# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**एम. ए. भाग-१(राज्यशास्त्र) : सत्र १**

## पर्यावरण आणि राजकारण
**(Environment and Politics)**

**एम. ए. भाग-१ (राज्यशास्त्र) : सत्र २**

## प्रशासनातील सद्यकालीन प्रवाह आणि समस्या
**(Recent Trends and Issues in Administration)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
एम. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-89345-12-4

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **प्रा. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर पर्यावरण आणि राजकारण व प्रशासनातील सद्यकालीन प्रवाह आणि समस्या हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. जयश्री कांबळे, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी, विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–१ : पर्यावरण आणि राजकारण**
**सत्र–२ : प्रशासनातील सद्यकालीन प्रवाह आणि समस्या**
**एम. ए. भाग–१**

## अभ्यास घटकांचे लेखक



| लेखक | सत्र–१ घटक क्रमांक | सत्र–२ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ | – |
| **श्रीमती मनिषा कुरणे**<br>श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,<br>माळवाडी–कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. सचिन भोसले**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | १ |
| **डॉ. दत्तात्रय सावंत**<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा,<br>ता. लांजा, जि. रत्नागिरी | – | २ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **पर्यावरण आणि राजकारण** | |
| १. | आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यात पर्यावरण | १ |
| २. | भारतीय परिप्रेक्ष्यात पर्यावरण | १७ |
| | **प्रशासनातील सद्यकालीन प्रवाह आणि समस्या** | |
| १. | प्रशासनातील सद्यकालीन प्रवाह | ३९ |
| २. | प्रशासनातील सद्यकालीन समस्या | ९१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यात पर्यावरण
## Environment in Global Context

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ विषय विवेचन
 १.२.१ पर्यावरणवादी विचारांची पार्श्वभुमी
 १.२.२ पर्यावरणाचे महत्व
 १.२.३ पर्यावरणवादाचे महत्व
 १.२.४ पर्यावरण चळवळीतील पर्यावरणवादाचे स्वरुप
 १.२.५ पर्यावरणवाद समस्या आणि आव्हाने
१.३ जागतिक पर्यावरणवादा समोरील समस्या
१.४ पर्यावरणवादा समोरील आव्हाने
१.५ जागतिक पर्यावरण परिषदा आणि हरित राजकारण
१.६ सारांश
१.७ पारिभाषीक शब्द व शब्दार्थ
१.८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे
१.९ सरावासाठी स्वाध्याय
१.१०अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये :-

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर पुढील गोष्टी समजावून घेता येतील.

१. पर्यावरण म्हणजे काय व पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्व समजावून घेता येईल.

२. पर्यावरणाच्या ऱ्हासाचे जबाबदार घटकाबदद्ल माहीती करुन घेता येईल.

३. पर्यावरणाच्या समतोलाची आवश्यकता व आव्हाने समजावून घेता येतील.

४. पर्यावरण ऱ्हासाचे राजकारण समजावून घेता येईल.

५. पर्यावरण रक्षणाच्या चळवळी आणि शाश्वत विकासाचे प्रयत्न समजावून घेता येतील.

## १.१ प्रस्तावना :–

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये पर्यावरण हा एक महत्वाचा राजकीय घटक म्हणून केंद्रस्थानी आकाराला आला आहे. जागतिक राजकीय अजेंडयावर केंद्रस्थानी येण्याचे कारण म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास हा मानव निर्मित आहे. या पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे अनेक समस्या जगासमोर उभ्या राहिलेल्या आहेत. जगातील आर्थिक विकास हा पर्यावरणाच्या ऱ्हासावर उभा आहे. त्यामुळे सजीव सृष्टीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. मानवाने बुध्दीच्या जोरावर पर्यावरणात हस्तक्षेप करुन स्वत:चे हित साधण्यावर भर दिला आहे.

मानवाच्या या अविचारी वर्तनामुळे इतर सजीवांवरही मोठे संकट आले आहे. रानटी अवस्थेपासून मानवी समाजाची उत्क्रांती होत गेली आणि आजचा आधुनिक अवस्थेपर्यंतचा मानव घडला. वैज्ञानिक संशोधन, औद्योगिक क्रांती, आधुनिकीकरण, तंत्रज्ञानातील क्रांती अशा विविध टप्प्यातून मानवी समाजाची जडणघडण झाली आहे. ही जडणघडण होत असताना निर्माण झालेल्या पर्यावरणविरोधी विविध कृतींमुळे पर्यावरण दूषित झाले आणि सजीव सृष्टी धोक्यात आली. मानवी समाजाची भौतिक वाटचाल सुरु असताना मानवाने पर्यावरणाचा सर्वव्यापी विचार न करता निसर्ग ओरबाडण्याची प्रवृत्ती ठेवली. त्यातून सजीवसृष्टीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आणि पर्यावरण संरक्षणाची जाणीव जागतिक बनली. सुरक्षित पर्यावरण मानवाच्या आर्थिक, सामाजिक व्यक्तीमत्वावर पर्यायाने राष्ट्राच्या विकासावर परिणाम करणारा घटक आहे हे आज सर्वमान्य झाले आहे.

## १.२ विषय विवेचन :–

पर्यावरण म्हणजे आजूबाजूला असणारी हवा, पाणी, जमीन, वनस्पती, पशुपक्षी आणि इतर सजीव व निर्जिव वस्तुंनी मिळून बनलेला परिसर पर्यावरणाच्या या मुलभूत घटकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे हस्तक्षेप केल्यामुळे त्याचे मुळ गुणधर्म बदलून ते दूषित होतात आणि निरुपयोगी बनतात. हे सर्व पर्यावरणाचे मुलभुत घटक आहेत, पर्यावरणाचे आधार आहेत. ते सजीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहेत. याचे संतूलन बिघडल्यामुळे प्रदूषण निर्माण होते. पर्यावरण हे जागतिक पातळीवर समांतर असल्याने एका राष्ट्रात होणाऱ्या प्रदूषणाचे परिणाम दुसऱ्या राष्ट्रांवर पडलेले दिसतात. परिणामी या सर्व गोष्टींचा प्रभाव आंतरराष्ट्रीय संबंधावर पडतो. यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात पर्यावरणवाद महत्त्वाची भुमिका बजावताना दिसतो. राष्ट्रे आपल्या परराष्ट्र धोरणात पर्यावरण सुरक्षेला अधिक महत्व व प्राधान्य देताना दिसू लागली आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीला आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचा महत्वाचा घटक म्हणून विशेष महत्व प्राप्त झाले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेसाठी राष्ट्रा-राष्ट्रामध्ये जीवघेणी स्पर्धा सुरु आहे. यातूनच पर्यावरण संरक्षणाची जाणीव देखील वैश्विक पातळीवर सर्वत्र दिसते.

### १.२.१ पर्यावरणवादी विचारांची पार्श्वभुमी :-

जरी पर्यावरणाविषयक समस्या आणि पर्यावरण ऱ्हासाचा भुतकाळ मोठा असला तरीही आर्थिक विकासाच्या पर्यावरणीय परिणामांबद्दलची जागरुकता दूसऱ्या महायुध्दानंतर निर्माण झाली आणि त्याला राजकीय स्वरुपदेखील याच काळात प्राप्त झाल्याचे दिसते. लोकांच्या माहितीसाठी पर्यावरणाचे विविध अभ्यास शास्त्रशुध्दपणे तयार केले गेले. पर्यावरणाच्या धोक्याचे इशारे देणारे अभ्यासदेखील झाले. परंतू खऱ्या अर्थाने पर्यावरण विचारांची सुरुवात रशेल कारसन यांच्या 'द सायलेंट स्पिंग' या पुस्तकाने केली. या पुस्तकाने जगाला पर्यावरण आणि मानवी अस्तित्व याबदद्लचे सखोल ज्ञान प्राप्त करुन दिले. १९६० नंतर पर्यावरण या संकल्पनेचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा विचार पूढे आला. मानवी बुध्दी आणि तंत्रज्ञानाने झालेल्या ऱ्हासाचे चित्र जगासमोर आले. त्याचबरोबर पर्यावरण संरक्षणाची जाणीवदेखील वैश्विक बनली.

पर्यावरण ऱ्हासाला मानवी कृती जबाबदार आहे अशी चिकीत्सा करण्यात आली. पृथ्वीवरील अनेक देश हे पृथ्वीवरील मर्यादित साधनसंपत्तीचा अमाप वापर करुन निसर्गाची शाश्वतता धोक्यात घालत आहेत. जगातील अनेक देश पर्यावरण सुरक्षेपेक्षा देशाच्या आर्थिक विकासाला अधिक प्राधान्य देताना दिसतात. त्यांच्या प्रदूषणकारी क्रियाकलापांमुळे पर्यावरणाचे आतोनात नुकसान करतात. जंगलातील वृक्षतोड, औद्योगिकरणाचे प्रदूषणकारी दुष्परिणाम, लोकसंख्या वाढ आणि शहरीकरण या सर्वांचा संबंध पर्यावरणाच्या ऱ्हासाशी आहे. यामध्ये विकसित आणि त्यापाठोपाठ अविकसित देशातील औदयागिकरण तसेच तेथील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा हा पर्यावरण ऱ्हासास कारणीभुत आहे. त्याचबरोबर त्यांची जगातील महासत्ता बनण्याच्या आणि बाजारपेठ काबीज करण्याचा हव्यासापोटी देखील मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास होताना दिसतो. तर अविकसित देशांमध्ये त्यांच्या जगण्याच्या चरितार्थांच्या गरजेपोटी पर्यावरणाचा ऱ्हास करताना दिसत आहेत. म्हणजे विकसित आणि अविकसित असे दोन्हींकडील देश आपआपल्या कृतीद्वारे पर्यावरणाचा ऱ्हास करताना दिसतात. परंतु जागतिकीकरणानंतर बाजारपेठांच्या देशातील संचारानंतर विकसित राष्ट्रे संपूर्ण जगभरामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास अधिक करताना दिसतात. विकसित राष्ट्रे या ना त्या प्रकारे व कारणाने पर्यावरणाचा ऱ्हास करताना दिसतात. विकसित राष्ट्रे त्यांच्या शक्तीचा वापर करुन अविकसित राष्ट्रातील साधन संपत्तीचा वापर 'ग्लोबल कॉमन्स' म्हणून करतात. पर्यावरण ऱ्हासाचा वापर राजकारणाला आव्हान देण्यासाठीसुध्दा वापरल्याचे दिसते. आणि पर्यावरण ऱ्हासामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण देखील प्रभावित झाले आहे.

### १.२.२ पर्यावरणाचे महत्व :-

पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे आज जगाला पर्यावरणाच्या असमतोलाला सामोरे जावे लागत आहे. प्रदूषित वातावरण हे निसर्गाच्या असमतोलाचे प्रमुख कारण आहे. मानवाने केलेली निसर्गाची अविवेकी लुट, अपरिमित हानी हेही कारण आहे. सेवा, सुविधा, सुख-सोयी आणि उपभोगवादी जीवन निसर्गातील साधनसंपत्तीच्या वापरातून आकारास आले. भुजल, वायू, खनिजे, वने, प्राणी या नैसर्गिक संपदेच्या

वापरातून मानवाची आजपर्यंतची वाटचाल सुकर झाली. निसर्गातील हस्तक्षेपाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे जागतिक तापमानवाढ त्यालाच ग्लोबल वॉर्मिंग असे म्हटले जाते. इंटर गव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंजच्या (IPCC) च्या चौथ्या अहवालानंतर ग्लोबल वॉर्मिंगच्या विषयाची मोठया प्रमाणात चर्चा झाली. जागतिक तापमान वाढीने पर्यावरणाची समस्या आधिक गंभीर झाली आहे वेगवेगळे अहवाल व निष्कर्ष पुढे येत आहेत. तापमानात झालेल्या चढ उतारांचाही मानवाच्या विकसित होण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव पडला आहे.

सुरक्षित पर्यावरण हे मानवाच्या भौतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहे. सुरक्षित पर्यावरणात व्यक्तिच्या व्यक्तीमत्वाचादेखील विकास होतो. व्यक्तीचा विकास म्हणजे पर्यायाने राष्ट्राचा विकास, आर्थिक, औदयोगिक विकासाच्या संकुचित अर्थामुळे मानवाने हव्यासापोटी निसर्गाची बेसुमार लुट केली आहे. या नैसर्गिक साधन संपत्तीवर स्वत:चा ताबा मिळविण्यासाठी जगभरातील अनेक राष्ट्रांमध्ये तीव्र स्पर्धा चालली आहे. या स्पर्धेतून विशेषत: वृक्षतोड, खनिजसाठे संपविणे, विज्ञान तंत्रज्ञानाच्या जोरावर वाढलेली उपभोगवादी संस्कृती यामुळे प्रदूषणात भर पडली आहे. ग्लोबल वॉर्मिंग सारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या वेगवेगळ्या प्रदूषणामुळे आणि पर्यावरणीय समस्यांमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळया समस्या निर्माण झाल्या. नवनवीन संकल्पना उदयाला आल्या. 'ग्लोबल कॉमन्स' च्या संकल्पनेने परस्परावलंबित्व वाढविणारी स्थिती निर्माण झाली. या सर्वातून सुरक्षित पर्यावरण आणि आर्थिक विकास यांची सांगड घालून मानवाला चिरकालीन विकास साधण्याची आवश्यकता आहे. आपले पर्यावरण सुरक्षित ठेऊन गरजा भागविताना त्याचबरोबर विकास साधताना पर्यावरणाची कमीत कमी हानी व्हावी यासाठी यूनोने जागतिक पर्यावरण परिषदांमध्ये कडक भुमिका घेऊन सुयोग्य शिफारशी केल्या आहेत. त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे निसर्गाचा ऱ्हास कमी होऊन भविष्यातील पिढ्यांसाठी साधनसंपत्ती राखून ठेवण्यास मदत होईल.

**१.२.३ पर्यावरणवादाचे महत्व :–**

आजच्या काळात पर्यावरण ऱ्हास ही एक राष्ट्रीय त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर गंभीर समस्या असल्याने हा ऱ्हास रोखण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध चळवळी सक्रिय आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास ही राष्ट्रापूरतीच नव्हे तर आंतराष्ट्रीय समस्या बनली आहे. जैवविविधतेचे संरक्षण, पाण्याच्या विविध स्त्रोतांचे प्रदूषण, जंगल, पृथ्वीचे आवरण, नद्यांचे प्रदूषण, हरीतपट्ट्यांचे संरक्षण, रासायनिक द्रव्यांचा वापर व त्याचे दुष्परिणाम इत्यादी विषयांना प्राधान्य देऊन विविध चळवळी संघर्ष करत आहेत. आशिया, आफ्रीका, यूरोप, अमेरिका अशा वेगवेगळ्या भागात जगभरामध्ये चळवळींनी पर्यावरण रक्षणाचे खुप मोठे कार्य केले आहे.

जगभरातील या सर्व पर्यावरणीय चळवळींमध्ये पाश्चिमात्य देशात १९७० च्या दशकामध्ये ग्रीनपीस, ग्रीन नेटवर्क, फ्रेंडस् ऑफ अर्थ. या चळवळी आकाराला आल्या. १९८० च्या दशकात घडलेल्या भोपाळ मधील वायू गळती, चर्नोबील वीज भट्टीतील स्फोट, आलास्कामध्ये झालेली तेलगळती आणि आखाती

युध्दात पेटविण्यात आलेल्या तेलविहीरी या घटना पर्यावरण चळवळींना आक्रमक होण्यास कारणीभुत ठरल्या.

दुसऱ्या महायुध्दानंतर शस्त्रास्त्र बंदी विरोधापासून सुरू झालेली ही चळवळ आजदेखील अविरतपणे पर्यावरण रक्षणाचे काम करत आहेत. या पर्यावरण चळवळींनी बऱ्याच मोठ्या प्रमाणात जनमानसात पर्यावरण जागृती निर्माण केली. तसेच राष्ट्रीय सरकारे व आंतरराष्ट्रीय स्तरावर युनायटेड नेशन्ससारख्या जागतिक संस्थेला देखील याची दखल घ्यायला लावून पर्यावरण संरक्षणाबदद्ल वेगवेगळे कायदे, करार करून सर्वांना पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी भाग पाडले.

### १.२.४ पर्यावरण चळवळीतील पर्यावरणवादाचे स्वरुप :-

पर्यावरणवाद त्याच्या सर्व रुपात पर्यावरण चळवळीमध्ये निर्माण झाला. चळवळ कशामुळे बनते याबदद्ल अनेक सिध्दांत आहेत. सामाजिक चळवळी संस्थात्मक नसतात. त्यांनी एक राजकीय भुभाग व्यापलेला असतो. जो दबाव गट, पक्ष आणि राज्याची प्रशासकीय प्रणाली, संसदीय प्रणाली सारख्या संस्थात्मक राजकीय स्वरुपापासून वेगळ्या असतात. समाजाच्या गैरसंस्थात्मक, अनौपचारिक क्षेत्राच्या राजकारणातूनच पर्यावरण चळवळी उदयाला आल्या. राजकारणाच्या या अनौपचारिक क्षेत्राबद्दल खूप कमी लिहले गेले आहे. तथापि सामाजिक चळवळीतील सिध्दांतकारांच्या मते बहुतेक नवीन आणि परिवर्तनीय कल्पना गैरसंस्थात्मक राजकारणातून सुरू होतात. हे सृजनशील लोकांचे गतिमान राजकारण आकारहीन जाळे, संघटना, तळागाळातील गट आणि यूतीमध्ये स्पष्ट होते. क्वचितच हे परिणाम औपचारिक कायदे आणि संस्थात्मक कायदयाद्वारे नियंत्रित केले जातात. परंतू याबदद्ल पारंपारिक राज्यशास्त्राने या दैनंदीन जीवनातील राज्यशास्त्राकडे खुपच दुर्लक्ष केले आहे.

### १.२.५ पर्यावरणवाद : समस्या आणि आव्हाने :-

पर्यावरणवाद हे एक व्यापक तत्वज्ञान, विचारधारा आणि सामाजिक चळवळ आहे. ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण आणि पर्यावरण सुधारण्याची चिंता आहे. याचा उपाय म्हणून पर्यावरणाच्या संवर्धनासाठी पर्यावरणातील बदलांचा मानवावर, प्राण्यावर व जैवविविधतेवर होणारा परिणाम समाविष्ठ आहे. पर्यावरणातील सजीव-निर्जिव प्राणी, पक्षी, संसाधने, मानव-प्राण्यांसह विचार व पर्यावरणीय बदलांचा मानवावर झालेला परिणाम या सर्वांचा एकत्रितपणे विचार केला जातो. पर्यावरणवाद हरीत विचारसरणी आणि राजकारणाच्या पर्यावरणीय नैसर्गिक पैलूंवर अधिक लक्ष केंद्रीत करते व सामाजिक पर्यावरण आणि पर्यावरणवादाची विचारधारा एकत्र करते. ''पर्यावरणवाद नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण, पूर्नसंचयित करतो आणि सुधारणांचा पूरस्कार करतो. पृथ्वीवरील महत्वपूर्ण घटक किंवा हवामानासारख्या प्रक्रियांचा पुरस्कार करतो. प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी प्राणी आणि वनस्पतींच्या वैविध्यतेचे संरक्षण करण्यासाठीची चळवळ म्हणून संबोधले जाते.''

## १.३ जागतिक पर्यावरणवादा समोरील समस्या :–

१. विकासापेक्षा पर्यावरणवाद सुरक्षिततेचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे प्रदूषण ही सामूहिक कृती समाजाचा एक मोठा भाग धोक्यात आणणारी आहे. त्याचा अधिक विस्तारित मुळ प्रवाह अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे. त्यामुळे पर्यावरणीय चळवळ कमी करण्याकडे कल असणारी आहे. कारण श्रीमंत समाज अधिकाधिक वस्तूंचा उपभोग घेण्यास उत्सुक असतो.

२. साठच्या दशकाच्या मध्यापर्यंत मोटारगाडी, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीनचा सामान्य वस्तू झाल्या होत्या. याचा अर्थ असा होता कि सर्व वर्गाकडे पैसे आणि उपभोगाची साधने दोन्ही होते.

३. शास्त्रज्ञ आणि विचारवंत स्त्रोतांच्या कमतरतेबद्दल आणि प्रजातीच्या लुप्त होण्याशी संबंधित बाबी तसेच आर्थिक वाढीची दिशा आणि कल राष्ट्रीय किंवा जागतिक परिसंस्थेवर त्याचा प्रभाव याविषयी माहीती देतात. विनाशाच्या या संदेशावर लोकांमध्ये रुची होती. समाजाने मापदंड स्वीकारले नाहीत तर निसर्गाला उपभोगाचे एक चांगले साधन म्हणून पाहिले.

४. पर्यावरणीय विचारसरणीसाठी बहुतेक निसर्गप्रेमीसाठी निश्चित निसर्गाशी असलेली बांधिलकी विरोधाभासाने स्पष्ट करतात की हजारो मैल चालून, दूर्मिळ तेल वापरुन वातावरण प्रदूषित करुन, राष्ट्रीय उदयाने, अभयारण्यांना भेटी देण्यास तयार होते. अशा प्रकारे पर्यावरण विरोधी म्हणजे जंगले किंवा पर्वतांच्या सौंदर्यात आश्चर्चचकित करणारी मुलभुत आणि अस्पर्शित नमूने म्हणून संरक्षित पर्यावरणवादयांनी फारसा प्रचार केला नाही.

५. पूर्व युरोपातील समस्यांमध्ये प्रामुख्याने वायू आणि जलप्रदूषण, कचरा व्यवस्थापन आणि दूषित मृदा याबाबतीत झेकोस्लोव्हाकिया आणि पोलंड हे प्रदूषणाच्या विळख्यात आहेत. उत्तर बाल्टिक आणि काळ्या समुद्रातील मोठ्या प्रदूषणासाठी हे देश थेट जबाबदार आहेत. सहाजिकच अशा पातळीच्या दूषिततेमुळे लोकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. पूर्वीच्या सोव्हीएत यूनियनच्या काही प्रदेशामध्ये जसे की बैकल सरोवर, अरल समुद्र आणि कझबास यासारख्या औद्योगिक केंद्रामुळे येथे कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. हे प्रमाण सोव्हिएतच्या सरासरीपेक्षा ५० टक्यांनी जास्त आहेत आणि श्वसनमार्गाचे आजार सामान्यपणे सर्वत्र दिसतात. मात्र पूर्वीच्या यूएसएसआर च्या अनेक आशियायी प्रदेशांमध्ये पर्यावरणीय ऱ्हास व त्याचे परिणाम, त्याचे दूषिततेचे स्तर लोकांना फारसे ज्ञात नाहीत.

६. प्रदुषणाच्या अनेक समस्यांचे श्रेय दुसऱ्या महायुध्दानंतर झालेल्या औद्योगिकीकरणाला दिले जाते. पश्चिम युरोप प्रगत तंत्रज्ञान विकसित करत असताना पूर्व युरोपच्या सरकारांनी पर्यावरणीय ऱ्हासाकडे दुर्लक्ष केले. या प्रकारच्या गंभीर पर्यावरणीय समस्यांमुळे निसर्ग संवर्धन किंवा वाळवंटांच्या समस्यांकडे फारसे लक्ष वेधले जात नाही.

७. पश्चिमात्य देशांमध्ये पर्यावरण चळवळ लुप्तप्राय प्राणी प्रजाती आणि नैसर्गिक अधिवास संरक्षणाच्या इच्छेतून उद्भवली. भारतात मात्र ती मानवी जगण्याच्या इच्छेतून निर्माण झाली. या चळवळींनी

शाश्वततेबरोबर सामाजिक न्यायाला चालना देण्याचे काम केले. चिपकोसारख्या चळवळींमधून नैसर्गिक संसाधने स्थानिक समुदायांनी वापरण्यासंबंधीचा हक्क मिळविण्याची विचारधारा आहे. परंतु राज्याने जंगले स्थानिकाकडून ती वापरण्याचा अधिकार काढून घेऊन व्यावसायिकांकडे शोषणासाठी वळविली.

## १.४ पर्यावरणवादा समोरील आव्हाने :–

१. १९९१ पासून जागतिकीकरणानंतर नवीन आर्थिक धोरण लागू करण्यात आले. नवीन आर्थिक धोरणाचा उद्‌देश दारिद्रय निर्मुलन आणि पर्यावरण संरक्षणाला एक गती निर्माण होईल असे वाटले असताना पर्यावरण आर्थिक उदारीकरणाचा मुख्य बळी ठरला आणि पर्यावरणावर पध्दतशीरपणे हल्ला केला गेला.

२. देश म्हणून आपल्या दिर्घकालीन भविष्याचा कोणताही विचार न करता राज्याने नवीन उदयोग खाणी टाऊनशीपसाठी वेळोवेळी मंजूरी दिली आहे.

३. भारतासारख्या दाट लोकवस्तीच्या देशात पर्यावरण समस्यांमुळे पर्यावरण आणि मानव दोन्ही परिणाम भोगत आहेत. नैसर्गिक जंगले तोडून त्याजागी विदेशी प्रजाती आणण्याचा कार्यक्रम सुरु झाल्याने मातीची झीज होत आहे. ते इंधन, चारा आणि कारागीर, कच्चा माल तसेच शेतकऱ्यांच्या सर्व संसाधनाचे नुकसान करत आहेत.

४. खाणप्रकल्पाचे योग्यरित्या नियमन न केल्यामुळे किंवा आधूनिक तंत्रज्ञान नसल्यामुळे गावकऱ्यांनी खालच्या नदी प्रवाहाच्या बाजूस वापरल्या जाणाऱ्या नद्या, डोंगरदऱ्या प्रदूषित होतात. या अर्थाने पर्यावरणीय जबाबदारी ही उच्चभ्रु नसून मानवी जगण्याचा आणि राष्ट्राचा आधार आहे.

५. चूकीच्या उद्योगांवर दंड लागू केला जात नाही. कायदयानुसार प्रत्येक नवीन प्रकल्पाचे पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन करणे आवश्यक आहे. परंतु आपल्याकडे प्रकल्पाचा मालकच असणारी व्यक्तीच अहवाल तयार करते.

६. १९७० आणि १९८० च्या दशकात अनिल अग्रवाल, भरत डोंगरा, कल्पना शर्मा, डॉ रेल डी मॉन्टे, उषा राय, शेखर पाठक, नागेश हेगडे यासारख्या पत्रकारांनी जंगलतोड, प्रजातींचे नुकसान, पाण्याचा गैरवापर शाश्वत उर्जा धोरणे या विषयांवर विपूल लेखन केले. परंतु १९९० च्या दशकात आर्थिक विकासाला वेग आला तेंव्हा पर्यावरण विरोधी प्रतिक्रियाही उफाळून आल्या.

७. भारताला पर्यावरण अंधकाराचे यूग म्हणता येईल अशा यूगाच्या मध्यभागी आपण आहोत. काही अपवाद वगळता राजकारणी लोक पर्यावरणाची काळजी करत नाहीत. कारण ते फक्त पाच वर्षाच्या निवडणूक चक्राचा विचार करतात.

८. भारताप्रमाणे चीनही पाश्चात्य देशांप्रमाणे इतर देशांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करतो. ज्याचे सर्व राहणीमान पाश्चात्याप्रमाणे आहे. ते वातुकुलित घरात राहतात. फँन्सी रेस्टॉरंटमध्ये खातात, स्वत:च्या महागडया मोटारगाडया वापरतात. सुट्टीमध्ये कुटूंबाला घेऊन जगाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत

प्रवास करतात. इतर राष्ट्रांनी ब्रिटन, अमेरिकेप्रमाणे औद्योगिकीकरणाचे प्रारुप स्विकारले तर हे जग संपून जाईल.

९. जागतिक स्तरावर हरीतगृह वायूंच्या संचयामुळे जलद आणि अपरिवर्तनीय हवामान बदलांचा धोका आहे. दुसरे म्हणजे भारत आणि चीन खंडीय स्तरावर या औद्योगिक प्रदूषणाचे पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम होतील. पाश्चिमात्य देशांनी आपले प्रदूषण करणारे उदयोग दक्षिणेकडे हलविले आहेत आणि त्याचा खर्च मात्र गरीब आशियायी देशांवर टाकला आहे.

## १.५ पर्यावरणाच्या जागतिक परिषदा आणि हरीत राजकारण :-

प्रचंड प्रमाणात आर्थिक विकासामुळे झालेल्या पर्यावरण ऱ्हासातून जागतिक पर्यावरण समस्या उद्भवल्या व त्यातून पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण झाली. पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करून त्यावर उपाय शोधण्यासाठी तातडीची गरज म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने पर्यावरण विभाग सुरू केला. या पर्यावरण विभागाचे उद्दीष्ट होते, पर्यावरण चळवळींना प्रोत्साहन देणे, पर्यावरण संरक्षणाची जाणीव जागतिक पातळीवर विविध देशांना करुन देणे. त्यांना अर्थसहाय्य पुरविणे व पर्यावरण जागृतीचा कार्यक्रम जागतिक पातळीवर यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करणे. त्यातून पर्यावरण परिषदा भरविल्या जातात. या पर्यावरण परिषदांमध्ये वेगवेगळया विषयावर चर्चा होते यातून पर्यावरण समस्येवर उपाय काढला जातो. या चर्चा होत असताना पर्यावरण संरक्षणाच्या हेतूबरोबर ती आपले राष्ट्रहितही साधताना दिसतात. त्याचबरोबर पर्यावरण संरक्षण करत असताना राष्ट्रहित डावलून देण्याच्या भूमिकेमुळे अनेक वेळा आक्रमक अथवा बचावात्मक पवित्रा घेतला जातो. यासाठी प्रत्येक राष्ट्र वेगवेगळ्या प्रकारे एकमेकाला शह कटशह देत असते. करार स्वीकारले अथवा नाकारले जातात व त्यातून पर्यावरणीय आंतरराष्ट्रीय राजकारण आकाराला येते.

पर्यावरण राजकारण हे वेगवेगळ्या स्वरुपात असते. त्यामध्ये विरोधाभास आणि तुलनेला विशेष महत्व असते. पर्यावरणाचा मानवी जीवनासाठी असलेला संदर्भ घेऊन पर्यावरणाचे नुकसान किंवा संरक्षण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध मार्गांचा उपयोग करुन प्रत्येक राष्ट्र आपल्या हिताच्या दृष्टिने सहमती किंवा विरोधाभास दर्शिवत असते. पर्यावरणीय भविष्यासाठी चाललेल्या राजकीय संर्घषाच्या धोक्याची जाणीव होऊन पर्यावरणाच्या संरक्षणासाठी जागतिक स्तरावर पर्यावरण परिषदा भरविल्या जातात.

### १.५.१ पर्यावरण परिषदांची आवश्यकता :-

मनुष्य हा पर्यावरणाचा घटक असल्याने संपूर्ण सजीव व निर्जिवांचे अस्तित्व पर्यावरणाच्या स्थितीवर अवलंबून आहे. लोकसंख्या वाढ, वाढते औद्योगिकरण, वाढते प्रदूषण यामुळे गेल्या काही दशकात पर्यावरणाच्या प्रश्नांनी अत्यंत गंभीर स्वरुप धारण केले आहे. पर्यावरणविषयक जागृतीची गरज जगातील सर्वच राष्ट्रांना जाणवू लागली. कारण पर्यावरणाचे संतूलन नष्ट झाल्यास पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व धोक्यात येईल. पर्यावरणातील विविध घटकातील मनुष्याचा हस्तक्षेप वाढत गेला आणि पर्यावरणाची स्थिती चिंताजनक बनली. विकासाच्या नावांखाली पर्यावरणामध्ये मानवी हस्तक्षेप वाढल्याने जैवविविधता ऱ्हास,

हवामान बदल, जागतिक तापमान वाढ यासारख्या विश्वव्यापी समस्या निर्माण झाल्या संयुक्त राष्ट्र संघनेने जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीवरील परिस्थितीकीय तंत्रावर विपरित परिणाम घडून आले. याचे परिणाम जगभरात सर्वत्र भोगावे लागताहेत त्यामुळे जगभरातील सर्वच राष्ट्रांनी या हवामान बदलाच्या समस्येवर तोडगा काढावा, उपाय शोधावेत यासाठी पर्यावरण परिषदा आयोजित करण्यात आल्या. पर्यावरणाच्या समस्या केंद्रस्थानी आल्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधावर त्याचा प्रभाव पडला. त्यातून वादविवाद निर्माण झाले व आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळे प्रश्न व समस्या निर्माण झाल्या. यातून मार्ग काढण्यासाठी पर्यावरण परिषदांची सुरवात १९७२ मध्ये झाली. १९७२ मध्ये स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे पहिली जागतिक पर्यावरण परिषद भरली.

### १.५.२ स्टॉकहोम परिषद (१९७२)

इंग्लडमध्ये उदयास आलेली औद्योगिक क्रांतीमुळे कारखाने, रस्ते, विकास प्रकल्प, अण्वस्त्रे व विकासात्मक प्रकल्पांमुळे नैसर्गिक संसाधनांचा अनिर्बंध वापर होऊ लागला. प्रदूषणाच्या समस्या मोठ्या प्रमाणात वाढु लागल्या. हळूहळू पर्यावरणाचा समतोल ढासळू लागला. या काळात पर्यावरण प्रदूषण आणि त्याच्याशी निगडीत अन्य समस्या या त्या देशाच्या सीमेच्या अंतर्गत असलेल्या जीवसृष्टीला हानीकारक ठरतात असा सर्वसाधारण समज होता. परंतू हवेला राजकीय अथवा भौगोलिक सीमेची बंधने नसतात. आणि देशातील प्रदुषणामुळे उत्सर्जित होणारे वायू हवेत मिसळून सीमापार अन्य कोणत्याही देशाच्या हद्दीत प्रवेश करु शकतात. १९६० च्या दशकात स्वीडनमध्ये होत असलेल्या आणि तेथील जलीय परिसंस्थेला घातक ठरत असलेल्या आम्लपर्जन्याला कारणीभुत असलेले प्रदूषक वायू सीमेपलिकडील मधून हवेच्या माध्यमातून स्वीडनच्या हवेत प्रवेश करत असल्याचे संशोधनातून सिध्द झाले. या पार्श्वभूमीवर स्वीडन सरकारने संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत आपली व्यथा मांडली. आणि जगातील सर्व राष्ट्रांनी एकाच मंचावर येऊन प्रदूषण व इतर पर्यावरणीय समस्यांवर विस्तृतपणे चर्चा करण्यासाठी एक जागतिक परिषद आयोजित करावी अशी विनंती केली. परिणामी स्वीडनची राजधानी असलेल्या स्टॉकहोम या शहरातच अशी परिषद भरविण्याचे निश्चित झाले. यासाठी १९७२ साली ५ जून ते १६ जून असे तब्बल दहा दिवस ही परिषद भरविण्यात आली.

ही परिषद मानवी पर्यावरणाशी निगडीत समस्यांवर आधारित होती. या परिषदेला ११४ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेमध्ये पूर्ण मानवजातीसाठी 'फक्त एक पृथ्वी' हे घोषवाक्य स्वीकारले. यामध्ये '५ जून' हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला गेला. या परिषदेमुळे खऱ्या अर्थाने पर्यावरणाकडे गांभीर्याने बघण्याकडे आंतराष्ट्रीय स्तरावर महत्व प्राप्त झाले.

### १.५.३ स्टॉकहोम परिषद व पर्यावरण राजकारण :–

स्टॉकहोम परिषदेची निर्मिती उत्तरेकडील राष्ट्रांच्या पर्यावरण चिंतेतून निर्माण झाली हे सुरवातीच्या टप्प्यातील मत होते. परंतू विकासाचा अभाव असणे हा एक प्रदूषणाचा महत्वाचा घटक आहे असे विकसित राष्ट्रांचे मत होते. १९७२ मध्ये पर्यावरण परिषदेत पर्यावरणावरील स्टॉकहोम जाहीरनाम्यात विकसित

राष्ट्रांकडून २६ तत्वे निश्चित करण्यात आली होती. त्यामध्ये तर्कसंगत नियोजन आणि एकात्मिक विकास साधल्याने पर्यावरणाची हानी न करता विकास साधला जाईल अशी ग्वाही होती. परंतु मानवी पर्यावरणासाठी सोबतची कृती आराखडा किंवा उद्दिष्ट्ये याविषयी माहीती नव्हती. गरीबी, असमानता, लोकसंख्येचा दबाव हे गरीब देशांच्या विरोधात व्यापाराच्या अटी लावून त्याचे आधिवास नष्ट करणारे प्रमुख घटक म्हणून ओळखले जातात. या घटकांची आवश्यकता ओळखून या समस्यांवर मात करण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कृती करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. परंतु आर्थिक वाढीच्या विकासावर आधारित विकास जगाच्या बहुतेक भागासाठी मानवी प्रतिष्ठा, सुरक्षा, न्याय आणि समानता सुरक्षित करण्यात यश आले नाही. तथापि आर्थिक वाढ आणि औदयोगिकरणाशिवाय दक्षिणेतील जीवनमान सुधारणार नाही असा आग्रह धरला. त्याचबरोबर दक्षिणेतील गरीब राष्ट्रांचे चूकीचे निर्णय या परिस्थितीला कारणीभुत आहेत हे मान्य करताच जागतिक मंदी, उच्च व्याजदार, प्राथमिक उत्पादनांच्या घसरलेल्या किंमती आणि विकसित राष्ट्रांचा संरक्षणवाद याला जबाबदार आहे अस नमूद केले गेले. अविकसित राष्ट्रांना निधी हस्तांतरीत करणे हा त्यावरील उपाय होता. परंतु विकसित देश अविकसित देशांचा पाठींबा मिळविण्यास अयशस्वी झाले. विकसित राष्ट्रांनी शक्य असतानाही अविकसित राष्ट्रांना कबूल केलेला निधी देणे नाकारले. यातून त्यांना अविकसित राष्ट्रांची अडवणूक करून आपल्याला हवे तसे अविकसीत राष्ट्रांना वागवून आपले राष्ट्रहित साधण्याचे त्यांचे राजकारण दिसून येते. इतर निदेशकांची गणना करताना नैसर्गिक संसाधनांचे अवमुल्यन विचारात घेत नाहीत. नैसर्गिक संसाधन प्रणाली आणि पर्यावरण संसाधनावर आर्थिक क्रिया कशा अवलंबून आहेत हे सांगण्याचा आटापिटा करतात व व्यापार पूरक परिस्थिती बनवतात.

### १.५.४ रिओ परिषद – १९९२ (पृथ्वी परिषद)

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमातील रिओ परिषद ही पर्यावरणीय आणि विकासात्मक संकटाचा परिणाम होता. यामुळे पर्यावरणाबददल अधिकाधिक संशोधन झाले. हा काळ वैज्ञानिक प्रगतीचा परिणाम म्हणून ओळखला गेला. या सर्वांमुळे ब्रुडलँड कमिशनचे विसर्जन केले व 'अवर कॉमन फ्यूचर' प्रकाशित केले. ब्रुडलँड अहवालाने रिओडी जानिरिओ येथे १९९२ च्या पर्यावरण आणि विकासावर परिषद घेण्याचे ठरविले. ज्याला आपण यु.एन.सी.ई.डी आणि ईसाओ ९२ म्हणून ओळखले गेले. पृथ्वी शिखर परिषद जी ११२ राष्ट्र प्रमुखासह १७९ राज्यांच्या प्रतिनिधींना एकत्र आणणारी आजवरची जागतिक नेत्यांची सर्वात मोठी परिषद होती. ज्याने पर्यावरण अजेंडयावर संबंधित दहा मुदद्‌ मांडले.

### १.५.५ परिषदेतील राजकारण :–

UNCED ने पर्यावरण आणि विकासात्मक संकल्पनांचा परस्पर संबंध ओळखला. तरीसुध्दा या परिषदेच्या दोन मुदयांवर ताण आणलेला होता. अविकसित राष्ट्रांनी पर्यावरणाचा मुख्य स्त्रोत म्हणून स्वत:च्या विकासाच्या संकटावर व आंतरराष्ट्रीय असमानतेच्या मुद्यांवर जोर दिला. आणि येणाऱ्या पर्यावरणीय संकटाची भिती व्यक्त केली. परंतु विद्यमान आंतरराष्ट्रीय शासनाचा किंवा प्रभावीपणे नवीन वाटाघाटी करण्याचा, आर्थिक किंवा राजकीय शक्ती खर्च घालण्याची त्यांची इच्छा नव्हती. श्रीमंत राष्ट्रांवर

मर्यादा, बंधने घातल्या गेल्या नव्हत्या. परंतु परिषदेतील चर्चेच्या प्रक्रियेत श्रीमंत राष्ट्रांनी वादविवाद केला होता. या परिषदा जरी पर्यावरणाच्या रक्षणासाठी असल्या तरी देखील त्यामध्ये नेहमीच पर्यावरणीय राजकारणाचा समावेश असतो. दक्षिणेकडील गरीब राष्ट्रे उत्तरेकडील श्रीमंत राष्ट्रांना पर्यावरण प्रभाववादाचा आरोप लावतात तसेच दक्षिणेकडील राष्ट्रेही त्यांच्यावर वसाहतवादी आर्विभावाचा आरोप लावतात. नेहमीप्रमाणेच विकसित राष्ट्रे वरचढ होताना दिसतात. हा प्रश्न पर्यावरणवादातील दक्षिणेकडील राष्ट्रांची आव्हाने वाढवतो.

विशेषत: हरीतगृह वायू उत्सर्जन मर्यादित करण्यासाठी अविकसित राष्ट्रांनी केलेल्या किंवा न केलेल्या १९९२ च्या कार्बनडाय ऑक्साइड पातळीवर कार्बन डायऑक्साइड ६० टक्के कपात आवश्यक असल्याचा अंदाज IPCC चा होता. मात्र या संबंधीची वचनबध्दता अमेरिकेने पूर्ण केलेली नव्हती. या परिषदेतील शब्दरचना खुप कमकुवत होती. जी छोट्या देशांना स्वीकारण्यास अवघड होती. पण नंतर युरोपियन यूनियनने ती स्वीकारण्याचे कबुल केले. कारण अविकसित राष्ट्रांना परिषदेतील करार पूर्ण करण्याच्या दृष्टीने ते आवश्यक होते.

**१.५.६ क्योटो प्रोटोकॉल :-**

क्योटो प्रोटोकॉल हा आंतरराष्ट्रीय करार असून याचा उद्देश कार्बन डाय ऑक्साइडचे उत्सर्जन आणि वातावरणातील हरीतगृह वायुंचे प्रमाण कमी करण्यासाठी संयूक्त राष्ट्र संघटनेने जपानच्या क्योटो या शहरामध्ये ही परिषद भरविली होती. ज्याचा उद्देश कार्बन डाय ऑक्साइड उत्सर्जन आणि वातावरणातील हरीतगृह वायू उत्सर्जन कमी करणे हा आहे. हा करार १९९७ मध्ये संमत झाला आणि २००५ साली प्रत्यक्षात आला.

संयुक्त राष्ट्रांची वातावरण बदलासंबंधीच्या संरचनात्मक परिषदेच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी सभासद देशांच्या परिषदेच्या माध्यमातून झाली. त्यातील तिसरी परिषद क्योटो प्रोटोकॉल, प्रोटोकॉल म्हणजे असा करार जो परिषदेच्या कार्यक्रमाला कार्यान्वित करतो. या कराराने अनुसुची एकमध्ये समाविष्ठ असलेल्या ३७ विकसित देशांनी २०१२ पर्यंत हरीतगृह वायू कमी करण्याचे कायदेशीर निर्बंध स्वीकारले होते. यानुसार या देशांनी त्यांच्या १९९९ साली असलेल्या हरीतगृह वायू उत्सर्जनाच्या प्रमाणाच्या सरासरी ५.२ टक्के उत्सर्जन कमी करावे असे ठरविले. १९२ देश क्योटो प्रोटोकॉलमध्ये सामील झाले. या प्रोटोकॉलला १३७ अविकसित देशांनी कायदेशीर मंजूरी दिली आहे. पण अमेरिकेने मात्र यात सामील होण्यास नकार दिला आहे. या प्रोटोकॉलच्या अंमलबजावणीसाठी 'अजब्टेशन फंड' ची स्थापना करण्यात आली. २००१ सालच्या माराक्केश कराराने क्योटो प्रोटोकॉलच्या कायदेशीर मंजुरीकडे महत्वाचे पाऊल टाकले. युरोपीय युनियन त्यांचे आठ टक्क्यांचे लक्ष्य साध्य करण्यातही यशस्वी झाली आहे. २००१ मध्ये यूरोपीय संघाने अविकसित देशांना प्रदूषण नियंत्रणासाठी ४०० कोटी डॉलर देण्याची हमी दिली.

**कराराच्या मर्यादा व हितसंबंधाचे राजकारण :–**

जगातील अनेक देश या करारात सामील होऊनही हरीतगृह वायूंचे मोठ्या प्रमाणात उत्सर्जन करणारी अमेरिका यात नसल्यामुळे हा करार फार प्रभावी ठरला नाही. २०१२ साली रशिया, कॅनडा, जपान, न्यूझीलंड या देशांनी या करारातून माघार घेतली. या कराराने केवळ विकसित देशावरच निर्बंध घातले म्हणून अमेरिकेने या कराराचे समर्थन केले नाही. भारत आणि चीन सारख्या प्रभावी आशियायी आर्थिक सत्तांना या करारान्वये सवलती दिल्या गेल्या. भारत आणि चीन यांचे दरडोई उत्सर्जन विकसित देशांच्या दरडोई उत्सर्जनाच्या तुलनेत खुप कमी असल्याचे कारण देऊन मिळणाऱ्या सवलतींचे समर्थन करतात. यावरुन स्पष्ट होते की विकसित आणि अविकसित देशांमध्ये उत्सर्जन कोणी किती कमी करावे याबाबत विवाद आहेत.

क्योटो प्रोटोकॉलची अंमलबजावणी क्लिष्ट होती. त्यात विषारी वायूंचे उत्सर्जन रोखण्याचा प्रस्ताव होता. जे शेती, वाहतूक, उर्जा क्षेत्रातून सोडले जातात. ही क्षेत्रे कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असतात. २०१२ साली क्योटो प्रोटोकॉलच्या बांधिलकीचा पहिला टप्पा व त्याच्या वैधतेची मुदत वाढवून २०२० पर्यंत वाढवली गेली आणि २०१३–२०२० या प्रोटोकॉलच्या बांधीलकीच्या दुसऱ्या टप्प्याला सुरवात झाली. भारताने या करारावर स्वाक्षरी केलेली आहे.

हे निर्बंध कसोशीने पाळले जावेत म्हणून 'कॅप अॅण्ड ट्रेड' कार्बन ट्रेडींग, जॉईंट इम्लिमेंटेशन प्रोजेक्ट हे अविकसित देशांनी स्वत:वर घातलेले ऐच्छिक निर्बंध या निर्बंधाच्या माध्यमातून हरीतगृह वायू उत्सर्जन कमी करण्याचा हा समग्र कार्यक्रम 'कॉमन डीफरशिएटेड अॅण्ड रिस्पेक्टीव्ह कॅपॅबिलिटी' या तत्वावर आधारित आहे म्हणजेच प्रत्येक देश स्वत:च्या क्षमतेनुसार सारख्या स्वरुपाची पण तरीही भिन्न प्रमाणात जबाबदारी निभावतो. त्यामुळे काहींनी उत्सर्जन कमी करण्याची जबाबदारी घेऊन इतरांनी केवळ परिणामी सुबत्तेचा उपभोग घेण्याची शक्यता कमी होते.

क्योटो प्रोटोकॉलमुळे एकुणच पर्यावरण संरक्षण करताना शाश्वत विकास साधणे यावर भर देण्यात आला आहे. नव्या शतकात जागतिक तापमान वाढीला नियंत्रीत करू पाहणाऱ्या या कराराचे यश उदारमतवादी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सहकार्याच्या मुल्यावर अवलंबून आहे. विकसित आणि अविकसित देशांचा समन्वय यासाठी आवश्यक आहे.

**१.५.७ पॅरीस करार (२०१५)**

१२ डिसेंबर २०१५ रोजी संयुक्त राष्ट्र फ्रेमवर्क कन्व्हेशन ऑन क्लायमेट चेंज [UNF ccc] मधील १९६ पक्षांनी पॅरिस करार केला. ज्यामध्ये हवामान बदलाचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सामुहिक प्रयत्नांसाठी एक नवीन कायदेशीर बंधनकारक चौकट आहे. या परिषदेमध्ये जागतिक अर्थव्यवस्थेच्या कार्बन मुक्ततेसाठी महत्वाचे टप्पे प्रदान केले. पॅरिस परिषदेत उच्च महत्वाकांक्षा आणि एकत्रीकरणासारख्या त्यांच्या अंतिम अवलंबनासाठी देशांना एकत्र करण्यात महत्वाचा ठरला.

मार्शल आयर्लडचे परराष्ट्र मंत्री टोनी ब्रम यांच्या नेतृत्वाखाली १५ देशांच्या समूहाने मुलत: विकसित देशांना कार्बन उत्सर्जन कमी करण्याची अट घालण्यात आली. व विकसनशील देशांसाठी ही अट थोडी शिथील करण्यात आली. पॅरीस परिषदेमध्ये कमी तापमानवाढ करण्यासाठी करार करण्यात आला. पण या करारामध्ये कोणतेही कायदेशीर बंधन घालण्यात आले नाही. पॅरीस करार हा UNF ccc च्या निर्णयाचा संलग्नक म्हणून स्वीकारण्यात आला. पॅरिस करार अंमलात येण्यापूर्वीच त्याच्या अंमलबजावणीचे नियम तयार झाले होते. पॅरिस करार अंमलात येण्यासाठी एक विशिष्ट कालावधी निर्धारित केलेला होता. पॅरिस करार अमेरिकन शिष्टमंडळाने एक आज्ञा म्हणून मानला होता. त्याला उत्सर्जन बंधनकारक नसल्याने त्यांनी या कराराला अनिष्ठ दर्शवूनच २०१६ मध्ये अमान्य केला. अमेरिकेचे २०१६ चे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या करारातून अध्यक्ष पदावर निवडून आल्यानंतर माघार घेतली.

या परिषदेमध्ये विशेष पण भिन्न जबाबदाऱ्या व संबंधित देशाची क्षमता हे तत्व स्विकारले गेले. त्यामुळे ते नियम वेगवेगळ्या राष्ट्रांना त्याच्या विकासाच्या क्षमतेवर वेगवेगळे लागू केले जातील असा असल्यामुळे ही बाब अमेरिकेने वेगळया अर्थाने घेतली. त्यामुळे विकसित आणि अविकसित देशांनी त्याला समान प्रतिसाद दिला पाहीजे. ही त्यांची समजूत येथे प्रतिबिंबित होते. करारातील सर्व मुद्दे जबाबदारीची विभागणी, हवामान न्याय किंवा व्यावहारिक समस्या सोडविण्यासाठी तत्वावर असली तरी विकसित आणि अविकसित देशामधील साध्या फरकाच्या पलिकडे जाणारी एक व्यापक संकल्पना आहे. त्याचबरोबर राष्ट्राची अनुकुल क्षमता वाढविणे, लवचिकता बळकट करणे आणि समर्थन देणे ही जागतिक वचनबध्दता असेल. २०२५ पर्यंत दरवर्षी १०० अब्ज US $ डॉलर विकसित देशांनी अविकसित देशांना इच्छेने दयावेत असे या करारात सांगण्यात आले. सार्वजनिक निधी आर्थिक क्षेत्रात महत्वपूर्ण भुमिका बजावेल आणि विकसित देशांनी याचा अहवाल वर्षातून दोनदा देणे आवश्यक आहे. हे तत्व दंडात्मक कार्यवाहीस पात्र नाही. परंतू या सर्व नियमांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात जवळजवळ सर्वच देशांनी याचा स्वीकार केला होता. परंतू तळापासूनची प्रक्रिया, एकूण देशांची महात्वाकांक्षा आणि नियमांच्या संदर्भात संमिश्र परिणाम झाला.

## १.६ सारांश :–

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या परिघामध्ये १९६० व १९७० च्या दशकामध्ये 'पर्यावरणाला' विशेष महत्व प्राप्त झाले. 'पर्यावरण' हे व्यापक चळवळीमधून विचारधारेतून आणि संशोधकांच्या संशोधनातून एक महत्वाचा घटक म्हणून केंद्रस्थानी आली. ते अनेक कारणांनी औद्योगिक क्रांती पासून जगभरामध्ये उद्योगधंद्यांची वाढ, बदलती जीवनशैली, संसाधनांचा अतिवापर यामुळे पर्यावरणाच्या ऱ्हासास सुरवात झाली. मानवी विकासाच्या चूकीच्या संकल्पनेमुळे निसर्ग ओरबाडण्याची मानवाची प्रवृत्ती व आर्थिक गरज बनली. ही गरज काही वेळेला आर्थिक तर काही वेळेला जीवनाची प्राथमिक स्वरुपातील होती. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे औद्योगिकरण व मानवी विकासासाठी लागणाऱ्या लोकसंख्या वाढ, आम्लपर्जन्य निर्वनीकरण, वाळवंटीकरण यासारख्या समस्या जगभर जाणवू लागल्या. एका ठिकाणी झालेल्या पर्यावरणीय प्रदूषणाचे

परिणाम दूसऱ्या ठिकाणी जाणवू लागेल. त्यातून मानवी जीवनावर याचे परिणाम जाणवू लागले. तसेच ते राज्या-राज्यातील भौगोलिक सीमांबरोबर राजकीय सीमांवरदेखील याचा परिणाम जाणवू लागले. व त्याचा परिणाम राजकीय क्षेत्रावरदेखील जाणवू लागला. यातून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात ताण-तणाव निर्माण झाले. याचा परिणाम आंतरराष्ट्रीय राजकीय प्रक्रियेवर पडला. या सर्व गोष्टींबरोबर विविध पर्यावरण संरक्षण व जागृती संबंधी वेगवेगळया साहित्यकृती निर्माण झाल्या. या साहित्यकृतीतून लोकजागृती निर्माण झाली व लोकजागृतीतून वेगळया पर्यावरण चळवळी निर्माण झाल्या. पर्यावरण चळवळींनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय राजकीय भूभाग व्यापला. यामध्ये राजकीय व सामाजिक विश्व ढवळून निघाले. याची दखल घेऊन याचा परिणाम म्हणून संयूक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाची निर्मिती झाली. या संघटनेद्वारे पर्यावरण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यामध्ये पर्यावरण, शिक्षण, जागृती व वाटाघाटी संदर्भात कार्यक्रम घेण्यास संयुक्त राष्ट्र संघटनेने सुरवात केली. या कार्यक्रमांमध्ये पर्यावरण परिषदा हे एक पर्यावरणसंबंधी जागृती, संरक्षणासाठीच्या प्रयत्नामध्ये परिषदा घेतल्या गेल्या. या परिषदा हे आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण संरक्षण, जबाबदारी, वाटाघाटी याचे हे व्यासपीठ आहे. या व्यासपीठावर एकत्र आलेल्या देशांमध्ये चर्चेच्या माध्यमातून वेगवेगळे पर्यावरणीय मुददे समोर आले आणि त्यातून वादविवाद घडून आले. यामध्ये विकसित आणि अविकसित राष्ट्रांमध्ये मतभेद निर्माण झाले. या मतभेदातून वाटाघाटी करण्यासाठी परिषदांच्या माध्यमातून पर्यावरण करार UNO च्या माध्यमातून दोन्हीकडील राष्ट्रांमध्ये घडून आले व राज्यशास्त्रामध्ये पर्यावरणीय राजकारणासारखे नवीन आयाम निर्माण झाले.

## १.७ पारिभाषीक शब्द व शब्दार्थ

१. पर्यावरण ऱ्हास : मृदा, हवा, पाणी या नैसर्गिक घटकाचे प्रदुषणामुळे होणारे नुकसान.

२. प्रदुषण : हवा, पाणी, मृदा या नैसर्गिक घटकाच्या रचनेमध्ये झालेला बदल.

३. पर्यावरण परिषद : पर्यावरणाचा समतोल टिकून राहण्यासाठी झालेल्या चर्चा.

## १.८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. पर्यावरण विषयक परिणामांबददल जागरुकता ........ महायुध्दानंतर निर्माण झाली.

२. पर्यावरण संरक्षणासाठी काम करणारी ........ ही आंतराष्ट्रीय संस्था आहे.

३. जागतिक पर्यावरण दिन ........ रोजी साजरा केला जातो.

४. ........ ही पहिली पर्यावरण परिषद होती.

५. क्योटो परिषद ........ या देशात झाली.

६. स्वत:च्या गरजा भागवत असताना भावी पिढींच्या गरजांची पूर्तता होण्यासाठी विचार करून संसाधन वापर व विकासाला ........ म्हणतात.

७. २०१५ साली ........ येथे जागतिक पर्यावरण परिषद घेतली गेली.

८. १९९२ साली रिओडी जानेरो येथे झालेल्या परिषदेचे नांव ........ आहे.

९. सुरक्षित पर्यावरण हे मानवाच्या ........ आणि ........ विकासासाठी आवश्यक आहे.

१०. पदार्थांचे मुळ गुणधर्म बदलून त्यामध्ये रासायनिक बदल घडण्याला ........ म्हणतात.

उत्तरे – १) दुसऱ्या, २) युनो, ३) ५ जून, ४) स्टॉक होत परिषद, ५) जपान, ६) शाश्वत, ७) पॅरीस, ८) पृथ्वी, ९) भौतीक व सामाजिक, १०) प्रदुषण.

**ब) टिपा लिहा.**

१) पर्यावरणाचे महत्व

२) पर्यावरणवाद

३) पर्यावरणवादासमोरील आव्हाने

४) पर्यावरण परिषदांची आवश्यकता

५) स्टॉकहोम परिषद

६) पृथ्वी परिषद

७) क्योटो प्रोटोकॉल

८) पॅरिस करार

## १.९ सरावासाठी स्वाध्याय

पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. पर्यावरणाचे राजकारण म्हणजे काय? स्टॉकहोम परिषदेतील राजकारण सांगा?

२. पर्यावरण ऱ्हास म्हणजे काय? कोणकोणत्या कारणांनी पर्यावरण ऱ्हास होतो ते स्पष्ट करा.

३. संयुक्त राष्ट्र संघटनेने पर्यावरणासाठी केलेले प्रयत्न सांगा.

४. विकसित आणि अविकसित राष्ट्रांचे पर्यावरण राजकारण विषद करा.

## १.१० अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


1. Boresep Ester 1965 'The condition of agriculture growth; George Allen of unwin ltd. Resdin house MeuSum street London.'
2. Carson R, 11962; 'Silent Sring' fawceltl crest New York.
3. Coall(1987) 'Develoment & underdevelopment profile of third world. Methuan London.
4. Dahi R. (1961 Who Governs? Democrocy and powers in American city New Hevan. C T Yele university press, America.

मराठी, दूय्यम साधने.

१. बर्वे सिध्दीविनायक, २००७ 'पर्यावरणशास्त्र' ओरीयन्ट ब्लाक स्वान.

२. देवळाणकर अतूल २००९ परवड पर्यावरणाची विवेकी पर्यावरण वादांची मौज प्रकाशन गृह पुणे.

३. आपटे मोहन २००९ 'मला उत्तर हवयं' राजहंस प्रकाशन पुणे.


❑❑❑

# घटक २

# भारतीय परिप्रेक्ष्यात पर्यावरण

## Environment in Indian Context

**अणुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.१.१ भारतातील पर्यावरण ऱ्हासाची कारणे व परिणाम

२.१.२ भारतातील पर्यावरण आणि विकासाचे राजकारण

२.१.३ भारतातील पर्यावरण चळवळी

२.१.४ भारत आणि शाश्वत विकास

२.२ सारांश

२.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

२.४ सरावासाठी स्वाध्याय

२.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर पुढील गोष्टी समजावून घेता येतील.

१. पर्यावरण म्हणजे काय? त्याचे स्वरुप समजावून घेता येईल.

२. भारतातील पर्यावरण ऱ्हासाची कारणे समजावून घेता येतील.

३. भारतातील पर्यावरण आणि विकासाचे राजकारण समजावून घेता येईल.

४. भारतातील प्रमुख पर्यावरण चळवळींबददल माहिती करुन घेता येईल.

५. शाश्वत विकास म्हणजे काय? व भारतातील शाश्वत विकासाची स्थिती समजावून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

पर्यावरणाची व्याख्या करताना आपल्या सभोवतालचा प्रदेश म्हणजे पर्यावरण. ज्याप्रमाणे मानवी शरीरामध्ये कार्य, उत्पादन आणि उपभोग यासारख्या क्रिया घडतात आणि त्या क्रियांद्वारे मानवी कार्य चालते. त्याचप्रमाणे पर्यावरणामध्ये वातावरण, हवा, पाणी, जमिनी पासून उर्जा वाहक, माती आणि वनस्पती, प्राणी आणि परिसंस्था यासारख्या नैसर्गिक संसाधनापर्यंत पसरलेले आहे. भौतिक वातावरण आणि व्यक्ति, व्यक्ति आणि समाज यांच्यातील संबंध बहुगुणित आणि बहुआयामी, गुणात्मक तसेच परिणामात्मक पैलू आहे. नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता आणि वापर याचा परिणाम विकास प्रक्रियेच्या गतीवर होतो. शहरी समाजासाठी पर्यावरणाचा मोठा भाग मानवनिर्मित आहे. परंतु तरीही कृत्रिम वातावरण, इमारत, रस्ते आणि अवजारे, मोटारगाड्या, श्रम आणि नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेवर आधारित आहेत. यामुळे घरातील वातावरण, कामाचे ठिकाण हे स्वत:च्या अटींवर हाताळले जाणारे पर्यावरणाचा एक वेगळा भाग म्हणून गणले जाते. घरातील वातावरण हे सहसा सार्वजनिक आरोग्याच्या हातात असते. आरोग्याचे धोके मुख्यत: वातावरण गरम होणे, स्वयंपाक करणे आणि प्रकाश व्यवस्था याच्याशी निगडीत असते. कमी दर्जाचे इंधन, अपूरी वायूवीजन या मुख्य समस्या असतात. या व्यतिरिक्त आर्द्रता, प्रकाश, बांधकाम साहित्य, रंगांमधील घातक पदार्थांशी संबंधित समस्या असू शकतात. पिण्याचे पाणी, सांडपाणी आणि कचरा या समस्या निवासस्थानाशी संबंधित नसून योग्य पायाभुत सुविधांच्या अभावाशी संबंधित आहेत. घरातील पर्यावरणीय आकडेवारी मानवी वसाहती आणि शहरी पर्यावरणावरील आकडेवारीचा उपसंच मानली जाऊ शकते. आर्थिक विकास आणि मानवी समृध्दीसाठी पृथ्वी आणि नैसर्गिक संसाधनाचे शाश्वत प्रशासन आवश्यक आहे. चांगल्या प्रकारे देखरेख केल्यास अतुलनीय, वैशिष्ट्यपूर्ण मालमत्ता, पाणलोट यांना सर्वसमावेशक विकास, निर्वाह सुरक्षा आणि दारिद्रय कमी करण्यास समर्थन देऊ शकतात. नैसर्गिक संसाधने मोठया संख्येने व्यक्तींना व्यवसाय देतात आणि मोठया प्रमाणात मुल्यांत्मक उत्पन्न तयार करतात. जगातील जैविक समुदाय हवा, पाणी आणि मातीचे व्यवस्थापन करतात. ज्यावर आपण संपूर्णपणे अवलंबून आहोत. ते विलक्षण हवामान, प्रसंग आणि वातावरणातील बदलाविरुध्द एक विशेष आणि व्यावहारिक लहर निर्माण करतात. आर्थिक क्षेत्राच्या दीर्घ पल्ल्याच्या विकासासाठी निरोगी जैविक प्रणाली महत्वाची आहे. ज्याप्रमाणे कृषी व्यवसाय, वन्य सेवा, मत्स्य व्यवसाय आणि पर्यटन हे सध्या असंख्य व्यवसाय देतात. लाकुड, तलाव नाले आणि समुद्रातील जलजीव खाण्याचे पदार्थ, इंधन आणि उपजिविकेची संधी देतात आणि आणीबाणीच्या काळात मौल्यवान सुरक्षा जाळ्यांशी जूळवून घेतात. विशेषत: जगातील गरीब, मागासलेले प्रदेश यातील महत्वपूर्ण नैसर्गिक मालमत्तेची अखंडता आणि कार्यक्षमतेशी तडजोड वाढत आहे. जगातील ६० ते ७० टक्के पर्यावरणव्यवस्था अत्यंत खराब होत आहे.

भारतात पर्यावरणाच्या अनेक समस्या आहेत. वायू प्रदूषण, जल प्रदूषण, कचरा, नैसर्गिक पर्यावरणाचे प्रदूषण ही भारतापुढील आव्हाने आहेत. १९४७ ते १९९५ दरम्यान परिस्थिती अधिक वाईट होती. माहिती जमा करणे आणि जागतिक बँकेच्या तज्ञांच्या स्थिती मुल्यमापन तपासणीनुसार १९९५ ते २०१० दरम्यान भारताने आपल्या नैसर्गिक समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि पर्यावरणीय गुणवत्ता वाढविण्यात या

ग्रहावरील सर्वात जलद स्थान प्राप्त केले आहे. तरीही विकसित अर्थव्यवस्थांप्रमाणेच पर्यावरणीय गुणवत्तेपर्यंत पोहचण्यासाठी भारताला खुप मोठा पल्ला गाठायचा आहे. भारतासाठी प्रदुषण हे एक मोठे आव्हान आणि संधी आहे. पर्यावरणीय समस्या हे भारतासाठी रोग, आरोग्य समस्या आणि उपजिविकेवरील दिर्घकालीन परिणामाचे प्राथमिक कारण आहे.

### २.१.१ भारतातील पर्यावरण ऱ्हासाची कारणे व परिणाम

पर्यावरणाच्या ऱ्हासाची प्रमुख कारणे आधूनिक शहरीकरण, औद्योगिकरण, अत्याधिक लोकसंख्या वाढ, जंगलतोड इत्यादी आहेत. पर्यावरण प्रदूषण म्हणजे गुणवत्ता आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होय.

मानवी क्रिया हे पर्यावरण ऱ्हासाचे मुलभुत कारण आहे. त्याने स्थितीत बदल घडवून आणले आहेत. जे प्रत्येक सजीवासाठी हानीकारक ठरले आहेत. वाहने आणि सयंत्रणाव्दारे उत्सर्जित होणारा धूर हे वातावरण दूषित करण्याचे प्रमुख स्त्रोत आहेत. उत्स्फूर्त शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे पाण्याच्या स्त्रोतांचे दूषितीकरण वाढण्यास मदत होते. तसेच क्लोरो फ्यूरो कार्बन, नायट्रोजन ऑक्साइड आणि इतर अस्वच्छ कण, दुषित हवा, वाहनांमधून सोडण्यात येणारा धूर या कृती पर्यावरणीय समस्यांची मुळे घट्ट करणारे घटक आहेत.

**सामाजिक घटक :–**

- लोकसंख्या – देशातील लोकसंख्या वाढीमुळे प्रामुख्याने शहरीकरण आणि औद्योगिकरणाची अनियंत्रित वाढ, शेतीचा विस्तार, तीव्रपणे नैसर्गिक आधिवासाचा नाश आणि आर्थिक विकास या गोष्टी पर्यावरणाचा ऱ्हास करत आहेत. भारतातील पर्यावरण ऱ्हासात लोकसंख्या हा महत्वाचा घटक आहे. लोकसंख्येची वाढ व त्याला आवश्यक आर्थिक विकास नैसर्गिंक संसाधनावर ताण निर्माण करतात. जैवविविधतेतील वैशिष्टयपूर्ण मालमत्तेची उपलब्धता आणि कमतरता या दोन्हींमुळे नैसर्गिक हानीला जबाबदार आहे. आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला प्रोत्साहन अथवा अडथळा निर्माण करू शकते म्हणून लोकसंख्या हा पर्यावरण ऱ्हासातील महत्वाचा घटक आहे. लोकसंख्या वाढीमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. सुधारणा कार्यक्रम कितीही असले तरी कल्पकतेने अपेक्षित परिणाम मिळण्याची शक्यता नसते. लोकसंख्येचा नैसर्गिक संसाधन वापरातून आणि कचरा उत्पन्न होण्याने पर्यावरणीय परिणाम वाढतो. तसेच जैवविविधता नष्ट होणे, जलप्रदूषण आणि शेतीयोग्य जमिनीवर ताण वाढणे यासारख्या पर्यावरणावर ताण आणणाऱ्या घटकांचा समावेश होतो.

लोकसंख्येतील वाढ ही आरोग्याच्या स्थितीत सुधारणा आणि रोग नियंत्रणामुळे झाली आहे. लोकसंख्येची घनता १९५१ मधील ११७ वरुन २००१ मध्ये ३१२ आणि पुढे २०११ मध्ये ३८२ व्यक्ती प्रतिचौरस किलोमीटरवर गेली आहे. काही आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक घटक ग्रामीण भागातून शहरी भागात लोकांना स्थलांतरीत करण्यास कारणीभुत असतात. कारण दरडोई मालमत्तेची कमी होण्याची क्षमता आणि ग्रामीण भागामध्ये खुले आर्थिक धोरण, कल्याण व सेवा कार्यालये आणि शहरी भागामध्ये

वाढीव प्रमाणात मानवी भांडवलाची आवश्यकता ही मुलभुत कारणे असू शकतात. जगाच्या केवळ २.४ टक्के क्षेत्रावर भारत आहे. परंतु जगातील १७ टक्के लोकसंख्या इथे वास्तव करते.

**गरीबी :–**

गरीबी ही आर्थिक परिस्थिती आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाचे दोन्ही परिणाम आहेत असे म्हटले जाते. दारिद्र्य आणि पर्यावरण यांचे गोलाकार आणि अत्यंत गुंतागुंतीचे संबंध आहेत. आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय असमतोल क्षमतांचा ऱ्हास करू शकते. कारण गरीब लोक श्रीमंतापेक्षा नैसर्गिक संसाधनावर अधिक अवलंबून असतात. त्यांच्याकडे इतर कोणतीही जास्तीची वास्तविक क्षमता नसल्यामुळे ते संसाधने लवकर नष्ट करतात. २१ व्या शतकात व्यक्तींचा संसाधन वापर दरडोई वाढत आहे आणि या वाढत्या पातळीमुळे मालमत्तेचा नियमीत ऱ्हास होत आहे. ज्यावर भविष्यातील पिढयांचे जीवन अवलंबून आहे. गरीबी हा लोकसंख्यावाढीसाठी महत्वाचा घटक आहे. गरीबांची जीवनशैली व उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेली इच्छा, क्रयशक्ती कमी करते. मालमत्तेचा असमान वितरण आणि खुल्या दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीसाठी सक्तीचे घटक कारणीभुत ठरतात. शिवाय निकृष्ट वातावरणामुळे गरीबीच्या प्रक्रियेला वेग येतो. कारण गरीब लोक थेट नैसर्गिक मालमत्तेवर अवलंबून असतात. भारतातील गरीबीचे प्रमाण १९७३ मध्ये ५५ टक्के ते १९९३–९४ मध्ये ३६ टक्के पर्यंत घसरले. पुढे २००४ ते २००५ मध्ये २७.५ टक्यापर्यंत लक्षणीय घट आढळते व ती ३०१ दशलक्ष इतकी घसरली आहे.

**शहरीकरण :–**

स्वातंत्र्यानंतर भारतातील नागरीकरण झपाटयाने होऊ लागले कारण भारताने अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे खाजगी क्षेत्राच्या प्रगतीत वाढ झाली आणि भारताचे जलद गतीने शहरीकरण होत गेले. १९०१ च्या आकडेवाडीनुसार भारतातील शहरी भागात राहणारी लोकसंख्या ११.४% इतकी होती. ही संख्या २०११ च्या जनगननेनुसार २८.५३% आणि २०११ च्या मुल्यांकनानुसार ३०% पर्यंत वाढली. उर्वरीत ३१.१६% २००७ साली तर यूनायटेड नेशन्स ऑफ द वर्ड पॉप्यूलेशनच्या अहवालाच्या पूनर्विलोकनाद्वारे सुचित केल्याप्रमाणे २०३० पर्यंत देशाच्या ४०.७६% लोकसंख्या शहरी भागामध्ये असेल. जागतिक बँकेच्या मते, चीन, इंडोनेशिया, नायजेरीया आणि अमेरीकेबरोबरच भारत २०५० पर्यंत जगातील शहरी लोकसंख्येच्या जास्त वाढीचे नेतृत्व करेल.

खेड्यांमध्ये फायदेशीर रोजगाराच्या संधीचा अभाव आणि पर्यावरणीय ताण यामुळे गरीब कुटूंबे शहरांकडे स्थलांतरीत होत आहेत. शहरी भागाच्या इतक्या जलद आणि उत्स्फुर्त विस्तारामुळे शहराची दूरावस्था झाली आहे. याने शहरी भागातील मौल्यवान मालमत्तेचा आधार संपून पायाभुत सुविधांच्या प्रशासनाच्या विनंती आणि पूरवठा, निवास, वाहतूक, पत्रव्यवहार, सुचना, पाणी–पूरवठा आणि मलनिस्सारण या बरोबरच मनोरंजनातील आनंद यामधील दरी वाढत आहेत. याचा परिणाम विकासावर होतच आहे. हवा आणि पाण्याच्या गुणवत्तेचा क्षय, वाढीचा विस्तार आणि जमिनीचा अतिरिक्त वापर हे सर्व बदल शहरी गरीबीला मदत करतात.

**आर्थिक घटक :-**

**आर्थिक विकास :-** भारताच्या आर्थिक विकासाचा स्तर आणि नमूना पर्यावरणीय समस्यांच्या स्वरुपावर परिणाम करतो. भारताच्या विकासाच्या दृष्टीने आर्थिक वाढ आणि सामाजिक कल्याणासाठी धोरणे आणि कार्यक्रमांच्या जाहिरातीवर सातत्याने भर दिला आहे. बहूसंख्य उपक्रमाद्वारे प्राप्त झालेल्या उत्पादनावर नवकल्पनांनी भर दिला आहे. जसे की सामान्य मालमत्तेचा वापर पेट्रोलियम जन्य खनिजे, लाकुड, पाणी, हवा आणि जमीन खराब करणे, पाण्याचे स्त्रोत आणि वैशिष्ट्यपूर्ण पर्यावरण रचनेचे अवमुल्यन करणे. यामुळे प्रदूषणात भरच घातली आहे.

**रासायनिक उद्योग :-**

रासायनिक उद्योगांच्या विस्तारामुळे मोठया प्रमाणात औद्योगिक आणि घातक कचऱ्याची निर्मिती झाल्यामुळे कचरा व्यवस्थापनाची गंभीर पर्यावरणीय समस्या व आरोग्याचे घातक परिणामदेखील वाढले आहेत. वाहतुकीचे देखील विस्तृत परिणाम आहेत. वायूप्रदुषण, रस्त्यावरील दळणवळण, ध्वनीप्रदूषण, सागरी तेल शुध्दीकरण व उपउत्पादने यांचे वितरणाने वाहतुक प्रणाली आणि प्रशासनाचा विस्तार केला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दिल्लीतील वायुप्रदुषण. बंदरांच्या विस्तारामुळे पाण्याचे पर्यावरण असंतूलन पाण्याच्या पर्यावरणीय प्रणालीवर परिणाम करते. या सर्व विकासामुळे जलविज्ञान, पृष्ठभागावरील पाण्याची गुणवत्ता, मत्ससंपदा, प्रवाळ आणि खडक यांचा खारफुटीवर परिणाम होतो.

**कृषी विकास :-**

पर्यावरणावर कृषी विकासाचा थेट परिणाम शेतीच्या क्रियांप्रक्रियामुळे होतो. ज्यामुळे मातीची धुप होते आणि मातीतील पोषक तत्वांचे नुकसान होते. हरीतक्रांतीचा प्रसार जमीन आणि पाणी यासारख्या संपत्तीचा दूरुपयोग करुन खते आणि कीटकनाशकांच्या वापराने अनेक घातक आच्छादनांचा विस्तार केला आहे. स्थलांतरीत शेती हे देखील जमिनीच्या ऱ्हासाचे महत्वाचे कारण आहे. कीटकनाशके आणि खतांच्या मोठया प्रमाणावर वापरामुळे होणारे विषारीकरण हे जलस्त्रोत दुषित होण्याचे एक महत्वाचे स्त्रोत आहे. सधन शेती आणि सिंचनामुळे जमिनीचा ऱ्हास होतो. विशेषत: क्षारीकरण, आणि पाण्याचा अतिवापर हे देखील महत्वाचे कारण आहे.

**संस्थात्मक घटक :-**

भारत सरकारचे पर्यावरण आणि वनमंत्रालय पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनाची जबाबदारी घेते. विविध मंत्रालये, राज्य सरकार, प्रदूषण नियंत्रण मंडळे आणि विविध तार्कीक विशेष आस्थापना, महाविद्यालये, गैर-सरकारी संघटना इत्यादी सोबत समन्वयाने काम करते.

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ हा पर्यावरण व्यवस्थापन नियंत्रित करणारा प्रमुख कायदा आहे. इतर वन संरक्षक कायद्यामध्ये १९७२ आणि १९८० च्या कायद्याचा समावेश आहे. या सर्व कायद्यामध्ये सध्या केंद्र आणि राज्य या ठिकाणी नैसर्गिक पायाच्या रचनात्मक अंमलबजावणीच्या क्षमता कमकुवत आहेत.

प्रकल्पाच्या सुरवातीच्या टप्यावर पर्यावरण विषयक समस्यांच्या एकत्रीकरणाबाबत विविध मंत्रालयांच्या संस्थांमध्ये प्रभावी समन्वय नाही. सध्याची धोरणे विविध सरकारी एजन्सीजमध्ये विखुरलेली आहेत. ज्यामध्ये भिन्न धोरणात्मक आदेश आहेत. तयार कार्य शक्तीचा अभाव आणि दूरगामी माहितीमुळे अनेक उपक्रम पूढे ढकलले जातात. राज्य सरकारी संस्थांच्या मोठया भागाला विशेष कर्मचारी आणि मालमत्तेची कमतरता जाणवते. पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन अभ्यासाची एकुण गुणवत्ता आणि प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी गेल्या काही वर्षात सुधारली असली तरी, संस्थात्मक बळकटीकरणामुळे प्रमुख व्यावसायिक आणि कर्मचारी यांच्यावर ताण येतो. पर्यावरण मुल्यांकन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी योग्य तांत्रिक व्यक्तींची आवश्यकता आहे. तसेच ते पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाचे साधन आहे.

**जमिनीचा ऱ्हास :-**

जमिनीचा ऱ्हास म्हणजे अवांच्छित समजल्या जाणाऱ्या जमिनीमध्ये कोणताही बदल किंवा अडथळा निर्माण होणे. पूरासारख्या मानवनिर्मित आणि नैसर्गिक कारणांमुळे जमिनीचा ऱ्हास होऊ शकतो. जंगलातील आग हे सुध्दा जमीन ऱ्हासाचे कारण आहे. असा अंदाज आहे की जगात ४० टक्यापर्यंत शेतजमीनीचे गंभीर नुकसान झाले आहे. जमिनीच्या ऱ्हासाचे मुख्य कारण म्हणजे हवामान बदल, जमीन साफ करणे आणि जंगलतोड करणे, खराब शेतीद्वारे जमिनीतील पोषक तत्वांचा ऱ्हास, अतिउपज ही कारणे आहेत. भारतामध्ये पाण्याच्या अतिवापराने जमिनीचा सुपीकपणा नष्ट होऊन जमिनीचा ऱ्हास होतो. वाढती लोकसंख्या परिणामी वाढती मागणी, अन्न, उर्जा आणि घरांसाठी जमीन वापराच्या पध्दतीमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. वाढत्या लोकसंख्येचा प्रचंड दबाव, अन्नाच्या वाढत्या मागणीमुळे जंगले आणि चराऊ जमिनीवर अतिक्रमण, जमिनी वापराचा विस्तार-वाढ, यामुळे भारताच्या पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास झाला आहे.

कृषीक्षेत्रात भारत अल्प व्याप्त आणि तंत्रज्ञानावर समर्पित उभ्या असलेल्या सुधारणेवर मुख्यत्वेकरुन अवलंबून आहे. कृषी क्षेत्रातील विकास म्हणजे संकरित बियाणे, खते, किटकनाशके, तणनाशके आणि कृषी अवजारे या सर्व प्रथांमुळे पर्यावरणीय अधोगती होत आहे.

**वायुप्रदूषण :-**

इंधन लाकुड, उर्जा संसाधने जाळणे, वाहनांचे कार्बन उत्सर्जन, वाहतुक कोंडी हे प्रमुख वायुप्रदूषणाचे स्त्रोत असून भारतातील वायूप्रदूषण ही एक गंभीर समस्या आहे. वायूप्रदूषण हे आशियायी तपकिरी ढगांचे प्रमुख कारण आहे. ज्यामुळे मान्सुनला विलंब होत आहे. भारत हा जगातील सर्वांत मोठा इंधन लाकुड, कृषी कचरा आणि उर्जेच्या उद्देशांसाठी उर्जेचा ग्राहक आहे. ग्रामीण भागातील घरगुती उर्जेच्या वापरावर पारंपारिक इंधन, लाकुड, पीकांचे अवशेष आणि शेण याचा वापर जास्त आहे. या वापराचा एकूण वाटा ९० टक्के इतका आहे. शहरी भागात हे पारंपारिक इंधन एकुण २४ टक्के आहे. इंधन लाकुड, कृषी कचरा आणि उर्जेच्या उददेशांसाठी उर्जेचा ग्राहक आहे. ग्रामीण भागातील घरगुती उर्जेच्या वापरावर पारंपारिक इंधन, लाकुड, पीकांचे अवशेष आणि शेण यांचा वापर जास्त आहे. या वापराचा एकूण वाटा ९० टक्के इतका आहे. शहरी भागात हे पारंपारिक इंधन एकुण २४ टक्के आहे. इंधन लाकुड, कृषी कचरा आणि शेणाच्या

गोवऱ्या यांच्या ज्वलनामुळे दरवर्षी १६५ दशलक्ष टन कार्बनडायऑक्साईड भारतातील घराबाहेर हवेत सोडला जातो. भारतातील केरोसीनवर उर्जा आधारित स्टोव्ह देखील हवामान बदलात योगदान देणाऱ्या ग्रीन हाऊस गॅसचे उत्सर्जनाचे प्रमुख स्त्रोत आहेत.

दरडोई आधारावर भारत हा कार्बनडायऑक्साईड हरीतगृह उत्सर्जित करणारा एक छोटासा देश आहे. २००९ मध्ये आंतरराट्रीय पर्यावरण मुल्यांकनच्या अंदाजानुसार प्रतिव्यक्ती सुमारे १.४ टन वायू उत्सर्जित झाला. युनायटेड स्टेटस तुलनेत प्रतिव्यक्ति १७ टन आणि जागतिक सरासरी ३ टन प्रतिव्यक्ति. तथापि २००९ मध्ये भारत हा तिसरा सर्वात मोठा कार्बनडाय ऑक्साइड उत्सर्जित करणारा देश होता. चीन ६.९ Gt प्रतिवर्ष, अमेरिका ५.२ प्रतिवर्ष नंतर १.६५ Go प्रतिवर्ष. जगातील एकुण लोकसंख्येच्या १७ टक्के लोकसंख्या असलेला भारत देश मानवाकडून उत्सर्जित होणाऱ्या कार्बनडाय ऑक्साइड उत्सर्जनात भारताचा जगातील वाटा ५ टक्के इतका आहे.

**भारतातील पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम :**

भारतातील पर्यावरण ऱ्हासाची प्राथमिक कारणे आर्थिक विकास आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर याच्या जोडीला लोकसंख्येची झपाट्याने वाढ ही आहेत. भारतातील प्रमुख पर्यावरणीय आपत्तीमध्ये जमिनीचा ऱ्हास जंगलतोड, मातीची धुप आधिवास नष्ट होणे आणि जैवविविधतेचे नुकसान होणे आर्थिक वाढ आणि बदलत्या उर्जा वापरामुळे उर्जेची मागणी वाढली आहे. पाणी टंचाईसह हवा पाणी आणि ध्वनीप्रदुषणात वाढ झाली आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार १९९५ ते २०१० दरम्यान भारताने आपल्या पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यात व पर्यावरणाची गुणवत्ता सुधारण्यात जगात सर्वात जलद प्रगती केली आहे. तरीही विकसित अर्थव्यवस्था प्रमाणेच पर्यावरणीय गुणवत्तेपर्यंत पोहचण्यासाठी भारताला खुप मोठा पल्ला गाठायचा आहे.

**२.१.२ भारतातील पर्यावरण आणि विकासाचे राजकारण :–**

वास्तविक भारतातील स्वातंत्र्योत्तर राजकीय विवाद प्रामुख्याने दोन मुद्द्यांवर आधारित आहे आणि विकास त्याचबरोबर पर्यावरणीय काळजीने व संरक्षणाने तिसरा आयाम टिकवून ठेवला आहे. भारतासमोरील आजचे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे विकास प्रक्रिया ओळखून त्याची अंमलबजावणी करणे. परंतु ही अंमलबजावणी करताना त्यामुळे जास्त समानता, वाढ आणि टिकाऊपणा येईल याची दक्षता घेणे.

म्हणजे केवळ सुंदर झाडे, वाघ धोक्यात आलेली परिसंस्था नाही, तर ते एक मानवी अस्तित्व आहे. ज्यावर आपण उदरनिर्वाह करतो आणि ज्यावर कृषी आणि औदयोगिक विकास अवलंबून असतो. हा विकास पर्यावरणाच्या खर्चावर अवलंबून असतो आणि त्यानंतर एक मुद्दा आहे. विकास हा अल्पकालीन असू शकतो ज्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कमी होतो. तर दिर्घकाळ असणारा केवळ पर्यावरणविरोधी असू शकतो. विकासाच्या दुसऱ्या श्रेणीत जाताना प्रचंड मानवी दुःख, वाढलेले दारिद्रय आणि दडपशाहीच्या किंमतीवर भारत कदाचित त्या टप्प्यावर वेगाने पोहचू शकेल. भारतातील सुक्ष्म पातळीवर काम करणाऱ्या शेकडो स्वयंसेवी संस्था, पर्यावरणीय गट यांच्यामध्ये याबदद्लच्या स्वारस्याची झपाट्याने वाढ झाली आहे.

जी काही वेळा पर्यावरणीय चळवळींची सुरवात म्हणून त्यांचे वर्णन केले जाते. यामध्ये काहींना जंगलतोड रोखण्यात, धरणांना विरोध, पाण्याचा अपव्यय यासारख्या गोष्टींमध्ये स्वारस्य आहे. बहुधा या सर्व गटांमध्ये सर्वात जूनी चळवळ म्हणून चिपकोंचा उल्लेख करावा लागतो. याने जंगलतोड जनमताच्या समोर आणण्यात मोठी भूमिका बजावली आहे. सायलेंट व्हॅली आणि बेरदी सारख्या कामटक धरणांच्या पश्चिम घाटातील आप्पीको चळवळ लोकांच्या तीव्र विरोधामुळे थांबली आहे. मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश आणि ४८ महाराष्ट्राच्या सीमेवर, भोपाल, पटट्णम, इंचपल्स दामाचिल्यारच्या प्रदूषणावर काराशास्त्र साहित्य परिषदेने दिर्घकाळापासून तीव्र संघर्ष केला आहे. तुलनेने हे सर्व सुप्रसिध्द गट आहेत. त्यांनी माध्यमांचे लक्ष वेधून घेतले आहे. तरीही हे गट पर्यावरनीय विनाश टाळून पर्यावरणमतांचे चे सकारात्मक पूनरुत्थान घडवून आणण्याची उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. लोक आणि पर्यावरण यांच्यामधील वाढत्या आकलनाचा लोकांनी फायदा घ्यावा या त्यांच्या उददेशाने आधिक न्याय आणि शाश्वत वापराविषयीचे लोकांचे ज्ञान वाढवणे सुरु झाले तरच पर्यावरणाचा हा कदाचित आजच्या काळातील सर्वाधिक आकर्षक विकास ठरेल.

**श्रीमंताकडून पर्यावरणांचा नाश :–**

पर्यावरणीय समस्येचे स्वरुप समजून घेण्यासाठी आपली पाश्चिमात्य लोकांशी तुलना करुन भारतामध्ये राजकीय पक्षांसह असा युक्तीवाद नेहमीच केला जातो कि पर्यावरण केवळ आर्थिक आणि औद्योगिक विकासात अडथळा आणू शकते. १९७२ च्या स्टॉकहोम येथे आयोजित परिषदेमध्ये बऱ्याच विकसनशील देशांच्या शिष्टमंडळानी असा युक्तीवाद केला कि पर्यावरणीय समस्या निराकरण हे आर्थिक विकासामध्ये आहे. ब्राझीलच्या शिष्टमंडळाने धूर हे प्रगतीचे लक्षण आहे अशी गर्जना केली होती. त्यानंतर आर्थिक भरभराट पाहणाऱ्या भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या परिषदेवर मोठा ठसा उमटवला होता. त्या परिषदेतील तिसऱ्या जगातून आलेले सर्व प्रदूषक अशी पाश्चिमात्य देशांनी युक्ती चालवलेली आहे अशी एक शंका होती. पण बरोबर १० वर्षानंतर जेव्हा युनायटेड नेशन्स ने स्टॉकहोम स्मरणार्थ एक बैठक आयोजित केली तेंव्हा तिसऱ्या जगातील काही गैरसरकारी गट विकास प्रक्रियेच्या बाजूने युक्तीवाद करण्यास तयार होते. तिसऱ्या जगाला आज पर्यावरणाचे संकट आणि विकासाचे संकट दोन्हींचा सामना करावा लागत आहे आणि दोन्ही संकटे तीव्र होत आहेत. आणि एकमेकांना बळकट करण्यासाठी संवाद साधत आहेत. एकीकडे असमानता, दारिद्रय आणि बेरोजगारी या विकास प्रक्रियेतून ज्या समस्या सोडविल्या जात आहेत त्याचा अंत होताना दिसत नाही. दुसरीकडे पर्यावरणाचा नाश आणखी वेगाने वाढला आहे. परंतु पर्यावरणीय समस्या विशेषत: जल आणि वायू प्रदूषणांशी संबंधित आहेत. त्या अनेक भागात खुप गंभीर झाल्या आहेत. दूसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास आर्थिक विकासाची प्रक्रिया आपल्या पर्यावरणीय समस्यांना आधिकच बिघडवत आहेत. तथापि औद्योगिकरण जसजसे पूढे जात आहे, तसतसे कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे. तरीही ती एक मोठी किंवा एकमेव पर्यावरणीय समस्या नाही. प्रमुख पर्यावरणीय समस्या या नैसर्गिक संसाधनांच्या अतिवापर व गैरवापरामुळे उद्भवतात. आधुनिक उद्योगासाठी कच्चामाल तयार करण्याच्या दबावामुळे या समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. माती, जंगले आणि जलस्त्रोत हे केवळ स्वत:च्या उदयोगासाठीच नाही तर पाश्चात्य उदयोगानांही कच्चा माल पुरविते.

**श्रीमंत देशांना अन्न पुरविणे :–**

भारतातील इशान्यकडील जंगलावर पहिला मोठा हल्ला चहाच्या मळ्यांच्या स्थापनेने झाला. आज कॉफी आणि इतर निर्यात पीक लागवडीसाठी जंगलांचा नाश सुरू आहे. भारताच्या किनारपट्टीवर, जवळपास सर्व आग्नेय आशियायी किनाऱ्या प्रमाणेच पाश्चिमात्य आणि जपानी बाजारपेठेत कोळंबीला प्रचंड मागणी असल्यामुळे अतिमासेमारी होते. या अति मासेमारीमुळे पारंपारीक मच्छिमार आणि ट्रॉलर्स यांच्यामध्ये प्रचंड तणाव आहे. पाश्चात्य ग्राहकांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी बेडकांच्या पायाची निर्यात यामुळे त्याचा बाधित भागातील कृषी किटकांच्या संख्येवर होणारा परिणाम हा देखील आहे.

परंतु उद्योगांद्वारे पर्यावरणीय शोषणाची पध्दत जी आपण जागतिक स्तरावर पाहतो ती फक्त भारतात पूनरुत्पादित होते. भारतातील जवळपास सर्व उत्पादन हे बायोमास आधारीत आहे. रेयॉन, कागद, प्लायवूड, रबर, साबण, साखर, तंबाखू, ज्यूट, चॉकलेट, अन्न प्रक्रिया पॅकेजिंग यापैकी प्रत्येक उदयोग देशाच्या लागवडीखालील तसेच वनजमिनीवर प्रचंड दबाव आणतो. पाश्चिमात्यांना मात्र पिकांच्या जमिनीची जंगलांची गरज आहे. पूर्वी चराईसाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनीवर अतिक्रमण केल्याने शेतकरी आणि भटक्या पशुपालकांमधील नाजूक संतूलन बिघडते. भारतीय कागद उद्योगाने जंगले निदर्यीपणे नष्ट केली. कर्नाटकातील कागद कंपन्यांनी बांबूची सर्व जंगले नष्ट करुन आता त्यांचा कच्चा माल भारताच्या शेवटच्या प्रमुख वनक्षेत्रातून मिळवत आहेत. आंध्र सरकारने तर कानाकांडा येथे तयार करू इच्छिनाऱ्या पेपर मिलसाठी अंदमान आणि निकोबारच्या जंगलावर लक्ष केंद्रीत केले आहे.

त्यातून एक गोष्ट स्पष्ट होते कि पर्यावरणाच्या नाशाचे मुळ म्हणजे श्रीमंत लोकांच्या उपभोगातून निर्माण होणारी नैसर्गिक संसाधनाची मागणी मग ती श्रीमंत राष्ट्र असोत किंवा स्वराष्ट्रातील श्रीमंत व्यक्ती व व्यक्ती गट त्यांची प्रचंड भुक व विकासाच्या नावांखाली प्रामुख्याने प्रदूषणाचे योगदान देतात.

**विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका :–**

अधुनिककाळात विज्ञान आणि तंत्रज्ञान जसजसे वाढत गेले तसतसे त्याने लोकांना प्रचंड शक्ती दिली. दुर्दैवाने वैज्ञानिक आणि तांत्रिक विकासामुळे निर्माण झालेले नवीन ज्ञान अत्यंत चूकीच्या व असमानपणे वापरले आहे. वैज्ञानिक आणि तांत्रिक विकासाचा प्रमुख परिणाम जो जसा आहे तसा अंर्तभुत आहे. संसाधनामध्ये शोषण करण्याची अधिकाधिक शक्ती दिली. संसाधनाच्या शोषणासाठी दूरच्या जमिनी दूरच्या परिसंस्था वसाहतींमध्ये बदलल्या गेल्या. या सर्व प्रक्रियेचा सर्वांत वाईट भाग म्हणजे आपल्याला आता जगभरामध्ये मोठ्या संख्येने ग्राहक मिळाले आहेत त्यामुळे पर्यावरणाचा वापर अत्यंत विनाशकारी आहे. आधूनिक विज्ञान आणि तंत्राज्ञानाचा वापर एकाच ठिकाणी नाही तर सर्व देशभर होतो. महाराष्ट्रातील कापसापासून तयार झालेला शर्ट दिल्लीतील रहिवासी घालतो. कापसावर किटकनाशकांची फवारणी केली जाते. ज्यामुळे डासांमध्ये प्रतिकार शक्ती निर्माण होते. हिमालयातील धरणात वीज तयार केली ज्याने माश्यांचे स्थलांतर रोखले. मध्य प्रदेशातील एका कारखान्याने तयार केलेला कागद ज्याने स्थानिक नदी प्रदूषित केली. आणि जंगलाचा नाश घडवून आणला. आदिवासींचे जीवन विस्कळीत केले. पंजाबमधील

तृणधान्य जे जमिनीची सुपीकता नष्ट करणारे तंत्रज्ञान वापरुन तयार केले जाते. या सर्व गोष्टी ग्राहकांना त्यांची क्रयशक्ती वाढविण्यास मदत करते. त्याचबरोबर डॉक्टर औषधाला पूर्णपणे निरुपयोगी म्हणून नाकारतात आणि नैसर्गिक वनस्पतींवर आधारीत अभ्यास करण्यासाठी व प्रचारासाठी कोणताही प्रयत्न करत नाहीत.

**गरीबी आणि त्यांचे पर्यावरण :-**

भारतासारख्या देशात गरीबीचे निर्मुलन पर्यावरणाच्या तर्कसंगतते शिवाय शक्य नाही. आणि याउलट पर्यावरणाचा नाश गरिबी तीव्र करेल. सामाजिक अन्याया बरोबरच पर्यावरणाचा नाश होतो. बहुसंख्य ग्रामीण कुटूंबे त्यांच्या गरजा उर्जा संसाधने किंवा संबंधित उत्पादनाद्वारे पूर्ण करतात. जे बहुतेक तात्काळ वातावरणात सोडले जातात. थोडक्यात ते उर्जा-आधारित निर्वाह अर्थव्यवस्थेशिवाय इतर कशातही राहत नाहीत. अन्न, इंधन, शेणखत, पिकांचा कचरा, चारा, सेंद्रीय खते, जंगलातील कचरा, झाडांच्या पानांचा पाला, बांधकाम साहित्य पोल, औषधी वनस्पती ही सर्व उर्जा उत्पादने आहेत. महत्वाच्या घरगुती गरजा भागविण्यासाठी भारताचे बायोगॅसवर किती अवलंबित्व आहे हे उर्जेची परिस्थिती पाहून समजू शकते. आम्हाला भारतीय म्हणून सांगायला आवडते की भारत जगातील १० वी सर्वात मोठी औदयोगिक शक्ती आहे असे काहीतरी आहे. पण तरीही भारतातील ५० टक्यांपेक्षा जास्त इंधनाचा वापर जीवन जगण्याच्या मुलभुत क्रियांसाठी एकुण इंधनाच्या वापराच्या १० टक्यांपेक्षा जास्त आहे.

भारतामध्ये स्वयंपाकाच्या इंधनापैकी ९० टक्के उर्जा सरपण, शेणखत आणि पिकांचा कचरा आहे. अगदी शहरी कुटूंबेही इंधन म्हणून लाकडावर अवलंबून असतात. काही लोक, उर्जा नियोजक आणि सरकारी अधिकारी ग्रामीण शहरी इंधन लाकुड व्यापाराच्या परिणामांचा सागर आहे. इंधनाच्या लाकडाची वार्षिक शहरी इंधन लाकडांची वार्षिक खरेदी भारतात ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. गेल्या १० वर्षामध्ये मध्य प्रदेश भारताच्या मध्यभागी असलेले एकमेव राज्य, ज्यामध्ये वाजवी प्रमाणात वनाच्छादित संरक्षण, जे उत्तर आणि पश्चिम भारतातील शहरांना इंधन लाकडांचा प्रमुख पूरवठादार म्हणून उदयाला आले. परंतू राज्यात दरवर्षी अधिकाधिक जंगलतोड असल्याने मध्य प्रदेशातच इंधनाच्या किंमती वाढत आहेत. सरपण निर्यातीवर बंदी घालणारे मध्य प्रदेश आता भारतातील पहिले राज्य बनले आहे आणि जगातील पहिले राज्य बनले आहे. परिणामी बाजारात १५ कोटी रुपयांचे जळाऊ लाकुड असलेल्या दिल्लीला आता सरपण कमी मिळू लागले आहे आणि आसामसारख्या दूरच्या ठिकाणाहून जास्त प्रमाणात सरपण मिळू लागले आहे.

अशा परिस्थितीत जिथे लाखो लोक त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी उर्जा स्त्रोतांवर मोठया प्रमाणावर अवलंबून आहेत. पर्यावरणाचा नाश किंवा प्रस्तावित वन विधेयक धोरण यासारख्या उर्जा संसाधनांवरचे अवलंबित्व कमी करणारे कोणतेही धोरण याचा लोकांच्या दैनंदिन जीवनावर अत्यंत घातक परिणाम होईल.

**निसर्गाचे परिवर्तन :-**

निसर्गाचा केवळ नाश होत नाही तर सातत्याने परिवर्तनही होत आहे. देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर दोन मोठे दबाव कार्यरत आहेत. पहिला म्हणजे लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेली आणि त्यामुळे उर्जा

संसाधनांची वाढलेली घरगुती मागणी. पर्यावरणाच्या नाशासाठी गरीबांना अनेकदा दोषी ठरविले जाते. परंतु आधुनिकीकरण, औद्योगिकरण आणि रोख अर्थव्यवस्थेच्या बाजारातील सहज प्रवेशामुळे निर्माण होणाऱ्या दब-दब्यांचा दूसरा संच, किमान धोरण-निर्धारण मंडळामध्ये क्वचितच बोलला जातो. आधुनिकीकरणाचा निसर्गावर दोन प्रकारे परिणाम होतो. प्रथम स्वस्त उर्जा संसाधन आधारित कच्च्या मालाच्या शोधात आणि कचऱ्यांच्या विल्हेवाटीसाठी स्वस्त संधीच्या शोधात हे पर्यावरणासाठी अत्यंत घातक आहे. जोपर्यंत पर्यावरणीय खर्च आणि आंतरिक खर्चाचे कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत. सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही उद्योगपती त्यांना समाजात देण्यास प्राधान्य देतात. आणखी काही कारखाने मिळावेत यासाठी राज्य सरकारांना मोठ्या प्रमाणावर जंगले देऊन जलप्रदूषण नियंत्रण कायदे वाऱ्यावर सोडतात. दूसरे म्हणजे आधुनिकीकरणामुळे निसर्गाच्या स्वभावात सातत्याने बदल होत आहे. भौतिक दृष्टीने अशी प्रवृत्ती म्हणजे निसर्गातील विविधता कमी करणे. उच्च उत्पादक मोनोकल्चरने परिपूर्ण असलेल्या निसर्गात रुपांतर करणे. या परिवर्तनाची प्रेरक शक्ती निसर्गाच्या संमिश्रीकरणातून निर्माण होते. मग तो गुरांचा कळप असो, तलाव असो, जंगल असो किंवा कृषी क्षेत्र असो विविधता कमी करुन जास्तीत जास्त नफा आणि उत्पादनासाठी सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या जनुकांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जातो. भांडवलशाही व्यवस्थांमध्ये तर हे आहेच. परंतु समाजवादी व्यवस्थांमध्ये देखील अधिकच दिसते. नवीन प्रणालीच्या दिर्घकालीन टिकाऊपणाचा क्वचितच विचार केला जातो. मुळ निसर्गाचे परिवर्तन करताना पर्यावरणीय भूमिकेकडे दूर्लक्ष केले जाते.

भारतात होत असलेल्या मोठ्या पर्यावरणीय बदलाचा परिणाम भारतातील लोकांसाठी विनाशकारी ठरला आहे. विशेषत: जेव्हा आपल्याला हे लक्षात येते कि, भारत एकीकडे अत्यंत उच्च पातळीची गरीबी असलेला देश आहे आणि दुसरीकडे लोकसंख्या घनतेची उच्च पातळी आहे. आज भौतिक वातावरणात क्वचितच अशी कोणती पर्यावरणीय परिसंस्थेची जागा शिल्लक नाही जी तिच्या उदरनिर्वाहासाठी एका किंवा दूसऱ्या मानवी गटाने व्यापलेली नाही. आता जर आर्थिक विकासाच्या नावांखाली, कोणत्याही पर्यावरणीय जागेचा नाश होईल किंवा समाजातील अधिक सामर्थ्यवान गटांना त्याचा फायदा होणार असेल तर अपरिहार्यपणे, त्या जागेवर पूर्वी अवलंबून असलेल्या लोकांचे नुकसान होईल.

**समग्र व्यवस्थापनाच्या दिशेने :-**

सर्वप्रथम आपली जमीन आणि जलस्त्रोताच्या व्यवस्थापनाबाबत अधिक समग्र विचार व्हायला हवा आणि जोपर्यंत असे दृढनिश्चयी प्रयत्न केले जात नाहीत. तोपर्यंत व्यवस्थापन सोपे होणार नाही. आपण हे ओळखले पाहीजे की सध्याच्या वैज्ञानिक विश्लेषणाच्या पध्दतीमध्ये अत्यंत अवैज्ञानिक विश्लेषण आहे.

जंगलांचा नाश झाल्यावर पिकांच्या उत्पादकतेवर मोठा परिणाम होतो. हे दोन प्रकारे घडते. मातीची धुप अनेक पटींनी वाढते आणि माती पूर्णपणे वाहून जाते. ज्यामुळे पूर आणि दृष्काळाचे तीव्र चक्र सुरू होते. पण तितकेच महत्वाचे म्हणजे जळाऊ लाकडाच्या कमतरतेचा जमिनीच्या पीक उत्पादकतेवर होणारा परिणाम जळाऊ लाकुड दूर्मिळ झाल्यावर लोक अनेक ठिकाणी शेणखत आणि पीक कचरा जाळू लागतात. शेण किंवा पिकांचा कचरा आता स्वयंपाकाच्या उर्जेचा प्रमुख स्त्रोत बनतो अशा प्रकारे वनस्पतीचा प्रत्येक भाग वापरला जातो आणि काहीही मातीत परत जात नाही. कालांतराने या पोषक घटकांचा पीक उत्पादकतेवर

परिणाम होतो. यामध्ये हरीतक्रांतीचे तंत्रज्ञान जोडले; नायट्रोजन, फॉस्फेटस आणि पोटॅश या रासायनिक खतांच्या मर्यादित पोषणावर उच्च उत्पन्न देणाऱ्या वाणांची वाढ करण्याचे तंत्रज्ञान. एकुण उत्पन्न वाढते आणि त्यामुळे मातीतील पोषकतत्वांचा निचरा होतो. आज, लुधियाना जिल्हयामध्ये अनेक तृणधान्यांचे उत्पादन सर्वाधिक आहे. परंतू त्यांच्या जमिनीत अनेक सुक्ष्म पोषक घटकांची कमतरता देखील आहे. पंजाबमध्ये अनेक शेतकऱ्यांनी नियमितपणे जस्तचा खत म्हणून वापर करण्यास सुरवात केली. लवकरच त्यांच्या जमिनीत सल्फर मॅगॅनीज आणि लोहाची कमतरता असेल. सुक्ष्म पोषक खतांचा उदयोग, आधीच कित्येक कोटी रुपयांचा उदयोग, भविष्यात अजून तेजीचा उदयोग बनणार आहे. परंतू याचा निव्वळ परिणाम असा आहे की, भारतीय शेती या आणि इतर अनेक घटकामुळे, त्यापैकी बहुतेक पर्यावरणीय घटकांशी संबंधित आहे. मात्र खतांचा वापर वेगाने वाढणाऱ्या पातळीच्या तुलनेत उत्पादनात सातत्याने घट होत आहे.

**लोकसंख्या आणि संसाधनांची मर्यादा :–**

भारताच्या वाढत्या लोकसंख्येला स्वातंत्र्योत्तर आर्थिक विकास कार्यक्रमांद्वारे मिळालेल्या नफयावर पर्यावरणाच्या नाशासाठी अनेकदा दोष ठेवला जातो. लोकसंख्या वाढीच्या आर्थिक आणि पर्यावरणीय दूष्परिणामांचा कोणताही गंभीर चर्चा केली गेली नाही. प्रथमत: समाजात अस्तित्वात असलेल्या उपभोग पध्दतींचा विचार करणे आवश्यक आहे. आणि दूसरे म्हणजे भारताच्या जमीन वहन क्षमतेच्या काही समजांवर आधारित असणे आवश्यक आहे. संमिश्र चित्र प्रदान करण्यासाठी या सर्व घटकांशी संबंधित कोणताही अधिकृत अभ्यास अस्तित्वात नाही.

किमान हे स्पष्ट आहे कि दोन लोकसख्या गट आहेत. जे पर्यावरणावर प्रचंड दबाव टाकत आहेत पहिला आणि सर्वात जास्त चर्चेत असलेला समूह म्हणजे गरीब आहे. लोकसंख्येचा हा सर्वात मोठा भाग आहे. हे स्पष्ट आहे का त्यांना अधिकतर जगाच्या संसाधनाच्या छोटयाश्या अंशावर निर्वाह करण्यास भाग पाडले जात आहे. त्यांची लोकसंख्या वाढत असताना संसाधनामधला त्यांचा वाटा कदाचित कमी होत आहे. वृक्षतोड, अतिचराई, सीमांत जमिनीचा लागवड, कमी पडणारा कालावधी इ. लोकसंख्या, साहित्य, गरीब पर्यावरणाचा नाश कसा करत आहेत. याबददूल चिंतेने भरले आहे मात्र पिडिताला दोष देण्याची ही पध्दत जूनीच आहे.

पर्यावरणाचा नाश करणारा दूसरा मानवी गट अर्थातच श्रीमंत आहे. पण त्याच्या अवनतीबदूल खुपच कमी बोलले जाते. या ढोंगीपणाचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघाने तयार केलेले जागतिक पर्यावरण संरक्षण धोरण, ज्याच्या आधारावर भारत सरकार ६१ राष्ट्रीय संवर्धन कार्यक्रम तयार केला आहे. रणनिती शाश्वत ग्रामीण विकासाच्या तातडीच्या गरजेबद्दल बोलते. परंतु शाश्वत शहरी विकास किंवा पाश्चात्य विकासाच्या अधिक महत्वाच्या गरजेचा उल्लेख करत नाही.

श्रीमंत लोक प्रमाणाने लोकसंख्येने कमी आहेत. परंतु ते संसाधनांचा खुप मोठा भाग वापरतात त्यांचा संसाधन वापराचा वाटा सतत वाढत असल्याचे दिसते. हा समूह पर्यावरण संसाधनांवर जगत नाही तर तो नैसर्गिक संसाधनांच्या विलक्षण व्यापक वापरावर अवलंबून आहे. श्रीमंत केवळ त्यांच्या स्वत:च्या

उपभोगानेच पर्यावरणाचा नाश करतात असे नाही तर गरीबांना अशा परिस्थितीमध्ये जगण्यास भाग पाडतात की त्यांना केवळ त्यांच्या पर्यावरणाच्या शोषणावर जगावे लागेल.

**२.१.३ भारतातील पर्यावरण चळवळी :–**

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी जगाच्या विविध भागात पर्यावरण चळवळी निर्माण होतात. नैसर्गिक साधनसंपत्तीचे अत्याधिक शोषणामुळे आणि लोकसंख्यावाढीच्या गरजा यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. गेल्या काही दशकांपासून पर्यावरण समस्यांकडे केंद्र आणि राज्य सरकारे आणि वैधानिक संस्थांच्या दृष्टिकोनामुळे भारतात त्याची मुळे आधीच खोलवर रुजली आहेत. अशा पर्यावरणीय नुकसानीशी संबंधित व बाधित स्थानिक लोकांच्या पूढाकाराने या गोष्टीला न्याय देण्यासाठी अनेक पर्यावरणीय गट आणि संस्था काम करत आहेत. पर्यावरण संरक्षणाबरोबरच विकासाला नवी दिशा देण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचे शोषण, जंगलतोड आणि शेत जमिनीला हानी पोहचविण्याऱ्या कृत्यावर व पर्यावरणावर अतिक्रम केल्याच्या विरोधात जलप्रवाह, तलाव, धरणे यामुळे झालेल्या नुकसानीबदद्‌ल असंख्य स्थानिक लोक निषेध करत होते. यातील बहुतेक प्रयत्नांना शास्त्रज्ञ आणि शिक्षण तज्ञांच्या गटांनी सहाय्य केले आहे. ज्यांनी लोकांच्या समस्या, अपेक्षा ओळखल्या. या लोकचळवळीमधून विकासाचे उपाय आणि पर्यायी प्रस्ताव पूढे आले आहेत. त्यांनी लोकांमध्ये पर्यावरण जागृती करण्यात महत्वाची भूमिका बजावली अशा काही चळवळी भारतामध्ये सक्रिय आहेत.

**१. बिष्णोई चळवळ :–**

बिष्णोईंना भारताचे पहिले पर्यावरणवादी म्हणता येईल. हा भारतातील राज्यस्थान राज्यातील निसर्ग उपासकांचा समुदाय आहे. या धर्मांची स्थापना गुरु महाराज जंबांजी यांनी १४८५ मध्ये केली होती. ज्याची जगण्याची २९ तत्वे मुख्यत: पर्यावरणाला चालना देणारी होती. जोधपूरच्या राजाला नवीन राजवाडा बांधायचा होता. त्यांनी खेजर्ली गावाजवळील जंगलातून लाकुड गोळा करण्यासाठी सैनिकांना पाठवले. जिथे बिष्णोई ग्रामस्थांनी खेजरीची झाडे वाढविण्यासाठी मेहनत केली होती. जेव्हा राजाची माणसे झाडे तोडायला लागली तेंव्हा तेथील बिष्णोईंनी संताप व्यक्त करत झाडे तोडण्यास विरोध केला. जेव्हा राजाचे सैनिक झाडे तोडू लागले तेंव्हा अमृतादेवी नावाच्या ग्रामस्थ महिलेने श्रध्देमुळे झाडांना तिने अक्षरश: मिठी मारली आणि इतरांनाही तसे करण्यास प्रोत्साहीत केले. एकेंक करुन सर्व ग्रामस्थांनी या झाडांना मिठी मारली व ती घेऊन जाण्यास विरोध केला. तेंव्हा सैनिकांनी सर्व लोकांचा शिरच्छेद केला. खेजर्लीच्या या कृत्याबदद्‌ल राजाला समजले आणि त्याने गावात धाव घेतली व बिष्णोई लोकांची माफी मागितली आणि सैनिकांना वृक्षतोड थांबविण्याचे आदेश दिले. त्यानंतर लवकरच बिष्णोई राज्याला वन संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केले. झाडे आणि प्राण्यांना इजा करण्यास मनाई केली. हा कायदा आजही या प्रदेशात अस्तित्वात आहे.

**२. चिपको आंदोलन :–** हिंदीमध्ये असणाऱ्या 'चिपको'या शब्दाचा अर्थ 'मिठी मारणे' आजच्या काळातही उत्तर भारतातील डोंगराळ भागातील खेड्यातील गरीब स्त्रिया ठेकेदारांच्या कुऱ्हाडीने तोडले जाऊ नयेत म्हणून झाडांना मिठी मारत आहेत. ही पहिली लोकचळवळ होती. आधुनिक काळात भारतात आणि

उत्तराखंडच्या चामोली जिल्हयात लोक जंगलतोडीच्या विरोधात होते. गावातील गरीब लोकांची स्वत:च्या संसाधनावर आधिकार आणि नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी ही चळवळ होती. १९६० च्या दशकात जेव्हा एका नामांकित खेळ साहित्य कंपनीच्या योजनेअंतर्गत झाडे कापली जात होती. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याने अलकनंदा नदीच्या १९७० च्या पुराची तीव्रता वाढली. ज्यात अनेक पूल आणि बसेस वाहून गेल्या. १०१ गावांमध्ये ६०४ घरे आणि ५०० एकर पीके नष्ट झाली. त्या विरोधात रस्ते अडवले गेले असे असूनही व्यावसायिक कारणांसाठी जंगलांचे शोषण सुरुच राहीले. चिपको आंदोलनाची पहिली सुरवात एप्रिल १९७३ मध्ये उत्तर प्रदेशातील चामोली जिल्ह्यातील मंडल नावांच्या गावात झाली. मार्च १९७४ मध्ये जेंव्हा वनविभागाने पाणलोट क्षेतातून झाडे तोडण्यासाठी ६८० एकर जंगलाचा वापर केला. तेंव्हा अलकनंदा नदीच्या खोऱ्यातील लोक, प्रामुख्याने स्त्रिया, या जंगलतोडीच्या विरोधात होत्या. गौरा देवी नामक महिलेच्या नेतृत्वाखाली त्यांनी या लाकुडतोड्यांना विरोध केला. वनरक्षकाला ताब्यात घेतले. त्यामुळे झाडे कापणाऱ्यांना पळून जावे लागले. या सर्व कृतीमुळे संघटित पध्दतीने जंगलतोडीला विरोध करणाऱ्या लोकांना प्रोत्साहित केले. ही चळवळ हिमालयीन इतर भागामध्ये पसरली. ज्यामध्ये भाँदर व्हॅली, चमचीधर जंगल, भद्यारघाट इ. भाग सामील होता. यावरून हे सिध्द झाले की, अशिक्षित गरीब लोकदेखील संघटितपणे शोषणाचा प्रतिकार करू शकतात. ही सर्व घटना व लोकांची कृती १९८० चा वनसंरक्षक कायदा व केंद्रासाठी पर्यावरणाच्या स्वतंत्र मंत्रालयाच्या निर्मितीसाठी कारणीभुत ठरला आहे.

**सायलेंट व्हॅली चळवळ :-**

सायलेंट व्हॅली प्रकल्पाअंतर्गत केरळच्या पल्लकड जिल्ह्यात कुंदापूडी नदीवर एक जलविद्यूत धरण बांधले जाणार होते. २४० मेगावॅट वीज निर्मिती, १००० हेक्टर अतिरिक्त शेतजमीन सिंचन आणि २००० ते ३००० लोकांना रोजगार उपलध होणार होता. प्रकल्पाची संकल्पना १९७३ मध्ये झाली असली तरी पैशाअभावी त्याच्या अंमलबजावणीला विलंब झाला. सायलेंट व्हॅली प्रकल्प आणि त्याचे परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या टास्क फोर्सने १९७६ मध्ये सादर केलेल्या अहवालात असे सुचविले होते कि हा प्रकल्प थांबवावा आणि परिसराची पर्यावरणीय परिस्थिती सुधारली पाहीजे. पुढे केरळ साहित्य परिषद, वैज्ञानिक शिक्षणावर काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेने, एक जीवशास्त्रज्ञ, एक अणूभौतिक शास्त्रज्ञ, एक विदयूत अभियंता, एक अर्थशास्त्रज्ञ आणि कृषी शास्त्रज्ञ यांचा समावेश असलेली एक बहु-अनुशासनात्मक टीम नियुक्त केली, ज्यांनी धरणाची व्यवहार्यता आणि परिणामांचा अभ्यास केला. हा प्रकल्प अहवालानुसार कार्यान्वित झाल्यास पश्चिम घाटातील उष्णकटीबंधीय सदाहरीत जंगलांच्या अवशेषांचे कधीही न भरुन येणारे अपरिवर्तनीय नुकसान होईल या प्रतिकुल अहवालानंतर, सायलेंट व्हॅली वाचवा म्हणून देशव्यापी मोहीम सुरु करण्यात आली. 'के.एस.एस.पी भाला' यांनी या संर्घषाचे नेतृत्व केले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी प्रकल्पाची किंमत आणि फायदे पाहण्यासाठी एम.एस.स्वामीनाथन यांची प्रमुख म्हणून एक समिती नेमली. समितीच्या शिफारशीवरुन या प्रकल्पाला भारत सरकारने मंजूरी दिली नाही.

**नर्मदा बचाव आंदोलन :–**

३१२ कि.मी. लांबीच्या नर्मदा नदीवर, भारत सरकारने सुमारे ३० मोठी आणि ३०० मध्यम आणि ३००० छोटी धरणे बांधण्याची योजना आखली होती. हा या देशातील सर्वात मोठा नदी खोरे प्रकल्प म्हणून ओळखला जातो. या प्रकल्पामुळे बाधित होणारे क्षेत्र म्हणजे मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांमध्ये पसरलेले आहे. तथापि तिन्ही राज्यांमध्ये प्रकल्पाची किंमत आणि फायदयाची विभागणी करण्यावर सहमती होऊ शकली नसल्यामुळे अंमलबजावणी गुंतागुंतीची होती. १९६९ मध्ये प्रति नियूक्तीला नर्मदा पाणी विवाद न्यायाधिकरणाकडे संदर्भित करण्यात आले. ज्याने १९७९ मध्ये त्याचा निकाल दिला. सरदार सरोवर धरण, गुजरातमधील वापरकर्त्यांना पाणी वळवण्यासाठी हजार कोटींच्या खर्चाचा संपूर्ण बहुउद्देशीय प्रकल्पाचा एक घटक होता. सरदार सरोवर प्रकल्पाचा उद्देश कच्छ आणि गुजरातच्या इतर दूष्काळी प्रदेशांना पिण्याचे पाणी आणि राजवनाच्या दोन जिल्हयांना पाणी सिंचनासाठी होता. यासाठी नर्मदा नदीवर मोठा जलाशय आणि विस्तृत कालवे आणि सिंचन व्यवस्थेच्या आवश्यकतेसाठी होता. नर्मदा नदीवर २ वर्ष पूर्ण पाणीसाठा ४५५ फुट ठेवण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या धरणामुळे गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या तीन राज्यातील ३७०० हेक्टर जमीन पाण्याखाली जाईल. तर सरोवर प्रकल्पाचा प्रभाव विस्तीर्ण क्षेत्रावर पसरलेला आहे. आणि बहुतेक मोठ्या आदिवासी लोकसंख्येवर त्याचा परिणाम होतो. २४५ गावांतील किमान एक लाख लोक जलमय झालेल्या भागात राहतात. या व्यक्तिरिक्त १४०० शेतकरी जलमय असण्याची शक्यता आहे. ज्यांना सिंचन व्यवस्थेचा फटका बसणार आहे. शेवटी धरणांच्या खालच्या प्रवाहात हजारोंच्या संख्येने असणारे इरविंग लोकांचे जीवन लक्षणीयरित्या प्रभावित होईल. १९८५ मध्ये जागतिक बँकेने या प्रकल्पासाठी एकुण ४५० दशलक्ष डॉलर्स कर्ज देण्याचे मान्य केले. १९९१ मध्ये जागतिक बँकेने सरदार सरोवर प्रकल्पाचे मानवी आणि पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी उपाय योजनांचे स्वतंत्र पुनरावलोकन करण्यासाठी 'ब्रॅडफोर्स मोर्स' यांची नियूक्ती केली. अखेरीस १९९४ मध्ये, जागतिक बँकेने प्रकल्पाबाबत केलेल्या वचनबध्दतेतून बाहेर पडली. परंतु गुजरात सरकारने प्रकल्पाला पुढे नेण्याचा आपला निर्धार दाखविला. नर्मदा बाँडद्वारे निधी उभारण्यासाठी लोकांपर्यंत जाण्याचा निर्णय घेतला आणि जेव्हा जारी केलेले दोन करार दोनदा फोल ठरले. तेंव्हा खऱ्या अर्थाने विजयाचा उन्माद झाला. 'धरणविरोधी' गटामध्ये सर्वात जास्त आवाज ज्येष्ठ गांधीवादी 'हंबा अंते' आणि मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली 'नर्मदा बचाव आंदोलन' झाले. प्रकल्पाला विरोध करण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रतिकाराने प्रयत्न केले. या चळवळीने कठोर कृतीचा अवलंब केला. मेधा पाटकर यांनी जून १९९३ मध्ये मुंबईत आमरण उपोषण केले. ऑगस्ट १९९३ मध्ये, प्रतिकार चळवळीने 'जल समर्पण केले' 'जागच्या जागी रहिवासी पाण्यात बुडवा' अशा भूमिकेचा अवलंब केला. आंदोलन आणि निषेध अजूनही चालू आहे.

**आप्पीको चळवळ :–**

सप्टेंबर १९८३ मध्ये सालकणी आणि आजूबाजूच्या गावातींल तरुण आणि महिलांनी झाडांना मिठी मारण्यासाठी जवळपास ५ मैलांचा प्रवास केला. अप्पीको ही चळवळ जंगल आणि झाडांच्या संरक्षणाच्या संदर्भात गढवाल हिमालयातील चिपको चळवळीच्या योगदानातून भारताच्या इतर भागातही त्याचा प्रभाव

दिसून आला. उत्तरेतील ही चिपको चळवळ दक्षिणेत 'आप्पीको चळवळ' म्हणून उदयास आली. अप्पीको हा कन्नड भाषेतील चिपको शब्दाचा समानार्थी शब्द आहे. पर्यावरण जागृतीची ही चळवळ ऑगस्ट १९८३ मध्ये कर्नाटकातील उत्तर कन्नड भागात सुरू झाली. तब्बल ३८ दिवस हे आंदोलन पूर्ण उत्साहात सुरू होते. तरुणांना त्यांच्या गावाभोवतीची जंगले हळूहळू नाहीशी होत असल्याचे लक्षात आल्यावर ते या चळवळींत मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

नोव्हेंबरमध्ये ही चळवळ निडगोड सिददूपूर तालूका येथे पसरली. जिथे ३०० लोक एकत्र आले आणि झाडे तोडणे यशस्वीरीत्या थांबविले. या भागातील आणखी एक समस्या अशी होती कि, बहुप्रजातीय जंगलांचे रुपातंर एकाच जंगलात होत होते. यामुळे पर्यावरणीय परिस्थितीला हानी पोहचत होती. त्यामुळे लोकांना जंगलातून खत आणि चारा मिळत नव्हता मधमाशांच्या पोळ्या गायब झाल्या होत्या. पुर्वी प्रत्येक कुटूंब वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांपासून वर्षाला किमान चार डब्बे मध गोळा करत असे. परंतु आता इतर झाडे तोडून उद्योगासाठी निलगिरीची झाडे लावल्याने त्यांना मध मिळत नव्हता. त्यामुळे इतर अनेक समस्या निर्माण होत होत्या.

आप्पीको चळवळ दक्षिण भारतात पर्यावरणीय जाणीवांची स्त्रोत बनली. वनविभागाची धोरणे व्यावसायिक वृक्षांना कशी चालना देत आहेत. ज्यामुळे ज्यामुळे सर्व सामान्यांना दैनंदीन जीवनात वापरल्या जाणाऱ्या अनेक आवश्यक संसाधनांपासून वंचित रहावे लागत आहे. यावर प्रकाश टाकण्यात आला. वनविभागाने ठरवून दिलेल्या संख्येपेक्षा जास्त झाडे तोडणाऱ्या ठेकेदारांच्या व्यावसायिक हितसंबंधाचा त्यांनी पर्दाफाश केला. या प्रक्रियेत कंत्राटदार, वनविभाग आणि राजकारणी यांचा हातखंडाही उघड झाला.

अप्पीको चळवळीने प्रामुख्याने तीन उददीष्ट्ये साध्य केली. अस्तित्वात असलेल्या वनक्षेत्राचे संवर्धन करणे. मोकळ्या जागेवर झाडे लावणे आणि त्याचे संवर्धन लक्षात घेऊन नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे. स्थानिक पातळीवर स्थापन केलेल्या 'कॅम्पस कॉर्न्झर्व्हेशन सेंटर' या संस्थेने उददीष्ट्ये साध्य करण्यात महत्वाची भूमिका बजावली. चळवळीने बाबूसारख्या झाडांचे संरक्षण करून स्थानिक लोकांचा उदरनिर्वाह जपला. पश्चिम घाटातील या चळवळीने त्यांच्या उपजिविकेचे साधन व्यावसायिक हितसंबंधापासून हिरावून घेतले. जंगल आणि पर्यावरणाला असलेल्या धोक्याची जाणीव अप्पीकोने शांततापूर्ण मार्गाने संवर्धन करणाऱ्या समाजाकडे नेले. ज्यामध्ये मनुष्य किंवा निसर्गाचे शोषण केले जाऊ शकत नाही. वंदना शिवा या पर्यावरणवादींच्या मते ''मानवी अस्तीत्वाला असलेल्या धोक्याचे हे सुसंस्कृत समाजाचे सुसंस्कृत उत्तर होते.''

**बालियापाल राष्ट्रीय चाचणी श्रेणी :–**

भारत सरकारने बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर ४०० चौरस किलोमीटर पसरलेल्या ओरीसातील बालासोर जिल्ह्यातील बालियापाल आणि भोगराई क्षेत्रातील १२६ गावांमध्ये राष्ट्रीय चाचणी क्षेत्र स्थापण करण्याची योजना आखली होती. हे क्षेत्र ओरीसासारख्या मागासलेल्या भागातील सर्वात सुपीक भुमीचे क्षेत्र आहे आणि सुपारीची झाडे, पाने, मांस, मासे, भाज्या, भात, काजू आणि इतर अनेक उत्पादनासाठी प्रसिध्द

आहे. प्रकल्पामुळे होणाऱ्या विस्थापनाच्या भितीने गावकऱ्यांनी नॅशनल टेस्ट रेंज प्रकल्पाविरोधात निदर्शने सुरु केली. यामुळे दिर्घकाळपर्यंत कोणताही सरकारी अधिकारी या गावात येऊ शकला नाही. सरकार प्रत्येक कुटूंबासाठी ५०० चौ. यार्डच्या जागेत मॉडेल व्हीलेज उभारण्याबरोबरच मोठया प्रमाणात लोकांच्या वस्तीच्या सुविधादेखील देण्यास तयार होते. घर बांधण्यासाठी आणि मुलांसाठी मोफत सुविधा व आर्थिक मदत देण्यासाठी तयार होते. संपूर्णत: ४००० कोटींपेक्षा जास्त खर्च आहे. तथापि गावात एकवाक्यता नव्हती. मुळात सरकारने नियोजन करताना लोकांना विश्वासात घेतले. अबो ग्रामस्थ त्यांची पारंपारीक घरे, राहणीमान आणि प्रस्थापित पारंपारिक जीवनशैली गमावण्यास तयार झाले. शिवाय लोकांमध्ये अविश्वास राहीलेला नव्हता. आश्वासने पूर्ण करण्यावर सरकारने, अनुभवाच्या जोरावर जिथे लोकांची अशी हकालपट्टी करण्यात आली. लोकांच्या या उत्कंठेमध्ये नागरी हक्क उपक्रम, समाजशास्त्रज्ञ शैक्षणिक क्षेत्रातील लोक आणि पर्यावरणवादी सामील झाले. जनतेने एक इंचही आंदोलन मागे घेतले नाही. कोणत्याही राजकीय गटाची किंवा संघटनेची सुरवातीच्या टप्प्यात कोणतीही भुमिका नसताना उत्स्फुर्तपणे वाढलेली ही एक चळवळ होती.

**निष्कर्ष :–**

पर्यावरणीय फायदयांच्या शोधात सामूहिक कृतीत गुंतलेल्या लोक आणि संस्थांचे व्यापक जाळे म्हणून पर्यावरणीय हालचालींची कृती केली जाते. पर्यावरण चळवळी वैविध्यपूर्ण आणि जटील समजल्या जातात. त्यांचे संघटनात्मक स्वरुप अत्यंत संघटित आणि औपचारीकपणे संस्थात्मक ते मुलत: अनौपचारिक, स्थानिक ते जवळजवळ जागतिक अशा त्यांच्या क्रिया-प्रक्रियांची अवकाशीय व्याप्ती, त्यांच्या चिंतेचे स्वरुप एकल समस्यांपासून ते जागतिक पर्यावरणीय चिंतेच्या घसरणीपर्यंत, अशी सर्वसमावेशक संकल्पना स्वत: पर्यावरणीय कार्यकर्त्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या शब्दाशी सुसंगत आहे. पर्यावरणीय चळवळीतील कार्यकर्त्यां. ज्याला पर्यावरण चळवळ म्हणतात त्याना अनेकस्तर आणि स्वरुपातील संबंध जोडण्यास सक्षम करते. भारतात विशेषत: १९७० नंतर, मोठया प्रमाणात पर्यावरणीय चळवळी उदयास आल्या.

तथापि, काही समकालीन चळवळींनी पूर्व तयारीत पर्यावरणीय हालचालींचा दर्जा प्राप्त केला आहे. कारण या चळवळी त्यांचे लक्ष जगण्याच्या मुलभुत गरजांवरून विस्तृत केले आहे.

लोकांच्या नैसर्गिक संसाधनांच्या टापूवर, त्यांच्यासाठी उपजिविकेचा स्त्रोत असलेल्या गोष्टीवर अधिकार प्रतिबिंबित केले. या नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रणाची पारंपारिक रचना नाकारण्याबद्दल पर्यावरणीय चळवळीतील प्रमुख सहभागींनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. जेव्हा आपण सामाजिक रचना, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास आणि संबंधित पर्यावरणीय बदल पाहतो. तेव्हा आपल्याला समाज आणि पर्यावरण यांच्यातील पूरक आणि सहजीवन संबंध आढळतात. ज्याकडे दुर्लक्ष करणे कठीण आहे.

### २.१.४ भारत आणि शाश्वत विकास :–

### शाश्वत विकास संकल्पनेचा उगम :–

१९८७ साली संयुक्त राष्ट्र संघाने (UNO), जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग [World Commission On Environment and Devolopment (WCED)] ची स्थापना केली. हा आयोग पृथ्वीवरील सामाजिक पर्यावरणीय समस्यांचे निरीक्षण करुन त्यावर वास्तववादी उपाय योजण्यासाठी आणि पृथ्वीवरील संसाधने पूढील पिढयांसाठी राखून त्याचा उपयोग पूढील पिढयांसाठी राखून ठेऊन त्यांचा उपयोग चालू शाश्वतरित्या कसा करता येईल. यासाठी उपाययोजना शोधण्यासाठी नेमण्यात आला होता. या आयोगाचे अध्यक्ष नॉर्वेचे पंतप्रधान ग्रो हारलेम ब्रुडलँड या होत्या. यावरुन या आयोगाला ब्रुडलँड कमिशन असे म्हणतात. या आयोगाने सादर केलेल्या 'अवर कॉमन फ्युचर' या अहवालात शाश्वत विकास 'Sustainable Devolpment' ही संकल्पना व त्याची व्याख्या करण्यात आली. शाश्वत विकासास चीरंतन, चिरस्थायी, धारणाक्षम विकास असेही म्हणतात.

### शाश्वत विकासाच्या व्याख्या :–

'जो विकास चालू पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो त्या विकासास शाश्वत विकास असे म्हणतात.'

'वर्तमानकालीन गरजांची पूर्तता करत असताना या प्रयत्नांचा परिणाम भविष्यकालीन गरजांवर होणार नाही ही बाब विचारात घेऊन साध्य केलेला विकास म्हणजे चिरंतन विकास होय.' थोडक्यात पर्यावरणाचा महत्व टिकवून ठेवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय.

### नैसर्गिक साधन संपदा : शाश्वत आर्थिक विकास व पर्यावरण

शाश्वत विकास म्हणजे शाश्वत जीवनशैली असा अर्थ काढणे चूकीचे ठरेल. शाश्वत विकासासाठी नैसर्गिक साधन संपत्तीची कमीत कमी हानी पर्यावरणाचा जास्तीत जास्त संयोग व आर्थिक विकास हा विचार केंद्रस्थानी असला पाहिजे. भावी पिढीच्या गरजा निसर्गातल्या क्षमतेला कोणताही धक्का न लावता लोकांच्या आजच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे धारणाक्षम विकास होय. याचाच अर्थ निसर्ग नियमांच्या चौकटीतून राहून निसर्गाला धक्का न पोहचवता मानवाने स्वत:चा विकास विविध नैसर्गिक घटकांचा वापर करणे होय.

मानव व पर्यावरण यांचा संबंध अतुट आहे. मानवाच्या सभोवताली असणाऱ्या अविवेकी वागण्याने पर्यावरणाचा ऱ्हास केला आहे. स्वत:चा किंवा समाजाचा विकास करताना जर निसर्गाला धक्का पोहचत असेल तर असा विकास अशाश्वत किंवा आधारक्षम विकासच होय. कारण यातून पर्यावरण असंतूलन होऊन मानव स्वत:साठी अस्थिरता निर्माण करुन घेईल हा धारणाक्षम विकास नाही. नैसर्गिक पर्यावरणाचे दिर्घकाळ टिकवून ठेवून मानवी जीवनमान उंचावणे म्हणजेच धारणाक्षम किंवा शाश्वत विकास होय.

मानवाने निसर्गाचा पूरेपूर उपयोग घेतला त्यातून पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले. २० व्या शतकाच्या उत्तरार्ध शेवटी माणसाला आपली चूक उमजली आणि वाढलेल्या गरजा सुखसोयी न सोडता शाश्वत जीवनशैलीच्या शोधात मानव फिरू लागला. पोषणक्षम जीवनपध्दतीसाठी संसाधनांचा योग्य वापर करणे गरजेचे असून दूष्काळ, महापूर, कुपोषण, पर्जन्यमान, दहशतवाद, दारिद्रय, यूध्द, संघर्ष, प्रदूषण, भुकंप, भुसख्खलन इत्यादी नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण ठेवणारे योग्य पर्याय सापडत नसल्याचे दिसते. या आव्हानांची पडताळणी मानव करत आहे. जगात नैसर्गिक साधन संपत्तीचे वितरण विषम स्वरुपात आहे. नैसर्गिक संपत्तीचा वापरसुध्दा देशपरत्वे कमी जास्त आढळतो.

मानव नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरेकी वापर करतोच पण त्याचबरोबर ती संसाधने मोठया प्रमाणावर दूषितही करत असतो. लोकसंख्या आणि नैसर्गिक साधन संपत्तीचा धारणाक्षम उपयोग या दोन्ही गोष्टी एकमेकांशी निगडीत आहेत. पण या नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर योग्य पध्दतीने करून शाश्वत विकासासाठी गरीबी व दारिद्र्याचे उच्चाटन करणे आणि पर्यावरण संरक्षण करणे काळाची गरज आहे.

मानव आणि त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणाचे एकात्मीकरण असते, म्हणजे एकाचे कल्याण दुसऱ्यावर अवलंबून असते. उत्पन्न आणि आर्थिक विकासाच्या गतीखेरीज पर्यावरणाचे संरक्षण होऊ शकणार नाही. तर पर्यावरण संरक्षणाविना हळूहळू क्षीण होईल. मानवाला पर्यावरणीय अवनतीपासून होणारा धोका हा आण्विक मनूष्यहानी सारखाच मोठा असणारा म्हणून औदयोगिकरण किंवा विकास कोणीही थांबवू शकणार नाही. त्यासाठी चिरस्थायी विकास हा मध्यम मार्ग असून त्यातून आर्थिक शाश्वतता निर्माण होईल. पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता, उर्जा, अन्नसुरक्षा, जैवविविधता, लोकसंख्या, औदयोगिक तंत्रज्ञान या मुलभुत बाबींवर शाश्वत विकासासाठी जोर देणे महत्वाचे असते.

मानवाच्या आर्थिक उन्नतीसाठी भारताच्या कृषीप्रधान देशात आधूनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन रासायनिक खते, औषधांचा अति उपयोग करुन कृषी योग्य जमिनीची प्रत प्रतिवर्षी कमी होत आहे. पाण्याचा अतिवापर करुन जमिनी खारट होत आहेत. मोठ्या शहराजवळील कृषी योग्य जमिनीचा उपयोग सिमेंटच्या जंगलाकरता होत आहे. भारतात आर्थिक विकासात शेती हा महत्वाचा घटक आहे. काही भागात, अनेक भागात अनेक घटकामुळे प्रदूषण वाढत आहे. म्हणून आर्थिक विकास व पर्यावरण यांच्या समन्वय साधून शाश्वत विकास करणे गरजचे आहे. कारण सर्व समावेशक विकास हवा असेल तर शेतीचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावे लागतील.

**पर्यावरण संरक्षण व सकल निसर्ग सुधारणा :–**

सर्व निसर्गकेंद्री मानून आपआपल्या कर्तव्याची जाणीव करून देऊन पर्यावरणाचे महत्व जपणाऱ्या भारतात सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण व संवर्धन कायदा आवश्यक होता.

निसर्गाची पूर्नबांधणी करण्यापेक्षा आज राजकारण्यांसाठी महत्वाचे व नियोजक काहीही नाही पण हे तेव्हाच शक्य आहे जेंव्हा लोक आणि निसर्ग यांच्यातील सलोख्याचे व निरोगी नातेसंबंध तयार होतील. तरच एकच निसर्ग जो लाखो लोकांसाठी उपयूक्त आहे तो तो पून्हा स्थापित केला जाऊ शकतो. पाश्चिमात्य

देशामध्ये इलेक्ट्रॉनिक क्रांतीसाठी, महासागरांचे खाणकाम करण्याचे प्रयत्न आणि जागतिक तंत्रज्ञानाचा चेहरा किती जलदपणे बदलला याची पर्वा न करता किंवा आधुनिकीकरणाच्या नावांखाली पाश्चिमात्य देशांशी किंवा भुराजकारणाच्या निव्वळ सक्तीतून, निसर्गाची पूनर्बांधणी करणे आणि लोकांशी त्याचे नाते जोडणे हाच कदाचित गरीबी आणि बेरोजगारी सोडविण्याचा एकमेव मार्ग राहील.

जमिनीच्या जवळ आणि उर्जा तयार करण्याची गरज असताना, या देशाला आपल्या लोकांच्या सामर्थ्याला आपल्या जमिनीच्या उत्पादन क्षमतेत अडथळा आणण्याची, भूमीहिनता, गरीबी आणि बेरोजगारीच्या मुळावर प्रहार करण्याची यापेक्षा चांगली संधी मिळू शकत नाही. जर पुरेशी उर्जा उपलब्ध असेल तर गरीबी म्हणजेच रोखीची कमतरता. अर्थशास्त्रज्ञांनी आणि आधूनिक सभ्यतेने परिभाषित केल्याप्रमाणे गरिबी नाहीशी होणार नाही. परंतु गरीबीची तीव्रता पूर आणि दूष्काळ यासारख्या नैसर्गिक आत्पतकालीन परिस्थितीची वाढती संवेदनशीलता अधिक उर्जा तयार करुन रोखली जाईल. वस्तुत: उत्पन्नाच्या माहितीवर किंवा अन्नाच्या कॅलरीजवर आधारित गरीबीचे पारंपारीक मोजमाप अशा परिस्थितीत अपूरे आहेत. जिथे उर्जेच्या गरजा पूर्ण करणे अधिक कठीण होत आहे आणि दैनंदीन आधारावर त्यांचे संकलन करणे ही मानवजातीची सर्वात वाईट आणि कष्टदायी पध्दत आहे. विशेषत: स्त्रियांच्या बाबतीत ही गणना केवळ अपूरीच नाही तर ती एक मजबुत लिंग पूर्वग्रह देखील दर्शिवते. कारण ही गोष्ट मुख्यत: गरीबीच्या पैलुंशी निगडीत आहे. पैसे नसणे या पैलुंशी पूरुष सामान्यत: संबंधित असतो. परंतु गरीबीच्या काही पैलुं ज्यामध्ये इंधन, चारा पाणी इ. पैलू महिला अभावानेच हाताळतात.

जर आपण सकल निसर्ग उत्पादनासारखी संकल्पना तयार केली तर आपल्याला असे आढळले की, गरीबांसाठी हे सुचक आहे, जे पारंपारिक सकल राष्ट्रीय उत्पन्न (GNP) पेक्षा कितीतरी पटीने अधिक महत्वाचे आहे. किंबहूना आपण असेही म्हणू शकतो कि ज्यांना ज्यांना परंपरागत गरीबांकडून फारशी वरकमाई मिळत नाही. तेच स्थुल निसर्ग उत्पादनावर सर्वात गंभीरपणे अवलंबून असतात. सकल राष्ट्रीय उत्पन्नाला सकल निसर्ग उत्पादनाचा नाश किंवा परिवर्तन करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही.

## २.२ सारांश :–

आर्थिक विकास आणि पर्यावरण यांचे नाते नवीन नाही. ज्याप्रमाणे पर्यावरणीय अवनती आणि आर्थिक प्रक्रिया यांच्यातील संबंधाची उकल होत गेली. त्याचप्रमाणे पर्यावरणाच्या माध्यमातून मैत्रीपूर्ण आर्थिक विकासावर भर दिला. पर्यावरण संरक्षण आणि मानव वंशाचे कल्याणकारी जीवन एकमेकांच्या विरोधात जाऊन नाही तर एकमेकास पूरक आहे. याची जाणीव होऊ लागली म्हणून चिरस्थायी विकासाची संकल्पना पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून प्रस्तूत करण्यात आली. पर्यावरण सहयोगी घटकातून मानवाने या जीवनपध्दतीचा स्वीकार करुन भविष्यातील पिढयांच्या गरजा भागवल्या जाव्यात आणि शाश्वत आणि चिरस्थायी विकास साधण्यासाठी प्रत्येकाने निर्सगकेंद्री विचार आणि आचार अंमलात आणला तर खऱ्या अर्थाने निसर्गाचे संरक्षण आणि संर्वधन होईल व मानवी जीवन सुकर होईल.

## २.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

१. पर्यावरणात आपल्या सभोवतालच्या ..... व ..... गोष्टींचा समावेश होतो.

२. भारतामध्ये पर्यावरण संरक्षणाची सुरवात ......... दशकात झाली.

३. चिपको म्हणजे .... होय.

४. भारत हा सर्वाधिक .......... देश आहे.

५. .... ही चळवळ भारतातील पहिली पर्यावरण चळवळ होय.

६. चिपको आंदोलनाचे नेतृत्व .... नी केले.

७. नर्मदा बचाओ आंदोलन .... संदर्भात होते.

८. अप्पीको चळवळ .... राज्यात सुरु झाली.

९. पर्यावरण हा शब्द .... या इंग्रजी शब्दापासून तयार होतो.

१०. शाश्वत विकासाच्या संकल्पनेची सुरवात .... ने केली.

उत्तरे : १) प्रदेशाचा, २) सत्तरच्या, ३) झाडास मिठी मारणे, ४) लोकसंख्येचा, ५) विष्णाई चळवळ, ६) गौरादेवी, सुंदरलाल बहुगुणा, ७) पर्यावरण ऱ्हास, ८) कर्नाटक, ९) environment , १०) ब्रुडलँड आयोग

**टिपा लिहा.**

१. पर्यावरण

२. शाश्वत विकास

३. पर्यावरण ऱ्हास

४. पर्यावरण चळवळ

५. पर्यावरण ऱ्हासाची समस्या

६. पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम

७. अप्पीको चळवळ

८. नर्मदा बचाओ आंदोलन

**सरावासाठी स्वाध्याय**

१. पर्यावरणवाद म्हणजे काय?

२. भारतीय पर्यावरणाच्या समस्या कोणत्या?

३. भारतातील पर्यावरण चळवळी कोणत्या?

४. भारतीय पर्यावरण ऱ्हासाचे आर्थिक घटक सांगा?

५. भारतीय पर्यावरण ऱ्हासाचे सामाजिक घटक सांगा?

६. भारतीय पर्यावरण ऱ्हासाचे संस्थात्मक घटक सांगा?

७. पर्यावरण म्हणजे काय पर्यावरण ऱ्हासाचे घटक सांगा.

८. भारतामधील पर्यावरण चळवळींचे पर्यावरण रक्षणातील योगदान सांगा.

९. भारत आणि शाश्वत विकासाबदद्‌ल लिहा.

१०. भारतीय पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम स्पष्ट करा.

११. भारताची पर्यावरण रक्षणाबदद्‌लची भूमिका स्पष्ट करा.

**संदर्भ :–**


१. अग्रवाल ए आणि एस. नारायण न, १९९८, पास्ट क्योटो पॉलिटिक्स, क्रिएटिव्ह कार्बन हिशेब, डाऊन टू अर्थ, ७(५), २७–३७.

२. गोगई. एल. (२०१३) नैसर्गिक संसाधन ऱ्हास आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम.

३. ओएल. (१९९७–९८) आर्थिक सर्वेक्षण नवी दिल्ली : नियोजन आयोग.

4. CSO (2003) भारतातील पर्यावरणीय आकडेवारीचे संकलन, नवी दिल्ली ; सांख्यिकी आणि कार्यक्रम अमलबजावणी मंत्रालय.

5. Agarwal, A. 1990 the North-South Perspective: Alienatiin of In dependence. AMBIO 19(2):94 96.

6. Coal, (1987) 'Devolopment & under development of profile of third world'. Methuan London.

7. Agarwal B. (1986), "Cold Healths and Barren Slops" the wood fuel crisis in the third world London ; Zed book, London.


❑❑❑

## घटक १
# प्रशासनातील सद्यकालीन प्रवाह

**अनुक्रमणिका**


१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

 १.३.१ डिजिटल शासन

 १.३.२ शाश्वत विकासाची उद्दिष्टे

 १.३.३ व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी

 १.३.४ मानवविकास निर्देशांक व सामाजिक लेखापरीक्षण

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.६ स्वाध्याय

 अ. अध्ययनासाठी प्रश्न

 ब. स्वंय अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

 क. सरावासाठी दीर्घोत्तरी प्रश्न

 ड. टीपा लिहा

१.७ अधिक वाचनासाठी


## १.१ उद्दिष्ट्ये :

- डिजिटल शासनच्या माध्यमातून सरकार व नागरिकांना जोडणाऱ्या लोकप्रशासनातील नव्या प्रवाहाची उपुक्तता या घटकांमध्ये अभ्यासणार आहोत.
- शाश्वत विकास घडवून आणण्याची प्रक्रिया भारतीय परिप्रक्षेत समजून या घटकांमध्ये घेता येईल.
- निसर्ग आणि समाज यांच्या विषयी आत्मभान बाळगून आर्थिक उद्दिष्टे प्राप्त करणे याबाबतची जाणीव व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी या माध्यमातून कशा प्रकारे होते याचे आकलन विद्यार्थांना या घटकातून होईल.
- मानवविकास निर्देशांक व सामाजिक लेखापरीक्षण देशातील सामाजिक आणि आर्थिक मापनाच्या माध्यामातून एकूण उपलब्धी मोजण्यासाठी वापरले जाते हे या घटकांमध्ये अभ्यासता येईल.

## १.२ प्रास्ताविक :

प्रशासच्या नव प्रवाहाचा जागतिकीकरणानंतर सुरवातीच्या काळामध्ये जागतिक पातळीवरील अनेक राष्ट्रांनी 'सुशासन' हे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्टे असल्याची बाब अधोरेखित केली आहे. शासनव्यवहारामध्ये लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी या काळामध्ये ई-शासन महत्वाचे मानले आहे. या कालावधीत माहितीचे स्वातंत्र्य पुनर्निश्चित करण्यात येऊन त्याला विस्तृत मार्गदर्शक तत्त्वांचा आधार पुरविण्यात यावा.सुशासनाच्या पुढाकारामध्ये इंटरनेट क्रांतीने आपली साधनात्मक प्रभाव क्षमता सिद्ध केलेली आहे आणि जगाचा प्रवास इंटरनेट शासनाच्यादिशेने सुरू आहे. इंटरनेट संभाव्यतेचा एक आयाम म्हणजे कोणत्याही वेळी आणि कोठेही सेवा पुरविता येते. याबरोबरच शासनाच्या केंद्रस्थानी नागरिकांना आणण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत. भारतामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर १९६०-७० च्या दशकात सुरु झाला. जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या वातावरणामुळे १९९० साली शेवटी या तंत्रज्ञानाची फळे सामान्य माणसाला मिळू लागली. सर्वप्रथम लष्करात वापरल्या गेलेल्या संगणक प्रणाली त्यानंतर शासन व्यवहारातही वापरल्या जाऊ लागल्या. माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रशासनामध्ये झालेल्या उपयोजनातून 'ई-प्रशासन' (E-Governance) ही संज्ञा निर्माण झाली आहे. केंद्र सरकारच्या पुढाकारांमुळे भारतीय लोकप्रशासनामध्ये माहिती-तंत्रज्ञानाची आगेकूच झाली. पुढे त्याचे रूपांतरण डिजिटल गव्हर्नस मध्ये होवून त्यास अत्यंत व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

प्रशासनाच्या नव प्रवाहामुळे डिजिटल संसाधनाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले असून यामध्ये संगणकीकरण, मोबाइल, इंटरनेट इत्यादींचा समावेश होतो. या आणि अशा नवनवीन तंत्रज्ञानातून तयार होणारी माहिती व प्रसार माध्यमांची मदत घेऊन शासनाचा कारभार अधिक पारदर्शक, सहभागी आणि प्रभावी बनवणे शक्य आहे. म्हणूनच डिजिटल गव्हर्नन्सला महत्व आहे. प्रशासन व राजकारण याच्या परस्पर संबधातून व्यापक नागरी हित सध्या करणे हे उद्दिष्ट प्राप्त करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध करून प्रत्येक देशाने मानवी हक्कांचे संरक्षण केले पाहिजे असे बंधन घातले आहे. या मानवी हक्काच्या आधारावर मानवी विकास अहवाल प्रकाशित करण्यात येतो. प्रत्येक राष्ट्राने मानवी विकासासाठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, पाणी, कुपोषण यांच्या निर्मूलनासाठी प्रयत्न केले पाहिजे असे अपेक्षित आहे. जगातील लोकशाही राष्ट्रांत मानवी विकासासाठी प्रयत्न केले जात नाहीत असे आढळून आले आहे. म्हणूनच शाश्वत विकासचे उद्दिष्टे ही लोकप्रशासनच्या नव प्रवाहाची सुरुवात असून विश्व गुरु म्हणून नेतृत्व करता भारताने 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' या जीवनमूल्यांच्या आधारे लोकसहभागातून नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनशील असे सुप्रशासन आणि विकासाचे प्रारुप (मॉडेल) तयार केले आहेत. भारतीय प्रारुपात (मॉडेल) प्राचीन ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासाठी घडवून आणले जात आहे. 'जी २०' च्या संपूर्ण कार्यप्रवाहांमध्ये विकासाच्या मुद्द्यांवरील भर वाढवून शाश्वत विकास घडवून आणण्याची प्रक्रिया अधिक गतीमान करण्याकडे भारताचे लक्ष राहणार आहे. महिला-नेतृत्व विकास, डिजिटल परिवर्तन आणि केवळ हरित संक्रमण आदी सर्व शाश्वत विकास गटांवर बहुआयामी प्रभाव टाकू शकतील, असे परिवर्तनशील क्षेत्रे आणि संक्रमणांवर विशेष

भर असणार आहे. सदर घटकामध्ये या नव लोकप्रशासन सार्वजनिक अधिकार व क्षमता या व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वच्या माध्यमातून गाठणे अथवा प्राप्त करणे आणि नव प्रवाहांची माहिती या प्रकरणात मांडणी करण्यात आली आहे.

## १.३ विषय विवेचन

### १.३.१ डिजिटल गव्हर्नन्स व शासन:

लोकशाही व्यवस्थेमध्ये नागरिक हा केंद्रस्थानी असतो. हे मुख्य ध्येय डोळ्यासमोर ठेवून लोकप्रशासनाच्या बदलाच्या अधिकाधिक डिजिटाजेशनच्या टप्पावर आहे. भारत सरकारने डिजिटल गव्हर्नन्सवर भर दिला आहे. लोकाभिमुख कार्याची गतीशिलता वाढविण्यासाठी लोकप्रशासनात नव प्रवाह निर्माण होताना दिसून येत आहेत. सरकारशी संबंधित कामासाठी नागरिकांना सरकारी कार्यालयात यावे लागू नये. डिजिटल गव्हर्नन्सच्या माध्यमातून सरकार नागरिकांना सर्व सरकारी सेवा-सुविधा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात, हा त्यामागील उद्देश आहे. प्रत्येक वीस ते पंचवीस हजार नागरिकांमागे किमान एक डिजिटल सेवा केंद्र उभारण्यात येत आहे. या केंद्रामधून नागरिकांना त्यांची सर्व सरकारी कामे ऑनलाईन पद्धतीने करता येतील. स्मार्ट सिटी, स्मार्ट पंचायत या माध्यमातून जमा होणाऱ्या माहितीच्या विश्लेषणासाठी मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम विकसित करण्यात आली आहे. त्याचा वापर करून त्या आधारे योजना अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य होणार आहेत भारत सरकारकडून मिळणारे सर्व प्रकारचे अनुदान व इतर लाभ थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होत आहे. त्यामुळे सरकारची मोठी बचत होत असून ही रक्कम सरकारकडून राज्य सरकारांना विकास कामासाठी देण्यात येत आहे. बँक खाती आधार क्रमांकाशी संलग्न केल्याने त्यातील २६ टक्के दुबार खाती बंद करण्यात सरकारला यश आले आहे. ही प्रक्रिया अजूनही सुरू आहे. डिजिटल साक्षर असणे महत्त्वाचे आहे. सध्या मूक कोर्सेसच्या माध्यमातून Swayam पोर्टलच्या माध्यमातून शिक्षण घेता येणेही शक्य आहे. त्याचबरोबर विविध विषयांचे अल्प मुदतीचे अभ्यासक्रमही Swayam पोर्टलच्या माध्यमातून करता येऊ शकतात. सध्याच्या काळात कौशल्य विकासालाही महत्त्व आले आहे. त्यासाठीही ऑनलाईन माध्यम पूरक ठरू शकते, हे केंद्र सरकामार्फत प्रस्तावित आहेत.

**डिजिटल गव्हर्नन्स संकल्पना :**

आजचे जग हे तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे शासन प्रशासन नागरिकभिमुख बनले आहे. डिजिटल गव्हर्नस हे शासकीय नवनिर्मिती लोकप्रशासनाच्या नव प्रवाहामध्येमध्ये डिजिटल गव्हर्नन्सच्या नव्या कालखंडास प्रारंभ झाला आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून शासनाला शासनाच्या व्यवहारांमध्ये अधिक सुसूत्रता आणता येते. यालाच 'डिजिटल-गव्हर्नन्स' असेही म्हणतात. असा सर्वसाधारण अर्थ डिजिटल गव्हर्नस चा थोडक्यात करता येतो. भारतामध्ये ई-शासनाला सन २००० च्या माहिती व तंत्रज्ञान कायद्यानुसार मान्यता देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत ई-गव्हर्नन्स हा त्यासाठी मोठा आधार आहे. हे असेच एक क्षेत्र आहे कि ज्यामुळे नोकरशाही व्यवस्थेचा योग्य वापर करून प्रचलित अडचणींवर मात करता येते. जागतिकीकरणाच्या वेगवान बदलाच्या काळामध्ये लोकप्रशासन अभ्यासशाखेचा विचार केला असता

प्रशासकीय सुधारणांमध्ये अगदी अलीकडचे ई-शासन किंवा डिजिटल गव्हर्नस महत्त्वाचे ठरते, आधुनिक तंत्रज्ञान क्रांती (ICT) मधून स्वीकृत केल्या गेलेल्या डिजिटल -शासनाचे मुख्य उद्दिष्ट शासकीय प्रक्रिया अधिक खुल्या करणे व नागरिकांना अधिकाधिक माहिती उपलब्ध करून देणे हे होय. डिजिटल व डिजिटल -शासन या दोन्ही संकल्पना नव्याने उदयाला आलेली असून या संकल्पनांची वैश्विकदृष्ट्या मान्य अशी व्याख्या सापडणे कठीण आहे. सद्यस्थितीत नव लोकप्रशासन प्रवाह हे अधिकाधिक नागरिकांना माहिती व सेवा पुरविण्यासाठी इंटरनेट, वेब पेज, मोबाईल फोन यांसारख्या माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करणे म्हणजे डिजिटल/ई-शासन होय अशी आपणास डिजिटल शासनाची व्याख्या करता येते.

रिडर्स युनिव्हर्सल या शब्दकोशानुसार, ''माहिती तंत्रज्ञान म्हणजे माहिती शास्त्रामध्ये वापरलेले तंत्रज्ञान होय. याच शब्दकोशामध्ये माहिती शास्त्राची व्याख्या अशी केली आहे की, विशेषतः संगणकासारख्या साधनाद्वारे जे तंत्रज्ञान आहे.''

एम. फीगर आणि जी. पी कॉड यांच्यामते, ''सार्वजनिक सेवांचा पुरवठा, नियंत्रण आणि धोरण-निर्मिती या तीन टप्प्यांमध्ये डिजिटल ई-शासनाची भूमिका स्पष्ट करता येते.''

ख्रिस्तोफर बाम यांच्यामते, ''डिजिटल-शासन म्हणजे माहिती तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे सार्वजनिक क्षेत्राच्या अंतर्गत आणि बाह्य संबंधामध्ये बदल होणे होय.''

सी.एस.आर. प्रभु यांच्यामते, ''डिजिटल-शासन म्हणजे शासनामध्ये ई-उद्योगाचे असे प्रारूप (Form) होय ज्यामध्ये सेवा पुरविणाऱ्या प्रक्रिया आणि संरचनांचा समावेश असतो आणि विद्युत उपकरणांच्या माध्यमातून आंतरक्रिया / संवाद होण्यास मान्यता असते.''

नवलोकप्रशासनातील महत्त्वाचा बदल म्हणजे नागरिकांना जलद व सुलभ सेवा देणे त्यास डिजिटल गव्हर्नन्स म्हणजे नवीन संरचना आणि सिंगल विंडो कल्चर असे म्हटले जाते. नागरिककेंद्रित व्यवस्थेसाठी सुशासन साध्य करणे ही काळाची गरज आहे. भारताच्या पंतप्रधानांनी भारताला ज्ञानावर आधारित भविष्यासाठी तयार करण्यासाठी आणि तंत्रज्ञानाला सक्षम बदलाच्या केंद्रस्थानी ठेवण्यासाठी डिजिटल इंडिया लाँच केली. पंतप्रधानांच्या भाषणानुसार, डिजिटल इंडियामध्ये भारताचे भविष्य बदलण्याची क्षमता आहे, जेणेकरून IT (भारतीय प्रतिभा) + IT (माहिती तंत्रज्ञान) = IT (India Tomorrow). प्रशासन स्तरावर अनेक विभागांचा माध्यमातून एक छत्री कार्यक्रम निर्माण करण्याचा हेतू आहे. या कार्यक्रम मध्ये मोठ्या संख्येने कल्पना आणि विचारांना एकाच, सर्वसमावेशक दृष्टीमध्ये एकत्रित केले जावून जेणेकरून प्रत्येक नागरिकाला स्वतःच्या पायावर उभे राहून मोठ्या ध्येयाचा भाग म्हणून पाहिले जाईल या व्यापक उद्देशाने डिजिटल गव्हर्नस अधिकाधिक नागरीकेंद्री बनवणे.

**डिजिटल गव्हर्नसचे ९ महत्त्वाचे घटक :**

डिजिटल इंडियामध्ये ९ स्तंभांचा समावेश आहे. ते खालीलप्रमाणे आहेत

- ब्रॉडबँड हाइवेज

- मोबाईल कनेक्टिव्हिटीचा सार्वत्रिक प्रवेश
- सार्वजनिक इंटरनेट प्रवेश कार्यक्रम
- ई-गव्हर्नन्स: तंत्रज्ञानाद्वारे सरकारमध्ये सुधारणा करणे
- ई-क्रांती-सेवांचे इलेक्ट्रॉनिक वितरण
- सर्वांसाठी माहिती
- इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग
- नोकरीसाठी IT
- जलद परिणाम देणारे कार्यक्रम (Early Harvest Programmes)

**डिजिटल गव्हर्नसची महत्त्वाची वैशिष्टे :**

१. शासनाने प्रशासनाच्या स्तरावर वेबसाईट वर शासकीय सेवांची माहिती टाकणे व या सेवांसाठी नागरिकांना अर्ज उपलब्ध असणे याचाही समावेश होतो.

२. आयकर अर्ज भरणे, परपत्राचे नुतनीकरण करणे व ऑनलाईन पद्धतीने रक्कम भरणा करणे या सेवा देखील या माध्यमांतून पुरविल्या जातात. (शासन विभागांमध्ये)

३. अत्युच्च कौउंटर सेवा उपलब्ध करून देणे व नागरिकांचे सेवा प्राप्त करण्यासाठीचे कष्ट वाचविणे हे डिजिटल शासनाचे उद्दिष्ट आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या तंत्रांचा सुयोग्य वापर केल्यास लोकप्रशासनाच्या नव्या युगाला प्रारंभ होऊन शासनाची कार्ये व प्रक्रिया अधिक पारदर्शी होण्यास मदत होईल. अशा प्रकारे डिजिटल-शासनाने तंत्रज्ञान नवप्रवर्तनाच्या माध्यमातून शासनाचे मूळ स्वरूप बदललेले दिसते - म्हणजेच, कार्य करण्याची पद्धती, कार्याची शैली, मूल्य अभिमुखता व मूळ गाभा बदललेला दिसतो. विकसित राष्ट्रांमध्ये, डिजिटल-शासन व्यवस्थित प्रस्थापित झालेले दिसते. ज्यामध्ये शासनाच्या सेवा नागरिकांना ऑनलाईन पोर्टल्स च्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातात.

**डिजिटल गव्हर्नसचे महत्व :**

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे लोकप्रशासनाचे गुणात्मक परिणामदिसू लागले आहेत. भारताने स्वीकारलेल्या आर्थिक उदारीकरण आणि मुक्त बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा परिणाम म्हणून डिजिटल-गव्हर्नस तंत्रज्ञानातून प्रशासकीय कामकाज सुरुवातीच्या कालखंडामध्ये या सर्व क्रियात्मक वैशिष्ट्यांखेरीज डिजिटल-गव्हर्नस भ्रष्टाचार कमी करण्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य वाढत असून स्वैर क्रियांच्या संधी कमी केल्या जातात. डिजिटल शासनामुळे नागरिकांचे सबलीकरण देखील होते कारण, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासकीय व्यवहारांमध्ये त्यांचा सहभाग वाढतो.

**१. जलद आणि शासनाचा खर्च कमी करणे:** शासन स्तरावर सुशासचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवा ह्या अपुऱ्या, खर्चिक आणि अनियमित असल्याचा नागरिकांना नेहमीच अनुभव येतो. मात्र, या सेवांच्या हाताळणीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा व्यवस्थित व कार्यक्षमपणे वापर केला तर संबंधित सेवा या जलद आणि कमी खर्चामध्ये पुरविता येऊ शकतात, असा अनुभव आहे. जमीन, संपत्तीच्या नोंदी हस्तांतरण करणे; शासनाकडून विविध प्रमाणपत्रे दाखले मिळविताना याचा अनुभव येतो.

**२. शासन नागरिक समन्वय :** ग्राहक / उपभोक्ता आणि सेवाग्राही (Clients) या दृष्टिकोनातून नागरिकांना सेवा पुरविण्यात यावी. डिजिटल -शासन हे नागरिकांशी सुसंवाद साधणारे असावे या मुख्य हेतूने नागरिकांचे सक्षमीकरण आणि परिणामकारक सेवा पुरवठा याकरिता नागरी समाजाने डिजिटल तंत्रज्ञानाचा विस्तार व उपयोजन करून सक्रीय भूमिका पार पाडावी.

**३. लोक निर्णयप्रक्रिया अधिकाधिक सुधारणे :** नागरिकांना नागरी सेवांचे ग्राहक म्हणून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासकीय कार्यांची प्रत्यक्ष माहिती मिळविता येते. तसेच, नागरिक शासनाची कार्ये ऑनलाईन केवळ बघू शकतात असे नाही तर ई-मेल्स व इतर उपकरणांच्या माध्यमातून शासनाला सल्ले देखील देऊ शकतात. म्हणून, नागरिकांचे सल्ले व पारदर्शकता एकाच नमुन्यात साधणारे तंत्रज्ञान एक महत्त्वाचे साधन ठरते.

**४. पारदर्शकता आणि जबाबदार :** प्रशासन आणि धोरणांबाबतच्या मोफत माहितीच्या उपलब्धतेमुळे डिजिटल गव्हर्नस सनदी सेवकांना प्रतिसादात्मक आणि जबाबदार बनावे लागले आहे. इंटरनेटवर जाहीर केलेल्या माहितीमुळे सार्वजनिक अधिकाऱ्यांची गैरव्यवहार करण्याची प्रवृत्ती कमी होत असून लोकांचा शासनावर विश्वास वाढण्यास सहाय्य होते. माहिती तंत्रज्ञानामुळे प्रशासनाच्या व्यवहारात पारदर्शकता आणि खुलेपणा निर्माण होतो. मुंबईतील प्रजा फाऊंडेशन या बिगर शासकीय संस्थेच्या उपक्रमाचा संदर्भ याबाबत देता येईल. या संस्थेच्या संकेतस्थळावर अधिकाऱ्यांविरोधातील तक्रारी नोंदविल्या जातात. ठरावीक मुदतीत त्यांची दखल घेतली नाही तर त्यांची दखल घेतली जाईपर्यंत ती तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पास होत राहते. माहिती तंत्रज्ञानाच्या अशा वापरामुळेही सनदी सेवक जबाबदार बनत आहेत.

**५. भ्रष्टाचारामध्ये घट :** डिजिटल-शासनामुळे भ्रष्टाचारावर मर्यादा येते आणि सेवांच्या पुरवठ्यामध्ये सुधारणा होते. डिजिटल गव्हर्नसमुळे प्रशासकांचा लहरीपणा आणि व्यवहाराचा खर्च कमी होतो. माहितीच्या उपलब्धतेमुळे लोकांची फसवणूक होत नाही व कार्याच्या पूर्ततेमध्ये मध्यस्थ वा गैरमार्गाचा अवलंब करण्याची आवश्यकता राहत नाही. नागरिकांची सनद आणि तक्रार निवारण केंद्रामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होण्यास सहाय्य झाले.

**६. लोकसहभाग :** पारंपरिक शासन व प्रशासन व्यवहारामध्ये लोकसहभागाला अत्यल्प वाव होता. डिजिटल गव्हर्नसमुळे प्रशासनातील लोकसहभागाचे स्वरूप बदलले असून ते अधिक सक्रीय आणि परिणामकारक झालेले आहे. कायदा निर्मितीपूर्वीच लोक सार्वजनिक धोरणांवर चर्चा, विवाद करतात आणि आपले मतही नोंदवितात.

वरीलप्रमाणे लोकप्रशासचे महत्व अधोरेखित केले तरी डिजिटल गव्हर्नस मध्ये काही दोष खालील प्रमाणे आढळून येतात. तंत्रज्ञानातून उदयाला आलेल्या डिजिटल गव्हर्नसमुळे लोकप्रशासनाकडे एका नव्या दृष्टिकोनातून बघितले जाते. मात्र, सरकारी क्षेत्रामध्ये याचा वापर मर्यादित दिसतो कारण, डिजिटल गव्हर्नसमुळे शासनामध्ये कर्मचारी कपात होण्याचा धोका संभवतो. पुढील दोन कारणांसाठी शासन लोकांऐवजी –डिजिटल गव्हर्नसचा अवलंब करू शकत नाही – एक, विकसित देशांमध्ये सुद्धा इंटरनेट ची उपलब्धता मर्यादित आहे म्हणून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्यवहार करावयाचे असल्यास ते पारंपरिक व्यवहारांपेक्षा स्वस्त पाडत असले तरीदेखील शासनाला नागरी समाधान टिकवून ठेवण्यासाठी जुन्या व नव्या अशा दोन्ही पद्धतींमध्ये दुवा साधावा लागतो. असे न केल्यास, मोठ्या प्रमाणात लोक शासकीय व्यवहाराच्या परिघाबाहेर राहतील. दोन, शासन क्षेत्राचा आकार कमी करणे व रोजगार कमी करणे यामुळे अनेक देशांमध्ये नोकरी गमावणाऱ्याना हाल अपेष्टा सहन कराव्या लागतात आणि यामुळे साहजिकच राजकीय क्षेत्रावर देखील परिणाम होतात. अशा प्रकारे, नेतृत्व करताना इतर कुठलाही पर्याय उपलब्ध नसल्यास हा पर्याय उरतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, डिजिटल गव्हर्नसचे नकारात्मक परिणाम बघता विकसित तथा विकसनशील देशांमध्ये त्याची अंमलबजावणी अनिश्चित व मर्यादित आहे. मात्र डिजिटल –गव्हर्नस म्हणजे नोकरशाहीतील अनावश्यक विलंब व भ्रष्टाचार वाढविणाऱ्या दप्तर दिरंगाई ला करण्यात आलेला विरोध होय. याखेरीज, यामुळे नागरिकांच्या नित्य सहभागाची वाट मोकळी होते. नवलोकप्रशासन – नागरिक यांच्यातील संबध सुधारण्यासाठी सुरुवात आहे असा आशादायक दृष्टीकोन आहे.

**डिजिटल गव्हनर्स चा लोकप्रशासनावरील परिणाम**

**प्रशासनातील पायाभूत सुविधांमध्ये पुढाकार :**

तंत्रज्ञान नवप्रवर्तनाच्या माध्यमातून लोकप्रशासनामध्ये कार्य कार्याची पद्धती,शैली, काही प्रमाणत मूळ गाभा बदलेला दिसून येतो आहे.लोक प्रशासनामध्ये माहिती–तंत्रज्ञानाच्या वापरला आणि प्रसाराला उत्तेजन देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर केंद्र शासनाने पुढील पावले उचललेली दिसतात–माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० ई–व्यापार, इंटरनेटद्वारे ई–संदेशवहन आणि अर्थव्यवस्थेत माहिती तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन मिळावे यासाठी १७ ऑक्टोबर २००० पासून माहिती तंत्रज्ञान अधिनियमाची अंमलबजावणी सुरू झाली. याकरिता एका नियंत्रक अधिसत्तेची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिनियमाद्वारे ई–व्यापार आणि ई–व्यवहारांना कायदेशीर चौकट प्राप्त होणार असून संगणक गुन्ह्यांना प्रतिबंध तर ई–करार, कागदपत्रे आणि अंकात्मक (डिजिटल) स्वाक्षरी इत्यादींना मान्यता प्राप्त होणार आहे. आणि पुढील काळात फार मोठ्या प्रमाणात डिजिटायजेशन झाल्याचे दिसून येते. हा भारत सरकारचा एक प्रमुख कार्यक्रम आहे ज्यामध्ये भारताला डिजिटली सशक्त समाज आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याचे ध्येय आहे. देशभरातील ऑनलाईन पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून सरकारी सेवा नागरिकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहज उपलब्ध करून देणे हा त्याचा उद्देश आहे. देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी १ जुलै २०१५ रोजी ग्रामीण भारताला हाय–स्पीड इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या मदतीने जोडण्यासाठी आणि जनतेला

त्यांच्या दैनंदिन जीवनात तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी ही मोहीम सुरू केली. डिजिटल इंडिया ड्राईव्ह हा भारत सरकारचा एक ड्रीम प्रोजेक्ट आहे.यामध्ये खालील महत्वाच्या मुद्याचा समावेश करावा लागतो.

**आधार प्रणाली:**

भारत सरकारने डिजीटल गव्हर्नन्सवर भर दिला आहे. आधार ओळख प्लॅटफॉर्म हा 'डिजिटल इंडिया' च्या मूलभूत पायांपैकी एक आहे, ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला एक विशिष्ट ओळख किंवा आधार क्रमांक दिला जातो. आधार, जगातील सर्वात मोठी बायोमेट्रिक्स-आधारित ओळख प्रणाली, सामाजिक आणि आर्थिक समावेशन, सार्वजनिक क्षेत्रातील सेवा सुधारणा, वित्तीय बजेट व्यवस्थापन, सुविधा आणि लोक-केंद्रित प्रशासन यासाठी एक धोरणात्मक धोरण साधन आहे. डुप्लिकेट किंवा बनावट ओळख टाळण्यासाठी हे अद्वितीय आणि मजबूत आहे आणि विविध सरकारी सहाय्य प्रणाली आणि कार्यक्रम, मोकळेपणा आणि चांगले प्रशासन यासाठी पाया/प्राथमिक ओळख म्हणून वापरले जाऊ शकते.

**भारत ब्रॉडबँड नेटवर्क**

भारत सरकारने कंपनी कायद्यांतर्गत भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेडची स्थापना विशेष उद्देश वहन म्हणून केली, ज्याचे अधिकृत भांडवल रु. १००० कोटी होते. भारतात नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क (NOFN) ची निर्मिती अनिवार्य करण्यात आली आहे. वाढीव फायबर टाकून, एकूण ६,६०० ब्लॉक आणि ६४१ जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या सुमारे २,५०,००० ग्रामपंचायतींचा समावेश केला जाईल.

**इंटरनेट ऑफ थिंग्जसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स**

IoT इकोसिस्टम जंपस्टार्ट करण्यासाठी आणि भारताच्या IT सामर्थ्यांचा वापर करून हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरच्या अभिसरण क्षेत्रात नेतृत्वाची भूमिका साध्य करण्यासाठी तसेच भारताला सक्षम करण्यासाठी डिजिटल इंडिया इनिशिएटिव्हचा भाग म्हणून IoT साठी सेंटर ऑफ एक्सलन्सची घोषणा करण्यात आली. अत्याधुनिक ॲप्लिकेशन्स आणि विषयातील कौशल्य विकसित करणे हे केंद्राचे प्रमुख ध्येय आहे. याव्यतिरिक्त, केंद्र उद्योगासाठी तयार लोक, एक स्टार्ट-अप समुदाय आणि IoT उद्योजक इकोसिस्टम विकसित करण्यात मदत करेल.

**प्रमाणपत्र-इन** (Cert-In)

- भारतीय सायबर स्पेस सुरक्षित करण्याच्या उद्देशाने CERT-In ची स्थापना करण्यात आली. ही सेवा सुरक्षा गुणवत्ता, व्यवस्थापन सेवा, तसेच घटना प्रतिबंध आणि प्रतिसाद सेवा प्रदान करते. माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) कायदा २००८ च्या कलम ७०B अंतर्गत सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात खालील कार्ये पार पाडण्यासाठी राष्ट्रीय एजन्सी म्हणून नियुक्त केले गेले आहे.
- सायबर घटनांवरील माहिती संकलित केली जाते, विश्लेषित केली जाते आणि प्रसारित केली जाते सायबर सुरक्षा घटनांचा अंदाज आणि इशारा दिला जातो आणि सायबर सुरक्षा घटना आपत्कालीन परिस्थितीत हाताळल्या जातात.

- माहिती सुरक्षा पद्धती, प्रक्रिया, सायबर घटना प्रतिबंध, प्रतिसाद आणि अहवालाशी संबंधित शिफारसी, सल्ला, असुरक्षितता नोट्स आणि श्वेतपत्रे जारी करणे

**CSC म्हणजे कॉमन सर्व्हिस सेंटर्स**

CSC योजना ही डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या मिशन-मोड प्रकल्पांपैकी एक आहे. देशातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिक महत्त्वपूर्ण सार्वजनिक उपयोगिता सेवा, सामाजिक सहाय्य योजना, आरोग्यसेवा, वित्त, शिक्षण आणि कृषी सेवा तसेच विविध B२C सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी CSC चा वापर करू शकतात. हे एक संपूर्ण भारत नेटवर्क आहे जे देशाच्या प्रादेशिक, भौगोलिक, भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेची पूर्तता करते, सरकारला सामाजिक, आर्थिक आणि डिजिटली समावेशक समाज निर्माण करण्याचे ध्येय साध्य करण्यास सक्षम करते.

सायबर स्वच्छता केंद्र  भारत सरकारच्या डिजिटल इंडिया उपक्रमामध्ये सायबर स्वच्छता केंद्र (बॉटनेट क्लीनिंग आणि मालवेअर विश्लेषण केंद्र) समाविष्ट आहे, ज्याचे उद्दिष्ट भारतातील बॉटनेट संसर्ग शोधून एक सुरक्षित सायबर स्पेस तयार करणे आणि पुढील संक्रमण प्रतिबंध करण्यासाठी अंतिम वापरकर्त्यांच्या प्रणालींना सूचित करणे, सक्षम करणे आणि सुरक्षित करणे हे आहे. देशाच्या 'नॅशनल सायबर सिक्युरिटी पॉलिसी'च्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी याची स्थापना करण्यात आली आहे, ज्याचा उद्देश सुरक्षित सायबर इकोसिस्टम तयार करणे आहे. हे केंद्र इंटरनेट सेवा प्रदाते आणि उत्पादन/अँटीव्हायरस उत्पादक यांच्याशी जवळून सहकार्य करते.

DigiLocker **डिजीलॉकर** हे एक डिजिटल वॉलेट आहे ज्याचा उद्देश नागरिकांना सक्षम करणे आहे. महत्त्वपूर्ण शाश्वत दस्तऐवज आणि प्रमाणपत्रे जारी करणे, देवाणघेवाण करणे आणि सत्यापित करणे यासाठी हे एक सुरक्षित, क्लाउड-आधारित प्लॅटफॉर्म आहे. डिजिटल रेकॉर्डच्या वापरास प्रोत्साहन दिल्याने वास्तविक पेपरलेस गव्हर्नन्सचा एक नवीन नमुना स्थापित झाला आहे. सध्या, DigiLocker १०० हून अधिक जारीकर्त्यांद्वारे जारी केलेल्या ३४७ कोटींहून अधिक अस्सल डिजिटल दस्तऐवजांमध्ये प्रवेश देते, ज्यात परिवहन विभाग, आयकर विभाग, महसूल विभाग आणि राज्य आणि केंद्रीय शिक्षण मंडळे यांचा समावेश आहे.

**डिजिटल साक्षरता अभियान** डिजिटल साक्षरता अभियान किंवा राष्ट्रीय डिजिटल साक्षरता अभियान (NDLM) योजना देशभरातील ५२.५ लाख लोकांना IT प्रशिक्षण देण्यासाठी तयार करण्यात आली होती, ज्यात अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या आणि मान्यताप्राप्त रेशन डीलर यांचा समावेश आहे. गैर-आयटी साक्षर व्यक्तींना आयटी साक्षर कसे व्हावे हे शिकवण्याचा या कार्यक्रमाचा हेतू आहे, जेणेकरून, ते लोकशाही आणि विकास प्रक्रियेत सक्रियपणे आणि प्रभावीपणे सहभागी होऊ शकतील आणि त्यांचे जीवनमान सुधारू शकतील.

**डिजिटल गव्हर्नरस च्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या Services (सेवा)**

नागरिकांना सेवा पुरविणे हे शासनाने आपले प्राथमिक कर्तव्य म्हणून विचारात घ्यावे. माहितीची पोच आणि संघराज्य चौकटीमध्ये माहितीची उपलब्धता याद्वारे लोकांना सक्षम केले जावे या उदेद्शाने डिजिटल गव्हर्नरस च्या माध्यमातून खालीलप्रमाणे सेवा पुरवल्या जावू लागल्या.

**प्रवेशयोग्य भारत मोहीम आणि मोबाइल ॲप** सुगम्य भारत अभियान, किंवा प्रवेशयोग्य भारत कार्यक्रम, ही एक प्रमुख राष्ट्रीय मोहीम आहे ज्याचा उद्देश सार्वत्रिक सुलभता प्राप्त करणे आहे, ज्यामुळे अपंग व्यक्तींना समान प्रवेश मिळू शकतो, स्वतंत्रपणे जगता येते आणि सर्वसमावेशक समाजात जीवनाच्या सर्व भागांमध्ये सक्रियपणे सहभागी होता येते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट वातावरण निर्मिती, वाहतूक व्यवस्था आणि माहिती आणि संप्रेषण परिसंस्थेची सुलभता सुधारण्याचे आहे. देशभरातील दुर्गम ठिकाणांची संपूर्ण माहिती मिळवण्यासाठी मोबाईल ॲप ही क्राउड सोर्सिंग यंत्रणा आहे. मोबाइल ॲप्लिकेशन IOS, Android आणि Windows साठी संबंधित ॲप स्टोअर्सवरून डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे.

**ॲग्रीमार्केट मोबाईल ॲप** शेतकऱ्यांना शेतीमालाच्या किमतींबाबत अद्ययावत ठेवण्याच्या आणि त्यांना त्रासदायक विक्री करण्यापासून परावृत्त करण्याच्या उद्देशाने मोबाईल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले. AgriMarket मोबाइल ॲप शेतकऱ्यांना त्यांच्या डिव्हाइसच्या ५० किलोमीटरच्या आत असलेल्या बाजारपेठेतील पिकांच्या किंमतीबद्दल माहिती मिळवून देते. हे सॉफ्टवेअर मोबाईल GPS चा वापर करून शेतक-यांची स्थिती आपोआप कॅप्चर करते आणि ५०-किलोमीटरच्या परिघात पिकांची बाजारमूल्ये मिळवते. Agmarknet पोर्टलचा वापर कृषी मालाच्या किमती मिळवण्यासाठी केला जातो. ॲप्स सध्या दोन भाषांमध्ये प्रवेशयोग्य आहेत इंग्रजी आणि हिंदी.

**भारत इंटरफेस फॉर मनी** (BHIM) भारत इंटरफेस फॉर मनी (BHIM) हे एक ॲप आहे जे आर्थिक व्यवहार सोपे, सुलभ आणि जलद (UPI) करण्यासाठी युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस वापरते. हे मोबाईल फोन किंवा पेमेंट पत्त्याचा वापर करून बँक-टू-बँक देयके आणि पैसे गोळा करण्यासाठी त्वरित परवानगी देते. भारत इंटरफेस फॉर मनी ॲप सध्या Android उपकरणांसाठी उपलब्ध आहे आणि ते Google Playstore वरून डाउनलोड केले जाऊ शकते.

**नेटवर्क आणि सिस्टीम्स फॉर क्राइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग** (CCTNS) सीसीटीएनएस (क्राइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स) हे एक गुन्हा आणि गुन्हेगारी ट्रॅकिंग नेटवर्क आणि सिस्टीम्स प्लॅनिंग स्कीम आहे जी नॉन-प्लॅन स्कीम, कॉमन इंटिग्रेटेड पोलिस ॲप्लिकेशन (सीआयपीए) च्या अनुभवावर आधारित आहे. सीसीटीएनएस ई-गव्हर्नन्स तत्त्वाचा अंगीकार करून पोलिसांची कार्यक्षमता आणि परिणामकारकता सुधारण्यासाठी एक व्यापक आणि एकात्मिक प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न करते आणि 'गुन्हे तपास आणि गुन्हेगार शोध' यावर लक्ष केंद्रित केलेल्या IT-सक्षम, अत्याधुनिक ट्रॅकिंग सिस्टमच्या उत्क्रांतीसाठी देशव्यापी नेटवर्किंग पायाभूत सुविधा स्थापित करण्याचा प्रयत्न करते.

**पीक विमा मोबाईल ॲप** पीक विमा मोबाईल ॲपचा वापर शेतकरी कर्जदार असल्यास क्षेत्र, कव्हरेज रक्कम आणि कर्जाच्या रकमेवर आधारित अधिसूचित पिकांसाठी विमा प्रीमियम मोजण्यासाठी केला जाऊ शकतो. कोणत्याही अधिसूचित क्षेत्रामध्ये कोणत्याही अधिसूचित पिकाची सामान्य विमा रक्कम, विस्तारित विम्याची रक्कम, प्रीमियम तपशील आणि अनुदानाची माहिती मिळवण्यासाठी देखील याचा वापर केला जाऊ शकतो.

**डिजिटल एम्स** भारतीय युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी (UIDAI) आणि **इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान** मंत्रालय यांच्यात प्रभावी इंटरफेस तयार करणे हा जानेवारी २०१५ मध्ये डिजिटल AIIMS प्रकल्पाचा पहिला टप्पा होता. (MeiTY). AIIMS ला भेट देणाऱ्या प्रत्येक रुग्णासाठी एक अद्वितीय आरोग्य ओळख क्रमांक तयार करण्यासाठी आधार प्लॅटफॉर्मचा वापर करण्यात आला. एम्समध्ये आलेल्या प्रत्येक रुग्णाला युनिक हेल्थ आयडेंटिफिकेशन नंबरमुळे डिजिटल ओळख देण्यात आली.

**ई-पंचायत** ई-पंचायत हा एक ग्रामीण ई-शासन कार्यक्रम आहे. जो ग्रामपंचायत कर्तव्ये स्वयंचलित करण्याच्या उद्देशाने संपूर्ण सॉफ्टवेअर समाधान प्रदान करतो. स्थानिक समुदायांना त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पद्धती, किस्से आणि आव्हाने दाखवण्यासाठी आणि सामायिक करण्यासाठी सक्षम बनवण्याच्या उद्देशाने पंचायत प्रतिनिधींसाठी उर्वरित जगाशी संवाद साधण्याचा हा एक मार्ग आहे.

**ई-बिझ** Infosys Technologies Limited (Infosys), वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकारच्या औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाच्या (DIPP) निर्देशानुसार आणि देखरेखीखाली eBiz ची अंमलबजावणी करत आहे. इंटरनेट प्लॅटफॉर्मद्वारे गव्हर्नमेंट-टू-बिझनेस (G२B) सेवांमध्ये जलद आणि सुलभ प्रवेश प्रदान करून देशातील व्यावसायिक वातावरण सुधारणे हे eBiz चे ध्येय आहे. हे फर्म सुरू करण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक नियामक प्रक्रियांमधील अनावश्यक विलंब कमी करण्यास मदत करेल.

**नागरी सक्षमीकरणाचे डिजिटल गव्हर्नन्स माध्यम** (Empowerment) :

ग्राहक / उपभोक्ता आणि सेवाग्राही (Clients) या दृष्टिकोनातून नागरिकांना सेवा पुरविण्यात यावी. डिजिटल -शासन हे नागरिकांशी सुसंवाद साधणारे असावे या मुख्य हेतूने डिजिटल गव्हर्नन्सची सुरवात झाली.

**आधार सक्षम पेमेंट सिस्टम** AEPS AEPS ही बँक-नेतृत्वाची संकल्पना आहे जी कोणत्याही बँकेच्या व्यवसाय प्रतिनिधीद्वारे आधार प्रमाणीकरण वापरून विक्रीच्या ठिकाणी (MicroATM) ऑनलाईन इंटरऑपरेबल आर्थिक समावेशन व्यवहार सक्षम करते. ही एक पेमेंट सेवा आहे जी बँक ग्राहक त्याच्या आधार-सक्षम बँक खात्यात प्रवेश करू देते आणि आधारचा वापर करून व्यवसाय करस्पॉन्डंटद्वारे बॅलन्स चौकशी, रोख ठेव, रोख पैसे काढणे आणि पैसे पाठवणे यासारख्या मूलभूत बँकिंग ऑपरेशन्स पूर्ण करू देते.

BPO (IBPS) **साठी प्रचारात्मक कार्यक्रम** इंडिया BPO प्रमोशन स्कीम (IBPS) चे उद्दिष्ट देशभरात ४८,३०० BPO/ITES जागांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे आहे. याचे बजेट रु. ४९३ कोटी आणि लोकसंख्येवर आधारित राज्यांमध्ये वितरीत केले जाते. यामुळे लहान शहरांना पायाभूत सुविधा आणि मानवी संसाधनांच्या बाबतीत क्षमता निर्माण करण्यास मदत होईल, IT/ITES-नेतृत्वाच्या पुढील वाढीसाठी पायाभूत काम होईल. तीन शिफ्ट ऑपरेशन्स विचारात घेतल्यावर, या उपक्रमात अंदाजे १.५ लाख थेट नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता आहे. यामध्ये अप्रत्यक्ष नोकऱ्यांची लक्षणीय संख्या निर्माण करण्याची क्षमता आहे.

**डीजीधन बाजार** या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून नागरिक आणि व्यापारी डिजीधन बाझारमधून रिअल-टाइम डिजिटल व्यवहार करू शकतील. देशभरात डिजीधन मेळे आयोजित करून डिजिटल व्यवहार करण्यासाठी ग्राहकांना विविध डिजिटल पेमेंट सिस्टीम डाउनलोड करणे, स्थापित करणे आणि वापरण्यात मदत करणे हा त्यांचा मानस आहे.

MyGov **प्लॅटफॉर्म** भारताचे माननीय पंतप्रधान, श्री नरेंद्र मोदी यांनी MyGov प्लॅटफॉर्मचे अनावरण केले, जो एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा एक प्रकारचा सहभागात्मक प्रशासनाचा प्रयत्न आहे ज्यामध्ये संपूर्ण जनतेचा समावेश आहे. MyGov ची संकल्पना भारताच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात योगदान देण्याच्या अंतिम उद्दिष्टासह, नागरिक आणि व्यावसायिक यांच्यात विचार आणि मतांच्या निरोगी देवाणघेवाणीसाठी इंटरफेस तयार करणाऱ्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सरकारला नागरिकांच्या जवळ आणणे आहे.

**राष्ट्रीय शिक्षण मिशन :** माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणावर राष्ट्रीय अभियान (NMEICT) ची संकल्पना उच्च शिक्षण संस्थांमधील सर्व विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी कोणत्याही वेळी आणि कोणत्याही ठिकाणाहून शिकविण्याच्या आणि शिकण्याच्या प्रक्रियेत ICT च्या संभाव्यतेचा उपयोग करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजना म्हणून करण्यात आली होती. विद्यार्थी, शिक्षक आणि आजीवन शिकणाऱ्यांच्या सर्व शैक्षणिक आणि शिकण्याच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी हा मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे.

**नॉर्थ ईस्ट बीपीओ प्रमोशन स्कीम** (NEBPS)

नॉर्थ ईस्ट बीपीओ प्रमोशन स्कीम (NEBPS) ला ईशान्य क्षेत्रामध्ये (NER) नोकऱ्या निर्माण करण्यासाठी आणि IT-ITES उद्योगाला चालना देण्यासाठी BPO/ITES ऑपरेशन्सना प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल इंडिया कार्यक्रमांतर्गत मान्यता देण्यात आली आहे. NEBPS ची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:

- IT/ITES उद्योगाला चालना देऊन NER मधील स्थानिक तरुणांसाठी नोकऱ्या निर्माण करणे, विशेषतः BPO/ITES उपक्रमांच्या स्थापनेद्वारे.
- IT उद्योगाचा पाया रुंदावण्यासाठी आणि संतुलित प्रादेशिक वाढ सुनिश्चित करण्यासाठी ईशान्य प्रदेशातील IT/ITES क्षेत्रात गुंतवणुकीला प्रोत्साहन.

**नरेगा–सॉफ्ट** NREGA ची योजना राज्य, जिल्हा आणि पंचायती राज संस्थांच्या तीन स्तरांवर ई–सरकार सुरू करण्याची योजना आहे. हे माहिती तंत्रज्ञानाचा वापर सामान्य माणसाला सक्षम करण्यासाठी एक सुविधा म्हणून करते. NREGAsoft नागरिकांना माहिती देऊन (RTI Act) माहिती अधिकार कायद्याचे पालन करते. हे सर्व दस्तऐवज जसे की मस्टर रोल्स, नोंदणी अर्ज रजिस्टर्स, जॉब कार्ड्स/एम्प्लॉयमेंट रजिस्टर्स/मस्टर रोल इश्यू रजिस्टर्स आणि मस्टर रोल पावती रजिस्टर्स लोकांना उपलब्ध करून देते.

OpenForge

OpenForge हे भारत सरकारचे खुले सहयोगी ई–गव्हर्नन्स ॲप्लिकेशन डेव्हलपमेंटचे प्लॅटफॉर्म आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे ओपन–सोर्स सॉफ्टवेअरच्या वापरास तसेच ई–गव्हर्नन्स–संबंधित स्त्रोत कोडच्या सामायिकरण आणि पुनर्वापराला प्रोत्साहन देण्याची सरकारची अपेक्षा आहे.

OpenForge **ची उद्दिष्टे आहेत:**

- सरकारी स्रोत कोड स्टोरेज आणि आवृत्ती नियंत्रण जतन करण्यासाठी एक प्लॅटफॉर्म प्रदान करणे, सार्वजनिक एजन्सी आणि खाजगी उपक्रम, नागरिक आणि संस्था यांच्यात खुल्या सहयोगी अनुप्रयोग विकासाच्या संस्कृतीचा प्रचार करणे.
- वाढीव पारदर्शकता आणि मास पीअर रिव्ह्यूद्वारे ई–गव्हर्नन्स सेवा आणि उच्च दर्जाचे आणि सुरक्षिततेचे निराकरण
- ई–गव्हर्नन्स प्रकल्प खर्च कमी करणे आणि पुनर्वापर, रीमिक्सिंग आणि शेअरिंग या प्रणालीद्वारे मालकीची एकूण किंमत कमी करणे.

**भारत सरकार पे**

डिजिटल गव्हर्नसच्या माध्यमातून एकसमान ई–गव्हर्नमेंट इन्फ्रास्ट्रक्चरसाठी नॅशनल पेमेंट सर्व्हिस प्लॅटफॉर्म प्रस्तावित केले आहे. जे नागरिकांना इंटरनेटद्वारे विविध सेवांमध्ये प्रवेश करणे आणि पेमेंट गेटवे इंटरफेसद्वारे ऑनलाइन पेमेंट करणे यांचा समावेश असलेल्या एंड–टू–एंड व्यवहाराचा अनुभव देईल. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने, NSDL डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड (NDML) च्या सहकार्याने, एक सामान्य पायाभूत सुविधा विकसित केली आहे ज्याचा वापर केंद्र, राज्ये आणि विभाग त्यांच्या राष्ट्रीय आणि राज्य पोर्टलद्वारे विविध सेवा प्रदान करण्यासाठी करू शकतात, ज्यात नेट बँकिंग, क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डसह ऑनलाईन पेमेंट करण्याची क्षमता आहे.

**नवलोकप्रशासनामध्ये डिजिटल गव्हर्नसचा वापर करण्यात येऊ लागल्याने पुढील प्रकारे बदल झालेला आढळून येतो.**

१) नव लोकप्रशासन हे पदसोपान अधिसत्तेऐवजी सत्तेचे जाळे निर्माण करू पाहत आहे.

२) पारंपरिक प्रशासन हे खर्चाभिमुख होते. माहिती तंत्रज्ञानामुळे ते जलद झाले.

३) नव लोकप्रशासन परीक्षण अभिमुखतेऐवजी उपलब्धीभिमुख बनले.

४) नव लोकप्रशासन हे प्रशासन वा अधिकाऱ्यांकडे विलंब पोच असे, ती सध्या जलद झाली.

५) नव लोकप्रशासन अधिकाधिक जलद व सुलभ झाले असून ते दफ्तर दिरंगाई ऐवजी रचनात्मक कार्यावर भर देवू लागले आहे.

६) डिजिटल गव्हर्नसच्या आधारे जैसे-थे वादी वृत्तीऐवजी सातत्याने सुधारणा होऊ लागली.

७) नव लोकप्रशासन हे व्यक्तीवादाकडून संघटनात्मक अभिमुखता झाले.

८) डिजिटल गव्हर्नसच्या माध्यमातून माहिती उघड न करण्यावर भर आहे त्याच बरोबरीने सध्या माहिती शेअर करून सक्षमीकरणावर भर देणे.

९) डिजिटल गव्हर्नसमुळे कागदपत्रांच्या ढिगाऱ्यांऐवजी संगणकामध्ये माहिती साठवण केली जाते.

## १.३.२ शाश्वत विकासची उद्दिष्टे :

**शाश्वत विकास** (Sustainable Development) :

विसाव्या शतकात जगातील अनेक राष्ट्रच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अंगाने नव लोकप्रशासनाच्या कार्यात वाढ झालेली दिसून येते; त्याचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून शाश्वत विकास साध्य करणे उद्दिष्ट आहे. पर्यावरण आणि अर्थव्यवस्था परस्परावलंबी आहेत. परस्परांसाठी आवश्यकदेखील आहेत. त्यामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांकडे दुर्लक्ष करून केल्या जाणाऱ्या विकासामुळे जीवसृष्टी टिकून राहण्यासाठी आवश्यक असलेल्या पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. शाश्वत विकासासाठी भावी पिढ्यांना किमान सध्याची पिढी उपभोगत असलेल्या सुविधां इतक्याच सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. सर्वांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी संसाधनांचे पुनर्वितरण करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे तो एक नैतिक प्रश्न ठरतो. एडवर्ड बार्थिअर (Edward Barbier) यांच्यामते, शाश्वत विकास म्हणजे असा विकास ज्याचा थेट संबंध तळागाळातील गरिबांच्या जीवनमानाचा भौतिक दर्जा उंचावण्याशी संबंधित आहे याची वाढीव उत्पन्न, वास्तविक उत्पन्न, शैक्षणिक सेवा, आरोग्य सेवा, स्वच्छता, पाणी पुरवठा इ. च्या संदर्भात सांख्यिकी मोजदाद केली जाऊ शकते. थोडक्यात, शाश्वत विकासाचे उद्दिष्ट म्हणजे निरंकुश गरिबी कमी करून गरिबांना दीर्घकालीन आणि सुरक्षित उपजीविका पुरविणे, ज्याद्वारे संसाधनांचा आणि पर्यावरणाचा ऱ्हास, सांस्कृतिक उलथापालथ आणि सामाजिक अस्थैर्य कमी होईल.

**शाश्वत विकास म्हणजे काय :**

जागतिक शाश्वतता टिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येवू लागले. याचे महत्वाचे उदाहरण म्हणजे अल्बर्ट आईनस्टाईन यांनी मान्य केले की भौतिक प्रगती काही उपयोगाची नाही चिरस्थायी शाश्वत विकास साध्य करायचा असले तर महात्मा गांधींचे विचार जगाला मार्गदर्शक ठरतील.आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र पर्यावरण आणि विकास परिषदेने UNCED शाश्वत विकास म्हणजे काय या संकल्पनेवर भर दिला आहे. खऱ्या भावी पिढ्यांच्या गरजांची पूर्तता करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमान पिढ्यांच्या गरजा भागविणारा विकास अशी विकासाची व्याख्या केली आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण

संमेलनाच्या अवर कॉमन 'आमचे सामान्य भविष्य' किंवा अंतिम अहवालानुसार विकासाची वरील व्याख्या करण्यात आली आहे. या अहवालानुसार, शाश्वत विकास म्हणजे 'सर्वांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करणे आणि अधिक चांगल्या जीवनाची आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वांना संधी पुरविणे होय.' (Meeting the basic needs of all and extending to all the opportunity to satisfy their aspirations for a better life) याचा अर्थ महात्मा गांधीचा सर्वोदय विचार हे होय.

**व्याख्या :** पर्यावरण आणि विकास विषयक आयोगाच्या मते, 'असा विकास जो वर्तमानकालीन लोकांच्या गरजा भागविण्याबरोबरच भविष्यकालीन लोकांच्या, पिढ्यांच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड करत नाही'.

**डेविड पिअर्स** म्हणतात की, शाश्वत विकास म्हणजे सामाजिक उद्दिष्टांची बेरीज होय. त्यात दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ, आरोग्य व पोषणात सुधारणा, शैक्षणिक प्रगती, संसाधनांच्या वापराचा अधिकार, उत्पन्नाचे योग्य वाटप आणि स्वातंत्र्यात वाढ होते.

थोडक्यात शाश्वत विकास ही संकल्पना सर्व उत्पादन साधनांचा आणि प्रामुख्याने नैसर्गिक साधनांचा योग्य आणि सारासार विचार करून विवेकी वापरावर भर देतो असा एक अर्थ अभिप्रेत आहे; तर व्यापक दृष्टीकोनातून सामाजिक आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. २०१५ मध्ये संपलेल्या सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांची (मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स) जागा घेण्याकरिता हे लक्ष्य विकसित केले गेले; परंतु सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांच्या विपरित या शाश्वत विकास ध्येयांमध्ये विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील फरक केला गेलेला नाही. त्याऐवजी हे उदिष्ट्ये सर्व देशांना समान स्वरूपात लागू होत आहेत. या उद्दिष्टांची प्राप्ती वर्ष २०३० पर्यंत करायचे ठरविले गेले आहे. शाश्वत विकासाची संकल्पना ही अशा विकासाशी जोडली आहे जो सर्वांच्या विशेषतः बहुसंख्य गरीब लोकांच्या रोजगार, अन्न, ऊर्जा, पाणी, घरे इत्यादी मूलभूत गरजा पूर्ण करेल आणि या गरजांच्या पूर्ततेसाठी कृषी उत्पादन, वीज आणि सेवांची वृद्धी सुनिश्चित करेल.

**जागतिक पातळीवरील शाश्वत विकास या संकल्पनेचा विकास :**

**एडवर्ड बार्बियर :** सुप्रसिद्ध पाश्चात्य विचारवंत एडवर्ड बार्बियर यांचे पर्यावरण आणि शाश्वत विकास अर्थशास्त्र या विषयी त्याचे योगदान महत्वपूर्ण आहे. हे कोलोरेंडो स्टेट युनिव्हर्सिटी या प्रतिष्ठित विद्यापीठातील एक प्राध्यापक आणि मस्कूल ऑफ ग्लोबल एन्व्हायर्नमेंटल सस्टेनेबिलिटीफ संस्थेतील एक ज्येष्ठ तज्ज्ञ आहेत. त्यांनी जागतिक पातळीवर शाश्वत विकासावर ३०० पेक्षा अधिक लेख व २५ पेक्षा अधिक पुस्तकाचे लेखन केले. त्यांनी संयुक्त राष्ट्राच्या अनेक संस्था, जागतिक बँक आणि OECD (Organization for Economic Cooperation and Development) सह विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थांना मार्गदर्शन केले आहे. त्यांना २००८ साली केंब्रिज विद्यापीठाने त्यांना शाश्वतता या विषयाशी संबंधित जगातील सर्वांत प्रभावशाली ५० व्यक्तींपैकी एक म्हणून गौरविले आहे

तसेच अर्थशास्त्र आणि पर्यावरणातील योगदानाबद्दल १९९१ सालचा मॅझोटी पुरस्कार (इटली) प्रदान करण्यात आला.

**हरमन डेली** (Herman Daly): पर्यावरणवादी अर्थशास्त्रज्ञ यांच्यामते, शाश्वत विकास साध्य करण्यासाठी पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१. मानवी लोकसंख्येला पर्यावरणाच्या वहन क्षमतेच्या पातळीपर्यंत मर्यादित करणे. पर्यावरणाची वहन क्षमता ही एक जहाजाच्या प्लीसमोन लाईन सारखी असते. जहाजाच्या लोड भरण्याच्या मर्यादेला 'प्लीसमोन लाईन' म्हटले जाते. अर्थव्यवस्थेतील अशा प्रकारच्या क्षमतेच्या अभावामध्ये मनुष्याची संख्या पृथ्वीच्या धारण क्षमतेपेक्षा अधिक होते, जी आपल्याला शाश्वत विकासापासून लांब ठेवते.

२. तांत्रिक प्रगती ही आदाने (इनपुट) कार्यक्षम करणारी असावी आणि ती आदानांचा उपभोग घेणारी असू नये.

३. पुनःपुन्हा संसाधनांचे निष्कर्षण शाश्वत विकासाच्या आधारे केले जावे जेणेकरून कोणत्याही स्थितीत निष्कर्षणाचा दर हा पुनर्निर्मिती दरापेक्षा (Rate of regeneration) अधिक असू नये.

४. अ-पुनर्नवीकरणीय संसाधनांच्या ऱ्हासाचा दर हा पुनर्नवीकरणीय पर्यायांच्या निर्मिती दरापेक्षा अधिक नसावा.

५. प्रदूषणामुळे निर्माण होणाऱ्या अकार्यक्षमतांमध्ये सुधारणा केली पाहिजे.

**ब्रुटलँड आयोग (कमिशन)**

ब्रुटलँड आयोग हा पर्यावरण आणि विकास यावरील जागतिक आयोग आहे. १९८३ साली संयुक्त राष्ट्राद्वारे या आयोगाची स्थापना करण्यात आली.या आयोगामध्ये संयुक्त राष्ट्राद्वारे नियुक्त करण्यात आलेले २१ सदस्य होते. नॉर्वेच्या माजी पंतप्रधान ग्रो हार्लेम ब्रुटलँड या आयोगाच्या अध्यक्ष होत्या.या आयोगाने १९८७ साली 'अवर कॉमनफ्युचर' हा अहवाल प्रसिद्ध केला, त्यालाच ब्रुटलँड अहवाल असे देखील म्हटले जाते.हा अहवाल प्रकाशित झाल्यानंतर ब्रुटलँड आयोग विसर्जित करण्यात आला.या दस्तऐवजाने 'शाश्वत विकास' (Sustainable Development) हा शब्द प्रचलित केला. यामध्ये ब्रुटलैंड कमिशनने (Brundtland Commission) या भावी पिढ्यांच्या संरक्षणावर भर दिला आहे. हा विचार पर्यावरणवाद्यांच्या या विचाराशी अनुरूप आहे की, पुढील पिढ्यांच्या हाती सुस्थितीतील पृथ्वी सुपूर्द करणे ही आपली नैतिक जबाबदारी (Moral obligation) आहे. म्हणजेच, वर्तमान पिढीने भावी पिढीकडे चांगले पर्यावरण सोपवावे. किमान आपल्याला वारसा हक्काने मिळालेल्या पर्यावरणाची जी गुणवत्ता होती किमान तेवढी गुणवत्ता राखलेले पर्यावरण आपण पुढील पिढीकडे सुपूर्द करावे. १९८८ साली या आयोगाच्या जागी 'सेंटर फॉर अवर कॉमन फ्युचर'ची सुरुवात करण्यात आली. वर्तमान पिढीची ही जबाबदारी आहे की, त्यांनी अशा विकासाला चालना द्यावी ज्याद्वारे नैसर्गिक आणि निर्मित पर्यावरणाला (Natural and built environment) अशारितीने प्रोत्साहन मिळेल की, ते पुढील घटकांना पूरक असेल.

अ. नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन.

आ.	जागतिक नैसर्गिक पारिस्थितिकीय व्यवस्थेच्या पुनर्निर्मिती क्षमतेचे संरक्षण; आणि

इ.	भावी पिढ्यांवरील अतिरिक्त खर्च किंवा जोखीम टाळणे.

**शाश्वत विकासाची उद्दिष्टे :** निरंतर विकास अथवा चिरस्थायी विकास हे उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्राने निर्धारित केलेली १७ जागतिक उद्दिष्टे. ही उद्दिष्टे 'वैश्विक उद्दिष्टे' किंवा म्हणूनही ओळखली जातात. ही व्यापक ध्येये एकमेकांशी निगडित आहेत; प्रत्येक उद्दिष्टाच्या प्राप्तीचे स्वतःचे लक्ष्य आहेत. सर्व उद्दिष्टांचे एकूण १६९ लक्ष्ये आहेत. यामध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या अनेक मुद्द्यांचा समावेश आहे. यात गरीबी, उपासमार, आरोग्य, शिक्षण, हवामानातील बदल, लिंग समानता, पाणी, स्वच्छता, ऊर्जा, पर्यावरण आणि सामाजिक न्याय इत्यादींचा समावेश आहे.




उद्दिष्ट १ – संपूर्ण जगातील सर्व प्रकारचे दारिद्र्य दूर करणे.

उद्दिष्ट २ – उपासमार दूर करणे, अन्नसुरक्षा साध्य करणे, पोषणात वाढ करणे व शाश्वत शेतीस प्रोत्साहन देणे.

उद्दिष्ट ३ – निरोगी जीवनाची खात्री देऊन (जगभरातील सर्व वयोगटातील) व्यक्तींमध्ये चांगल्या स्वास्थ्याची भावना निर्माण करणे.

उद्दिष्ट ४– सर्वांना सर्वसमावेशक व न्याय्य, दर्जेदार शिक्षण प्रदान करून सर्वांना आयुष्यभर शिक्षण घेता येईल अशा संधी निर्माण करणे,

उद्दिष्ट ५ – लिंग समानता प्राप्त करणे आणि महिला व मुलींचे, सबलीकरण करणे.

उद्दिष्ट ६ – सर्वांना पाणी आणि स्वच्छता उपलब्ध करून देणे आणि त्याचे शाश्वत नियोजन करणे.

उद्दिष्ट ७ – सर्वांसाठी परवडण्याजोगी, विश्वसनीय व शाश्वत ऊर्जा उपलब्ध करणे.

उद्दिष्ट ८ – निरंतर सर्वसमावेशक व शाश्वत आर्थिक वाढीस प्रोत्साहन देऊन उत्पादक रोजगार आणि सर्वांना चांगले काम पुरविणे.

उद्दिष्ट ९ – सुयोग्य पायाभूत सुविधांच्या उभारणीतून सर्वसमावेशक व शाश्वत औद्योगिकीकरण करणे आणि नावीन्यतेस प्रोत्साहन देणे.

उद्दिष्ट १० – देशातील व आंतरदेशीय विषमता कमी करणे.

उद्दिष्ट ११ – शहरे व मानवी अधिवास समावेशक, सुरक्षित, लवचिक व शाश्वत बनविणे.

उद्दिष्ट १२ – शाश्वत उत्पादन व उपभोगाचा आकृतिबंध निर्माण करणे.

उद्दिष्ट १३ – (UNFCC च्या तरतुदींच्या अधीन राहून) हवामान बदल व त्याचे परिणाम याबाबत तात्काळ कारवाई करणे.

उद्दिष्ट १४ – शाश्वत विकासासाठी समुद्र व सागरी संसाधनांचा शाश्वत वापर करणे व त्यांचे जतन करणे.

उद्दिष्ट १५ – भू-परिसंस्थांचे संरक्षण व पुनर्वसन करणे व शाश्वत वापरास प्रोत्साहन देणे, वाळवंटीकरणास तोंड देणे, भूअवनती थांबविणे, जैवविविधतेचा ऱ्हास थांबविणे.

उद्दिष्ट १६ – शाश्वत विकासासाठी शांतताप्रिय आणि समावेशक संस्था उभारणे, सर्वांना न्याय प्रदान करणे, या संस्थांना प्रभावी, जबाबदार व समावेशक बनविणे.

उद्दिष्ट १७ शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीस गती देणे आणि जागतिक भागीदारीस प्रोत्साहन देणे.

**शाश्वत विकास साध्य करण्याचे मार्ग:**

विकसित, विकसनशील व अविकसित राष्ट्रांना आपल्या राष्ट्राचा जलद आणि सर्वांगीण विकास व्हावा, असे जगातील प्रत्येक राष्ट्रास वाटत असते. त्याचे दोन हेतू असतात. एक, देशातील लोकांच्या जीवनमानाचा व राहणीमानाचा दर्जा सुधारावा आणि उंचवावा. दुसरा, आपला देश एक आर्थिक प्रगत देश आणि आर्थिक महासत्ता म्हणून जगात उदयास यावा. असा प्रयत्न व विकासाचे धोरण जगातील अनेक देशांनी, प्रामुख्याने प्रगत देशांनी, स्वीकारल्याने पर्यावरण आणि नैसर्गिक साधनांचे अध:पतन होण्यास मदत झाली. त्यातून आज सर्व सजीवसृष्टी आणि पृथ्वीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाश्वत विकासाच्या मुख्य हेतूला प्रमाण मानून शाश्वत विकासाच्या मूळ स्रोतांचा वापर काळजीपूर्वक करणे त्याच बरोबरीने पर्यायी स्रोतांच्या वापरास प्रोत्साहन देणे आणि या द्वारे चिरस्थायी शाश्वत विकास साध्य करता येवू शकतो. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

**अ. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर** (Use of Non-Conventioanal Sources of Energy) भारत वीज पुरवठ्याच्या गरजेच्या पूर्ततेकरिता औष्णिक आणि जलऊर्जा प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. या दोन्हीचा पर्यावरणावर खूप प्रतिकूल परिणाम होतो. औष्णिक ऊर्जा संयंत्र मोठ्या प्रमाणात कार्बनडाय ऑक्साईडचे उत्सर्जन करतात आणि तो एक हरित वायू आहे. औष्णिक ऊर्जा संयंत्राच्या

धुरातून मोठ्या प्रमाणात राख बाहेर पडते जिचा योग्य वापर केला नाही तर जलस्रोत, भूमी आणि पर्यावरणातील इतर घटकांचे प्रदूषण होते. जल–विद्युत प्रकल्पांमुळे वने जलमय होतात आणि नदी प्रवाह क्षेत्रे आणि नदी खोऱ्याच्या नैसर्गिक प्रवाहामध्ये अवरोध होतो. पवन ऊर्जा आणि सौर ऊर्जा ही अपारंपरिक ऊर्जेची उत्तम उदाहरणे आहेत, तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे त्यांचा उपयोग करून घेण्याच्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात विकास झालेला नाही.

**ब. ग्रामीण भागात एल.पी.जी. आणि गोबर गॅस** (LPG, Gobar Gas in Rural Areas) – ग्रामीण भागामध्ये राहणारे कुटुंब इंधनासाठी लाकूड, शेण आणि इतर जैविक पदार्थांचा वापर करते. या पद्धतीचे अनेक प्रतिकूल परिणाम होतात. उदा. जंगलतोड, हरित आच्छादनाची नासाडी, गुरांच्या शेणाची नासाडी आणि प्रदूषण, यामुळे वने नष्ट होणे, हरित क्षेत्रामध्ये घट, पशुंचे शेण आणि वायू प्रदूषण यांसारखे परिणाम होतात. या स्थितीत सुधारणा करण्यासाठी अनुदानाद्वारे कमी किमतीत 'द्रव पेट्रोलिअम वायू' (LPG) दिला जातो. याशिवाय गोबर गॅस संयंत्र यासाठी सुलभ कर्ज आणि अनुदान देऊन उपलब्ध करून दिले जात आहे. एलपीजी हे एक स्वच्छ इंधन आहे जे कुटुंबातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी करते. यामध्ये ऊर्जेचा अपव्ययदेखील खूप कमी होतो. गोबर गॅस चालवण्यासाठी शेणाला संयंत्रामध्ये भरले जाते आणि त्यापासून गॅसची निर्मिती होते, या गॅसचा इंधन म्हणून वापर केला जातो. यातून जे शिल्लक राहते ते एक अधिक चांगले जैविक खत असते आणि हे खत मृदा पोषक आहे.

**क. शहरी भागामध्ये उच्चदाब नैसर्गिक वायू** (CNG) – भारतात सुरुवातीस दिल्लीतील सार्वजनिक वाहतुकीसाठी ई. इंधन म्हणून सीएनजीचा वापर केल्यामुळे वायू प्रदूषणाच्या पातळीत मोठी घट झाली आहे.आणि मागील काही वर्षांपासून देशातील इतर अनेक शहरांमध्ये सीएनजीचा वापर सुरू करण्यात आला आहे.

**ड. पवन ऊर्जा** (Wind Power) हवेचा वेग शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सर्वसाधारणपणे तीव्र असतो अशा क्षेत्रात पवन चक्कीच्या माध्यमातून वीज निर्माण करता येऊ शकते. ऊर्जेच्या या स्रोताचा पर्यावरणावर कोणताही प्रतिकूल परिणाम होत नाही. हवेमुळे टर्बाइन फिरतात आणि त्यातून वीज तयार होते. मात्र, अशा पवनचक्क्या उभ्या करण्याचा सुरुवातीचा खर्च खूप मोठा आहे पण याचे लाभ या खर्चापेक्षा अधिक आहेत.

**इ. सौर ऊर्जा** (Solar Power through Photovoltaic Cells) नैसर्गिकपणे भारतात सूर्य किरणांच्या माध्यमातून सौर ऊर्जा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या ऊर्जेचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने केला जातो, उदा. कपडे, अन्न आणि कृषी उत्पादने आणि दैनंदिन वापरातील अनेक वस्तू या ऊर्जेच्या साहाय्याने वाळविल्या जातात. थंडीमध्ये सूर्य किरणांचा वापर आपण उष्णतेसाठी करतो. वनस्पती सौर ऊर्जेचा वापर प्रकाश संश्लेषणासाठी करतात. आता फोटोव्होल्टीय सेलच्या मदतीने सौर ऊर्जेला विद्युत ऊर्जेमध्ये परावर्तीत केले जाऊ शकते. हे सेल सौर ऊर्जेला एका विशिष्ट प्रकारच्या उपकरणाने पकडतात

आणि ऊर्जेचे विजेमध्ये रुपांतर करतात. ग्रीड किंवा तारेद्वारे वीज पुरवठा एकतर शक्य नाही किंवा तो फार खर्चिक आहे अशा दूरच्या प्रदेशांमध्ये हे तंत्रज्ञान उपयुक्त आहे. तसेच, ते प्रदूषणापासून पूर्णतः मुक्त आहे.

**ई. लघू–जल प्रकल्प** (Mini Hydel Plants) – पर्वतीय भागातील जवळपास सर्व क्षेत्रांमध्ये धबधबे आढळतात. या धबधब्यांपैकी बहुतांश धबधबे हे कायमस्वरूपी असतात. लघू–जल प्रकल्प हे या धबधब्यांच्या ऊर्जेतून छोटे टर्बाइन चालवतात. या टर्बाइनमधून वीजनिर्मिती होते. या विजेचा वापर स्थानिक स्तरावर केला जाऊ शकतो. या प्रकारचे वीज प्रकल्प हे पर्यावरणाच्या दृष्टीने हितकारक असतात. कारण हे प्रकल्प जिथे बसवले जातात तिथल्या भू–वापराच्या पद्धतीमध्ये कुठलाही बदल करत नाहीत. याचा अर्थ अशा प्रकल्पाचा उपयोग केला तर मोठ–मोठे ट्रान्स्मिशन टॉवर आणि तारा यांची यामध्ये गरज भासत नाही आणि यामुळे वीज वितरणातील नुकसान टाळता येऊ शकते.

**उ. पारंपरिक ज्ञान आणि पद्धती** (Traditional Knowledge and Practices) पारंपरिकदृष्ट्या भारतीय लोक पर्यावरणाच्या अधिक सानिध्यात आहेत. ते पर्यावरणाचा नियंत्रक न बनता पर्यावरणाचा एक भाग बनून राहिले आहेत. जर आपली कृषी व्यवस्था, जमिनीवर सलग वर्षे वेगवेगळी पिके घेणे यामुळेही शेतकऱ्यांना फायदा होत आहे. याशिवाय कीटक नियंत्रणात मदत जनजागृती केली जात आहे. उदा. साप हा उंदीर आणि इतर अनेक प्रकारच्या किड्यांना खातो. त्याचप्रकारे घुबड आणि मोर यांसारख्या पक्षांच्या मोठ्या प्रजाती हानिकारक कीटकांचे सेवन करतात. जर त्यांना आपण कृषी क्षेत्राभोवती राहू दिले तर मोठ्या संख्येने ते किटकांचा नाश करतील. याबाबतीत सरडेदेखील महत्त्वाचे आहेत. शाश्वत विकास हा शब्द आज लोकप्रिय (Catchphrase) बनला आहे. विकासाच्या विचारधारेत हा एकार्थाने अत्यावश्यक असा बदल आहे. त्यामुळे हा मार्ग अवलंबल्यामुळे शाश्वत विकास आणि सर्वांचे कल्याण होईल.

**शाश्वत विकासाचे दृष्टीकोन:**

लोकप्रशासन अधिकाधिक नागरीकेंद्री व व्यक्तीहित साध्य करण्यासाठी शाश्वत विकास ध्येयांच्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी शाश्वत विकास या संकल्पनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा असावा, ही बाब विचारात घेणे आवश्यक आणि उपयुक्त आहे. शाश्वत विकासाचे एकूण चार दृष्टीकोन आहेत.

**१. आर्थिक दृष्टीकोन :** शाश्वत विकासाच्या आर्थिक पैलूंत अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक वृद्धी होत जाऊन उत्पन्नाचा प्रवाह सुरू राहणे अपेक्षित आहे. अर्थात, हे होत असताना देशातील नैसर्गिक, भौतिक, मानवी भांडवलांचे साठे संपणार नाहीत, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. याबरोबरच उत्पादनाचा आणि उपभोगाचा पर्यावरणीय खर्च विचारात घेणे आवश्यक आहे.

**२. सामाजिक दृष्टीकोन :** सामाजिक अंगाने शाश्वत विकासाच्या सामाजिक पैलूंत सामाजिक न्याय आणि समता साध्य होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच लोकांना सुरक्षितता, अन्न, निवारा, आरोग्य, शिक्षण, स्वयंविकासाची संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

**३. पर्यावरणीय दृष्टीकोन :** शाश्वत विकासाच्या पर्यावरणीय पैलूंत नैसर्गिक साधनांचा योग्य आणि विवेकी वापर, प्रदूषण शोषणाचे कार्यक्षम कार्य, नैसर्गिक साधनांचे साठे राखून ठेवणे, परिस्थितीकीचा समतोल राहील याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

**४. संस्थात्मक दृष्टीकोन :** शाश्वत विकासाच्या संस्थात्मक पैलूंत विकास नीती म्हणून स्वीकार आणि जागतिक करारात सहभाग व अंमलबजावणी, दूरध्वनी आणि आंतरजाल वापरणाऱ्यांची संख्या, संशोधन व विकास खर्च, नैसर्गिक आपत्तीकाळात कमीत कमी हानी इत्यादींसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

शाश्वत विकासासंदर्भात अनेक निकष किंवा निर्देशांक आहेत. त्यामध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादन वृद्धी दर, लोकसंख्या स्थैर्य, मानव संसाधन विकास, शुद्ध हवा, ऊर्जा तीव्रता, नूतनीकरणक्षम ऊर्जेचे प्रमाण, उत्पादन साधनांचा वापर तीव्रता, पाण्याचा वापर, जमीन किंवा मृदा अध:पतन, वनव्याप्त क्षेत्र, पुनर्चक्रीकरण प्रमाण, वाहतूक तीव्रता, दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल देशांर्गत उत्पादनाशी निव्वळ गुंतवणुकीचा हिस्सा, एकूण निर्यात आणि आयातीचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण, पर्यावरण अंतर्भूत निव्वळ देशांतर्गत उत्पादन, निर्यातीचा हिस्सा किंवा प्रमाण, वार्षिक ऊर्जा उपभोग, वस्तू निर्माण क्षेत्रात नैसर्गिक साधने तीव्रतेच्या उद्योगांचे प्रमाण किंवा हिस्सा, खनिज साधनांचे शोधित साठे, जीवाश्म इंधन साधनांचे शोधित साठे, चिरकाल ऊर्जा शोधित साठे, संसाधने वापराची तीव्रता, स्थूल देशांतर्गत उत्पादनात वस्तू निर्माण क्षेत्राचे योगदान, नूतनीकरण ऊर्जा वापराचे प्रमाण, निव्वळ संसाधने स्थलांतराचे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण, एकूण विदेशी विकास साहाय्यचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण, पर्यावरण संरक्षण खर्चाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण, चिरंतन विकास निधी, भांडवली वस्तूंची आयात, विदेशी परकीय गुंतवणूक, पर्यावरणस्नेही भांडवली वस्तूंच्या आयातीचे प्रमाण, तांत्रिक साहाय्य अनुदान इत्यादी निकष हे शाश्वत विकासचे उद्दिष्टे प्राप्त करण्याच्यादृष्टीने महत्त्वाचे आहेत.

**भारत आणि शाश्वत विकास :** सुरुवातीच्या काळामध्ये नीती आयोगाच्या माध्यमातून भारतात शाश्वत विकासाचा मुख्य हेतू आणि कार्यक्रम यांची अंमलबजावणी केली. यामध्ये प्रामुख्याने प्रत्येक उदिष्ट आधारभूत मंत्रालयाची ओळख करून त्यांना तशी जबाबदारी दिली आहे. भारत सरकारने शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा', 'बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान', 'सागरमाला', 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'आधार कायदा' यांसारख्या कार्यक्रम राबवीत आहे. सरकारच्या या योजनांमध्ये राज्यांचाही सहभाग आहे. याशिवाय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाला निरंतर विकास उद्दिष्ट्यांसाठी राष्ट्रीय निर्देशांक विकसित करण्याचे कार्य सोपविण्यात आले आहे.

**भारत–जी–२० प्रतिनिधित्व आणि शाश्वत विकास**

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, मुद्यांना प्रमाणमानून जागतिक पटलावर जी २०' अर्थात जगातील वीस प्रभावशाली देशांचा समूह किंवा गट. या समूहाची परिषद विविधतेने नटलेल्या भारत देशात झाली आहे. हा बहुमान नक्कीच अभिमानास्पद आहे. देशांना एकसंघता, शाश्वत विकास आणि समृद्धीच्या दिशेने

नेणारा ठरणार आहे. 'वसुधैव कुटुंबकम् : एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' ही या परिषदेची संकल्पना. याच संकल्पनेतून आणि दृष्टिकोनातून वातावरणासंबंधी आव्हाने, शांतता आणि शाश्वत विकासाच्या मार्गावरील आव्हानांवर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सांघिकरित्या मात करण्यासाठी एक 'सर्वंकष आराखडा २०३०' मांडण्यात आला आहे. भारताने 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' या जीवनमूल्यांच्या आधारे लोकसहभागातून नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनशील असे सुप्रशासन आणि विकासाचे प्रारुप (मॉडेल) तयार केले आहेत. भारतीय प्रारुपात (मॉडेल) प्राचीन ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासाठी घडवून आणले जात आहे. 'जी २०' च्या संपूर्ण कार्यप्रवाहांमध्ये विकासाच्या मुद्द्यांवरील भर वाढवून शाश्वत विकास घडवून आणण्याची प्रक्रिया अधिक गतीमान करण्याकडे भारताचे लक्ष राहणार आहे. महिला-नेतृत्व विकास, डिजिटल परिवर्तन आणि केवळ हरित संक्रमण आदी सर्व शाश्वत विकास गटांवर बहुआयामी प्रभाव टाकू शकतील, असे परिवर्तनशील क्षेत्रे आणि संक्रमणांवर विशेष भर असणार आहे.

'२०३०' चे उद्दिष्ट्य साध्य करण्याच्या दृष्टीने २०१५ मध्ये सुरू झालेल्या प्रवासाच्या मधल्या, निर्णायक टप्प्यावर भारताकडे 'जी २०' चे अध्यक्षपद आले आहे आणि संयुक्त राष्ट्रांनी अनुक्रमे २०२३ आणि २०२४ मध्ये आयोजित केलेल्या शाश्वत विकास गटाची शिखर परिषद आणि भविष्यासाठीची शिखर परिषद यांच्या समांतरपणे ही परिषद होत आहे. एवढंच नव्हे तर ही 'अमृतकाळा'ची सुरुवात असून शाश्वत विकास या माध्यमातून साध्य करता येईल याबाबत खालील महत्त्वपूर्ण विषय जी२०मंचावर घेण्यात आले.

**विकसनशील देशांना आत्मनिर्भर करण्यावर विकास कार्य गटाचा भर:**

'जी २०' सह अनेक आंतरराष्ट्रीय मंचांवर विकसनशील राष्ट्रांचा भारत प्रतिनिधित्व करेल. जागतिक निर्णय प्रक्रियेत विकसनशील देशांनी महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे, असे भारताने अनेकदा सांगितले आहे. या वर्षभरात विकास कार्य गटांच्या होणाऱ्या सर्व चर्चांमध्ये अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करण्याचा भारताचा प्रयत्न असणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मते 'सुधारित बहुपक्षवाद' हा सर्व घटकांना आवाज मिळवून देतो, समकालीन आव्हानांना तोंड देतो आणि मानवी कल्याणावर लक्ष केंद्रित करतो. त्यामुळेच भारताच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात विकसनशील देशांचा आवाज सर्वच आंतरराष्ट्रीय मंचांवर अधिक बळकट करण्याची आणि त्यांना आत्मनिर्भर करण्यावर विकास कार्य गट भर देतील. भारताचे 'जी २०' चे अध्यक्षपद केवळ 'जी २०' देशांपर्यंतच मर्यादित नसून संपूर्ण जगाचे विशेषत: 'ग्लोबल साऊथ'देशांचे असेल.

**राष्ट्रा-राष्ट्रा आर्थिक अर्थसहाय्य:**

भारत आणि इतर राष्ट्रे ही शाश्वत विकास ची '२०३०' पर्यंतची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीची आर्थिक तरतूद असणे गरजेचे आहे. त्यामुळे विकसनशील देशांना अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. करोना साथीमुळे प्रामुख्याने आर्थिक कारणास्तव, '२०३०' पर्यंत शाश्वत विकासाची निर्धारित उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यात अनेक देशांना अडचणी येत आहेत. विकसनशील देशांत शाश्वत विकास उद्दिष्टांसाठीच्या आर्थिक

तरतुदीमधील ही दरी किमान २० टक्क्यांनी वाढली असल्याचा अंदाज आहे. त्यामुळेच भारतीय अर्थखात्याने, 'कोणताही देश कर्जाच्या विळख्यात सापडणार नाही' अशा पद्धतीने त्याला विकासासाठी परवडणारे अर्थसाहाय्य उपलब्ध व्हावे या दृष्टीने व्यूहरचना आखणे, हे भारताच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात विकास कार्य गटांच्या प्राधान्य क्रमात अग्रस्थानी असेल.

**नागरिकांचे आरोग्य संरक्षण**

जागतिक पातळीवर इतर राष्ट्राच्या सहकार्याने अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सरकारी-खासगी भागीदारीमुळे भारताच्या 'डिजिटल पेमेंट' प्रणालीने नागरिकांच्या जीवनात व्यापक बदल घडवून आणले आहेत. त्यामुळेच 'कोविड-१९' साथीच्या काळात अवघ्या काही सेकंदांत गरजू लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये मदत निधी देणे भारताला शक्य झाले. सर्वसमावेशकतेवर भर देऊन, भारताने २०१४ पासून ३५ कोटीहून अधिक बँक खाती उघडली आहेत आणि विशेष म्हणजे त्यातील ५६ टक्के महिलांची आहेत. भारताचे 'राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियान' आणि 'आरोग्य विमा योजना' आजमितीस ५० कोटी नागरिकांना संरक्षण देत असून ही जगातली सर्वात मोठी सरकारी अनुदानित आरोग्य विमा योजना आहे. त्यामुळे शाश्वततेचे उदिष्ट गाठण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

**विकसनशील देशांमध्ये 'डेटा'संबंधित क्षमता-निर्मितीवर भर**

भारतातील प्रत्येक नागरिकापर्यंत 'डिजिटल' माध्यमातून वस्तू पोहोचवण्यासाठी 'इको सिस्टम'चा समावेश असलेले नवनवीन तंत्रज्ञान भारतीय 'स्टार्टअप्स' शोधून काढत आहेत. विकासासाठी माहितीच्या आदान-प्रदानाला प्रोत्साहन देण्याच्या व्यापक विचाराने भारताने अनेक मुक्त-स्रोत मंच जगासाठी खुले करण्यासह संयुक्त राष्ट्रांच्या मदतीने, विकसनशील देशांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी 'जी २०' ची क्षमता निर्माण करणारी यंत्रणा उभी करण्यात पुढाकार घेतला आहे. भारताच्या 'जी २०' अध्यक्षपदाच्या कार्यकाळात 'विकास कार्य गट' हा, विकसनशील देशांमध्ये 'डेटा'संबंधित क्षमता-निर्मितीवर लक्ष केंद्रित करेल आणि विकासासाठी माहितीचे आदान-प्रदान या आधारे बहुमुखी व मानव केंद्रित शाश्वत विकासाला चालना देईल.

**जागतिक पातळीवरील ग्लोबल वॉर्मिग बदलत्या हवामान कृती कार्यक्रम :**

भारताचे विकासाचे प्रतिरूप हे आधुनिकही आहे आणि समकालीन सुद्धा! परंपरा आणि शाश्वत विकास यात ते रुजलेले आहे. 'पर्यावरणवादी जीवनशैली' भारत सरकारचा महत्वपूर्ण कार्यक्रम हा लोकचळवळ आहे. तिच्या यशाच्या जोरावर रोम शिखर परिषदेत 'जी-२०' नेत्यांनी मान्य केलेल्या हवामान कृती आराखड्यातील, 'परवडणारे वित्त साहाय्य', तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण आणि 'शाश्वत उपभोग आणि उत्पादन' या महत्त्वपूर्ण बाबींवर भारत अत्यंत सखोलपणे काम करणार आहे.

प्रारंभीच्या वर्षांमध्ये बहुस्तरीय विकासाबरोबरच ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल, अन्न सुरक्षा, जागतिक आरोग्य आणीबाणी आणि गरीबी ई आव्हानात्मक विषय सुद्धा विकास कार्य गटाने हाताळले. 'जी २०' च्या

धोरणाला तसेच परंपरा आणि 'संवर्धन व संयम' या मूल्यांवर आधारित जीवन जगण्याचे निरोगी आणि शाश्वत मार्ग यांना प्रोत्साहन देण्यासाठी विश्वव्यापी चळवळ उभी करण्याचा भारताचा मानस आहे. शाश्वततेसाठी व्यक्तिगत स्तरावर निर्णय घेणे आणि शाश्वत जीवन शैलीची मूल्ये समाजात रुजवणे यावर भर दिला जाईल. यात पर्यावरणवादी जीवन शैली  वर्तुळाकार / चक्राकार अर्थ व्यवस्था, हरित पर्यटन आणि सांस्कृतिक प्रथा-परंपरांचे जतन व संवर्धन तसेच त्यासाठी संसाधनांची जुळवाजुळव या सगळ्याचा समावेश असणार आहे. सन २०१० मध्ये 'जी २०' ची स्थापना झाली. तेव्हापासून आजतागायत 'विकास कार्य गट' हा विकास आराखड्याचा संरक्षक म्हणून काम पाहत आहे. २०१५ मध्ये जी २० ने 'शाश्वत विकास आणि त्यासाठीची उद्दिष्टे' हा कृती आराखडा-२०३० स्वीकारला. त्यानंतर 'विकास कार्य गटा'ने जी २० चा 'विकास आराखडा' आणि 'शाश्वत विकास आणि त्यासाठीची उद्दिष्टे' यात मेळ घालण्याचे काम यशस्वीपणे केले आहे आणि भारत विश्वगुरु या संकल्पनेच्या आधारे जगाला शाश्वत विकासाची जीवनमूल्ये जपण्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

### २.३.३ व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी

जागतिकीकरणोत्तर प्रशासनामधील सार्वजनिक धोरणामध्ये व्यापक बदल झालेले आहेत आर्थिक आणि सामाजिक विषमता, ऐतिहासिक संरचना आणि भौगोलिकतेमुळे लादलं गेलेलं मागासपण, भांडवली जगाची अफाट नफ्याची भूक आणि क्षमता, या व अशा काही महत्त्वाच्या कारणांमुळे जगातल्या बहुसंख्यांवर एकप्रकारे अंतहीन बकालपणाची सक्ती झाली आहे. या भीषण वास्तवावर तात्पुरती मात करण्यासाठी बहुसंख्यांना लागणारा आधार पुरवणे, अशी 'समाजसेवेची' एक व्याख्या करता येऊ शकते. काही सन्माननीय अपवाद वगळता जगभरात भांडवली जगातून होणारी 'समाजहित'साध्य करणे साधारणतः या प्रकारची असल्याचं दिसतं. व्यवसाय ही संस्था समाजाचा एक अविभाज्य भाग असून समाजाच्या मालकीच्या विविध साधन संपत्तीचा उपयोग करुन आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करतो. प्रामुख्याने राष्ट्रातील जी सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती असेल, त्यावर ती उद्दिष्ट्ये अवलंबून असतात. भारतासारख्या देशामध्ये मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी व सरकारी क्षेत्र हातात हात घालून उद्योगधंदे करीत असतात. अशा अर्थव्यवस्थेत फायदा मिळविण्याबरोबरच सामाजिक जबाबदारी उद्योगांनी घेणे अभिप्रेत असते. व्यावसायिक सामाजिक जबाबदारीचे उद्दिष्ट हे व्यवसायाच्या कृतीमधून ग्राहक, कर्मचारी, समाज, भागधारक ह्या घटकांच्या प्रगती करिता व पर्यावरणाच्या संरक्षणाकरिता प्रयत्न करणे व योगदान देणे होय.

**अर्थ व व्याख्या :**

व्यवसायीकाची सामाजिक जबाबदारी ही उद्योगधंद्याच्या निर्णयांमधून समाजावर व पर्यावरणावर सकारात्मक परिणाम करणारी असते. व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी ही चिरंतन विकासावर आधारित असून त्यामध्ये आरोग्य व समाजाच्या कल्याणकारी योजनांचा समावेश होतो. तसेच व्यवसायाचे जे आधारस्तंभ (stakeholders) असतात त्यांच्या अपेक्षांची पूर्ती विचारात घेणे आवश्यक असते.

पीटर ड्रकर यांच्या मते, ''उद्योगधंद्यापुढील प्रमुख उद्देश जास्तीत जास्त नफा मिळविणे हा नसून तोटा न होण्यासाठी व आर्थिक उद्दिष्टांमधील धोके टाळण्यासाठी जो फायदा आवश्यक आहे तो साध्य करणे हा आहे. म्हणून आजच्या जागतिकीकरणाच्या परिस्थितीत नफ्याबाबतची पारंपारिक संकल्पना बदलून केवळ भागधारक अथवा उद्योगसंस्था ह्याच्याच फायद्याचा विचार हा एकूण उद्दिष्टांमधील केवळ एक लहानसा भाग ठरतो.''

व्यवस्थापन शास्त्रज्ञ बोवेन यांच्या मते, 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी म्हणजे सामाजिक उद्दिष्ट्ये व मूल्ये ह्यांच्या दृष्टीने योग्य असे निर्णय, धोरणे व कृती करण्याची जबाबदारी होय.'

''व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी हा एक व्यवसायाचा सकारात्मक दृष्टिकोन असून त्याद्वारे व्यवसायाच्या विविध घटकांना आर्थिक, सामाजिक व पर्यावरण पूरक फायदे देवून चिरंतन विकासाकरिता योगदान देणे होय.''

वरील अर्थाला अनुसरून नव लोकप्रशासनाची अभ्यासविषय असणाऱ्या सार्वजनिक धोरणामध्ये बदल होऊन १९९०नंतर भारतात देखील अशा समाजउपयोगी कार्यक्रम राबवणारी भावना मोठ्या प्रमाणावर रुजलेली, वाढलेली आणि विस्तारलेली दिसते. भांडवली नफ्यावर आधारित समाजसेवेचा एक प्रकार म्हणजे कॉर्पोरेट सोशल रीस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) होय. भारत सरकारच्या व्यवसायिक कार्य मंत्रालयाने २०१३ व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी हा कंपनी कायदा अस्तित्वात आणला या कायद्याद्वारे व्यावसायिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या उद्योगांना त्यांच्या समाजाप्रती बांधिलकी जपण्यासाठी सामाजिक कल्याणकारी उपक्रमाकरिता व्यवसायिकांची सामाजिक उत्तरदायित्व प्रकल्प हाती घेण्यात आला की यामध्ये वैधानिक बंधने घालण्यात आलेली दिसून येतात अशा प्रकारचा हा जगातील सर्वात मोठा वेगळा प्रयोग या प्रयोगाला वैधानिक नोंदणीकृत काही निवडक उद्योग यासाठी अनिवार्य करणारा भारत हा एकमेव देश आहे. हा उपक्रम देशांमध्ये शाश्वत विकास आणि सार्वजनिक खाजगी भागीदारीच्या क्षेत्रामध्ये परिवर्तन निर्माण करणारा ठरत आहे. कार्पोरेट किंवा खाजगी उद्योग व्यवसायाच्या मूल्य साखळीमध्ये सामाजिक पर्यावरणीय आणि मानवीय विकासाच्या समस्यांना सोडवण्यासाठी निर्माण होणाऱ्या समस्यांना सोडवण्यासाठी एक साधन म्हणून व्यवसायिकांची सामाजिक उत्तरदायित्वाची कल्पना केली गेली. कंपनी कायद्याचे कलम १३५ हे उद्योगांना त्यांच्या उत्पादनक्षमतेनुसार व्यवसायिकाची सामाजिक उत्तरदायित्वाची मर्यादा प्रदान करते उदाहरणार्थ वर सांगितल्या पद्धतीने

अ) कंपनीची उलाढाल ५०० कोटी किंवा त्याहून अधिक रक्कम

ब) कंपनीचे उलाढाल १००० कोटी किंवा त्याहून अधिक असेल

क) कंपनीचा निव्वळ नफा ५०० कोटी त्यापेक्षा अधिक असेल तेव्हा व्यावसायिक सामाजिक जबाबदारी नियमानुसार व्यवसायिक सामाजिक जबाबदारीच्या तरतुदी केवळ भारतीय कंपन्यांनाच लागू नाही तर भारतीय भारतातील परदेशी कंपन्यांच्या शाखा व प्रकल्प कार्यालयास लागू नसल्याचे दिसून येते.

## १. विश्वस्त संकल्पनेशी साधर्म्य :

व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी ही संकल्पना महात्मा गांधीच्या 'विश्वस्त संकल्पनेशी' संबंधित आहे. ह्या विश्वस्त संकल्पनेनुसार आपणाजवळ असलेल्या मालमत्तेचे आपण विश्वस्त आहोत व अधिक मालमत्ता असणाऱ्या श्रीमंतांनी त्याचा वापर दुर्बल घटकांसाठी करावा. त्यानुसार व्यवसायाकडे असलेल्या नफ्याचा उपयोग समाजाच्या उद्धाराकरिता करणे ह्या विश्वस्त संकल्पनेद्वारे अभिप्रेत आहे. म्हणूनच एकूण समाजाच्या उद्दिष्ट्यांच्या व मूल्यांच्या दृष्टीने योग्य अशी सामाजिक धोरणे आखणे, निर्णय घेणे व त्यांची कार्यवाही करणे हे प्रत्येक उद्योगाचे कर्तव्यच ठरते.

## २. सामाजिक जबाबदारी :

व्यक्तिगत लाभाच्या अनुषंगाने स्थापन झालेल्या अनेक कंपन्यामध्ये समाजाप्रती जबाबदारी आपणही त्या निसर्गचा घटक असणाऱ्या समाजाचा भाग असून त्या समाजाचे आपण देणे लागतो या जाणिवेने समाजउपयोगी उपक्रम जबाबदारी पूर्वक राबविण्यात येतात. व्यवसाय ज्या परिसरात कार्यरत असतो तेथील समाजाच्या अपेक्षा उद्योगाकडून असतात. नैसर्गिक साधन संपत्ती ही दुर्मिळ असून तिचा योग्य तो पर्याप्त उपयोग व्यावसायिकाने केला पाहिजे. म्हणजेच कोणत्याही साधनसंपत्तीचा अपव्यय किंवा बेजबाबदारपणे उपयोग होणार नाही हे पाहणे व्यवसायाची जबाबदारी असते. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही सर्वांचीच नैतिक जबाबदारी असून व्यवसायिकांची सामाजिक जबाबदारी आहे. हवा, पाणी, ध्वनी इ. चे प्रदूषण न होता त्यावर योग्य त्या उपाययोजना करणे महत्त्वाचे असते. उद्योगधंद्याच्या उत्पादन प्रक्रियेतून बाहेर पडणाऱ्या प्रदूषित वायू किंवा पाण्यामुळे समाजास हानी पोहचणार नाही याची दक्षता व्यवसायिकाने घेणे आवश्यक आहे. समाजाला व्यवसायिकांकडून विविध कल्याणकारी कार्यक्रमाकरिता आर्थिक मदत किंवा देणग्या अपेक्षित असतात. उदा. दारिद्र्य निर्मूलन, शैक्षणिक संस्थाना मदत, खेळ व क्रीडा कार्यक्रमांचे प्रायोजकरण इ. व्यवसायिक लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने आरोग्य तपासणी शिबिर, व्यसनमुक्ती कार्यक्रम, स्वच्छता अभियान इ. कार्यक्रम राबवू शकते. व्यवसायिकाने समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल व दिव्यांग लोकांकरिता मदतीचा हातपुढे केला पाहिजे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांना रोजगाराची संधी, दिव्यांगांना विशेष मदत, विद्यार्थ्यांना वह्या पुस्तकांचे वाटप अशा स्वरूपात समाजातील आर्थिक दृष्ट्या गरीब लोकांना व दिव्यांगांना मदत केली जाते. उद्योगाने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भौगोलिक क्षेत्रात आपल्या शाखा काढून तेथे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन द्याव्यात. त्यामुळे तेथील लोकांना रोजगार मिळून त्यांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ होवू शकेल. त्याचबरोबर तेथील भौगोलिक क्षेत्राचा विकास सुद्धा होईल. रोगराई, भूकंप, चक्रीवादळ, पूर, आग लागणे इ. प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती काळात उद्योगधंदे समाजासाठी विविध प्रकारची मदत करू शकतात. सध्या संपूर्ण जगामध्ये कोविड-१९ च्या महामारी ने धुमाकुळ घातलेला होता. त्यामुळे देशांतर्गत आरोग्य सेवा अपुऱ्या व तुटपुंज्या पडत आहे. अशा ह्या बिकट परिस्थितीत रिलायन्स, टाटा, बिर्ला इ. उद्योगसमूह हॉस्पीटल उभारणी, ऑक्सीजन मीटर, व्हेंटिलेटरर्स, अँटीजेन टेस्ट इ. साठी आर्थिक मदत करीत आहेत. व्यवसायिकांनी रोजगार निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करून स्थानिक लोकांना उपजिविकेच्या संधी निर्माण कराव्यात. त्यामुळे तेथील लोकांचा बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

## ३. हिस्सेधारक / मालकांबाबतची जबाबदारी :

भागधारक हे व्यवसायाचे मालक असून मुख्य आधारस्तंभ असतात. त्यांनी त्यांची बचत व्यवसायामध्ये अधिक दराने परतावा मिळविण्यासाठी गुंतविलेली असते त्यामुळे भागधारकांबाबतच्या व्यवसायाच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील. भागधारकांना त्यांनी गुंतविलेल्या भांडवलावर योग्य दराने परतावा अपेक्षित असतो. भागधारकांना व्यवसायाने भांडवलाचा उपयोग पर्याप्त रीतीने करणे अपेक्षित असते. भागधारकांना योग्य ती माहिती व कंपनीची आर्थिक स्थिती ह्या सभांमध्ये समजावून सांगणे महत्त्वाचे असते. व्यवसायिकाने भागधारकांना विविध सेवा जलद व तात्काळ पद्धतीने पुरविल्या पाहिजे. भांडवल उभारणीत प्रथम प्राधान्य: व्यवसायास नवीन भांडवल उभारणी करावयाची असल्यास, सद्यस्थितीतील भागधारकांना गुंतवणूक करण्यास प्रथम प्राधान्य द्यावे. हक्काचे समभाग विद्यमान भागधारकांना विकता येतात. व्यवसायातील घडामोडींची माहिती भागधारकांना दिली गेली पाहिजे. व्यवसायाचे अंतिम लेखे व्यवस्थित रितीने तयार करुन त्याचे अंकेक्षण (Audit) करुन घ्यावे. भागधारकांना नफा तोटा पत्रक व ताळेबंदाच्या प्रती अंकेक्षणानंतर उपलब्ध कराव्यात. व्यवसायिकाने विस्तार व विकेंद्रीकरण प्रकल्प हाती घेणे भागधारकांना अपेक्षित असते. त्यामुळे समभागांचे मूल्य वाढून कंपनीच्या नावलौकिकात वाढ होते. आजच्या स्पर्धेच्या युगात व्यवसाय नावलौकिक व प्रतिमा ह्या फार महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामुळे चांगल्या प्रतिमेचा फायदा जादा परतावा मिळण्यासाठी भागधारकांना अपेक्षित असतो.

## ४. कर्मचाऱ्यांबाबतची जबाबदारी :

उद्योग व्यवसायाचे यश व अस्तित्व हे बहुतांशरित्या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. त्यामुळे उद्योगाने कर्मचाऱ्यांना प्रेरणा देण्यासाठी त्यांच्या संदर्भातील विविध सामाजिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या पाहिजेत. कर्मचाऱ्यांना त्यांचे जीवनमान स्वाभिमानाने जगण्यासाठी योग्य ते वेतन व भत्ते (आर्थिक लाभ) देणे आवश्यक असते. आर्थिक लाभांमध्ये बोनस, आरोग्य भत्ता, करमणूक भत्ता, प्रवास भत्ता इ. चा समावेश होतो. व्यवसायिकाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना कामाची हमी / सुरक्षितता दिली पाहिजे. दीर्घ कालावधी करिता कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपाचे काम देवू नये. कर्मचाऱ्यांना कामाची ठिकाणची परिस्थिती ही चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन दिली पाहिजे.त्याकरिता आरोग्य तपासणी, डॉक्टरांची कायम स्वरूपी उपलब्धता, सुरक्षा साधने (शिरस्त्राण, हातमोजे, रबरी बूट इ.) ची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करणे अनिवार्य ठरते. कर्मचाऱ्यांची नियुक्ती, बढती, बदली, निवृत्ती इ. संदर्भात व्यवस्थापनाने योग्य त्या धोरणांची निश्चिती करणे आवश्यक असते. उद्योगधंद्यानी कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता विविध प्रकारची सेवा देणे आवश्यक ठरते. उदा. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, इ.ची उपलब्धता कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देते. उद्योगव्यवसायात औद्योगिक शांतता राखणे हे व्यवस्थापनाचे कार्य असते. त्याकरिता बहुतांश कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कामगार संघटनेस मान्यता देणे ही व्यवसायाची सामाजिक जबाबदारी ठरते. कर्मचाऱ्यांच्या तक्रारी हाताळण्यासाठी योग्य अशी तक्रार निवारण पद्धती व्यवसायिकाने राबविली पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या विकासाकरिता व्यवसायिकाने त्यांना विविध बढतीच्या संधी उपलब्ध करुन द्याव्यात.

प्रत्येक राष्ट्रामध्ये व्यावसायिक उद्योग (कंपनी) व्यवसाय करीत असताना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे नैसर्गिक साधन संपत्तीवर त्याचा परिणाम होतो, पर्यायाने निसर्ग व समाज यामध्ये बाधित होतो. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करीत असताना उद्योगच्या माध्यमातून कमीत कमी निसर्ग हानी व संसाधनाची हानी टाळली पाहिजे असा प्रयत्न केला जावा की ज्यायोगे आज मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण, पाणीप्रदूषण, हवाप्रदूषण इ. कमीतकमी करण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. सार्वजनिक अवकाशात व्यावसायिक उद्योग हे आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून कर देवून सकल राष्ट्राच्या उत्पन्नास किंवा अर्थव्यवस्थेस हातभार लावते.

व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी चे खालीलप्रमाणे काही राबविण्यात आलेले उपक्रम व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी तत्व :

१. जबाबदारीच्या तत्वास प्रमाण मानून लोकांसाठी स्वस्त दरातील स्पेशालिटी रुग्णालयांची सोय उदा. टाटा कॅन्सर मेमोरिअल हॉस्पिटल.

२. एखादी महापालिकेची शाखा दत्तक घेणे उदा. 'एल अॅण्ड टी' कंपनीने घेतलेली पवई येथील पालिकेची शाळा.

३. निराधार मुलांना कपडेलत्ते पुरवणे उदा. रेमंडचे कोणतेही लोकरी कपडे ग्राहकांनी खरेदी केल्यानंतर त्यातून मिळणाऱ्या नफ्यातून निराधार मुलांना कपडे मोफत पुरविण्याचा उपक्रम.

४. आपल्या कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या घरी असलेल्या कपडे, स्टेशनरी यासारख्या अधिकच्या वस्तू दुर्बल, उपेक्षित सामाजिक घटकांसाठी अत्यावश्यक असतात. अशा वस्तू एकत्र करून गरजू व्यक्तींना पुरवणे. उदा. कॅपजेमिनी कंपनीतील 'वुई केअर' प्रोग्राम.

५. समाजाचे आरोग्य जपणारे उपक्रम. उदा. कोलगेट कंपनीचा फ्री डेंटल चेक अप प्लॅन किंवा 'एल. अॅण्ड टी.' व कॅपजेमिनीतील रक्तदानाचा उपक्रम.

६. एखादे खेडे दत्तक घेऊन तेथील पेयजलाचा प्रश्न सोडवणे, वृक्षारोपण करणे, सौर ऊर्जेच्या आधारे ते गाव स्वयंपूर्ण बनविण्यात हातभार लावणे. इ.

**आवश्यक तत्त्वे:**

१. 'व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी' धोरण बनविण्यापूर्वी समाजाचे त्यांचे प्रश्न, अपेक्षा अंतर्मन जाणून. त्यांना हव्या असलेल्या गोष्टींचा 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी' धोरणामध्ये समावेश करा.

२. 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी' फक्त कंपनीबाहेरच्या समाजासाठी नसावी तर कंपनीमधील कर्मचाऱ्यांसाठीही असावी. उदा. रासायनिक खतांऐवजी जैविक खतांचा वापर करून पिकविलेल्या भाज्या व फळे यांनाच कॅन्टीनच्या मेनूमध्ये फॅसिलिटी मॅनेजरने प्राधान्य द्यावे.

३. 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी' संदर्भात कर्मचाऱ्यांसाठी खास अॅवॉर्ड असावे. उदा. पॅकेजिंग मटेरिअलमध्ये रिसायकल मटेरियल वापरणाऱ्या व्यक्तीस, ५० वेळा रक्तदान करणाऱ्या व्यक्तीस,

कॅन्टीनमधील अन्नाची नासाडी वाचविणाऱ्या व्यक्तीस वगैरे. यामुळे समाजाप्रती वचनबद्धता दिवसागणिक वाढत जाते.

४. संवाद कंपनी 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी' अंतर्गत काय काय उपक्रम करत आहे, त्याचे फायदे कसे दिसत आहेत, त्यातील अडचणी काय आहेत, याबाबत कर्मचारी व समाजाशी वरचेवर संवाद साधावा. त्यासाठी कंपनीचा वार्षिक अहवाल, फेसबुक, कंपनी वेबसाइट यांचा वापर करावा.

५. 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी' मधील गुंतवणूक दीर्घकालीन असते व त्याचे दृश्य परिणाम/ फायदे दिसल्यास वेळ लागतो याची जाणीव असावी. 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी' अंतर्गत ठरविलेली उद्दिष्ट्ये सहजसाध्य असावीत व त्यांची प्रगती सहज मोजता यावी अशी असावी. उदा. पाच वर्षांत एक लाख झाडांचे वृक्षारोपण व संवर्धन, दोन वर्षांत गावातील चार पाझर तलावांची निर्मिती,

६. 'व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी' आपल्या प्रमुख व्यवसायाशी निगडित असावी. उदा. शीतपेये बनविणारी कंपनी जर वारेमाप भूजल वापरत असेल तर त्याची क्षती भरून काढण्यासाठी 'सीएसआर'अंतर्गत कंपनीने जलसंधारणाची कामे करावीत, सॅनिटरी पॅड बनविणाऱ्या कंपनीने पौगंडावस्थेतील मुलींसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करावीत. तात्पर्य काय, तर 'व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी' म्हणजे 'कंपनी सक्सेस रेट' वाढविण्याचे साधन म्हणूनही वापरावे.

थोडक्यात की भारतातील औद्योगिक घराण्यांची सामाजिक बांधिलकी हा विषय सगळ्यांनीच गांभीर्याने घेण्याचा आहे. मध्यंतरी सोशल नेटवर्कवर एक प्रश्न विचारण्यात आला होता की, रतन टाटांचे नाव जगातील श्रीमंतांच्या यादीत अंबानी, मल्ल्यांसारखे का झळकत नाही असा प्रश्न समाज मनातून येतो. 'सीएसआर'मध्येच आहे. 'टाटा सन्स' या मुख्य कंपनीची अधिकतर मालकी टाटांनी स्थापन केलेल्या सामाजिक ट्रस्टकडे असून रतन टाटांकडे म्हणजे कोणा एका व्यक्तीकडे नाही. व्यावसायिक सामाजिक जबाबदारी अर्थात 'सीएसआर' हे एखाद्या निसर्गचक्राप्रमाणे असते. जे काही समाज, पर्यावरणाकडून मिळाले तेच पुन्हा त्यांना अर्पण करणे हे त्याचे उदात्त तत्त्व असतं. व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी ह्या संकल्पनेला अधोरेखित करून भारतामध्ये कंपन्यांच्या नफ्यातून असा पैसा लोकोपयोगी कामांमध्ये सक्तीने आणण्याची सुरुवात अगदी अलीकडची असली तरी जगभरात ही पद्धत ५० ते ८० वर्षे जुनी आहे.

पर्यावरणविरोधी व्यवसाय सुरू असताना पर्यावरणाविषयी अगदी वरवरची काळजी व्यक्त करत त्यासाठी काही कामाना मदत करणे आणि त्यातून स्वतःची पर्यावरणस्नेही अशी प्रतिमा घडवणे या प्रक्रियेला ग्रीनवॉश असं संबोधलं जातं. कंपन्यांनी पैसा 'खर्च' करून जर त्यांची प्रतिमा घडवली तर बिघडलं कुठे, सामाजिक अथवा राजकीय दबावातून किंवा सक्तीतून का होईना, त्या समाजातल्या संसाधनविहीन वर्गाला मदतच करतायत की, असे मुद्दे उपस्थित केले जाऊ शकतात. मात्र, सीएसआर किंवा तत्सम सामाजिक सहवेदनेतून प्रतीमासंवर्धनापलीकडे अनेक गोष्टी घडतात, घडवल्या जातात. सत्तरनंतर जगभरातून कॉर्पोरेटजग पुरस्कृत समाजकार्यामुळे न्याय्य हक्काच्या चळवळी लयाला जायला लागून त्यांचं मोठ्ठ्या प्रमाणावर 'एनजीओकरण' झाले. लोकांचे लढे जेव्हा भांडवली जग पुरस्कृत पैशांवर चालू लागतात तेव्हा त्यांचा शेवट ठरलेला असतो.

उदाहरणार्थ, सीएसआरच्या अधिकृत धोरणाच्याही आधी म्हणजे २०००च्या दशकात भारतात अनेक राज्यांमध्ये 'मायक्रोसॉफ्ट' कंपनीने मोफत संगणक आणि संगणक प्रशिक्षण पुरवलं. त्यानंतर २०१०च्या आयटी विषयाच्या अधिकृत अभ्यासक्रमाचा भाग म्हणून 'मायक्रोसॉफ्ट विंडोज' महाराष्ट्रभर पोहोचलं. धोरणं आणि धोरणांचा आधार असणारी भाषा बदलून तिचं सार्वत्रिकीकरण घडवून आणणं सीएसआरसारख्या कार्यक्रमांमधून सहज शक्य होतं. बलाढ्य कंपन्या, अवाढव्य बँका आणि कमकुवत सरकारं अशा त्रिवेणी संगमातून 'एनजी'च्या 'सिव्हील सोसायटी' झाल्या. 'शिक्षण, आरोग्य, बालअधिकार, महिला सक्षमीकरण अशा कोणत्याही क्षेत्रांमध्ये वापरली जाणारी भाषा गेल्या दोन दशकात ज्या पद्धतीने बदललीय ती पाहता लोकनियुक्त सरकारांच्या धोरणांवर कॉर्पोरेट जगाचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

व्यावसायिकाची सामाजिक जबाबदारी वरील टीका भारतात सीएसआरसारख्या योजनांमुळे सरकारं कल्याणकारी कर्तव्यांपासून, घटनादत्त जबाबदारीपासून पळ काढताना दिसतात. १९९० नंतरच्या जागतिकीकरणजन्य संरचनात्मक समायोजन कार्यक्रमामुळे संसाधनविहीन वर्गाला मिळणाऱ्या अनेक सवलती बंद झाल्या किंवा त्यांचं स्वरूप पूर्णतः बदलत आहे. सरकारच्या निर्गमनाच्या या कार्यक्रमाला गती देण्यासाठी सीएसआरचा वापर केला जातोय अशी टीका केली जाते

**समाज सेवेच्या कार्याचा देखावा :** जगभरातल्या बलाढ्य कंपन्या आपापल्या गरजेचे, आवडीचे किंवा तज्ज्ञतेचे क्षेत्र निवडून समाजासेवेच्या कार्यात उतरलेल्या दिसतात. यामध्ये अनेकदा विरोधाभास असतात. उदाहरणार्थ, 'फोक्सवॅगन' कंपनीतला घोटाळा हा ऑटोमोबाईल क्षेत्राच्या आजवरच्या इतिहासातला सर्वात मोठा घोटाळा मानला जातो. या कंपनीच्या लाखो गाड्या पर्यावरणाला घातक असणाऱ्या वायूंचे उत्सर्जन प्रमाणित कमाल मर्यादेच्या जवळपास चाळीस पट करत असल्याचं आढळलं होतं. यामुळे कंपनीला अमेरिका आणि युरोपात अब्जावधी डॉलर्सचा जबरदस्त दंड भरण्याची पाळी आली आहे. हे सगळं घडत असताना ही कंपनी मात्र सीएसआरच्या माध्यमातून जगभरात पर्यावरण रक्षण, जैवविविधता संवर्धन अशा पर्यावरणस्नेही कार्यक्रमानादेखील निधी पुरवत होती. म्हणजे आपण ज्या समस्येविरुद्ध लढायला निधी पुरवतो ती समस्या निर्माण करायला आपणच हातभार लावायचा जगभरात अशी हजारो उदाहरणं आहेत.

**नैसर्गिक संसाधनाची लुट व पर्यावरणस्नेही उपक्रम:** खनिज उत्पादक किंवा खाणकाम उद्योजक लाखो लोकांना स्थलांतरित करतात आणि मग सीएसआरच्या माध्यमातून स्थलांतराच्या समस्या आणि त्यावरचे उपाय अशा संशोधनासाठी पैसा पुरवतात. तंबाखू उत्पादक सीएसआरमार्फत कर्करोगाच्या संशोधनासाठी किंवा उपचारासाठी पैसा पुरवतात. 'जागतिक आरोग्य संघटने'च्या २००३ सालच्या एका अहवालात तर तंबाखू उत्पादकांद्वारे होणाऱ्या सीएसआरला 'मूलभूत विरोधाभास' असं म्हटलंय. थोडक्यात सांगायचं तर सीएसआरमधून अनेक कंपन्या एका बाजूला करबचत करतात, तर दुसऱ्या बाजूला स्वतःची प्रतिमानिर्मिती किंवा प्रतिमासंवर्धन करत राहतात.


**विषमतानिर्मितीची योजना :** लोकसहभाग किंवा सीएसआरचा पैसा राज्याच्या मुलभूत कर्तव्याला पर्याय ठरणं ही केवळ चिंताजनकच नाही तर विषमता निर्मितीची योजना ठरू शकते. ज्या भागांची सांपत्तिक स्थिती

अधिक चांगली आहे, ज्या भागांमध्ये सीएसआरला बाध्य असणारे उद्योगधंदे उभे आहेत त्या भागात असा निधी अधिक प्रमाणात उपलब्ध होणं स्वाभाविक आहे. महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाला तर विदर्भ, कोकण किंवा मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्र या बाबतीत वरचढ ठरणार हे उघड आहे.

**गुणवत्ता कर्तव्य:** सध्या महाराष्ट्रात डिजिटल शाळा, आयएसओ प्रमाणित शाळा याचं पेव फुटलंय. सरकारकडे कसलाही निधी न मागता काहीही करायला मुभा, नव्हे प्रोत्साहन देण्यात येते. पुण्यात झालेल्या 'शिक्षणाची वारी' या नवोपक्रमशील शिक्षकांनी चालवलेल्या अभिनव उपक्रमांच्या प्रदर्शनात 'लोकसहभाग, सीएसआर. आयएसओ' इत्यादींचे स्वतंत्र स्टॉल होते. अशा शाळा आयएसओ किंवा डिजिटल झाली म्हणून मुलांच्या ज्ञानात फरक पडतो. असे प्रश्न पुढे निर्माण होतात. यासाठी योजनाचा अभ्यास न करताच 'प्रोत्साहन योजना' सुरू आहेत

**धोरण निर्मीत्याचे कंपनीकरण:** लोकप्रशासनातील महत्वाचा भाग म्हणजे निर्णय निर्धारण प्रकियेवर खाजगी व्यावसायिकांचा वाढता हस्तक्षेप उदा. गेल्या वर्षी केरळमध्ये कलाकाम्ब्लम गावाच्या ग्रामपंचायत निवडणुकीत 'किटेक्स' या कापड उत्पादक कंपनीने आपले उमेदवार उभे करून निवडून आणले. आपल्या समाजकार्याचा भाग म्हणून असे उमेदवार उभे केल्याचा दावा कंपनीने केलाय. कॉर्पोरेट आणि लोकनियुक्त सरकार यातली राजकीय सीमारेषा पुसट होण्याची ही सुरुवात ठरू शकेल. अशा भविष्याचा विचार करता समकालीन लोकनियुक्त सरकारांना त्यांच्या 'कल्याणकारी' भूमिकेपासून सहज दूर जाऊ देण्याची मुभा द्यावी का, असा प्रश्न निर्माण होतो.

व्यावसायिक जगतामध्ये अनुशासन ठेवणे हा व्यावसायिक क्षेत्राचा गाभा आहे. व्यावसायिक उद्योग क्षेत्रामध्ये प्रक्रिया व रचना ह्यांचे एकत्रीकरण अशी व्यावसायिक उद्योग क्षेत्राची व्याख्या करता येईल. पारदर्शकता, उत्तरदायित्व, नावीन्यपूर्णता, सामाजिक जबाबदारी या बाबी साध्य करणे ही यातील अधोरेखित उद्दिष्टे होत. व्यावसायिक उद्योग क्षेत्र काही नवीन नसून, व्यापार व्यवस्थापनाची महत्त्वाची यंत्रणा म्हणून ते कायमच चर्चेत राहिले आहे. जागतिकीकरणाची सुरुवात आणि अर्थव्यवस्था खुल्या केल्या गेल्याने केवळ व्यावसायिक क्षेत्रामध्ये CSRची गरज अधोरेखित केली गेली.




लोकप्रशासनातील नवे विचारप्रवाह स्वयंप्रेरित शिस्त असण्याची गरज मानवजातीच्या स्वरूपामध्येच अंतर्निहित आहे. त्यामुळे भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर, स्व फायद्यासाठी सत्ता वापरणे, वशिलेबाजी इत्यादी बाबी पुढे येतात आणि म्हणूनच, अशाच माणसांपासून बनलेले व्यावसायिक क्षेत्र किवां कंपनी या समस्यांना बळी पडणे सहजशक्य आहे. एकीकडे मुक्त अर्थव्यवस्था उदयाला आली असली तरी नियंत्रण व्यवस्था मात्र

अनुपस्थित होती आणि म्हणूनच बाजारपेठेचे कार्य सुसूत्र असावे यासाठी कंपन्यांची स्वयंप्रेरित वैधानिक नियमावली असणे गरजेचे ठरले. निगमांची विश्वासपात्रता कमी होण्याची जगभरातील समस्या हे व्यावसायिक क्षेत्रामध्ये व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारीची संकल्पनेची इतक्या तातडीने गरज भासण्याचे महत्त्वाचे कारण आहे.

## १.३.४ मानव विकास निर्देशांक व सामाजिक लेखापरीक्षण :

- **मानवी विकास निर्देशांक**

नव लोकप्रशासनाच्या सद्यकालीन प्रवाहामध्ये या संकल्पनेला महत्व आहे. मानव विकास निर्दशांक हे सांख्यिकीय साधन आहे. ज्यामध्ये देशातील सामाजिक आणि आर्थिक मापनाच्या माध्यामातून एकूण उपलब्धी मोजण्यासाठी वापरले जाते. नव लोकप्रशासनाच्या माध्यमातून देशाचे सामाजिक आणि आर्थिक परिमाण हे तेथील लोकांच्या आरोग्य आणि शिक्षणाची पातळी आणि त्यांचे जीवनमान यावर आधारित असतात. मानवी हक्क आंतरराष्ट्रीय पातळीवर विचाराविनिमयासाठी आले. जगात ठिकठिकाणी झालेल्या क्रांतीमुळे हे हक्क पवित्र आहेत हे स्पष्ट झाले. या मानवी हक्काच्या आधारे मानवी विकास झाला पाहिजे यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना, जागतिक बँक व इतर जागतिक पातळीवरील संघटना प्रयत्नशील आहेत. जगात आणखी मध्यपूर्व व आफ्रिकेतील राष्ट्रात मानवी हक्क पाळले जात नाहीत याची दखल घेण्यासाठी मानवी हक्क स्थापन करण्यात आले आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध करून प्रत्येक देशाने मानवी हक्कांचे संरक्षण केले पाहिजे असे बंधन घातले आहे. या मानवी हक्काच्या आधारावर मानवी विकास अहवाल प्रकाशित करण्यात येतो.

**मानव विकास निर्देशांकाचा अर्थ:**

मानव विकास म्हणजे ''अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य शिक्षण, मनोरंजन या सहा मूलभूत मानवी गरजा आहेत. या गरजांची समाधानकारक पूर्तता होणे मानवी विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे, मानव विकास निर्देशांक हे दीर्घ व निरोगी जीवन, ज्ञानी असणे आणि चांगले राहणीमान या मानव विकासाच्या महत्त्वाच्या परिमाणातील सरासरी कामगिरीचे संक्षिप्त माप आहे.''

''जनसामान्यांच्या जीवनातील शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन जीवनातील हक्कांची व प्रत्यक्ष प्राप्तीचा एकत्रिकरण म्हणजे मानवी विकास होय. मानवी विकास म्हणजे जनसामान्यांच्या निवडीच्या कक्षा वाढविण्यांची प्रक्रिया असे म्हटले जाते.''

सुखी समाधानी व दीर्घआयुष्य जीवन जगण्याची क्षमता निर्माण होणे व त्या प्रक्रियेत शिक्षण घेऊन चांगले जीवनमान जगणे महत्त्वाचे आहे. मानव विकास म्हणजे लोकांच्या निवडींच्या विस्ताराची प्रक्रिया होय. मानव विकास हा चांगले आरोग्य व ज्ञान यांसारख्या मानव क्षमतांच्या निर्मितीबरोबरच त्या क्षमतांचा काम, आराम किंवा राजकीय व सांस्कृतिक उपक्रमांसाठी वापर करण्याशीही संबंधित आहे. आरोग्याच्या परिमाणाचे मूल्यनिर्धारण आयुर्मर्यादेच्या साह्याने केले जाते. शिक्षण परिमाणाचे मूल्यनिर्धारण हे २५ व

त्यापेक्षा जास्त वयाच्या प्रौढाच्या शालेय शिक्षणाच्या वर्षांची सरासरी आणि शाळेत प्रवेश घ्यायच्या वयातील मुलांच्या अपेक्षित शालेय शिक्षणाची वर्षे यांनी केले जाते. राहणीमानाच्या परिमाणाचे मूल्यनिर्धारण हे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे केले जाते. प्रत्येक विकासाच्या केंद्रस्थानी लोक पाहिजेत आणि विकासाचा हेतू लोकांना अधिक पर्याय देऊ करणे हा असल्याचे या अहवालात स्पष्ट केले आहे. निर्देशांकाच्या आधारे मानव विकासाचे यात मोजमाप केलेले आहे.

**मानव विकास निर्देशांक :**

मानवी विकास निर्देशांक हा देश विकासाच्या कोणत्या पातळीवर आहे हे दाखवतो. मानवी विकास निर्देशांकाचे गुणांक हे ० ते १ मध्ये घेतले जातात. ज्या देशांचा निर्देशांकाचा गुणांक हा ०.७०० पेक्षा जास्त असतो त्या देशाचा समावेश अति उच्च व उच्च मानवी विकास गटात करण्यात येतो. ह्या गटात १०२ देश आहेत. ज्या देशांचा निर्देशांकाचा गुणांक हा ०.५०० ते ०.७०० मध्ये आहे त्यांचा समावेश मध्यम मानवी विकास गटात करण्यात येतो. ह्या गटात ४१ देश आहेत. ज्या देशांचा निर्देशांकाचा गुणांक हा ०.५०० पेक्षा कमी आहे त्यांचा समावेश न्यून मानवी विकास गटात करण्यात आलेला आहे.

नव लोकप्रशासनामध्ये मानवी विकास निर्देशांकाचा मुख्य उद्देश हा विकासात्मक अर्थशास्त्राचे केवळ राष्ट्रीय उत्पन्नावरील लक्ष हटवून मानवी विकास योजनांकडे वळविणे हा होता.

**मानवी विकास निर्देशांकाची उद्दिष्टे :**

१. मानव विकास हा राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील विकासाचा हा एक उत्तम दर्शक आहे.

२. मानव विकास निर्देशांकद्वारे राष्ट्रांना एका साच्यात मापणे सोपे होते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव विकासमधील समस्या कोणत्या आहेत याविषयी संशोधन सुरु झाले. त्यांनी मानव विकासाच्या बाबतीतील राष्ट्राराष्ट्रातील आणि स्त्री व पुरुषांतील प्रचंड प्रमाणावरील विषमता, तसेच विकासापासून वंचित असणाऱ्याचे मोठे प्रमाण प्रकाशात आणले. मानव विकासाच्या बाबतीतील समस्यांची ओळख तर त्यांनी जगाला करून दिली. मानव विकास निर्देशांक हा संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम (युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम यूएनडीपी) अंतर्गत प्रसिद्ध केला जातो. १९९० मध्ये प्रसिद्ध झालेला जागतिक पातळीवरील पहिला मानव विकास अहवाल या संस्थेचे कर्मचारी व संस्थेबाहेरचे तज्ज्ञ यांनी पाकिस्तानचे अर्थशास्त्रज्ञ महबूब उल हक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केला. या मानव विकास अहवालाने वार्षिक अहवालाच्या मालिकेस सुरुवात झाली. २०१६ मध्ये प्रसिद्ध झालेला मानव विकास अहवाल हा पंचविसावा जागतिक मानव विकास अहवाल आहे. १९९० ते २०१६ या काळात २०१२ वर्ष वगळता आणि २००७ व २००८ या वर्षांसाठीचा एकत्रित अहवाल सोडून प्रत्येक वर्षी नव्याने मानव विकास अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. राष्ट्राची आर्थिक वृद्धी घडून आली की, आपोआप त्या राष्ट्रातील सर्व लोकांचा विकास होईल या समजुतीला या अहवालाने छेद दिला. मानव विकासासाठी उत्पन्नातील वृद्धी

आवश्यकच आहे; मात्र ती पुरेशी नाही. उत्पन्नात वाढ करण्याबरोबरच आर्थिक विषमता, दारिद्र्य, लिंगभाव असमानता इत्यादी गोष्टी दूर करण्याची गरज या विविध अहवालातून स्पष्ट झाली.

**मानव विकास निर्देशांकाचे महत्वाचे विषय :**

मानव विकास निर्देशांकने मानव विकासासंबंधीच्या प्रश्नांकडे जगाचे लक्ष वेधले आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मानव विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. २०२२ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या ३१ मानव विकास अहवालांत मानव विकासासंबंधी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केलेली आहे. या वैविध्यपूर्ण विषयांवरून मानव विकासाची व्याप्ती फार मोठी असल्याची कल्पना येते.

| अ. क्र. | वर्ष | मानव विकास अहवालातील विषय |
|---|---|---|
| १ | १९९० | मानव विकासाची संकल्पना आणि माप. |
| २ | १९९१ | मानव विकासासाठी वित्तव्यवस्था करणे. |
| ३ | १९९२ | मानव विकासाची जगतिक परिमाणे. |
| ४ | १९९३ | लोकांचा सहभाग. |
| ५ | १९९४ | मानव सुरक्षेची नवीन परिमाणे. |
| ६ | १९९५ | लिंगभाव आणि मानव विकास. |
| ७ | १९९६ | आर्थिक वृद्धी आणि मानव विकास. |
| ८ | १९९७ | दारिद्र्य निर्मुलनासाठी मानव विकास. |
| ९ | १९९८ | मानव विकासासाठी उपभोग. |
| १० | १९९९ | मानव चेहऱ्यासह जागतिकीकरण. |
| ११ | २००० | मानव हक्क आणि मानव विकास. |
| १२ | २००१ | मानव विकासासाठी नवीन तंत्रज्ञान कार्याची घडण. |
| १३ | २००२ | विघटित जगातील लोकशाहीचे घनीकरण. |
| १४ | २००३ | मिलेनियन विकास ध्येये : मानवी दारिद्र्य संपविण्यासाठी राष्ट्रांची एकत्र बांधणी. |
| १५ | २००४ | आजच्या भिन्न जगातील सांस्कृतिक स्वातंत्र्य. |
| १६ | २००५ | आंतरराष्ट्रीय सहकार्य : असमान जगातील साहाय्य, व्यापार व सुरक्षा. |
| १७ | २००६ | दुर्मिळतेपलीकडे : वीज, दारिद्र्य आणि जागतिक पाणी संकट. |
| १८ | २००७-०८ | हवामान बदलाविरुद्ध लढाई : विभाजित जगातील मानव दृढ ऐक्य. |

| | | |
|---|---|---|
| १९ | २००९ | अडथळ्यावर मात करणे : मानव विकास. |
| २० | २०१० | राष्ट्रांची वास्तव संपत्ती : मानव विकासाची पाऊलवाट. |
| २१ | २०११ | शाश्वतता आणि समन्याय : सर्वांसाठी उज्ज्वल भविष्य. |
| २२ | २०१३ | दक्षिणेचा उदय : वैविध्यपूर्ण जगातील मानव प्रगती. |
| २३ | २०१४ | मानव प्रगती कायम राखणे : असुरक्षा कमी करणे व लवचिकपणा निर्माण करणे. |
| २४ | २०१५ | मानव विकासासाठी कार्य. |
| २५ | २०१६ | प्रत्येकासाठी मानव विकास. |
| २६ | २०१८ | तरुण लोकसंख्येसाठी संधींचे नियोजन. |
| २७ | २०२२ | देशादेशांमधील असुरक्षिततेची भावना आणि एकमेकांवरील अविश्वास. |

जागतिक पातळीवर ऑगस्ट २०१७ पर्यंत १४५ देशांचे ६४५ मानव विकास अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. त्यात भारतातील एकूण १८ मानव विकास अहवालांचा समावेश आहे. भारतातील या १८ अहवालांत एक राष्ट्रीय पातळीवरील (२००१) आणि उर्वरित राज्य पातळींवरील अहवाल होते. त्यांत उत्तर प्रदेश (२००७); केरळ (२००५), अरुणाचल प्रदेश (२००५), ओडिशा (२००४), पंजाब (२००४), नागालँड राज्य (२००४), गुजरात (२००४), तमिळनाडू (२००३), आसाम (२००३), हिमाचल प्रदेश (२००२), मध्य प्रदेश (२००२, १९९८, १९९५), महाराष्ट्र (२००२), राजस्थान (२००२), सिक्कीम (२००१), कर्नाटक (१९९९) या राज्यांचा समावेश होता. राष्ट्रीय पातळीवरील अहवालाबरोबरच प्रादेशिक पातळीवर ३६ अहवाल प्रसिद्ध झालेले असून यांत आफ्रिका (४), अशिया आणि इतर (४) यांचा समावेश आहे. मानव उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वृद्धी अतिशय महत्त्वाची आहे; परंतु ही वृद्धी कशाप्रकारे विविध समाजातील मानव विकासांमध्ये रूपांतरित होते किंवा रूपांतरित होण्यात अपयशी ठरते, हा अभ्यास महत्त्वाचा आहे. काही समाजाने मध्यम पातळीचे दरडोई उत्पन्न असताना उच्च पातळीचा मानव विकास साध्य केला. इतर काही समाज तुलनात्मक दृष्ट्या असलेली उच्च उत्पन्न पातळी आणि जलद आर्थिक वृद्धी त्याला अनुसरून असलेल्या मानव विकासाच्या पातळीत रूपांतरित करण्यात अपयशी ठरले.

**मानव विकास निर्देशांकाचा प्रभाव :** अमर्त्य सेन यांच्या मते दारिद्र्य व दुष्काळ, सामाजिक निर्देशांक, सामाजिक निवड सिद्धांत, क्षमता दृष्टीकोन इत्यादी विचारांचा मानव विकास अहवाल व मानव विकास निर्देशांक यांवर प्रभाव आहे. जागतिक, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा अशा विविध पातळींवरील मानव विकास निर्देशांकामुळे मानव विकासविषयक अभ्यासाला गती मिळाली. या निर्देशांकाने जगातील विविध देशांतील आणि वेगवेगळ्या देशांच्या विविध राज्यांतील शासकीय व बिगर शासकीय संस्थांच्या धोरणांवर प्रभाव टाकलेला आहे. देशादेशांतील मानव विकासाच्या बाबीतील असमानता व तिची कारणमीमांसा यात स्पष्ट केली. त्यामुळे ही असमानता दूर करण्याच्या प्रयत्नाला गती मिळाली. लिंगभाव असमानता मोठ्या प्रमाणात

असल्याचे स्पष्ट झाल्याने ती दूर करण्यासाठी महिला आरक्षण, महिला सबलीकरण, महिलांना सत्तेत सहभाग, लिंगभाव अर्थसंकल्प इत्यादी मार्गांनी भारतात प्रयत्न सुरू झाले. आर्थिक वृद्धीची फळे सर्वच लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज लक्षात घेऊन सर्वसमावेशक वृद्धी प्रयत्नाला गती मिळाली. गरीबांच्या गरजा प्रतिबिंबित होतील अशाप्रकारे राष्ट्रीय धोरणात सुधारणा करण्यात आली. अर्थसंकल्पातील प्राथमिकता बदलण्यात आल्या. आर्थिक पाहणीत मानव विकासासंबंधीची आकडेवारीचा समावेश करण्यात आला. बाराव्या पंचवार्षिक योजनेची सर्वसमावेशक वृद्धीची विचारधारा पुढे ठेवून महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालामध्ये सर्वसमावेशक मानव विकास या कल्पनेवर भर दिला आहे. महाराष्ट्र राज्याच्या योजना, कार्यक्रम व धोरणे यांवर या अहवालाचा प्रभाव पडलेला आहे. महाराष्ट्र राज्याने पहिला मानव विकास अहवाल २००२ मध्ये आणि दुसरा २०१२ मध्ये प्रसिद्ध केला. दुसऱ्या अहवालाने मानव विकासाच्या बाबीतील एका दशकातील राज्याची मानव विकासविषयक प्रगती स्पष्ट केली आहे. साक्षरतेच्या बाबतीत सुधारणा होण्याबरोबरच साक्षरता लिंगभाव अंतर कमी झाले आहे. महाराष्ट्र राज्यात जिल्हा पातळीवर मानव विकास अहवाल प्रसिद्ध केले जात आहेत. मानव विकासासंबंधीच्या समस्यांवर प्रमुख माध्यमात चर्चा होत आहेत. त्यामुळे समाजात लिंगभाव असमानता, दारिद्र्य, कुपोषण, महिलांचे शोषण यांसंबंधी जाणीव जागृती होत आहे.

मानव विकास अहवाल २०२१ मध्ये दिल्याप्रमाणे मानव विकास निर्देशांकानुसार १८७ देशांमध्ये भारताचा ०.५७० मानव विकास निर्देशांकासह १३४ वा क्रमांक होता. नॉर्वे ०.९४३ निर्देशांकासह पहिल्या क्रमांकावर, तर काँगो ०.२८६ निर्देशांकासह शेवटच्या क्रमांकावर होता. १९९० मध्ये भारताचा मानव विकास निर्देशांक ०.४२८ होता. तो सातत्याने वाढत जाऊन २०२१ मध्ये ०.५७० एवढा झाला. भारताच्या मानव विकास निर्देशांकातील वाढीत सातत्य असले, तरी वाढीच्या दरात मात्र सातत्य दिसून येत नाही. भारताच्या मानव विकास निर्देशांकात १९९० ते २००० या काळात वार्षिक सरासरी १.४५ टक्क्यांनी आणि २००० ते २०१० या काळात वार्षिक सरासरी १.६२ टक्क्यांनी वृद्धी झाली. त्यापुढील काळात काही प्रमाणात घटीची प्रवृत्ती दिसून येते. मानव विकास निर्देशांकात २०१० ते २०१५ या काळात वार्षिक सरासरी १.४६ टक्क्यांनी वृद्धी झाली. १९९० ते २०१५ या काळात वार्षिक सरासरी १.५२ टक्क्यांनी मानव विकास निर्देशांकात वृद्धी घडून आली.

**मानव विकास निर्देशांकाचे मोजमाप:**

**जुनी पद्धत**

मानवी विकास निर्देशांकाचे मोजमाप करण्यासाठी ही पद्धत २००९ पर्यंत वापरली गेली. मानवी विकास निर्देशांकामधील घटक मोजण्यासाठी खालील सूत्र वापरले गेले. X-index = x-min(x)/max(x)-min(x)

मानवी विकास निर्देशांकामधील घटकांकडून घेतले गेलेले कमीत कमी व जास्तीत जास्त गुणांक हे अनुक्रमे min(x) d max(x) यावरून दिसतात. मानवी विकास निर्देशांकामधील प्रत्येक घटकाला १/३ एवढे महत्व दिलेले आहे.

१. आयुर्मान = LE-२५/८५-२५

२. शैक्षणिक निर्देशांक = २/३L१+१/३GEI

शैक्षणिक निर्देशांक हा प्रौढ साक्षरता दर आणि प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण यांच्या एकत्रित पटसंख्येद्वारे मोजला जातो. त्यात शैक्षणिक निर्देशांकाच्या एकत्रित गुणांकांपैकी २/३ महत्त्व हे प्रौढ साक्षरता दराला तर १/३ महत्व हे GER (Gross Enrollment Ratio) ला देण्यात आलेले आहे. प्रौढ साक्षरता दर हा लिहिणे आणि वाचणे यांची क्षमता दर्शवतो तर GER हा बालवाडी ते पदव्युत्तर पदवी शिक्षणाची पातळी दर्शवतो.

प्रौढ साक्षरता निर्देशांक = LR-०/१००-०

प्रौढ साक्षरता निर्देशांक हा एखाद्या क्षेत्रातील किंवा देशातील किती प्रौढ लिहू आणि वाचू शकतात हे ठरविणारा निर्देशांक आहे. १५ वर्षांवरील जे लोक लिहू आणि वाचू शकतात त्यांची टक्केवारी म्हणजे प्रौढ साक्षरता दर. एखादा माणूस शिक्षणाशिवाय जगू शकतो त्यामुळे येथे कमीतकमी पातळी शून्य घेतलेली आहे.

एकूण पटसंख्या निर्देशांक = CEGR-०/१००-०

वयाचा विचार न करता एखाद्या देशातील शिक्षणाच्या ठरावीक पातळीपर्यंतची एकूण पटसंख्या म्हणजे एकूण पटसंख्या निर्देशांक आहे.

३. GDP=log(GDPpc) - log (१००)/ log(४००००)- log(१००) मानवी विकास निर्देशांकाचे मोजमाप करण्यासाठीचे सूत्र २०१० मध्ये सुधारित करण्यात आले. मानवी विकास निर्देशांक हा आयुर्मान निर्देशांक, शैक्षणिक निर्देशांक आणि उत्पन्न निर्देशांक यांचा भूमिती मध्य (GEOMETRIC MEN) आहे.

HDI = ३/IEI. ELII मानवी विकासाचे मोजमाप करण्यासाठी सरासरीच्या ऐवजी भूमिती मध्याचाच वापर का केला जातो? घटकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असमान विकास होत असताना भूमिती मध्य वापरल्याने निर्देशांकाचे गुणांक कमी येतात. मानवी विकास निर्देशांकाच्या क्रमांकावर भूमिती मध्याचा फार कमी प्रमाणात परिणाम होतो. मानवी विकास निर्देशांकाच्या विविध घटकांतील फरक हा नवीन मानवी विकास निर्देशांकाच्या सूत्रात वापरल्या गेलेल्या भूमिती मध्याने मोजला जातो. एखाद्या घटकाची प्रगती कशी होत आहे, हे नवीन मानवी विकास निर्देशांकाच्या सूत्रात लगेच दिसून येते. तसेच नवीन मानवी विकासाचे सूत्र या तीन घटकांमध्ये देशाची प्रगती कशी होत आहे हे ही दाखवते. म्हणजेच एखाद्या घटकात कमी झालेली प्रगती ही दुसऱ्या घटकात झालेल्या मोठ्या प्रगतीने भरून निघत नाही. भूमिती मध्य हा दोन घटकांमधील substitutability कमी करतो. त्याचबरोबर आयुर्मान निर्देशांकात १ टक्का झालेली घसरण ही शिक्षण किंवा उत्पन्न निर्देशांकात झालेल्या १ टक्का घसरणी एवढाच परिणाम, मानवी विकास निर्देशांकावर करेल असे बघते. वेगवेगळ्या घटकांची प्रगतीची तुलना करतांना साधारण सरासरी पेक्षा भूमिती मध्यच जास्त उपयोगी ठरतो.

१. **आयुर्मान निर्देशांक**

आयुर्मान निर्देशांक LEI=(LE-२०)/(८२.३-२०)

जपान मध्ये ८२.३ हा सगळ्यात जास्त आयुर्मान निर्देशांक आहे. हा पुराव्यांवर आधारित आहे. कमीत कमी आयुर्मान मर्यादा २० वर्षे आहे. जर समाज किंवा समाजातील एखाद्या घटकाचा आयुर्मान निर्देशांक हा पुनरुत्पादनाच्या ठराविक वयापेक्षा कमी असेल तर तो समाज नामशेष होऊ शकतो. आपत्तीमुळे गुणांक कमी आलेले आहेत. एका ठराविक वयानंतर जीवनाची उरलेली वर्षे म्हणजे आयुर्मान. आयुर्मान ही सरासरी आहे. एखादा माणूस त्याच्या अपेक्षित जीवनापेक्षा पुष्कळ वर्षे आधी किंवा नंतर मृत्युमुखी पडू शकतो.

२. **शैक्षणिक प्रमाण निर्देशांक**

**शैक्षणिक निर्देशांक** = "(MYSLEYSI) /०.९५१

२.१ शैक्षणिक निर्देशांकाची सरासरी वर्षे = MYS/१३.२

अमेरिकेत २००० मध्ये शैक्षणिक निर्देशांकाची सरासरी १३.२ ही जास्तीत जास्त वर्षे आहे. शैक्षणिक निर्देशांकाची सरासरी वर्षे म्हणजे २५ व अधिक वर्षे वय असलेल्या माणसांना मिळालेली शिक्षणाची सरासरी वर्षे, प्रत्येक शैक्षणिक पातळीतील अंतर लक्षात घेऊन संपादित शैक्षणिक पातळीतून रूपांतरित केले जाते.

२.२ शैक्षणिक निर्देशांकाची अपेक्षित वर्षे (EYSI)=EYS/२०.६ ऑस्ट्रेलिया मध्ये २०.६ ही सगळ्यात जास्त शैक्षणिक निर्देशांकाची अपेक्षित वर्षे आहेत. शैक्षणिक निर्देशांकाची अपेक्षित

वर्षे म्हणजे शालेय प्रवेशाच्या वयापासून पुढे किती वर्षे शालेय शिक्षण मिळते हे होय. मानवी विकास निर्देशांकाच्या जुन्या सूत्रात प्रौढ साक्षरता निर्देशांक व एकूण पटसंख्या निर्देशांक यांचा समावेश होतो. पण नवीन सूत्रांमध्ये शैक्षणिक निर्देशांकाची सरासरी वर्षे व शैक्षणिक निर्देशांकाची अपेक्षित वर्षे समाविष्ट आहेत.

**३. उत्पन्न निर्देशांक** = ln (GNIpe)- ln (100)/ ln(10%,%21)- ln (100) जुन्या सूत्राप्रमाणे, उत्पन्न निर्देशांकात स्थूल राष्ट्रीय उत्पन्न वापरले होते. पण एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे देशाच्या नागरिकांचे निव्वळ उत्पन्न दाखवते. यात आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या उलाढाली आणि देशात निर्माण होणारे पण परदेशात पाठविले गेलेले उत्पन्न सुद्धा ग्राह्य धरले जाते. त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हा देशाच्या आर्थिक सुबत्तेबद्दलचा एक बिनचूक घटक आहे. येथे जास्ती जास्त व कमीत कमी पातळी ही १०७७२१ व १०० अशी आहे.

२०११ मध्ये कतार चे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे सर्वात जास्ती होते ते म्हणजे १०७७२१ होय. आणि २००८ मध्ये झिम्बाब्वे या देशाचे सर्वात कमी म्हणजे १६३ इतके दरडोई उत्पन्न होते. जागतिक दारिद्र्यरेषाही १.२५ प्रत्येक दिवशी अशी असली तरी झिम्बाब्वेतील माणसे दिवसाला ४५ सेंट्स बर जगू शकतात. त्यामुळे उत्पन निर्देशांकाची कमीत कमी पातळी ही १०० ठरवली आहे. मोजली न जाणारी उपजीविकेची साधने आणि बाजार पेठेत न पाठविले जाणारे उत्पन्न यावरून उत्पन्नाची ही निम्न संख्या ठरविली जाते. जर

एखाद्या राष्ट्राचे दरडोई उत्पन्न १६३ पेक्षा कमी झाल्यास उत्पन्न निर्देशांकाची किमान पातळीत बदल करण्यात येतील.

**देशाचे मानवी विकास निर्देशांकाचे क्रमांक व मानवी विकास निर्देशांकाचे गुणांक**

मानवी विकास निर्देशांकाचे क्रमांक हे अति उच्च मानवी विकास, उच्च मानवी विकास, मध्यम मानवी विकास व न्यून मानवी विकास यावर ठरविले जातात.

| मा.वि. निर्देशांक | विकास पातळी | राष्ट्र | मा.वि.निर्देशांक चा गुणांक | आयुर्मान | शैक्षणिक सरासरी वर्ष | शैक्षणिक अपेक्षित वर्ष | दरडोई उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अतिउच्च | नॉर्वे | ०.९४४ | ८१.५ | १२.६ | १.०६ | ६३,९०९ |
| २ | | ऑस्ट्रेलिया | ०.९३३ | ८२.५ | १२.८ | १९.९ | ४१,५२४ |
| ५ | | अमेरिका | ०.९१४ | ०.८.९ | १२.९ | १६.५ | ५२,३०८ |
| ६ | | जर्मनी | ०.९११ | ८०.% | १२.९ | १६.३ | ४३,०४९ |
| १७ | | जपान | ०.८९० | ८३.६ | ११.५ | १५.३ | ३६.०४.० |
| ४६ | | कुवेत | ०.८१४ | ०.४.३ | ०.२० | १४.६ | ८५,८२० |
| ५७ | उच्च | रशिया | ०.८०० | ६८.० | ११.० | १४.० | २२.६१.० |
| ७९ | | ब्राझील | ०. ४४० | ०.३.९ | ०.२० | १४.६ | १४,२.०५ |
| ९१ | | चीन | ०.१९० | ०.५.३ | ०.५० | १२.९ | ११,४.०० |
| ११८ | मध्यम | द.आफ्रिका | ०.६५८ | ०.४.६ | ६.६ | १२.० | ५.०.०१ |
| १३५ | | भारत | ०.५८६ | ६६.४ | ४.४ | ११.०० | ५१५० |

(माहिती स्रोत- निती आयोग)

स्थूल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा मानवी विकास निर्देशांक हा विकासाचा चांगला निर्देशांक असला तरी त्याच्यावर टीका झालेली आहेच. मानवी विकास निर्देशांक पर्यावरणाचा विचार करत नाही. मानवी विकास निर्देशांकाचे अधिक लक्ष देशाची प्रगती आणि क्रमांक यावर आहे. जागतिक पातळीवर विकासावर मानवी विकास निर्देशांक लक्ष देत नाही. आणि आता सूत्र बदलल्यामुळे मोजमापात चूक होऊ शकते. उच्च, मध्य आणि निम्न विभागात होणारी देशांची वर्गवारी चुकू शकते. विकासाचा एवढा अभ्यास होत असतांना मानवी विकास निर्देशांकाला अनावश्यकही म्हटले गेलेले आहे.

**मानवी विकास आणि स्त्रिया :**

सुरुवातीच्या कालखंड पासून भारतात स्त्री हक्काचे विषय जाणीव जागृती केली जात होती मात्र पुढे स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष दिले गेले. मानवी विकासात स्त्री हा महत्त्वाचा घटक आहे. १९७६ मध्ये स्त्रियांसाठी राष्ट्रीय ॲक्शन प्लॅन स्वीकारला. १९८८ मध्ये नॅशनल परस्पेक्टिव्ह प्लॅन

तयार झाला. राष्ट्रीय पोषण धोरणे, राष्ट्रीय शिक्षण धोरण, राष्ट्रीय लोकसंख्या धोरणे या सर्व धोरणात स्त्रियांच्या विकासाचे घटक होते.१९९८ च्या स्पेशल ॲक्शन प्लॅनप्रमाणे स्त्रिया व मुलीना शिक्षण मिळणे शक्य व्हावे म्हणून योजना आखल्या गेल्या, 'डेव्हलपमेंट बँक ऑफ वुमेन इंटरप्रिनर्स' ही बँक सुरू करून महिलांना कर्जपुरवठा सुरू करण्यात आला. स्त्रियांवरील सर्व प्रकारच्या भेदभावाचे निर्मूलन या संयुक्त राष्ट्र संघातील कराराप्रमाणे ग्रामीण स्त्रियांच्या सबलीकरणाची मोहीम झाली. ग्रामीण विकास मंत्रालयामध्ये स्त्रियांच्या दारिद्र्य निर्मूलनासाठी खास कक्ष आहे. जवाहर ग्राम समृद्धी योजनेअंतर्गत ग्रामीण भागात मूलभूत गरजा पुरवणे व रोजगार निर्माण करणे हा उद्देश आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा परिषदेत महिला व बालकल्याण समिती महिला व बालकांच्या कल्याणासाठी सुरू करण्यात आली आहे.

**लिंगभाव विकास निर्देशांक :** लिंगभाव विकास निर्देशांक हा मानव विकास निर्देशांकातीलच घटक निर्देशंकाचा वापर करून आरोग्य, ज्ञान आणि राहणीमान या मानव विकासाच्या तीन मुलभूत परिमाणातील स्त्री व पुरुष असमानता विचारात घेऊन मानव विकासातील लिंगभाव अंतराचे मापन करतो. लिंगभाव विकास निर्देशांक हा पुरुषांच्या तुलनेत स्त्रीया किती मागे पडलेल्या आहेत, हे स्पष्ट करतो.

**लिंगभाव असमानता निर्देशांक :** लिंगभाव असमानता निर्देशांक हा असमानता निर्देशांक आहे. तो माता मृत्यूदर प्रमाणाने मापन केलेले पुनरुत्पादक आरोग्य, राष्ट्रीय कायदेमंडळात स्त्रियांनी धारण केलेल्या जागांचे प्रमाण व कमीतकमी माध्यमिक शिक्षण घेतलेल्या २५ किंवा त्यांपेक्षा जास्त वयाच्या प्रौढ स्त्री व पुरुषांच्या प्रमाणाने मापन केलेले सबलीकरण आणि १५ व त्यांवरील स्त्री व पुरुषांच्या श्रमदल सहभाग दराने मापन केलेले व श्रम बाजार सहभागाने व्यक्त केलेले आर्थिक स्थान या मानव विकासाच्या तीन महत्त्वाच्या पैलूतील असमानतेचे मापन करतो. या निर्देशांकाने १५९ देशांतील स्त्रीयांची स्थिती व मानव विकासाच्या प्रमुख क्षेत्रांतील लिंगभाव अंतरावर प्रकाश टाकला आहे.

**गरिबी निर्देशांक :** बहुआयामी गरीबीचे निर्देशांक मानव विकास निर्देशांकाच्याच आरोग्य, ज्ञान व राहणीमान या तीनही परिमाणाच्या बाबतीतील वंचितता गरिबी असलेल्या लोकांची संख्या व ज्याच्याशी विशेषत: गरीब कुटुंबे आहेत व वंचिततेची संख्या दर्शवितो.

**असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक :** असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक प्रत्येक परिमाणाच्या सरासरी मूल्याचे त्याच्या असमानतेच्या पातळीनुसार देशाची आरोग्य, ज्ञान आणि उत्पन्न यांतील सरासरी कामगिरी आणि कशाप्रकारे त्या कामगिरीचे देशाच्या लोकांमध्ये वितरण केले जाते, त्याचे एकत्रिकरण करतो. अशाप्रकारे असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक ही मानव विकासाची वितरण-संवेदनशील सरासरी पातळी होय. पूर्ण समानतेच्या स्थितीत असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक हा मानव विकास निर्देशांकाबरोबर असतो.

बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये २०२१- २०२२ या कालावधीतमध्ये मोठ्या प्रमाणत असुरक्षिततेचे वातावरण तसेच महामारी मुळे मानव विकास अहवालात देशादेशांमधील असुरक्षिततेची भावना आणि एकमेकांवरील विश्वासाची घटती पातळी या समस्यांची नोंद दर्शविली आहे. संगणकीय तंत्रज्ञान, असमानता,

संघर्ष, कोविड-१९ व इतर साथीच्या रोगांसारख्या नवीन समस्यांना व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आरोग्य सेवा प्रणालींची क्षमतांचे परिक्षण केले. हे धोके विचारात घेऊन संरक्षण, सक्षमीकरण आणि एकता या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. यामुळे मानवी सुरक्षा व विकास यांतून एकत्रितपणे कार्य करता येईल. चांगले आरोग्य, संपत्ती आणि शैक्षणिक दृष्ट्या सक्षम असणारे देश आज मागील दहा वर्षांच्या तुलनेत चिंता व्यक्त करीत आहे, असेही अहवालात नमूद केले आहे.

- **सामाजिक लेखापरीक्षण :**

लोकप्रशासनामध्ये सावर्जनिक धोरणाची अंमलबजावणी करीत असताना पारदर्शकता आणि जबाबदारीचे तत्व सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक लेखापरीक्षण ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. सामाजिक लेखापरीक्षण ही मुख्यतः लोकांद्वारे केलेली प्रक्रिया आहे. हे विशेषत: ज्यांना एखाद्या प्रकल्पामुळे प्रभावित होणार आहे किंवा ज्या प्रकल्पाचे लेखापरीक्षण केले जाणार आहे त्यांचे थेट लाभार्थी आहेत त्यांना केले पाहिजे.

**अर्थ व उद्देश:**

''सामाजिकदृष्ट्या उपेक्षित सर्व घटकांना सरकारद्वारे योजना/प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे परिणाम समुदायाद्वारे पडताळले जातात सामाजिक लेखापरीक्षण असे म्हणतात यामध्ये ही मुख्यतः लोकांद्वारे केलेली प्रक्रिया आहे.''

सामाजिक लेखापरीक्षणची प्रक्रिया सरकारद्वारे किंवा सरकारने निवडलेल्या संस्थेद्वारे सुलभ केली जाते. म्हणून, सामाजिक लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेत, योजना/प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे परिणाम समुदायाद्वारे पडताळले जातात, ज्यामध्ये प्राथमिक भागधारकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेत, प्रामुख्याने सरकारी कागदपत्रांची ग्राउंड रिॲलिटीशी तुलना केली जाते, ज्यामध्ये समुदायाच्या सहभागाने पडताळणी केली जाते आणि पडताळणीची प्रक्रिया आणि निष्कर्ष समाजाला एक व्यासपीठ उपलब्ध करून त्यांच्यामध्ये वाचून दाखवले जातात. या प्रक्रियेअंतर्गत, खर्च केलेल्या पैशाची उपयुक्तता आणि त्याचा योग्य दिशेने केलेला खर्च याचेही लेखापरीक्षण केले जाते, जेणेकरून समाजाच्या राहणीमानात बदल होतो.

**सामाजिक लेखापरीक्षणाचा मुख्य उद्देश:**

- पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणे
- समाजाला त्यांच्या गरजा आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
- ग्रामसभा मजबूत करणे जेणेकरुन विशेषतः वंचित वर्गाचा सहभाग सुनिश्चित करता येईल.
- हक्कांबद्दल जागरुकता वाढवणे

➢ लोकशाही व्यवस्था आणि निर्णय प्रक्रिया सुनिश्चित करणे

➢ सेवा पुरवठादारांना समाजाप्रती उत्तरदायी बनवणे

**सामाजिक लेखापरीक्षण: पारदर्शकता आणि जबाबदारीची तत्त्वे :**

सामाजिक लेखापरीक्षण अंतर्गत, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची किमान तत्त्वे निश्चित केली गेली आहेत, ज्यामुळे सामाजिक लेखापरीक्षणाची प्रक्रिया वास्तववादी बनते आणि जे सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेत जास्तीत जास्त लोकसहभाग सुनिश्चित करते, परिणामी लोकांना त्यांचे विचार व्यक्त करण्याची संधी मिळते.

**माहिती:** सामाजिक लेखापरीक्षण करण्यापूर्वी, सामाजिक लेखापरीक्षण संघाकडे त्या कार्यक्रमाची/ प्रकल्पाची संपूर्ण माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे जेणेकरुन सामाजिक लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेत, ते लाभार्थ्याला त्याच्या हक्क आणि हक्कांबद्दल संपूर्ण माहिती देऊ शकेल. यासह, ऑडिट टीम आणि समाजातील सर्व घटकांना ती माहिती मिळू शकते. ही माहिती सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करणे किंवा विविध मल्टीमीडिया माध्यमांद्वारे देखील समाजाला उपलब्ध करून दिली पाहिजे.

**सहभाग:** सहभाग म्हणजे समाजातील सर्व लोक सामाजिक लेखापरिक्षण प्रक्रियेत सहभागी होऊन निर्णय घेऊ शकतात.

**सुरक्षितता:** लेखापरीक्षण प्रक्रियेत समुदायाची सुरक्षा सुनिश्चित करणे आवश्यक आहे जेणेकरून लोकांचे सर्व वर्ग, विशेषत: वंचित समुदाय किंवा लाभार्थी गट, कोणत्याही भीतीशिवाय चर्चेत मुक्तपणे सहभागी होऊ शकतील आणि स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील. गरज भासल्यास जिल्हा प्रशासनाचीही मदत घेता येईल.

**सुनावणी :** समाजाच्या तक्रारी ऐकण्यासाठी अशी व्यवस्था असावी जिथे समाजातील लोक त्यांच्या समस्या मांडू शकतील. त्यांच्या समस्या ऐकून घेऊन योग्य तो निर्णय घेता येईल.

**कृती:** सामाजिक लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेत, समुदायाने घेतलेल्या निर्णयानुसार वेळेवर कारवाई केली जाऊ शकते आणि जेव्हा पुन्हा सुनावणी घेतली जाते, तेव्हा मागील कृती समुदायाला सांगता येते.

**पब्लिक फोरम :** समाजाच्या जास्तीत जास्त सहभागासाठी समाजालाच एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे. जेणेकरून न घाबरता चर्चा आणि निर्णय घेता येतील. भिंत लेखन, जनजागृती कार्यक्रम किंवा रॅली आयोजित करणे इत्यादी प्लॅटफॉर्ममध्ये समुदायाच्या सहभागासाठी विविध माध्यमांचा वापर केला जाऊ शकतो.

**प्रसार:** सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेचे निष्कर्ष समुदायामध्ये वाचले जावे किंवा दुसऱ्या शब्दांत सामाजिक लेखापरीक्षण अहवाल समुदायासाठी उपलब्ध असावा. त्यासाठी विविध आधुनिक तंत्रज्ञानाचाही वापर केला पाहिजे.

**झर्निपल्ली ग्रामपंचायत, ब्लॉक अगायपूर, जिल्हा बोलंगीर, ओडिशा मधील सामाजिक लेखापरीक्षण**

ऑक्टोबर २००१ मध्ये, झर्निपल्ली ग्रामसभेच्या सदस्यांनी पंचायतीने गेल्या तीन वर्षांत केलेल्या विकासकामांचे सामाजिक लेखापरीक्षण केले. ब्लॉक आणि जिल्हा स्तरावरील अधिकारी तसेच मजदूर किसान शक्ती संघटना, लोकांच्या माहितीच्या अधिकारासाठी राष्ट्रीय मोहीम आणि ॲक्शन एड इंडियासह अनेक व्यक्ती आणि संस्थांनी या ऑडिटमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

या लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले की;

- काही काम अद्याप पूर्ण झाले नाही, त्यासाठी वाटप केलेली रक्कम खर्चात दाखवण्यात आली आहे.
- सरकारी मार्गदर्शक तत्त्वांनी कंत्राट देण्यावर बंदी घातली होती, तथापि, ३१ कंत्राटदार प्रकल्पावर काम करत होते.
- ठेकेदारांकडून मस्टर रोलची देखभाल केली जात नव्हती.
- दारिद्र्यरेषेखालील (BPL) कुटुंबांना १०० मनुष्य दिवस रोजगार देण्याचे उद्दिष्ट असूनही, केवळ १२ अर्धा दिवस रोजगार निर्माण झाला.
- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना रेशनकार्ड नसल्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या दुकानातून त्यांचे अंशतः वेतन धान्याच्या स्वरूपात गोळा करता आले नाही.

**सामाजिक लेखापरीक्षण पूर्व तयारी**

**संबंधित विभाग/एजन्सीशी समन्वय:** कार्यक्रम/प्रकल्पाचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यासाठी, त्या विभाग/एजन्सीशी अगोदर समन्वय स्थापित करणे आवश्यक आहे. जेणेकरून सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेदरम्यान त्या विभागाचे/एजन्सीचे संपूर्ण सहकार्य प्रदान केले जाऊ शकते. सामाजिक लेखापरीक्षणाबाबत विभाग/एजन्सीने विभाग/ब्लॉक/पंचायत स्तरावर आगाऊ पत्रव्यवहार केला पाहिजे जेणेकरुन त्यांच्या स्तरावर अगोदर समजून घेणे आणि तयारी करणे शक्य होईल.

**कार्यक्रम/प्रकल्पाची संपूर्ण माहिती:** सामाजिक लेखापरीक्षण करण्यापूर्वी, लेखापरीक्षण संघाला ज्या कार्यक्रमाचे/प्रकल्पाचे सामाजिक लेखापरीक्षण केले जाणार आहे त्याबद्दल संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण संघाला कार्यक्रम/प्रकल्पाचे उद्दिष्ट, त्याअंतर्गत पुरवल्या जाणाऱ्या सेवा, सेवा पुरवठादार/अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीची भूमिका, सेवा पुरविण्याची कालमर्यादा, लाभार्थींचे हक्क/अधिकार याबद्दल संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. याबाबतचे प्रशिक्षण अगोदरच झाले पाहिजे.

**कागदपत्रे मिळवणे:** सामाजिक लेखापरीक्षण करताना कार्यक्रम/प्रकल्पाशी संबंधित कागदपत्रे जसे की, लाभार्थ्यांची संपूर्ण यादी, विविध प्रकारची नोंदवही, खर्चाशी संबंधित बिल-व्हाऊचर इत्यादींचा संपूर्ण तपशील अगोदरच मिळवावा आणि कागदपत्रांचा सखोल अभ्यास केला पाहिजे. कागदपत्रांच्या आधारे पडताळणी करता येते.

**विभाग/एजन्सीला पूर्व माहिती:** ज्या कार्यक्रम/प्रकल्पासाठी सामाजिक लेखापरीक्षण केले जाणार आहे त्या कार्यक्रम/प्रकल्पाशी संबंधित अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीने सामाजिक लेखापरीक्षण केले पाहिजे आणि या संदर्भात त्यांचे सहकार्य आवश्यक असल्यास त्यांना आगाऊ माहिती द्यावी.

**फॉरमॅट्स/टूल्सची पूर्वतयारी:** सोशल ऑडिटसाठी आवश्यक असलेली टूल्स/फॉर्मेट आवश्यकतेनुसार आधीच प्रिंट करून ऑडिट टीमला दिली जावीत.

**सामाजिक ऑडिट प्रक्रिया**

**नोटिफिकेशन कॅलेंडर:** सोशल ऑडिट करण्यासाठी, एक कॅलेंडर तयार केले पाहिजे ज्यामध्ये सोशल ऑडिट कोणत्या तारखेपासून कोणत्या पंचायतीमध्ये केले जाणार आहे. त्यानंतर ग्रामसभेची तारीख आणि जनसुनावणीची तारीख लिहून मग कॅलेंडर सूचित करून संबंधित निवड संस्थेला पाठवावे जेणेकरून त्यांना कळेल की कोणत्या पंचायतीमध्ये सामाजिक लेखापरीक्षण करायचे आहे, ते कधी करायचे आहे. आणि अधिकारी संबंधित कर्मचाऱ्याला वेळेत कळवतात, कृपया आवश्यक सूचनांसह कळवावे.

**किक–ऑफ बैठक:** सामाजिक लेखापरीक्षणाची प्रक्रिया गावकऱ्यांकडून करावी लागते, म्हणून पंचायत/गाव स्तरावर किक–ऑफ बैठक आयोजित करणे खूप महत्वाचे आहे. या बैठकीमध्ये पंचायत लोकप्रतिनिधी, विविध संस्था/गट/समित्यांचे सदस्य जसे की बचत गट, युवा गट, संनियंत्रण समित्या, शेतकरी गट, पंचायत स्तरावरील समित्या इत्यादी, त्या पंचायतीमध्ये कार्यरत CSOs उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीशी संबंधित अशासकीय संस्थांमधील लोक आणि कर्मचारी/अधिकारी यांचा सहभाग सुनिश्चित केला पाहिजे. तसेच, कार्यक्रम/प्रकल्पातील लाभार्थी गटाने बैठकीला उपस्थित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या बैठकीत प्रामुख्याने सोशल ऑडिटच्या प्रक्रियेवर चर्चा व्हायला हवी. तसेच ग्रामस्थांना, विशेषत: लाभार्थ्यांना सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करून त्यांना सहभागी करून घेण्याची योजना आखली पाहिजे. सोशल ऑडिटच्या प्रक्रियेत करावयाच्या संपूर्ण उपक्रमांवर चर्चा झाली पाहिजे आणि कोणाचे सहकार्य कोणत्या वेळी घ्यायचे आहे यावर चर्चा करून जबाबदारीही निश्चित करावी. ग्रामसभा कधी आणि कुठे घ्यायची यावरही चर्चा व्हायला हवी. शेवटी, सोशल ऑडिटसाठी संपूर्ण नियोजन तयार करावे लागेल.

**पडताळणी:** पडताळणी प्रामुख्याने तीन स्तरांवर केली जाते. कागदपत्रांची पहिली पडताळणी, दुसरी प्रत्यक्ष पडताळणी आणि लाभार्थ्यांची पडताळणी.

**अ) कागदपत्रांची पडताळणी:**

सोशल ऑडिट दरम्यान, अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीकडून प्राप्त कागदपत्रांची संपूर्ण पडताळणी केली जावी. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची संपूर्ण प्रक्रिया समजली पाहिजे, किती लाभार्थी आहेत याची नावांसह तपशील, बैठकांशी संबंधित माहिती, कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील खर्चासंबंधी माहिती, कार्यक्रमाशी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांची भूमिका इ. घेतले पाहिजे. कोणते कार्यक्रम/प्रकल्प, विविध प्रकारचे

दस्तऐवज/रजिस्टर/रजिस्टर तयार केले जातात ज्यामध्ये विविध प्रकारचा डेटा संकलित केला जातो, त्या सर्वांची पडताळणी करणे आवश्यक आहे. सेवा प्रदान करताना संबंधित सेवा प्रदात्याच्या भूमिकेशी संबंधित कागदपत्रांचीही पडताळणी करावी. आवश्यक असल्यास, कागदपत्रांच्या छायाप्रती घेणे आवश्यक आहे जेणेकरून या कागदपत्रांचा पुरावा म्हणून वापर करता येईल.

**ब) शारीरिक पडताळणी:**

ज्या कार्यक्रमाचे/प्रकल्पाचे सामाजिक लेखापरीक्षण केले जाणार आहे, त्या कार्यक्रमाच्या/प्रकल्पाच्या सेवा प्रदात्याच्या केंद्र/अंमलबजावणी साइटला भेट देऊन प्रत्यक्ष पडताळणी केली जाते. त्याची सद्यस्थिती तपासली जाते. कार्यक्रम/प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत आधीच दस्तऐवजीकरण केल्याप्रमाणे साइट भेट दिली जाते आणि कागदपत्रे/रेकॉर्ड्सशी जुळवली जाते. शिवाय त्याचा दर्जा, उपयुक्तता आदींचीही पडताळणी केली जाते.

**क) लाभार्थी पडताळणी :**

यापूर्वी मिळालेल्या कार्यक्रम/प्रकल्पाच्या लाभार्थी यादीच्या आधारे, लाभार्थ्यांना त्यांच्या घरी भेट देऊन आणि कागदपत्रे/रेकॉर्डमध्ये दर्शविलेल्या फायद्यांच्या वर्णनानुसार लाभार्थ्यांची माहिती आहे की नाही हे तपासून योग्य परिस्थितीचे मूल्यांकन केले जाते. अभिलेखानुसार लाभार्थ्याला लाभ मिळाला आहे की नाही याची माहिती घेतली.

**पुरावे संकलन:** सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेत पुरावे गोळा करणे हे एक महत्त्वाचे कार्य आहे. पुराव्याशिवाय कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करू नये. पुरावे अनेक प्रकारचे असू शकतात जसे की कागदपत्रांची छायाप्रत, वैयक्तिक लेखी पुरावा, वैयक्तिक मुलाखतीची व्हिडिओग्राफी, गटचर्चेदरम्यान घेतलेल्या अहवालाची छायाप्रत, छायाचित्र, व्हिडिओग्राफी, ग्रामसभेच्या अहवालाची छायाप्रत, MIS अहवालाची छायाप्रत जी पुरावा म्हणून वापरता येईल. फॉर्ममध्ये गोळा करा.

जेव्हा जेव्हा प्रतिवाद सादर केला जातो तेव्हा ते पुराव्यासह सादर केले जावे. जे पुरावे संवेदनशील आहेत ते अत्यंत काळजीपूर्वक सादर करणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांची साक्ष देखील पुरावा म्हणून खूप महत्वाची आहे परंतु त्यांची सुरक्षितता देखील खूप महत्वाची आहे.

**अहवाल तयार करणे:** सामाजिक लेखापरीक्षण दरम्यान केलेल्या डेटाचे संकलन केल्यानंतर सामाजिक लेखापरीक्षण अहवाल तयार करायचा आहे. अहवालातील तथ्ये संकलित करायची आहेत. जी ग्रामसभेत पुराव्यासह सादर करावी.

**सामाजिक लेखापरीक्षण अहवालाचे मुख्य घटक:**

- ऑडिट समस्या
- आवश्यक माहिती गोळा केली

- प्राप्त माहितीचे स्रोत
- पडताळणीसाठी अवलंबलेल्या पद्धती
- वैधानिक विचार काय असू शकतो?
- सामाजिक लेखापरीक्षण परिणाम
- कोण दोषी आढळला आहे
- कोणत्या मुद्द्यांचा अधिक तपास केला पाहिजे?
- प्रमुख ऑडिट निर्णय

**ग्रामसभेची संस्था:** लेखापरीक्षण अहवाल ग्रामसभेत ठेवायचा असतो. सामाजिक लेखापरीक्षण आणि अहवाल तयार केल्याच्या दुसऱ्या दिवशी हा कार्यक्रम आयोजित केला जावा. ग्रामसभा आयोजित करण्यासाठी सामाजिक लेखापरीक्षणादरम्यान ग्रामस्थांना त्याची माहिती देऊन सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे लागते. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेचा कोणताही सदस्य ग्रामसभेचे अध्यक्ष राहू शकत नाही. ग्रामसभेत उपस्थित ग्रामस्थांमधून सर्वानुमते अध्यक्षाची निवड करावी लागते. ग्रामसभेच्या सुरुवातीला अध्यक्षांच्या परवानगीने ग्रामसभेचे कामकाज सुरू करावे. सर्व प्रथम, लोकांना कार्यक्रम/प्रकल्पाची माहिती द्यावी, त्यानंतर लेखापरीक्षणची प्रक्रिया सांगितली पाहिजे. त्यानंतर सामाजिक लेखापरीक्षणाचा अहवाल वाचावा आणि प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करून निष्कर्षांची खातरजमा करून ग्रामसभेने मंजूर करून घ्यावे जेणेकरून ग्रामसभेने मंजूर केलेले मुद्देच जनसुनावणीसाठी पाठवले जावेत. चर्चा संपल्यानंतर ग्रामसभा सदस्यांचे आभार मानले पाहिजेत.

**<u>पंचायत जनसुनावणी : ग्रामसभेच्या दुसऱ्या दिवशी पंचायत जनसुनावणी घेण्यात यावी.</u>**

त्याची प्रसिद्धी सोशल ऑडिट दरम्यानच केली जावी. पंचायत जनसुनावणीत केवळ तेच मुद्दे पुराव्यासह सादर करावेत ज्यावर ग्रामसभेने सहमती दर्शविली आहे. ग्रामसभेत ज्युरी निवडले जावे आणि अहवालाची प्रत त्यांच्यासमोर निर्णयासाठी ठेवावी. तसेच हा अहवाल वाचून सर्व गावकऱ्यांना कळवावा. पंचायत जनसुनावणीमध्ये अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेचे सदस्य असणे खूप महत्वाचे आहे जेणेकरून ज्युरी सदस्य प्रत्येक मुद्द्यावर चौकशी करू शकतील आणि त्यानंतर ज्युरी समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक निर्णय घेऊ शकतील. सार्वजनिक सुनावणीत अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे जेणेकरून ते ज्युरीच्या निर्णयांचे पालन करू शकतील.

**ज्युरीची रचना:** सार्वजनिक सुनावणीत, ज्युरी सदस्य असे असू शकतात जे अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीचा भाग नसतात. महिला गट/संघाचे सदस्य, लाभार्थी गटातील एक प्रतिनिधी, पंचायत समिती सदस्य किंवा इतर लोकप्रतिनिधी, नागरी समाज/CSO याप्रमाणे निर्णायक मंडळाचे सदस्य म्हणून ग्रामस्थ असणे

आवश्यक आहे. तेथे IAS चे प्रतिनिधी, ब्लॉक स्तरावरील नामनिर्देशित सदस्य असू शकतात जे अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीचा भाग नसतात, सरपंच इ. लक्षात घेण्यासारख्या गोष्टी

सोशल ऑडिट करताना खालील गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे

- सामाजिक लेखापरीक्षण हे सर्वेक्षण नाही जे समाजसेवक स्वतः पूर्ण करतो तर ती सोसायटीने केलेली प्रक्रिया आहे. त्यामुळे ही प्रक्रिया पार पाडताना समाजातील लोकांना सहभागी करून घ्या.
- सोशल ऑडिटचे निष्कर्ष सार्वजनिक करा आणि लोकांमध्ये चर्चा केल्यानंतरच अंतिम निकालापर्यंत पोहोचा.
- समाजातील लोकांना कोणत्याही विषयावर निर्णय घेण्याची संधी द्या. लक्षात ठेवा की स्वत: कोणताही निर्णय घेऊ नका किंवा निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकू नका. कोणत्याही प्रकारे रागावू नका तर संयम दाखवा.
- सामाजिक कार्यकर्त्याची भूमिका एका सुत्रधाराची असते जी समाजातील लोकांना फक्त मार्ग दाखवते. समाजातील लोकांना विषय समजून घेण्यासाठी विकसित करावे लागेल जेणेकरून त्यांची क्षमता विकसित होईल आणि ते सक्रियपणे सोशल ऑडिट करण्यात पूर्ण सहभागी होतील.

सामाजिक लेखापरीक्षण कशा पद्धतीने केले जाते त्याचे उदाहरण खालीलप्रमाणे : सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यामातून समजून घेता येईल.

**उदा: सार्वजनिक वितरण प्रणालीचे सामाजिक लेखापरीक्षण**

बाजारातील अन्नधान्याच्या तुटवड्यावर मात करण्यासाठी आणि त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी, समाजाला वाजवी किमतीत अन्नधान्य उपलब्ध व्हावे म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्था १९६० मध्ये सुरू करण्यात आली. वर्षापूर्वी सुरू झालेली ही प्रणाली लोकांच्या कल्याणावर आधारित प्रणाली होती, २०१३ मध्ये अन्न सुरक्षा कायदा लागू झाल्यानंतर ही प्रणाली लोकांना अन्न सुरक्षेचा अधिकार प्रदान करते. सार्वजनिक वितरण प्रणाली समाजाला पूरक अन्न पुरवते आणि समाजाच्या संपूर्ण अन्न गरजा पूर्ण करत नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा मुख्य उद्देश समाजातील गरजूंना अन्न सुरक्षा प्रदान करणे हा आहे आणि अशा प्रकारे पुरवल्या जाणाऱ्या सेवा रास्त भाव दुकानांद्वारे पुरवल्या जातात. ज्यांना सामान्य भाषेत रेशन दुकाने म्हणतात.

**सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत प्रदान केलेल्या सेवा**

या कार्यक्रमांतर्गत दारिद्र्यरेषेखालील लोकांना रेशन दुकानातून रास्त दरात रेशन दिले जाते, ज्यामध्ये गहू, तांदूळ, रॉकेल तेल, मीठ आणि साखर यांचा समावेश होतो. समाजातील विविध स्तरातील लोकांसाठी विविध प्रकारची रेशनकार्डे तयार केली जातात. जसे की अंत्योदय अन्न योजनेत समाविष्ट कुटुंबांसाठी लाल कार्ड आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी पांढरे/निळे कार्ड. सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत,

दारिद्र्यरेषेखालील प्राथमिक कुटुंबांना आणि विविध श्रेणीतील अत्यंत गरीब कुटुंबांना रेशन दिले जाते. अंत्योदय अन्न योजनेंतर्गत अत्यंत गरीब कुटुंबांना दिल्या जाणाऱ्या रेशनच्या प्रमाणासाठी वेगळी तरतूद आहे. या योजनेत खालील कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे.

अल्पभूधारक शेतमजूर, ग्रामीण कारागीर/कारागीर, झोपडपट्टीत राहणारे रोजंदारी मजूर, रिक्षावाले, गाड्यांवरील फळ-भाजी विक्रेते, कचरा गोळा करणारी कुटुंबे.

रिवारचे प्रमुख, जे प्रामुख्याने विधवा आहेत, आजाराने ग्रस्त व्यक्ती, अपंग व्यक्ती, ६० वर्षांवरील व्यक्ती ज्यांच्या कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी कुटुंबाचा आधार किंवा समाजाचा आधार मिळत नाही.

महिलांची कुटुंबे, अविवाहित पुरुष ज्यांना उपजीविकेचे कोणतेही साधन नाही किंवा जे आजाराने त्रस्त आहेत, खालच्या जातीचे आणि आदिवासी लोकांचे कुटुंब.

**सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत प्राप्त लाभ**

अ) अंतोदय अन्न योजनेनुसार दिले जाणारे साहित्य आणि प्रमाण या योजनेंतर्गत कुटुंबांना ३५ किलो रेशन दिले जाते ज्यामध्ये २० किलो गहू आणि १५ किलो तांदूळ दिले जातात, ज्याची खरेदी किंमत अनुक्रमे २ आणि ३ रुपये आहे. याशिवाय त्यांना रॉकेल तेल, साखर आणि मीठही दिले जाते.

ब) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना लाभ कुटुंबाला प्रति युनिट ३ किलो गहू आणि २ किलो तांदूळ द्यायचे आहे, ज्याची खरेदी किंमत अनुक्रमे २ आणि ३ रुपये आहे. याशिवाय त्यांना रॉकेल तेल, साखर आणि मीठही दिले जाते.

(पीडीएस)

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सामाजिक लेखापरीक्षणाचे विविध आयाम**

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या सेवा प्रामुख्याने रास्त भाव दुकानांमधून पुरविल्या जातात. सामाजिक लेखापरीक्षण दोन पातळ्यांवर करावयाचे आहे. पहिल्या स्तरावर रास्त भाव दुकानाला भेट देऊन पडताळणी करायची आहे आणि दुसऱ्या स्तरावर संबंधित रास्त भाव दुकानात नोंदणी केलेल्या लाभार्थी गटाशी पडताळणी करायची आहे.

**अ) रास्त भाव दुकानाची पडताळणी करताना, प्रामुख्याने खालील मुद्द्यांची पडताळणी करावी लागेल:**

**दुकानातून उपलब्ध सुविधा/फायदे:** सोशल ऑडिट दरम्यान, सध्या रेशन दुकानातून कोणत्या सुविधा/लाभ पुरवले जात आहेत याची पडताळणी करावी लागेल. त्या वेळी उपस्थित लाभार्थी जे रेशन घेत आहेत त्यांनाही रेशनमध्ये कोणत्या वस्तू आणि किती प्रमाणात दिले जात आहे, याचीही विचारणा करावी.

**दुकान उघडण्याची नियमितता:** दुकान उघडण्याची दैनंदिन नियोजित वेळ काय आहे आणि दुकान खरेच दररोज उघडले आहे की नाही आणि असल्यास, कोणत्या कालावधीसाठी हे तपासावे लागेल.

**दृश्यमानता: सूचना फलक डिस्प्ले:** रेशन मिळण्यातील पारदर्शकता रेशन दुकानावर दुकान उघडण्याची वेळ, विविध वस्तूंच्या दैनंदिन साठ्याची स्थिती, अंतोदय सारख्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून मिळणाऱ्या लाभासंबंधित लाभार्थी अशा विविध प्रकारची माहिती रेशन दुकानावर प्रदर्शित केली जाते याची पडताळणी करणे आवश्यक आहे. अन्न योजना, प्राधान्य घरांची यादी प्रदर्शित केली आहे की नाही. सूचना फलकावर या गोष्टी प्रदर्शित केल्याने पारदर्शकता सुनिश्चित होते.

**टॉकचे व्यवस्थापन:** रेशन दुकानात मालाचा साठा कसा व्यवस्थापित केला जातो. रेशनचे साहित्य कधी मिळाले आणि किती वितरित केले. या संदर्भात, स्टॉक रजिस्टर ठेवली जात आहे का? रेशन दुकानाचे स्टॉक रजिस्टर पाहून या गोष्टींची पडताळणी करा आणि आवश्यक असल्यास पुरावा म्हणून स्टॉक रजिस्टरची फोटोकॉपी किंवा फोटोग्राफी घ्या.

**धान्य मिळविण्यात नियमितता:** रेशन दुकानाच्या व्यापाऱ्याकडून साहित्य कोणत्या आधारावर मिळवले जात आहे. गोदामातून डीलरला साहित्य कधी आणि किती वेळा उपलब्ध करून दिले जात आहे. याबाबत पडताळणी करावी लागणार आहे. बिल-व्हाऊचर इत्यादी पाहून पडताळणी करता येते. तसेच साहित्य मिळवण्यासाठी डीलरला कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करावा लागतो की नाही हे समजून घेण्यासाठी?

तक्रार नोंदवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याचे नाव आणि क्रमांक: जर कोणत्याही लाभार्थ्याने आपली तक्रार नोंदवायची असेल तर संबंधित अधिकाऱ्याचे नाव/पदनाम आणि संपर्क क्रमांक रेशन दुकानात प्रदर्शित केला आहे की नाही हे पहावे.

**अ) साहित्य खरेदी करताना डीलरचा अनधिकृत खर्च:** सामाजिक लेखापरीक्षण करताना हे देखील पडताळले पाहिजे की साहित्य खरेदीसाठी डीलरला किंमतीव्यतिरिक्त काही रक्कम द्यावी लागेल का?

**ब) लाभार्थीसह पडताळणी:** सामाजिक लेखापरीक्षणादरम्यान, पडताळणी प्रामुख्याने खालील बाबींवर केली जाते. सामान्य माहिती- या अंतर्गत नोंदणीकृत कुटुंबाला रेशन मिळते की नाही, रेशनकार्ड कोणाकडे आहे, रेशन मिळण्यासाठी किती अंतर आहे, दुकान जवळ असूनही रेशन उपलब्ध आहे की नाही याची पडताळणी करावी लागते. दूरच्या दुकानातून नोंदणी केली आहे का?

**कौटुंबिक तपशील:** या अंतर्गत, कुटुंबात राहणारे सर्व सदस्य नोंदणीकृत आहेत की नाही याची पडताळणी केली जाईल. सदस्य नसतानाही कुटुंब नोंदणीकृत आहे का, याचीही पडताळणी करावी लागेल.

**धान्याच्या पावतीशी संबंधित पडताळणी :** या विषयांतर्गत नोंदणी करूनही रेशन मिळाले की नाही, रेशन मिळण्याची नियमितता, दुकान उघडण्याची वेळ, दुकानातून रेशन मिळण्याची माहिती, रेशन घेताना होणारी गैरसोय, याची पडताळणी करायची आहे. दुकानात जाताना होणारी गैरसोय, रेशन मिळवण्यासाठी होणारा अतिरिक्त खर्च, रेशनमध्ये उपलब्ध साहित्याचा तपशील, रेशनचा दर्जा, रेशन न मिळाल्यास नुकसान भरपाई.

**शिधापत्रिका बनविण्याशी संबंधित:** सामाजिक लेखापरीक्षण करताना रेशनकार्ड बनवताना येणाऱ्या अडचणींबाबत पडताळणी करायची आहे. अंमलबजावणी करणारी एजन्सी पात्र लाभार्थ्यांना कालमर्यादेत शिधापत्रिका पुरवते किंवा त्यात झालेल्या विलंबाशी संबंधित डेटा गोळा करते.

## १.४ सारांश :

नव लोकप्रशासनाच्या सद्यकालीन प्रवाहामध्ये राजकीय शासनसंस्थांच्या निर्णय निर्धारण प्रक्रीयेमध्ये लोकसहभाग वाढविण्यासाठी सुसंस्कृत समाज व शासनाने डिजिटल संसाधानाचा वापर करावा राजकारणी व राजकीय पक्षांकडून आपापल्या मतदारसंघात कार्यक्षम पद्धतीने डिजिटल तंत्रज्ञानाच्या साह्याने वापर करणे किंवा सत्तेविरोधातील काही मते सुसंस्कृत समाजामार्फत मांडण्यासाठी देखील हा वापर केला जाऊ शकतो. त्याबरोबर डिजिटल संसाधानाचा वापर शासनाची कार्ये अधिक गुणात्मक व्हावीत म्हणून शासनाने केलेले प्रयत्न लक्षात घेतले जातात. शाश्वत विकासाचा उद्देश पर्यावरणीय समस्या कमी करणाऱ्या विकासाला चालना देण्याचा आहे आणि भावी पिढ्यांना त्यांच्या गरजांची पूर्तता करताना आपल्या कोणत्याही क्षमतांशी तडजोड करावी लागणार नाही, अशारितीने वर्तमान पिढ्यांना आपल्या गरजा पूर्ण करता येतील. सध्या जगाला पर्यावरणीय संसाधनांच्या वाढत्या मागणीचा सामना करावा लागत आहे. पण या संसाधनांचा अतिवापर किंवा गैरवापर केल्यामुळे त्यांचा पुरवठा मर्यादित होत चालला आहे याचे आत्मभान नागरिकाने बाळगणे आवश्यक आहे.

व्यावसायिक सामाजिक जबाबदारीचे स्वरूप हे लोककल्याणाबरोबरच अधिक व्यापक असून फक्त समाजातल्या दुर्बल घटकांकडे मदतीचा हात पुढे करणे त्याचबरोबरीने मानवी विकास निर्देशांक मध्ये मिळकत आधारित निकषांपलीकडे अनेक निकष निश्चित केले आहेत. त्यामध्ये स्त्री-पुरुष विकास व सुधारणा, मानवी दारिद्र्य आदी निकष मानवी विकास अहवालात अंतर्भूत आहेत. साधे निकष व सरासरी आकडे यांनी लादलेल्या मर्यादा असूनही या संयुक्त, मिश्र निकषांनी मानववंचित अवस्था दूर करण्याची निकड स्पष्टपणे मांडली आहे. सामाजिक लेखापरीक्षणची प्रक्रिया सरकारद्वारे किंवा सरकारने निवडलेल्या संस्थेद्वारे सुलभ केली जाते. म्हणून, सामाजिक लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेत, योजना/प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे परिणाम समुदायाद्वारे पडताळले जातात.

## १.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. **डिजिटल गव्हर्नस :** एक असे तंत्रज्ञान की ज्याद्वारे कोणत्याही वेळी आणि कोठेही सेवा पुरविता येते.

२. **शाश्वत विकास:** ही संकल्पना सर्व उत्पादन साधनांचा आणि प्रामुख्याने नैसर्गिक साधनांच्या योग्य आणि सारासार विचार करून विवेकी वापरावर भर देतो असा एक अर्थ अभिप्रेत आहे.

३. **मानव विकास निर्देशांक :** व्यक्तीस दीर्घ व निरोगी जीवन, ज्ञानी असणे आणि चांगले राहणीमान या मानव विकासाच्या महत्त्वाच्या परिमाणातील सरासरी कामगिरीचे संक्षिप्त माप करणे होय म्हणजे जनसामान्यांच्या जीवनातील शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन जीवनातील हक्कांची व प्रत्यक्ष प्राप्तीचा

एकत्रिकारण म्हणजे मानवी विकास होय. मानवी विकास म्हणजे जनसामान्यांच्या निवडीच्या कक्षा वाढविण्यांची प्रक्रिया असे म्हटले जाते.

४. **सामाजिक लेखापरीक्षण :** सामाजिकदृष्ट्या उपेक्षित सर्व घटकांना सरकारद्वारे करण्यात येणाऱ्या योजना/प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे परिणाम समुदायाद्वारे तपासले किंवा पडताळले जातात त्यास सामाजिक लेखापरीक्षण म्हटले जाते.

## १.६ स्वाध्याय

**अ. स्वंय अध्ययनासाठी प्रश्न:**

१. भारतामध्ये ई - शासनाला सन ............. च्या माहिती व तंत्रज्ञान कायद्यानुसार मान्यता देण्यात आली आहे.

२. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून शासनाचे शासनाच्या व्यवहारांमध्ये अधिक सुसूत्रता आणता येते. यालाच .............असंही म्हणतात

३. ..............यांच्यामते, शाश्वत विकास म्हणजे असा विकास ज्याचा थेट संबंध तळागाळातील गरिबांच्या जीवनमानाचा भौतिक दर्जा उंचावण्याशी संबंधित आहे

४. ....................हा पर्यावरण आणि विकास यावरील जागतिक आयोग आहे. १९८३ साली संयुक्त राष्ट्राद्वारे या आयोगाची स्थापना करण्यात आली.

५. सामाजिकदृष्ट्या उपेक्षित सर्व घटकांना सरकारद्वारे योजना/प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे परिणाम समुदायाद्वारे पडताळले जातात ............... असे म्हणतात.

ब. स्वंय अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे:

१. २०००

२. डिजिटल- गव्हर्नन्सफ

३. एडवर्ड बार्थिअर (Edward Barbier)

४. बूटलैंड आयोग

५. सामाजिक लेखापरीक्षण

**क) सरावासाठी दीर्घउत्तरी प्रश्न:**

१) डिजिटल गव्हर्नसचा अर्थ सांगून महत्व स्पष्ट करा.

२) डिजिटल गव्हनर्स चा लोकप्रशासनावरील परिणामावर सविस्तर चर्चा करा.

३) शाश्वत विकास म्हणजे काय सांगून शाश्वत विकासाचे महत्व स्पष्ट करा.

४) व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी तत्व स्पष्ट करा.

५) मानव विकास निर्देशांक व सामाजिक लेखापरीक्षण यावरती सविस्तर चर्चा करा.

**ड) टिपा लिहा:**

१) डिजिटल गव्हर्नस

२) शाश्वत विकास उदिष्टे

३) व्यावसायिकांची सामाजिक जबाबदारी व पर्यावरण

४) मानव विकास निर्देशांक

५) सामाजिक लेखापरीक्षण

## १.७ अधिक वाचनासाठी :


१) चक्रवर्ती बिद्युत, चंद प्रकाश २०१८ 'जागतिकीकरणातील लोकप्रशासन सिद्धांत आणि व्यवहार', सेज पब्लिकेशन नवी दिल्ली.

२) पाटील व्ही. बी,२०१८ 'भारतीय प्रशासन' केसागर प्रकाशन पुणे.

३) फाडिया बी. एल.२०१८, भारतीय प्रशासन, साहित्य भवन, आग्रा

४) माहेश्वरी श्रीराम अनु. साधना कुलकर्णी, २०२०, 'भारतीय प्रशासन', ओरिनटल लॉगमन, हैदराबाद.

५) भट्टाचार्य मोहित, २०२२, 'लोकप्रशासन कें नये आयाम', जवाहर पब्लिशर्स, नई दिल्ली.


❑❑❑

# घटक २
# प्रशासनातील सद्यकालीन समस्या

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ विकासातील लोकसहभाग

२.२.२ विकासातील लिंगभाव समानता

२.२.३ दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी प्रशासन

२.२.४ प्रशासकीय नैतिकता

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचण्यासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे –

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील बाबींचे आकलन होईल.

- विकासातील लोकसहभाग संकल्पना व तिचे महत्व, विकासातील लोकसहभागाची आवश्यकता, विकासातील लोकसहभागाची साधने, लोकसहभागासमोरील आव्हाने समजून घेऊन लोकसहभाग प्रभावी बनविण्यासाठी उपाय सुचविता येतील.
- विकासातील लिंगभाव समानता ही संकल्पना, विकासातील स्त्रिया आणि स्त्रिया व विकास हा दृष्टीकोन तसेच लिंगभाव समानतेचे फायदे या बाबी समजून येतील.
- दुर्बल घटकांसाठीच्या कल्याणकारी प्रशासनाचा अर्थ, त्याची प्रशासकीय रचना व स्वरूप, दुर्बलांसाठीच्या कल्याणकारी योजना व महत्व समजून घेता येईल.
- प्रशासनातील नैतिकता हि संकल्पना, नैतिकतेची तत्वे किंवा घटक, प्रशासकीय नैतिकतेची आवश्यकता, प्रशासकीय नैतिकतेच्या अभावामुळे निर्माण झालेल्या समस्या व त्यावरील उपाययोजना समजून घेता येतील.

## २.१ प्रास्ताविक

जागतिकीकरणानंतरच्या काळात लोकप्रशासन या विद्याशाखेत खूप मोठे बदल झाले आहेत. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचा लोकप्रशासनावर परिणाम झाला, या परिणामातून व इतर अनेक कारणांमधून लोकप्रशासनात नवीन संकल्पनांचा, नवीन विचारांचा उदय झाला. त्याबरोबरच अनेक नवीन प्रश्नही निर्माण झाले आहेत. त्यात प्रामुख्याने विकासातील लोकसहभाग व विकासातील लिंगभाव समानता हे दोन मुद्दे अत्यंत प्रभावीपणे दिसतात. तसेच समाजातील दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी प्रशासन व प्रशासनातील नैतिकता या बाबीही प्रशासनात महत्त्वपूर्ण ठरत आहेत. या संदर्भातील सर्व संकल्पनांचा आढावा आपण प्रस्तुत प्रकरणात घेत आहोत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ विकासातील लोकसहभाग

**अ. अर्थ व संकल्पना –**

लोकशाहीमध्ये 'लोकसहभाग' अत्यंत महत्वाचा असतो. कारण लोकशाहीमध्ये शासन समाजाच्या म्हणजे लोकांच्या कल्याणाकरिता विविध विकास कार्यक्रम राबवीत असते. विकास कार्यामध्ये जनतेला सहभागी करून घेणे व जनतेच्या सहकार्याने विकास कामे पूर्ण करणे म्हणजे 'लोकसहभाग' होय. कोणत्याही राष्ट्राला सर्वांगीण प्रगती करीत असताना आपल्या विकास कार्यात लोकांना सहभागी करून घ्यावे लागते. त्यामुळे लोकसहभाग हा विकासात अत्यंत महत्त्वाचा घटक ठरतो. जर विकासात लोकांचा सहभाग नसेल तर शासकीय योजना अपयशी ठरतात.

आधुनिक काळात भारताने लोककल्याणकारी राज्य ही भूमिका स्वीकारल्यामुळे लोककल्याणासाठी लोकांचा सहभाग व सहकार्य आवश्यक असल्याचे दिसते. तर दुसऱ्या बाजूला समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणजे प्रशासन असे दिसते. म्हणजे लोक सहभाग लोककल्याणाचा पाया आहे. ग्रामपातळीपासून ते राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत लोकसहभागाशिवाय विकास कामे पूर्ण होऊ शकत नाहीत. विकास कामे अधिक जलदगतीने पूर्ण करण्यासाठी व दर्जेदार पद्धतीची करण्यासाठी लोकसहभाग गरजेचा असतो. महाराष्ट्राचा विचार करता आपणास लोकसहभागातून झालेल्या विकासाचा आढावा पाहता येतो. अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धी गावाचा किंवा पोपटराव पवार यांनी हिवरेबाजार गावाचा लोकसहभागातून केलेला विकास हा एक आदर्श नमुना सांगता येतो.

लोकसहभागाच्या व्याख्या अनेक विचारवंतानी केल्या आहेत. त्यातील काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. सर हिप यांच्या मते, 'लोक सहभाग म्हणजे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये लोकांचा सक्रिय समावेश होय.'

२. बंकी यांच्या मते, 'सहभाग म्हणजे अशी गतिमान समूह प्रक्रिया की ज्यामध्ये सर्व सदस्य एकत्रितपणे कार्य करतात. तसेच समस्या सोडवण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी संबंधित लोकांचे विचार घेणे होय.'

३. सॅम्युएल पॉल यांच्या मते, 'लोकांचा सहभाग म्हणजे अशी क्रियाशील प्रक्रिया की, ज्यामुळे लाभार्थ्यांच्या विकासात्मक प्रकल्पाचे निर्देशक व अंमल केल्यामुळे त्याचा वैयक्तिक विकास होईल, तसेच आत्मविश्वास वाढेल, त्याचबरोबर आत्मनिर्भर होतील ते होय.'

थोडक्यात लोकसहभाग म्हणजे ध्येय ठरविणे व ते मिळवण्याकरिता आवश्यक असणारी संसाधने संकलित करणे, जीवनमान सुधारण्याच्या दिशेने कार्य करण्यासाठी लोकांचे सततचे सामूहिक प्रयत्न होय. लोकसहभाग म्हणजे आपल्या अधिकारांची जाणीव होऊन सामाजिक प्रवाहात सहभागी होणे होय.

**ब. लोकसहभागाचे महत्व –**

विकास कार्यात लोकसहभागाचे महत्त्व अनेक विचारवंतानी व्यक्त केले आहे. महात्मा गांधीजीनी लोकसहभागातून ग्रामिण विकासाचे महत्त्व सांगितले. एवढेच नव्हेतर लोकसहभागातून खेडी स्वयंपुर्ण करण्यावर त्यांनी भर दिला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानी गावोगावी जाऊन स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. त्यांनी लोकसहभातून स्वच्छता मोहिम राबविण्याचा विचार व प्रत्यक्ष कार्यही केले. महाराष्ट्रात तत्कालीन ग्रामविकास मंत्री कै. आर. आर. पाटील यांनी 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' आणि 'महात्मा गांधी तंटामुक्ती योजना' ग्रामिण पातळीवर सुरू केल्या. परिणामी गावातील वादविवाद गावात मिटविले जात आहेत. सध्याचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनीही 'माझे सरकार' संकल्पनेची निर्मिती करून शासन आणि लोकांना एकत्र जोडण्याचे काम केले. त्याच्या मतानुसार लोकशाही लोकांच्या भागीदारी शिवाय अशक्य आहे. अशा या लोकसहभागाचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे.

**१) भ्रष्टाचारावर नियंत्रण** – लोकसहभागामुळे भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविता येते. प्रशासन जेव्हा शासकीय योजना धोरणाची अंमलबजावणी करते तेव्हा त्यात भ्रष्टाचार होण्याची शक्यता असते. परंतु अलिकडच्या काळात धोरण ठरविल्यापासून ते अंमलबजावणीपर्यंत लोकांचा सहभाग राहतो. एवढेच नव्हे तर लाभार्थ्यांचा यात प्रत्यक्ष समावेश असतो. त्यामुळे भ्रष्टाचारचे कमी होत आहे. एकंदरित लोकसहभागामुळे भ्रष्टाचारांवर नियंत्रण मिळविता येते.

**२) कार्यक्षमता** – लोकसहभागामुळे विकास कामे अधिक कार्यक्षमतेने राबविता येतात. लोकांमधील गैरसमज व शासनाप्रती विरोध दूर करण्याचे उत्तम माध्यम म्हणजे लोकसहभाग होय.

**३) आत्मनिर्भरता** – लोकसहभागामुळे परावलंबीत्व संपुष्टात येण्यास मदत होते. लोकसहभागामुळे आत्मविश्वास, आत्मपरीक्षण व समस्यांचे निराकरण करण्याची प्रेरणा मिळू शकते. लोकसहभागातून गावात अनेक कुटिर उद्योगांची निर्मिती व विविध विकास कामे झाल्याचे पाहावयास मिळते. म्हणून आत्मनिर्भयता ही लोकसहभागातून उदयास येते.

**४) शासन व लोकांमध्ये संवाद** – विकास कार्यात लोक सहभागाचे महत्त्व विशेष स्वरूपाचे आहे. लोकसहभागामुळे शासन आणि लोकांमध्ये संवाद निश्चित होतो. त्यामुळे दोघामध्ये परस्पर विश्वास आणि सहयोगाची भावना वाढीस लागते. समस्याचे निराकरण होण्यास व शासकीय योजना यशस्वी होण्यास मदत होते.

**५) कौशल्य विकास** – ग्रामिण व शहरी लोकांनी प्रकल्पात सहभागी झाल्यामुळे त्यांच्यात कौशल्य वाढिस लागतात. विकास कामात सातत्याने लोकांचा सहभाग असल्यास कौशल्य विकसित होते.

**क. लोकसहभागाची आवश्यकता**

प्रत्येक देशाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास हा 'लोकांचा सहभाग' यावर आधारीत असतो. भारत स्वतंत्र झाल्यानंतर सर्वसमावेशक विकासाची अपेक्षा ठेवल्यामुळे नोकरशाही केंद्रीकरण, भ्रष्टाचार अशा अनेक समस्यांमध्ये वाढ झाली. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी लोकसहभागाची आवश्यकता आहे. ज्यात जनता धोरण निर्मिती व अंमलबजावणीच्या सर्वच स्तरावर सहभागी होते.

**१) ग्रामीण क्षेत्राचा विका**स – भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था काही प्रमाणात शेतीवर आधारित आहे. शेती व शेतीपुरक जोडधंद्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शासन विविध धोरणे व कार्यक्रम ठरवित असते. शेतीसाठी पाणी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. यामुळे 'पाणी आडवा पाणी जिरवा' यासारख्या योजना लोकसहभागातून पुर्ण होत आहेत. पाण्यावर विविध पिके घेतली जातात. पाण्याचा अपव्यय होवू नये या विचारातून ठिंबक सिंचन पद्धती, तुषार सिंचन पद्धतीचा पिकांना पाणी देण्यासाठी वापर केला जातो. शेतीकरीता पॉली हाऊस, ग्रीन हाऊसचा वापर केला जातो. ड्रोनच्या सहाय्याने शेतीतील पिकांना फवारा देणे इत्यादीमुळे ग्रामिण भागाचा विकास होत आहे. हा विकास लोकसहभागामुळे शक्य होत आहे. म्हणून ग्रामीण क्षेत्राच्या विकासाकरिता लोकसहभाग आवश्यक आहे.

**२) योजनाची फलश्रृती** – भारतात शहरी व ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी स्वच्छ भारत, गंगा स्वच्छता, हरित भारत, उज्वला गॅस, कौशल्य विकास, रोजगार हमी अश्या अनेक योजना शासनाकडून राबविल्या जातात. परंतु त्या योजना लोकांपर्यंत किती पोहचतात? या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये शासकीय नोकरशाहीची उदासिनता दिसते. प्रत्येक योजनेत जर लोकांचा सहभाग असेल तर ती यशस्वी होते. म्हणजे विकास कार्य पुर्णत्वास जाते. लोकसहभागाशिवाय शासनाच्या योजना ह्या यशस्वी होत नाहीत. थोडक्यात, योजनांच्या फलश्रृतीसाठी लोकसहभाग आवश्यक आहे.

**३) पायाभूत सुविधाच्या निर्मितीसाठी निधी** – देशातील सर्वच क्षेत्रातील उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी लोकसहभागाची आवश्यकता आहे. फक्त शासकीय निधीतून सर्व सुविधा उपलब्ध होणे शक्य नाही. विकास कामासाठी आर्थिक पाठबळ असल्याशिवाय ते योग्यरित्या पूर्ण करता येत नाही. महाराष्ट्रातील हिवरे बाजार, राळेगणसिद्धी अशा अनेक गावात लोकसहभागातून निधी जमा करून

सार्वजनिक विहिरी, धरणातील गाळ वाढणे, रस्ते बांधणी, पाणीलोट, वनराई, इत्यादी विकास कामे केलेली आहेत.

**४) मागासलेल्या क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी** – ग्रामीण, डोंगराळ, दऱ्याखोऱ्यांतील भागात सर्वच सोयी, सवलती पोहचत नाहीत. दारिद्र्य, गरिबी, बेरोजगारी, महिलांचे प्रश्न, कुपोषण, शिक्षण इत्यादीबाबत उदासिनता दिसून येते. हे सर्व प्रश्न जटील व गुंतागुंतीचे आहेत. दळणवळणाची असुविधा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, आरोग्याचे प्रश्न अश्या अनेक समस्या आहेत. शासन या समस्या सोडविण्यासाठी विविध योजना, कार्यक्रम राबविते. मात्र त्या लोकांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाहीत. म्हणजे लोकसहभाग हा महत्त्वाचा आधार आहे.

**५) सुशासनासाठी** – लोकसहभाग हा 'सुशासन' संकल्पनेचा महत्त्वाचा आधार आहे. लोकसहभागामुळे प्रशासनात पारदर्शकता व उत्तरदायित्त्व निर्माण होते. शासकीय योजनेच्या निर्णय प्रक्रियेपासून ते धोरणाची अंमलबजावणीपर्यंत लोकांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. सुशासनात कायद्याचे राज्य, सहभागात्मकता, लोकशाही समावेशक, इत्यादीला महत्त्व प्राप्त होते. म्हणून सुशासन संकल्पनेसाठी लोकसहभागाची नितांत आवश्यकता आहे.

**६) आरोग्य पूर्तता** – जागतिक आरोग्य संघटनेने सुरूवातीला सर्वांसाठी आरोग्याची पुर्तता करण्यासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. वर्तमान काळात विकासाचे मोजमाप करण्यासाठी मानव विकास निर्देशांक या कसोटीला महत्त्व दिले जाते. शैक्षणिक प्राप्ती, उत्पन्न आणि आर्युमान या तीन घटकांवर निर्देशांक अवलंबून असते. वर्तमान काळात स्वच्छता, शुद्ध पेयजल, सकस आहार, घन कचऱ्याची योग्य विल्हेवाट, ग्रामीण भागातील आरोग्य, इत्यादी योजनेत लोक सहभागी होत आहेत.

**७) श्रममूल्यांना महत्त्व** – विकास कार्यात लोकसहभाग हा श्रमाच्या माध्यमातून मिळत असतो. महाराष्ट्रात पाणी फाऊंडेशनने लोक परिश्रमाच्या माध्यमातून लोकसहभाग वाढविला आहे. महाराष्ट्रातील अनेक गावात श्रमाच्या आधारे अनेक विकास कामे केली गेली आहेत.

**ड. लोकसहभागाची साधने –**

लोकसहभागासाठी असलेले विविध मार्ग किंवा साधने पुढीलप्रमाणे आहेत.

**१) लोकशाही विकेंद्रीकरणासाठी पंचायतीराज संस्था** – शासन, प्रशासन व्यवस्थेत व विकासात लोकांचा सहभाग अधिकाधिक वाढविण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण केले जाते. शासनाचे धोरण कितीही चांगले असले तरी जोपर्यंत त्यात जनतेचा सक्रीय सहभाग वाढत नाही तोपर्यंत विकासाची गती वाढत नाही. त्यामुळे भारतात विकासाच्या प्रक्रियेत जनतेचा प्रत्यक्ष सहभाग वाढावा म्हणून लोकशाहीत्मक पद्धतीने सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला पंचायतीराज संस्थांच्या माध्यमातून विकास कामांमध्ये प्रत्यक्षपणे सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. इतकेच नव्हे तर गावपातळीवरील

विविध समस्या सोडविण्यासाठी, योजना व कार्यक्रम तयार करण्याची व त्याची अंमलबजावणी करण्याची संधी जनतेस मिळाली आहे.

**२) जिल्हा नियोजन व विकास मंडळ –** प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली व आमदार-खासदार या लोकप्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा तयार केला जातो. या मंडळामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांतील अशासकीय सदस्य म्हणून नागरिकांची नियुक्ती केली जाते. या माध्यमातून जिल्ह्याचा संतुलित विकास करण्यासाठी, पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या, राबविण्याच्या आणि मूल्यमापनाच्या कामात जनतेला सहभागी करून घेतले जाते. जिल्ह्यामध्ये वास्तव्य करणाऱ्या जनतेच्या सहभागातून जिल्ह्याच्या विकासाची योजना बनविल्यामुळे ती खऱ्या अर्थाने दर्जेदार व समाज उपयुक्त बनत असते.

**३) निवडणुकीतील मतदान –** लोकशाही शासन प्रणालीत लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी लोककल्याणाची विविध कामे करतात. सार्वत्रिक निवडणुकीत प्रौढ मतदार आपला लोकप्रतिनिधी निवडत असतो. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिका, विधानसभा, लोकसभा, इत्यादी लोकशाहीत्मक संस्थांचे सदस्य म्हणजे लोकप्रतिनिधी निवडण्याचे कार्य नागरिक अथवा मतदार करीत असतात. अर्थातच मतदानाच्या माध्यमातून विकास प्रक्रियेत ते सहभागी होत असतात.

**४) परिषद, सभा व चर्चासत्र** – जागरूक व अभ्यासू नागरिक वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केलेल्या सभा, चर्चासत्र / परिषदेमध्ये आपले विचार किंवा भूमिका मांडत असतात. तर काही लेखक वर्तमानपत्र व नियतकालिकांमधून आपले विचार मांडत असतात. विकास कामासंदर्भात किंवा विविध समस्या सोडविण्यासंदर्भात जनमत तयार करण्यात या नागरिकांची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. थोडक्यात या माध्यमांद्वारे लोकसहभाग वाढत असतो.

याबरोबरच शासनाकडून योजनांचा प्रचार, प्रसार केला जातो तेव्हा त्यातूनही लोकसहभाग वाढविण्याचा प्रयत्न शासन करीत असते.

**इ. लोकसहभागा समोरील आव्हाने –**

विकास कार्यात लोकसहभागाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देशात तसेच महाराष्ट्रात लोकसहभागातून विकास कार्ये झालेली अनेक उदाहरणे आहेत. गावातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी संपूर्ण देशात 'शिरपूर पॅटर्न' प्रसिद्ध आहे. चराई बंदी, कुऱ्हाड बंदी, नसबंदी, नशाबंदी आणि श्रमदान या पंचसुत्रीचे काटेकोर पालन लोकसहभागामुळे करता आले. असे असले तरी लोकसहभागापुढे काही आव्हाने उभी राहिली आहेत. त्यामुळे विकास कार्य पूर्ण होण्यात अडथळे येत आहेत. ती आव्हाने खालीलप्रमाणे आहेत.

**१) राजकीय पक्षबाजी** – लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षाला महत्त्व असले तरी राजकीय पक्षबाजीमुळे लोकसहभाग वाढण्यात अडथळे निर्माण होत आहेत. आज देशातील राजकारणाचे वारे गावपातळीपर्यंत पोहचले आहे. प्रत्येक गावात सर्वच राजकीय पक्षाचे सदस्य, स्थानिक नेते आहेत. हे

गटबाजीत गुंतलेले आहेत. शासकीय योजनांची अंमलबजावणी करतांना सत्ताधारी पक्षाचे समर्थक सहभागी होतात; परंतु विरोधी पक्षाचे सदस्य सहभागी होत नाहीत किंवा त्या विकास कामाला विरोध करतांना दिसतात. विकासापेक्षा सत्तेला महत्त्व दिले जाऊ लागले. यामुळे लोकसहभागापुढे राजकीय पक्षबाजी एक आव्हान आहे.

**२) जातीवाद** – भारतात विविध जाती समुदायाचे लोक राहतात. शासकीय योजना कार्यक्रम राबवित असतांना लोकसहभागाची आवश्यकता असते; परंतु त्या भागात किंवा गावात एखाद्या जाती समुदायाच्या हिताची योजना असेल तर दुसऱ्या जाती समुदायातील लोकांकडून विरोध होतो असे दिसते. यातून जातीय हितसंबंध जोपासले जातात आणि जातीय स्वार्थ साधला जातो. त्यामुळे गरीब दुर्बल मागासलेल्या जाती समुदायांच्या हिताच्या योजनेत लोकांचा सहभाग आढळत नाही.

**३) स्थानिक संस्थांची मक्तेदारी** – ग्रामीण व शहरी भागात धर्मसंस्था, जातीसंस्था, सामाजिक संस्था, सहकारी संस्था कार्यरत असतात. विकास कामात लोकसहभाग वाढत असतांना या संस्था काही वेळा अडथळा निर्माण करतात. अश्या संस्थेच्या विरोधात किंवा त्यांच्या हितसंबंधाला बाधा आणणारे धोरण किंवा कार्यक्रम असल्यास ते यशस्वी होऊ देत नाहीत. कारण अशा संस्थेचा त्या भागात दबदबा असतो. त्यांनी ठरविल्या प्रमाणेच विकास कार्ये पार पडत असतात. थोडक्यात विकास कार्यात लोकसहभाग वाढविण्यात स्थानिक संस्थेची मक्तेदारी आडवी येते.

**४) स्थानिक नेत्याची मक्तेदारी** – स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात स्थानिक नेतृत्वाचा उदय झालेला आहे. हे नेते शासनाच्या योजना, कार्यक्रम व धोरण लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम करतात. त्यात नेत्याचे काही हितसंबंध गुंतलेले असतात. त्याच्या हितसंबंधाच्या विरोधात जाणारे धोरण, कार्यक्रम असेल तर ते त्याला विरोध करतात. तर विकासाभिमुख योजना यशस्वी करण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असतो; परंतु स्थानिक नेत्यांचे त्या भागात वर्चस्व असल्यामुळे तो नेता म्हटल्याप्रमाणे लोक कार्य करतात. एकंदरीत लोकसहभागापुढे स्थानिक नेत्यांची मक्तेदारी एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**५) शासकीय योजनाबाबत अज्ञान** – केंद्र शासन असो वा राज्य शासन असो, ते विकासाच्या योजना राबवित असतातच. ग्रामीण भागातील लोकांना अनेक योजनांची माहिती नसते. त्याबाबत अज्ञान असते. त्यामुळे ते विकास कार्याच्या योजनेत सहभागी होत नसतात. तसेच निरक्षरपणा हा देखील अज्ञान निर्मितीचे मुख्य कारण आहे. मागासलेल्या समुदायांना त्याच्या हितांच्या योजनेचीही माहिती नसते. त्यामुळे त्या भागात विकास कार्ये मंदावतात.

**६) प्रशासनाची उदासिनता** – विकास कार्यात ज्याप्रमाणे लोकसहभाग आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्रशासनाची भूमिका ही महत्त्वाची असते. केंद्र, राज्य सरकारच्या योजनेची अंमलबजावणी प्रशासन करीत असते; परंतु योजना, धोरण व कार्यक्रम कितीही चांगले असले तरी प्रशासन ती योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवित नसेल. तसेच त्यांना त्यात सहभागी करून घेत नसेल तर ती योजना अयशस्वी होते. थोडक्यात

प्रशासनाची उदासिनता हे लोकसहभागासमोरील आव्हान बाले आहे. अशाप्रकारे विविध आव्हाने लोकसहभागापुढे उभारली आहेत.

**ई. लोकसहभाग प्रभावी बनविण्यासाठीचे उपाय –**

लोकप्रशासनामार्फत केली जाणारी कोणतीही कृती असो त्यात जोपर्यंत लोक सक्रियपणे सहभागी होत नाहीत तोपर्यंत ती कृती यशस्वी होऊ शकत नाही. शासनाने आखलेले धोरण अथवा योजना कितीही चांगली असली तरी ती यशस्वी होण्यासाठी त्यात लोकसहभाग असणे गरजेचे असते. लोकांच्या सहभागाशिवाय विकासात्मक कामे पूर्ण करणे प्रशासनाला खूप कठीण जाते. विकास कामात व प्रशासनात लोकसहभाग वाढविण्यासाठी पुढील प्रभावी उपाय सुचविता येतील.

**१) प्रशाकीय साक्षरता अभियान** – देश पातळीपासून ते गाव स्तरावर आजही बहुसंख्य जनता अशी आहे की, ज्यांना प्रशासन व्यवस्था कशी चालते? जनकल्याणासाठी शासनाच्या कोणकोणत्या योजना आहेत? तसेच त्या योजनांचा लाभ कसा मिळतो या संदर्भात प्रचंड अज्ञान आहे. त्यासाठी शाळा, महाविद्यालये, प्रसार माध्यमे, प्रशासन व्यवस्था व सेवाभावी संस्था इत्यादी घटकांच्या मदतीने साक्षरता अभियान राबविल्यास विकास कामात जनसहभाग वाढेल.

**२) लोकसहभागासाठी आदर्श प्रारूप निर्मिती** – कोणत्याही विकास कामाची यशस्वीता ही जनसहभागावरच अवलंबून असते. जेथे जनता सक्रियपणे सहभागी होते तेथे भ्रष्टाचारास फारसा वाव नसतो. पण जनसहभाग कसा प्राप्त करावा याबाबतचे प्रभावी व उपयुक्त प्रारूप दिसून येत नाही. म्हणून जनतेशी योग्य रितीने संवाद साधता यावा, त्यांच्या कल्पनांना धोरण निर्धारणात स्थान मिळावे आणि प्रशासन व जनता यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध विकसित व्हावेत यासाठी एक रूपरेषा निर्धारित करून प्रारूपाची निर्मिती करावी.

**३) सार्वजनिक कामाविषयी आवड निर्माण करणे** – शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबर त्यांच्या मनात सामाजिक बांधिलकीची भावना विकसित व्हावी तसेच सार्वजनिक कार्यात त्यांना रुची, आवड वाटावी यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. सर्वसामान्यपणे लोकसहभाग म्हणजे जनतेने सार्वजनिक कार्यात रस घेणे, सक्रियपणे सहभागी होणे होय. पण अलीकडे स्वार्थाशिवाय सार्वजनिक काम करणारा वर्ग कमी होत आहे. सामाजिक कार्याला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी विद्यार्थी जीवनातूनच सार्वजनिक कार्याविषयी आवड निर्माण केली पाहिजे.

**सारांश –**

लोकसहभाग हे सरकारी योजना अंमलात आणण्याचे महत्वाचे साधन आहे. त्याद्वारे आज ग्रामीण, शहरी भागाचा सर्वांगिण विकास होताना दिसतो. महाराष्ट्रात लोकसहभागाचा आधार घेऊन आदर्श गावे निर्माण झालेली आहेत. उदाहरणार्थ, राळेगणसिद्धी, हिवरेबाजार, शिरपूर पॅटर्न, पेरे पाटील यांचे पाटोदा हे आदर्श गाव, इत्यादी. एकूणच पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी म्हणतात, सबका साथ, सबका विकास

यातत्वानुसार भारतात रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, विमान, रेल्वे, बंदरे, इत्यादी क्षेत्रात लोकसहभाग वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. थोडक्यात विकासाठी आज लोकसहभाग हा अत्यंत महत्वाचा घटक ठरतो.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. ............... यांच्या मते, 'लोक सहभाग म्हणजे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये लोकांचा सक्रिय समावेश होय.'

अ) बंकी　　ब) सॅम्युएल पॉल　　क) गोस्वामी　　ड) सर हिप

२. 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानफ ग्रामिण पातळीवर ........... यांनी सुरू केले.

अ) महात्मा गांधी　　ब) अण्णा हजारे

क) कै. आर. आर. पाटील　　ड) नरेंद्र मोदी

३. .......... हा लोक सहभागातील अडथळा आहे.

अ) सुशासन　　ब) निरक्षरता　　क) कर्तव्य पालन　　ड) साक्षरता

## २.२.२. विकासातील लिंगभाव समानता.

### अ. प्रास्ताविक

सद्यकाळात स्थानिक, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावर पाहता 'लिंग समानता' हा मूलभूत मानवी हक्क बनला आहे. दारिद्र्य कमी करण्यापासून ते आरोग्य, शिक्षण, संरक्षण यापर्यंत लिंग समानता वाढवणे हे निरोगी समाजाच्या सर्व क्षेत्रांसाठी महत्त्वपूर्ण व आवश्यक बनले आहे. शासनाच्या कोणत्याही विशिष्ट धोरणांमुळे पुरुष आणि स्त्रिया यांच्यात भेदभाव होणार नाही. त्यांचा प्रशासनातील सहभाग किंवा संसाधन वाटपातील लिंगभेदांचे मूल्यांकन करताना समानतेला प्राधान्य दिले जाते. यालाच 'लिंगभाव समानता' असे म्हणतात.

### ब. विकासातील लिंगभाव समानता संकल्पना –

१९८० च्या दशकात लिंगभाव आणि विकास हा एक आर्थिक व सामाजिक दृष्टिकोण विकसित झाला. हा दृष्टिकोण लिंगभाव संबंधाच्या परिप्रेक्ष्यातून सर्व सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संरचना व विकास या धोरणांची पुनर्तपासणी करण्यासाठी एक विश्लेषणात्मक चौकट मांडतो. भारतातील स्त्रियांच्या स्थितीविषयी माहिती जाणून घेण्यासाठी भारत सरकारकडून १९७२ मध्ये एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने १९७४ मध्ये समानतेच्या दिशेने अहवाल प्रकाशित केला. समितीने त्यामध्ये अधोरेखित केल्याप्रमाणे भारतामध्ये स्त्रियांची स्थिती बिकट असल्याचे दिसून आले. घटते लिंग गुणोत्तर, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय प्रतिनिधित्व आणि विकास या सर्व प्रक्रियेत स्त्रियांचे स्थान आणि लिंगभाव समानता

साध्य करण्यात येणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक अडथळ्यांचे विश्लेषण या अहवालामध्ये करण्यात आले. परिणामी स्त्रियांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थिती सुधारण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. त्यामध्ये लिंगभाव आणि विकास या दृष्टिकोणाला महत्त्व देण्यात आले. विविध योजना, कायदे हे लिंगभाव समानता, मानवी हक्क, विकास या पैलूंबाबत भाष्य करत असले, तरी या सर्व बाबी लिंगभावाच्या चष्म्यातून बघणे आवश्यक आहे. त्यामुळे जेव्हा विकास होतो, तेव्हा तो कशाप्रकारे स्त्री-पुरुषांवर भिन्न परिणाम करतो हे दिसून येते. लिंगभाव आणि विकास दृष्टिकोणाला विकासातील स्त्रिया, स्त्रिया व विकास या दृष्टिकोणांची पार्श्वभूमी आहे.

विकासातील स्त्रिया आणि स्त्रिया व विकास हे दोन्ही दृष्टिकोण केवळ उत्पादक बाबींवर भर देतात; मात्र स्त्रिया या पुनरुत्पादन, घरकाम यांसारख्या कामांमध्ये गुंतलेल्या असतात. त्या केवळ उत्पादक बाबींकडे लक्ष देत नाहीत. या दोन्ही दृष्टिकोणातील त्रुटी विचारात घेऊन १९८० च्या दशकात लिंगभाव आणि विकास हा दृष्टिकोण उदयास आला. या दृष्टिकोणाने स्त्री-पुरुष आणि सामाजिक संरचनेच्या संदर्भात लैंगिक असमानतेच्या कारणांचे विश्लेषण केले. तो कामगारांचे एका साचेबंद कप्प्यात बंदिस्थ करणाऱ्या रचना तसेच लिंग असमानता निर्माण करणाऱ्या संस्था आणि यंत्रणेत बदल करण्याचा प्रयत्न करतो. या दृष्टिकोणाचा सैद्धांतिक पाया आपणास समाजवादी स्त्रीवादामध्ये दिसून येतो. त्यामुळे हा दृष्टिकोण केवळ उत्पादन संबंधावर लक्ष केंद्रित न करता पुनरुत्पादन संबंध आणि स्त्रियांच्या जीवनातील विविध सामाजिक पैलूंवरदेखील प्रकाश टाकतो. केट यंग यांच्या मते, लिंगभाव आणि विकास हा दृष्टिकोण सामाजिक संस्था, आर्थिक आणि राजकीय जीवन यांच्या माध्यमातून समाज कशा प्रकारे घडतो? यांसह सर्वांगीण बाबींवर भाष्य करतो. हा दृष्टिकोण स्त्रियांवर लक्ष केंद्रित करत नाही, तर समाजामध्ये लिंगभावाधारित होणारी सामाजिक घडण, भूमिकांचे आदान-प्रदान, स्त्री आणि पुरुषांकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा यांबाबत चिकित्सक मांडणी करून पितृसत्ता ही स्त्रियांच्या शोषणाचे आणि दुय्यमत्वाचे मुख्य कारण आहे, हे अधोरेखित करतो. हा दृष्टिकोण कुटुंबांतर्गत आणि कुटुंबाबाहेर स्त्रियांच्या सहभागाचे आणि योगदानाचे तसेच कुटुंब, घरदार, बाजार व राज्य यांच्यातील आंतरसंबंध आणि गुंतागुंतीचे विश्लेषण करतो.

लिंगभाव आणि विकास दृष्टिकोण लिंगभाव असमानता दूर करण्यामधील भूमिकेला व स्त्रियांचे सक्षमीकरण याला महत्त्व देतो. विकासाची प्रक्रिया ही राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा किचकट घटकांनी समाविष्ट आहे. त्यामुळे समाजातील वंचित घटकांना सक्षम बनवून त्यांच्या आयुष्यामध्ये बदल घडवून आणण्यावर हा दृष्टिकोण भर देतो. १९९५ मध्ये बीजिंग येथे स्त्रियांवर झालेल्या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर लिंगभाव मुख्यप्रवाह, लिंगभाव अर्थसंकल्प आणि नियोजन या संकल्पनांना राबविण्यासाठीही एक प्रभावी पद्धत म्हणून या दृष्टिकोणाला मान्यता देण्यात आली. सर्वांना समान संधी उपलब्ध होण्यासाठी विविध धोरणे, कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या सर्व स्तरांवर आणि पातळींवर लिंग समानता दृष्टिकोणाचा समावेश करणे म्हणजे लिंगभाव मुख्यप्रवाह होय. लिंगभाव अर्थसंकल्प आणि नियोजन हा डावपेच लिंगभाव समानतेच्या तत्त्वाला प्रोत्साहन देऊन स्त्रिया आणि पुरुषांसाठी अर्थसंकल्पामध्ये आवश्यक त्या तरतुदी आखतात. त्याच प्रमाणे लिंगभाव आणि विकास हा दृष्टिकोण व्यावहारिक पातळीवर

विविध डावपेच आखून लिंगभाव गरजा पूर्ण करण्यावर प्रकाश टाकतो. हे करत असताना तो लिंगभाव नातेसंबंधामध्ये बदल घडवून आणण्यासाठी एकापेक्षा जास्त पातळ्यांवर काम करतो. तसेच पुरुषांना या बदलाच्या प्रक्रियेमध्ये एक महत्त्वाचा घटक म्हणून समाविष्ट करतो.

**विकासातील स्त्रिया :** लिंगभाव आणि विकास यासंदर्भात मांडणी करताना विकासातील स्त्रिया आणि स्त्रिया व विकास हे दृष्टिकोण बघणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रियांना एकतर अदृश्य ठेवले गेले किंवा वगळण्यात आले. स्त्रिया या कुटुंबामध्ये आणि समूहांमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावतात, तरीही त्यांच्या श्रमाची मोजदात होत नाही. त्यामुळे स्त्रियांचा वैयक्तिक विकास व्हावा यासाठी स्त्रियांना विकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यावर हा दृष्टिकोण भर देतो. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला ईस्टर बोसरुप यांच्या 'वुमेन्स रोल इन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' या पुस्तकात सदरच्या संकल्पनेला धरून मांडणी करण्यात आली. ईस्टर यांनी सर्वांत प्रथम स्त्रियांना एक स्वतंत्र विकासाच्या प्रक्रियेतील एक अभिव्यक्ती म्हणून पाहिले. अभ्यासक या दृष्टिकोणावर टीका करताना नमूद करतात की, विकासातील स्त्री दृष्टिकोण समाजातील विविध संरचना मान्य करतो; मात्र स्त्रियांचे दुय्यमत्व, शोषण, लिंगभाव संबंध, पुरुष पूरक तंत्रज्ञान, संसाधनांचे वाटप यांबाबत चिकित्सक प्रश्न उभे करीत नाही.

**स्त्रिया आणि विकास :** १९७० च्या दशकात हा दृष्टिकोण विकसित झाला. स्त्रिया या पूर्वीपासून आर्थिक उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट होत्या, यावर हा दृष्टीकोन भर देतो. शेती क्षेत्रामध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करताना दिसतात. असे असले तरी, स्त्रियांच्या श्रमाचे मूल्यांकन केले जात नाही. त्यांना केवळ विकासाचे लाभार्थ म्हणूनच पाहिले जाते. त्यामुळे 'विकासातील स्त्रिया' हा दृष्टीकोन महत्त्वाचा असून तो स्त्रियांचे योगदान अधोरेखित करतो. तो स्त्रिया आणि विकास यांमधील संबंधावर प्रकाश टाकतो; मात्र तो पितृसत्ता, उत्पादनाची विभिन्न साधने आणि स्त्रियांचे शोषण व दुय्यमत्व यांच्यातील संबंधाचे विश्लेषण करीत नाही. स्त्रिया आणि विकास हा दृष्टीकोन गृहीत धरतो की, आंतरराष्ट्रीय संरचना जेव्हा अधिक न्याय व शोषण विरहित बनतील, तेव्हा तिसऱ्या जगातील स्त्रियांची परिस्थिती सुधारेल.

**क. लिंगभाव समानतेचे फायदे :**

- लिंगभाव समानतेमुळे सत्तासंबंधामध्ये सकारात्मक बदल व समानता आणण्यास मदत होते.
- लिंगभाव समतेमुळे निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचे प्रमाण व वाटाघाटीची क्षमता वाढण्यास मदत होते.
- लिंगभाव समानतेमुळे हिंसाचार कमी होऊन स्वतःच्या हक्कांच्या जाणीव निर्माण होते.
- लिंगभाव समतेमुळे पितृसत्ता, लिंगभाव यांसारख्या सामाजिक संस्थाना शह देण्यास मदत होते.

**ड. सारांश –**

विकासाची व्याख्या करताना आर्थिक विकास या दृष्टिकोणातून विचार केला जातो; मात्र व्यक्तीचा (स्त्री-पुरुष, तृतीयपंथी) सर्वांगिण (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय) विकास यावर भर दिला जात नाही. ठराविक समूहातील लोक हे विकासाचे लाभार्थी ठरतात, तर बहुतांश वेळा परिघावरील

लोक बळी ठरतात. बरेचदा या गटांमध्ये स्त्रिया, लहान मुले, सत्ताहीन समूहांचा समावेश असतो. थोडक्यात, विकासाची प्रक्रिया ही सर्वांसाठी समान नाही. लिंगभाव आणि विकास एक विश्लेषणाची चौकट उपलब्ध करून देतो. त्या माध्यमातून आपण विकासाच्या असमान प्रक्रियेला प्रश्नांकित करू शकतो. सैद्धांतिक पातळीवर लिंगभाव आणि विकास हा जरी समग्र दृष्टिकोण वाटत असला, तरी व्यावहारिक पातळीवर त्याची अंमलबजावणी करताना समस्या येतात. स्त्रियांना विकासाच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्याचे सूत्र बऱ्याच संस्थांनी स्वीकारले असले, तरी स्त्रियांचे समाजातील स्थान, शिक्षण, प्रथा, परंपरा, हिंसा या बाबींमुळे स्त्रियांना समानता मिळविण्याची वास्तविक प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नाही.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१. ............. च्या दशकात लिंगभाव आणि विकास हा एक आर्थिक व सामाजिक दृष्टिकोण विकसित झाला.

अ) १९३० ब) १९५० क) १९६० ड) १९८०

२. १९९५ मध्ये ........... येथे स्त्रियांवर झालेल्या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर लिंगभाव अर्थसंकल्प आणि नियोजन ही संकल्पना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

अ) न्यूयॉर्क ब) बीजिंग क) नवी दिल्ली ड) मुंबई

३. 'वुमेन्स रोल इन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' हा ग्रंथ ......... यांनी लिहिला.

अ) बी. एल. टर्नर ब) जॉन मैथ्यू क) ईस्टर बोसरुप ड) एम. कैथरीन

## २.२.३ दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी प्रशासन.

### अ. प्रास्ताविक

भारतीय घटनाकारांनी भारतात कल्याणकारी राज्याची स्थापना करण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणाकडे येथे विशेष लक्ष दिले गेले. दुर्बलांच्या हिताचे रक्षण व्हावे, त्यांना विकासाची समान संधी मिळावी याकरिता राज्यघटनेमध्ये तरतुदी करण्यात आल्या. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १५(३) मध्ये म्हटल्याप्रमाणे महिला व बालकांसाठी विशेष तरतुदी करण्यापासून या कलमातील कोणतीही बाब राज्यसंस्थेला प्रतिबंध करू शकत नाही. तसेच १५(४) प्रमाणे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय नागरिक किंवा अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या उन्नती, प्रगतीसाठी विशेष तरतूद करण्यापासून या कलमातील किंवा अनुच्छेद २९(२) मधील कोणतीही तरतूद राज्यसंस्थेला पायबंद घालू शकत नाही. तसेच अनुच्छेद ४६ नुसार समाजातील अनुसूचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक विकासाला विशेष हातभार लागेल आणि त्यांचे सामाजिक अन्याय व शोषणापासून संरक्षण करणे अशी तरतूद करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने स्वातंत्र्योत्तर काळात

राज्यकर्त्यांनी दुर्बल घटकांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी प्रयत्न केले. दुर्बल घटकांच्या विकासासाठी केलेल्या शासनाने केलेल्या प्रयत्नांना, राबविलेल्या प्रशासकीय रचनेस दुर्बलांसाठीचे कल्याणकारी प्रशासन अस म्हणतात.

**ब. अर्थ –**

कल्याणकारी राज्य म्हणजे जनतेच्या कल्याणासाठी काम करणारे राज्य होय. तर दुर्बल घटकांकरिता कल्याणकारी प्रशासन म्हणजे समाजामध्ये जे दुर्बल किंवा व्यतीत घटक आहेत त्यांना सहाय्य करणे, त्यांच्या विकासाकरिता धोरणे व कार्यक्रम राबविणे म्हणजे दुर्बलांकरिता सामाजिक कल्याण करणे होय. सर्वसाधारणपणे दुर्बल घटकांमध्ये मागास जाती, महिला, बालके, वृद्ध, अपंग, अल्पसंख्यांक व अनुसूचित जाती, जमातींचा समावेश केला जातो. शासन अशा सर्व घटकांच्या कल्याणासाठी विविध योजना, कार्यक्रम राबवित असते. त्यांना विशेष सवलती देऊन समाजाच्या विकास प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला जातो. शासन स्तरावर दुर्बलांच्या विकासाकरिता विविध विभाग, मंडळे स्थापन केली जातात व त्याद्वारे सामाजिक कल्याण केले जाते.

**क. दुर्बलांच्या विकासासाठी कल्याणकारी प्रशासन –**

सद्यकाळात बहुतांश राष्ट्रांमध्ये दुर्बलांच्या विकासासाठी शासन स्तरावर कल्याणकारी प्रशासन यंत्रणा उभारली जाते. शासनाकडून विविध योजना व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीद्वारे दुर्बलांचा विकास साधण्याचे, त्यांचे सामूहिक कल्याण करण्याचे विविध उपक्रम राबविले जातात. भारताच्या संदर्भात विचार करता राष्ट्रीय व राज्यपातळीवर कल्याणकारी प्रशासन यंत्रणा अस्तित्वात आहे, त्यात केंद्रीय समाज कल्याण मंडळ, राज्य समाज कल्याण मंडळ, राष्ट्रीय महिला आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय इतर मागासवर्ग आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, राष्ट्रीय सफाई कामगार आयोग यांचा समावेश होतो. याबरोबरच राष्ट्रीय मागासवर्गीय विकास महामंडळ, केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्रालय अशी दुर्बल घटकांच्या विकासाकरिता  कल्याणकारी विकास यंत्र कार्यरत आहे. त्याचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे.

**१. केंद्रीय समाज कल्याण मंडळ :–** देशातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या कल्याणासाठी विकासाची कार्ये करणाऱ्या शासकीय संस्था व स्वयंसेवी संघटना यांच्या कार्यावर देखरेख ठेवण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, अर्थसहाय्य करण्यासाठी आणि त्यांच्या कार्यात समन्वय साधण्यासाठी केंद्रीय पातळीवर सन १९५३ साली 'केंद्रीय समाज कल्याण मंडळा'ची स्थापना करण्यात आली. या मंडळात एक अध्यक्ष व इतर काही सदस्य असतात. तर केंद्र व राज्य सरकारच्या सामाजिक कल्याणाच्या कार्यासाठी दिल्या गेलेल्या मदतीत समन्वय ठेवणे, समाज कल्याण संघटनाचा अभ्यास करण्यासाठी स्वयंसेवी संघटनांना अनुदान दिल्यानंतर त्यांच्या कार्याचे मुल्यांकन करणे. अशी अनेक उद्दिष्ट्ये ठेवून हे मंडळ काम करते.

**केंद्रीय समाज कल्याण मंडळाची कार्ये :–**

१) समाज कल्याणासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थ सहाय्य पुरविणे.

२) प्रौढ महिलांकरिता अल्पकालीन मार्गदर्शन वर्ग किंवा संक्षिप्त शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करणे.

३) महिलांसाठी सामाजिक व आर्थिक कल्याणाचे कार्यक्रम सुरु करणे.

**२. राज्य समाज कल्याण मंडळ :–** १९५४ मध्ये केंद्र शासनाप्रमाणेच प्रत्येक घटक राज्य शासनाने स्वतंत्र समाज कल्याण मंडळाची स्थापना केली. या मंडळाचा कारभार कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याकडे सोपविण्यात आला. या मंडळाचा शासकिय प्रमुख म्हणून सचिव कार्य करतात. तर समाज कल्याण योजना व कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक घटक राज्यात एक समाजकल्याण संचालनालय स्थापन करण्यात आलेले असते. त्याचा प्रमुख संचालक हा असतो.

**राज्य समाज कल्याण मंडळाची कार्ये –**

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या सर्वांगीण विकासासाठी कल्याणकारी योजना व कार्यक्रमांचे आखणी करणे. २) अनुसूचित जाती जमातीच्या आर्थिक विकासासाठी विविध उपक्रमांना केंद्र सरकारकडून अर्थसहाय्य घेवून ते वरील जातीच्या व्यक्तिंना रोजगाराची साधने उपलब्ध करून देण्यासाठी वापरणे. ३) अनुसूचित जातीच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अर्थसहाय्य करून त्यांना या कार्यासाठी प्रोत्साहन देणे.

**३. राष्ट्रीय महिला आयोग –**

देशातील महिलांच्या एकूण परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी १९७४ मध्ये एक समिती नेमली गेली. त्या समितीने भारतामध्ये केंद्रीय पातळीवर एक महिला आयोग स्थापन करण्याची शिफारस केली. पुढे महिला सबलीकरणाचा एक भाग म्हणून भारतात ३१ जानेवारी १९९२ रोजी 'राष्ट्रीय महिला आयोगा'ची स्थापना करण्यात आली.

i. **उद्देश :–** १) महिलांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी संवैधानिक, कायदेशीर संरक्षण उपाययोजनांशी संबंधीत बाबीवर लक्ष ठेवणे व त्याकरिता शासनास प्रभावी संरक्षक उपाययोजना सूचविणे. २) समाजाच्या सर्व क्षेत्रातील महिलांचे संरक्षण व विकास करणे, महिलांचा समाजातील दर्जा उंचावणे. ३) स्त्रियांना दिला जाणारा असमान दर्जा व अन्यायी वागणूक यास प्रतिबंध करणे.

ii. **रचना :–** राष्ट्रीय महिला आयोगात एक अध्यक्ष व ५ सदस्य असतात. या आयोगाच्या अध्यक्षाचा व इतर सदस्यांचा कार्यकाल ३ वर्षाचा असतो. तसेच या आयोगात एक पूर्णवेळ सचिव व शासनाद्वारे नियुक्त केलेले ५ सदस्य असतात.

iii. **राष्ट्रीय महिला आयोगाचे अधिकार/कार्ये :–** १) केंद्र व राज्य सरकारला महिलांची सर्वांगीण स्थिती सुधारण्यासाठी संरक्षक उपाययोजनांची अंमलबजावणी करता यावी याकरिता शिफारशी करणे. २) राज्यघटना व कायद्यातील महिलांना बाधक होणाऱ्या तरतुदी दुर करण्यासाठी कायद्यामध्ये सुधारणात्मक कायदेशीर उपाययोजनेबाबत शिफारशी करणे. ३) स्त्रियांचे अधिकार हिरावून घेणे. स्त्रियांना संरक्षण देण्यासाठी, समानतेचे व विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करणे. महिलांच्या कल्याणाची सुनिश्चिती करणे व त्यांना सहाय्य करणे या उद्देशाने घेण्यात आलेले धोरणात्मक निर्णय आणि घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे यांचे पालन करणे आणि अशा बाबीमधून निर्माण होणाऱ्या प्रश्नाबाबत समुचित प्राधिकरणाकडे दाद मागणे इत्यादी संबंधीत गोष्टीची दखल घेणे. ४) संविधानातील तरतुदीच्या किंवा महिलांशी संबंधीत असलेल्या कायद्याबाबत महिलांना मार्गदर्शनपर सल्ला देणे. ५) महिलांबाबत करण्यात येणारा भेदभाव, अत्याचार यावर चौकशी करण्याची मागणी करणे. ६) महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकास नियोजनाच्या कार्यात सल्ला देणे व सहभागी होणे. ७) केंद्र व राज्यातील महिलांच्या विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे.

iv. **महत्त्व :–** आज राष्ट्रीय महिला आयोग महत्वाची भूमिका बजावत आहे. राज्यघटनेने महिलांच्या संरक्षणासाठी केलेल्या नियमांचे निरिक्षण करुन महिलांच्या प्रतिष्ठेत व दर्जात सुधारणा करण्यासाठी आयोग प्रयत्नशील असतो. गरजू महिलांना न्यायालयांच्या कामकाजासंबंधी माहिती देण्याचे काम आयोगाकडून केले जाते. तसेच कायद्यांचा भंग होऊन महिलांना उपद्रव होईल. अशा गोष्टी करणाऱ्या व्यक्ती, संस्था यावर आयोगाकडून कायदेशीर तक्रार केली जाते. परिणामी या आयोगाचे महत्व वाढताना दिसते.

### ड. दुर्बलांच्या विकासाच्या योजना –

दुर्बलांच्या विकासासाठी शासन विविध धोरणे ठरवून योजना व उपक्रम राबवीत असते. त्यात प्रामुख्याने महिलांसाठी थेट कर्ज योजना, प्रशिक्षण योजना, बीज भांडवली योजना, महिला समृद्धी योजना, उच्च शैक्षणिक कर्ज योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, महिला किसान योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना, कन्यादान योजना देवदासीकरिता कल्याणकारी योजना, सामुदायिक विवाह योजना, बालकांसाठी बाल संरक्षण योजना, दत्तक योजना, अल्पसंख्याकांसाठी शैक्षणिक सक्षमीकरण योजना, रोजगार आणि आर्थिक सक्षमीकरण योजना, पायाभूत विकास योजना, वृद्धांसाठी संजय गांधी निराधार योजना, मातोश्री वृद्धाश्रम योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, अपंगांसाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना यांचा समावेश होतो.

### इ. दुर्बलांकरिताच्या कल्याणकारी प्रशासनाचे महत्व

लोकांच्या कल्याणासाठी समाज सुधारणा, समाज परिवर्तन व सामाजिक सुरक्षेसाठी कल्याणकारी प्रशासन हे अतिशय महत्त्वाचे मानले जाते. लोकप्रशासनातील कल्याणकारी प्रशासनाला अनेक कारणामुळे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याची चर्चा पुढीलप्रमाणे.

**१) अंमलबजावणी करणारी यंत्रणा –** भारतीय राज्यघटना ही कल्याणकारी स्वरूपाची आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मुलभूत अधिकार, कर्तव्ये, मार्गदर्शक तत्त्वे इत्यादीचा समावेश राज्यघटनेत केला आहे. शिवाय समाजातील दुर्बल घटकांच्या विकासाकरिता घटनेत करण्यात आलेल्या तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे काम कल्याणकारी प्रशासन करत असते.

**२) दुर्बलांच्या कल्याणाचे साधन –** निराश्रीत, दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, स्त्रिया, कामगार, बालके, भिकारी, अपंग व वृद्धांसाठी म्हणजे समाजातील दुर्बलांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम कल्याणकारी प्रशासन करत असते.

**३) समाज परिवर्तनाचे माध्यम** – सामाजिक परिवर्तनासाठी राज्यघटना व सामाजिक कायदे संमत केले जातात व त्यांची अंमलबजावणी कल्याणकारी प्रशासनाकडून केली जाते. उदा. हुंडा प्रतिबंधक कायदा, भ्रुणहत्या प्रतिबंधक कायदा, अस्पृश्यता निवारण कायदा, समान वेतन कायदा, बालकामगार निर्मुलन कायदा, दत्तक विधान कायदा इत्यादी कायद्यांची अंमलबजावणी करून समाज सुधारणा केल्या जातात.

**४) राष्ट्रीय विकासाचा भागीदार** - भारतीय समाजात कामगार, बालके, अपंग, दुर्बल स्त्रिया, आदिवासी, भटके लोक यांचे प्रमाण जास्त आहे. राष्ट्राच्या विकासासाठी दुर्बलांचाही विकास करावा व्हावा लागतो. राष्ट्रीय विकासात त्यांचेदेखील सहकार्य घ्यावे लागते. लोक कल्याणकारी प्रशासनाद्वारे दुर्बलांच्या विकासासाठी विविध योजना तयार करून, त्यांची अंमलबजावणी करून त्यांच्या विकासावर भर दिला जातो.

अशाप्रकारे दुर्बलांच्या विकासात कल्याणकारी प्रशासन महत्वाची भूमिका बजावत असते.

**सारांश :–**

कल्याणकारी प्रशासन म्हणजेच सामाजिक कल्याण प्रशासन होय. समाजातील विशिष्ट लोकांसाठी किंवा विशिष्ट समुदायासाठी ते कार्य करत असते. जो समाज जगण्यास असमर्थ असतो, तो आपली उपजीविका करू शकत नाही अशा दुर्बल समाजासाठी कल्याणकारी प्रशासन कार्यरत असते. ज्यात दिव्यांग, मतिमंद, अपंग, कमजोर, आजारी, अनाथ, निराश्रित, वृद्ध विधवा महिला, भिकारी, बालके, गर्भवती स्त्रिया, अपंग व वृद्ध इत्यादी सर्व दुबळ्या व असहाय्य घटकांचा समावेश होतो. या सर्वांच्या कल्याणासाठी व पुनर्वसनासाठी कायदे, धोरण, योजना व कार्यक्रमांची निर्मिती करून त्याची अंमलबजावणी करावी लागते. म्हणून साधारणतः दुर्बल लोकांच्या कल्याणासाठी कार्य करणारे प्रशासन म्हणजे लोककल्याणकारी प्रशासन असे समजले जाते. दुर्बल घटकांसाठी करावयाच्या कल्याणकारी कार्यांच्या प्रशासनासाठी भारत सरकारने 'सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय' या नावाने स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले आहे. हे मंत्रालय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासलेले वर्ग, अल्पसंख्याक, अपंग, महिला व बालके यांच्या शैक्षणिक विकासासाठी आणि त्यांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी कार्य करते. तर सामाजिक न्याय व कल्याण मंत्रालयाकडून समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी विविध योजना व कार्यक्रमांचे नियोजन केले जाते आणि त्याची अंमलबजावणी केली जाते. याशिवाय अनुसुचित जमातींच्या कल्याणाचा विचार करण्यासाठी 'जनजाती कार्य मंत्रालय' हे स्वतंत्र मंत्रालय निर्माण करण्यात आले आहे.

तसेच महिला व बालके यांच्या कल्याणासाठी मानव संसाधन विकास मंत्रालयात 'महिला व बालविकास विभाग' या नावाचा वेगळा विभाग स्थापन करण्यात आला आहे. थोडक्यात भारताच्या संदर्भात विचार करता दुर्बलांच्या विकासाकरिता शासन स्तरावरून विशेष प्रयत्न केले जातात.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१. ............ साली 'केंद्रीय समाज कल्याण मंडळा'ची स्थापना करण्यात आली.

अ) १९३५ ब) १९५३ क) १९६३ ड) १९८३

२. भारतात ............ रोजी 'राष्ट्रीय महिला आयोगा'ची स्थापना करण्यात आली.

अ) ३१ जानेवारी १९९२ ब) १३ जानेवारी १९९२

क) ३१ जानेवारी १९८२ ड) १३ जानेवारी १९९२

३. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल ....... वर्षाचा असतो.

अ) ५ ब) ६ क) ४ ड) ३

## २.२.४ प्रशासकीय नैतिकता

### अ. प्रास्ताविक

प्राचीन ग्रीक विचारवंत प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी राज्याकडे नैतिक दृष्टिकोनातून पहिले. प्रजेला सुखी करण्यासाठी राज्यकर्त्यांचे आचरण नैतिक असावे, असा विचार त्यांनी मांडला. मध्ययुगीन राज्यावर धर्माचा व नितीमत्तेचा पगडा असल्याने, राज्यकर्ते अनैतिक कृती किंवा व्यवहार करण्यास तयार नसत. मात्र १६ व्या शतकातील काही राजकीय विचारवंतानी वैयक्तिक व सार्वजनिक नैतिकतेत फरक केला. मॅकीयाव्हलीने सार्वजनिक हित म्हणजे राज्याचे हित साध्य करण्यासाठी राज्यकर्त्यांनी सर्व नैतिक विचार गौण मानले पाहिजेत असे प्रतिपादन केले. डर्निंग यांच्या मते, मॅकीयाव्हली अनितीचा पुरस्कार करत नाही, तर तो राजकारणात त्यास दुय्यम स्थान देतो.'' राज्याच्या अस्तित्वासाठी तो न्याय-अन्याय, धर्म-अधर्म, नैतिक-अनैतिक या मूल्यांचा विचार करत नाही. सार्वजनिक हितास तो प्राधान्य देतो आणि त्यासाठी तो नितीमत्तेस दुय्यम लेखतो आहे.

समकालीन भारतात प्रशासक व राज्यकर्त्यांच्या अनैतिक आचरणाने लोकप्रशासनाची प्रतिष्ठा लोप पावली आहे. त्यांचे अनैतिक आचरण समर्थनीय नाही, कारण ते व्यापक समाजहिताच्या विरोधी आहे. त्यांचा भ्रष्टाचार आणि त्यातून होणारी अनैतिक कृती व अनैतिक आचरण ही भारतीय प्रशासनासमोर उभे असलेली गंभीर समस्या आहे. भ्रष्टाचाराच्या या अजगराने भारतीय प्रशासनाची अवस्था दयनीय केली आहे. म्हणून समकालीन संदर्भात लोकप्रशासनातील नैतिकता अभ्यासने महत्वाचे ठरते.

## ब. प्रशासकीय नैतिकता –

प्रशासकीय नैतिकता म्हणजे राज्यकर्त्यांनी किंवा प्रशासकीय अधिकारी वर्गाने आपली जबाबदारी पार पाडताना कोणताही व्यक्तीगत स्वार्थ न बाळगणे होय. तर मानवी जीनवाला मिळालेले अत्यंत महत्त्वाचे मूल्यवान गुण वैशिष्ट्ये म्हणजे 'नैतिकता' होय. नैतिकता हा गुण कोणत्याही राष्ट्रातील व्यक्तीचा व त्या देशातील प्रशासन व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा गुण समजला जातो. आज युरोपातील नोर्वे, स्वीडन, डेन्मार्क इत्यादी देश भ्रष्टाचारमुक्त असल्याने, मानवी विकास निर्देशांकात त्यांचे स्थान वरचे आहे. आज वरील युरोपीय देशातील नागरिक समाधानी जीवन जगतात, कारण या देशातील शासन व प्रशासनात नैतिकतेला महत्त्वाचे स्थान आहे. या देशांच्या प्रशासनात पारदर्शकता असून प्रशासकीय अधिकारी नैतिकदृष्ट्या कृतिसंपन्न असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या संदर्भात विचार करता अण्णा हजारे यांच्यासारखे समाजसेवक भारतीय राजकारण व प्रशासनास नैतिकतेचे अधिष्ठान देण्याबाबत आग्रही आहेत. 'नैतिकता' किंवा 'नीती' या संकल्पनेचा प्रचलित अर्थ काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे, काय न्याय्य आहे आणि काय अन्यायमूलक आहे. या संदर्भात लावला जातो. म्हणजेच जी कृती समर्थनीय नाही ती अनैतिक आहे. राजिएल एबलसन या अभ्यासकाने 'नैतिकता' या शब्दाची तीन विभिन्न प्रकारात विभागणी केली आहे, ती पुढीलप्रमाणे.

१) प्रथम – नैतिकता म्हणजे जीवनशैली.

२) द्वितीय – यात आचरण नियमावली तयार करणे.

३) तृतीय – यात जीवनशैली व आचरण नियमावली संदर्भात माहिती मिळविणे.

हे तीन्ही प्रकार एकमेकांशी संलग्न आहेत. प्रशासनात नैतिकतेच्या संकल्पनेचा विचार हा प्रामुख्याने ज्या नियमांद्वारा योग्य–अयोग्य, चूक–बरोबर, नैतिक–अनैतिक ठरविण्यात येते त्या नियमांना 'नैतिक नियम' म्हणतात. म्हणजेच नैतिकतेशी विसंगत कृती ही अनैतिक समजली जाते. प्रशासनात नैतिकता विशेषत्वाने विचारात घेतली जात आहे. कारण आधुनिक काळात लोकसेवेने व्यवसायाचे स्वरुप धारण केले आहे. परिणामतः प्रशासकीय नीतीच्या मुद्यांवर अधिक भर दिला जातो आहे. आज जर्मनी, ग्रेट ब्रिटन व अमेरिका या देशात "Professional Ethics' म्हणजेच व्यावसायिक नितीमत्ता विचारात घेतली जाते. "Ethics in Government Act -1978' सारख्या कायद्याच्या माध्यमातून प्रशासनातील नैतिकतेला कायदेशीर स्वरुप प्राप्त करून देण्यात आले आहे.

प्रशासकीय नैतिकतेची संकल्पना स्पष्ट करीत असतांना एस. एल. गोयल यांनी असे प्रतिपादन केले आहे की, ''प्रशासकीय नीतीशास्रात त्या प्रशासकीय मापदंडाचे अध्ययन केले जाते, की ज्याद्वारे चूक किंवा बरोबर, नैतिक किंवा अनैतिक तसेच चांगले किंवा वाईट या बाबींच्या आधारावर प्रशासकीय कृतिचा आढावा घेण्यात येतो. नार्मन विन्सेन्ट पीले आणि कैनेथ ब्लॅकार्ड यांनी "The Power of Ethical Management' या पुस्तकात प्रशासकीय नैतिकतेच्या संदर्भात असे प्रतिपादन केले आहे की,

१) एखादा घेण्यात येणारा निर्णय कायदेशीर आहे का? जर तो कायदेशीर नसेल तर तो नैतिक ही नाही.

२) एखादा घेण्यात येणारा निर्णय हा निष्पक्ष आहे का? जर तो निष्पक्ष नसेल तर तो नैतीकही नाही.

३) घेण्यात आलेल्या एखाद्या निर्णयामुळे आपण स्वतःला दोषी समजतो का? जर समजत असेल तर तो निर्णय चूकीचा आहे.

**क. प्रशासकीय नैतिकतेचे घटक / तत्वे –**

प्रशासकीय नैतिकतेचे विविध घटक पुढील प्रमाणे आहेत.

प्रशासकीय नैतिकतेत सचोटी, प्रामाणिकपणा, कर्तव्याची निष्ठा, जनहिताची भावना, कार्यक्षमता, पक्षपाती वृत्ती, नम्रता, राष्ट्रावर व कार्याप्रती निष्ठा, भ्रष्टाचार नसलेला, निष्पक्षता, गुप्तता, तटस्थता, अनामिकता, निःपक्षपातीपणा, जबाबदारी, उत्तरदायित्व, न्याय, मानवता, लोकशाही व संविधानाप्रती आस्थेची भावना अश्या विविध घटकांचा समावेश होतो. या तत्वांचे पालन केल्यास त्याला प्रशासन लोककल्याणकारी, पारदर्शक व जनताभिमुख होते. शासन व प्रशासनाकडून प्रशासकीय नितिमूल्ये पळून राज्यकारभार केला जावा हीच जनतेची अपेक्षा असते.

**ड. प्रशासनात नैतिकतेची आवश्यकता –**

प्रशासनात नैतिकतेच्या आवश्यकतेचे प्रतिपादन करताना असे म्हणता येईल की, "When money is lost nothing is lost. When time is lost, something valuable is lost. However when character is lost, everything is lost.'' व्यक्तिगत जीवनात चारित्र्य–नैतिकता महत्त्वाची असते. त्याचप्रमाणे सार्वजनिक व प्रशासकीय जीवनात नितीमत्ता महत्वाची असते. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे पाहूया.

१) प्रशासकीय नैतिकतेमुळे शासकीय अधिकाऱ्यांच्या अन्यायमूलक वर्तनाला प्रतिबंध बसेल. ते अधिकारांचा दुरुपयोग करणार नाहीत. नैतिकतेवर भर दिल्यास अन्यायमूलक व अयोग्य कृती उद्भवणार नाही. त्यांचे वर्तन सकारात्मक होईल.

२) प्रशासकीय नैतिकतेमुळे प्रशासनातील उत्तरदायित्वाची भावना वृद्धिंगत होईल. प्रशासक जबाबदारीने वागतील. प्रशासनातील उत्तरदायित्वाची भावना आणि जबाबदारीची जाणीव या गोष्टी जनतेला समाधान देऊ शकतील.

३) नैतिक आचरणामुळे शासकीय अधिकारी व जनता यांच्यातील संबंध सौहार्दपूर्ण होण्यास साहाय्य होईल. शासकीय अधिकारी आपण जनतेचे सेवक आहोत, या विचाराने प्रवृत्त झाले तर शासकीय उपक्रमांच्या कार्यवाहीत जनतेचा सहभाग वाढेल. लोकसहभाग वाढल्याने शासकीय धोरणाची कार्यवाही यशस्वीरीत्या होऊ शकेल.

४) प्रशासकीय नैतिकतेच्या भावनेने प्रेरीत होऊन शासकीय अधिकारी कार्य करू लागले तर शासनद्वारा जनतेस दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता वाढेल. आज स्वित्झर्लंड व जपान या देशातील शासकीय सेवा अत्यंत दर्जेदार समजल्या जातात. कारण या देशात प्रशासकीय नैतिकता जोपासली जाते.

५) प्रशासकीय नैतिकतेमुळे समाजकल्याणाचे आणि सार्वजनिक हिताचे संवर्धन होईल. प्रशासकीय भ्रष्टाचार होत नसल्याने शासकीय निधीचा योग्य प्रकारे विनियोग करता येईल.

६) प्रशासकीय नैतिकतेमुळे औपचारिक व कायदेशीर नियंत्रणाची आवश्यकता भासणार नाही, कारण शासकीय अधिकारी अयोग्य कृती करणार नाहीत. परिणामी शासनाचे जनतेविषयीचे उत्तरदायित्व साध्य होईल.

७) नैतिक आचरणामुळे प्रशासनाची कार्यक्षमता वृद्धिंगत होईल. लोकप्रशासन कार्यक्षम असणे आवश्यक आहे, त्यापेक्षाही ते नैतिक असणे अनिवार्य आहे. व्यक्तीसाठी चारित्र्य अनिवार्य समजले जाते. त्याचप्रमाणे प्रशासनाकरीता नैतिकता सर्वस्व असते.

**इ. प्रशासकीय नैतिकतेच्या अभावामुळे निर्माण झालेल्या समस्या –**

प्रशासकीय नैतिकतेच्या अभावामुळे भ्रष्टाचार, सत्तेचा दुरुपयोग, प्रशासकीय अधिकाऱ्यांची बेजबाबदार वृत्ती परिणामी प्रशासन कार्यास विलंब अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. या सर्वांपैकी अत्यंत महत्त्वाची समस्या म्हणजे 'प्रशासकीय भ्रष्टाचार' होय. प्रशासकीय भ्रष्टाचार या संकल्पनेचा सविस्तर आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

**प्रशासकीय भ्रष्टाचार –**

**१. संकल्पना –**

अवस्थी आणि माहेश्वरी यांनी भ्रष्टाचाराची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले की, ''जाणीवपूर्वक आपल्या अधिकार किंवा पदाचा इतरांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या शोषण करण्याकरिता वापर करणे आणि त्याद्वारे स्वतःचा भौतिक स्वरूपाचा फायदा करून घेणे किंवा स्वतःची प्रतिष्ठा, अधिकार व स्थान वाढविण्याकरिता त्याचा वापर करणे होय.'' अशा प्रकारचा लाभ कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने अधिक असतो. असा व्यक्तिगत स्वार्थ साधताना समाजाचे आर्थिक नुकसान केले जाते. भारतीय दंड विधानच्या कलम १६१ मध्ये दखलपात्र गुन्हा असलेल्या भ्रष्टाचाराचे तपशीलवार स्पष्टीकरण देण्यात आले आहे.'' जी व्यक्ती केंद्र सरकार वा राज्य सरकाराचा कर्मचारी आहे किंवा असल्याचे समजले जाते, ती व्यक्ती आपली वैध कर्तव्ये पार पाडताना आणि अधिकारांचा वापर करताना, स्वतःकरिता वा अन्य कोणा व्यक्तीकरिता लाच स्वीकारते, ज्या व्यक्तीचे उत्पन्न त्याच्या निर्धारीत वेतन किंवा पगारापेक्षा प्रमाणाबाहेर असेल, जी आपल्या अधिकारांचा विशिष्ट व्यक्तीला अनुकूल वा प्रतिकूलरीत्या वापर करत असेल, म्हणजेच पक्षपातीपणा करून कोणा व्यक्तीचा फायदा किंवा नुकसान करत असेल किंवा केन्द्र सरकार वा राज्य सरकारे वा केन्द्रीय विधिमंडळ वा राज्याची विधिमंडळे वा अन्य सरकारी नोकरांना अशा प्रकारच्या

भ्रष्ट मार्गाचा वापर करण्यास प्रवृत्त करेल.'' म्हणजेच सरकारी कर्मचाऱ्याने लाच घेणे आणि सरकारी कर्मचाऱ्याला लाच देणे ही दोन्ही कृत्ये दखलपात्र गुन्हा आहे.

संथानम समितीच्या मते, स्वतः करिता, स्वतःच्या कुटुंबियांकरिता, स्वतःच्या मित्रांकरिता आणि स्वतःच्या नात्यागोत्यातील व्यक्तींचा आर्थिक वा अन्य स्वरूपात फायदा करून घेण्याच्या पारंपारिक भ्रष्ट मार्गाव्यतिरिक्त अन्य अनेक भ्रष्ट मार्गांचा वापर सरकारी कर्मचाऱ्यांद्वारा केला जातो. कमी दर्जाचा माल स्वीकारणे, सरकारी कर्मचाऱ्यांचा वा यंत्रणेचा खाजगी कारणाकरिता वापर करणे, इत्यादी. भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अपारंपारिक भ्रष्ट माध्यमांचा अधिकाधिक वापर केला जातो. त्यात गेल्या काही वर्षात परकीय देशांतून यंत्रसामग्रीची आयात करताना किंवा त्याचा निविदा मागविताना किंवा त्यासंबंधीच्या मागणीची पूर्तता करताना, परकीय चलनाच्या रूपात, परकीय बँकात फार मोठ्या रकमा गोळा केल्या जातात.

भ्रष्टाचाराचे एक अप्रत्यक्ष स्वरूप म्हणजे 'वशिलेबाजी' होय. अधिकारपदावर असलेल्या व्यक्तींवर दबाव आणून, अधिकारपदाकरिता योग्य नसलेल्या व्यक्तीची, योग्यता असलेले अन्य उमेदवार उपलब्ध असताना केली जाणारी निवड हा भ्रष्टाचाराचा प्रकार अधिक भयावह आहे. गुणवत्तेच्या निकषाच्या आधारे सेवकभरती केली जावी, या तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला असला तरीही सेवकभरतीत व्यापक प्रमाणात भ्रष्टाचार आढळून येतो. अधिकारपदावरील व्यक्तीवर राजकीय दबाव आणणे, आपल्या नात्यागोत्यातील व्यक्तींची अधिकारपदाकरिता शिफारस करणे, अधिकारपदावर असलेल्या व्यक्तीने सेवकभरती करताना लाच स्वीकारणे अशी भ्रष्टाचाराची स्वरूपे सर्वश्रुत आहेत. या भ्रष्टाचाराला जातीयतेची भीती मिळाली असून, आपल्या जाती-जमातीच्या लोकांची अधिकाधिक सेवकभरती करण्याकडे संबंधितांचा कल दिसून येतो.

**२. प्रशासकीय भ्रष्टाचाराची कारणमीमांसा –**

सनदी नोकरवर्गातील नीतीमत्तेचा ऱ्हास म्हणजेच त्यांच्या भ्रष्ट वर्तनाची समस्या सार्वत्रिक स्वरूपाची असली, तरीही त्याची कारणे देश, काळ, परिस्थितीपरत्वे भिन्न आहेत. उच्च पदस्थातील भ्रष्टाचार अधिक विलासी जीवन जगण्याकरिता किंवा सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करण्याकरिता किंवा अधिक महत्त्वाचे अधिकारपद प्राप्त करण्याच्या लालसेतून उद्भवतो. तर निम्म स्तरावरील सेवकवर्ग, अनेक वेळा नाइलाजास्तव मूलभूत गरजा भागविण्याकरिता भ्रष्ट मार्गांचा अवलंब करतात. राजकारणी व्यक्ती निवडणुका जिंकून, सत्ता संपादन करण्याकरिता किंवा असलेली सत्ता टिकविण्याकरिता, उच्चपदस्थ सनदी अधिकाऱ्यांच्या संगनमताने भ्रष्ट मार्गांचा अवलंब करतात. विभिन्न स्वरूपाच्या प्रशासकीय भ्रष्टाचारास कारणीभूत ठरणाऱ्या काही प्रमुख घटकांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

i) **मानवी प्रवृत्ती –** 'मानवी स्वभाव' हे प्रशासकीय भ्रष्टाचाराचे उगमस्थान आहे. प्रत्येक मनुष्य हा आत्मकेन्द्रीत म्हणजेच स्वार्थी असतो. आपला स्वार्थ साधण्याकरिता इतरांचा तोटा झाला तरीही त्याला पर्वा नसते. त्याला स्वतःचे व स्वतःच्या कुटुंबियांचे सुख, सामाजिक प्रतिष्ठा यांची पूर्तता करण्याकरिता पैशाची गरज असते. आपल्या अधिकारांचा गैरवापर करून पैसे मिळण्यात त्याला काही वावगे किंवा गैर वाटत

नाही. त्यामुळे भ्रष्ट नसलेले म्हणजेच नीतिमत्तेची कास धरणारे सरकारी कर्मचारी हे अपवादात्मक बाब बनले आहेत. म्हणजेच जोपर्यंत अधिकाधिक संपत्ती, अधिकार व प्रतिष्ठा प्राप्त करण्याची सहज मानवी प्रवृत्ती असेल तोपर्यंत भ्रष्टाचार हा होतच राहील.

ii) **सामाजिक घटक** – सनदी नोकरवर्गाच्या भ्रष्टाचाराला सभोवतालच्या वातावरणातील बरेच घटक कारणीभूत असतात. त्यामुळे भ्रष्टाचार खोलवर रुजतो. त्यातील प्रमुख घटक म्हणजे समाजव्यवस्था होय. समाजामध्ये व्यक्तींची प्रतिष्ठा ही तिच्याजवळ असणारा पैसा, स्थावर मालमत्ता यांच्याशी संबंधित असते. त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी गैर मार्गांनी पैसा गोळा करण्याकडे मध्यम व कनिष्ठ मध्यमवर्गीय कर्मचारी प्रवृत्त होतात. जोपर्यंत सामाजिक प्रतिष्ठेचे मापदंड बदलत नाहीत तोपर्यंत भ्रष्टाचार सुरू राहील.

iii) **नैतिक मूल्यांचा ऱ्हास** – २० व्या शतकात जगातील बहुतेक देशातील नीतिमत्ता ढासळली असून नैतिक मूल्यांची चाड आता जनसामान्यांना राहिली नाही. त्यामुळे सदाचार हा अपवादात्मक, तर भ्रष्टाचार हा सार्वत्रिक बनला आहे. खानपानाचे, लैगिक संबंधाचे, व्यक्तीगत वर्तनाचे सर्व प्रस्थापित नियम शिथिल झाले आहेत. उदा. आज मद्यपानाला सामाजिक प्रतिष्ठा मिळाली आहे. तर मद्यपान न करणारी व्यक्ती 'मागास' किंवा 'बुरसटलेल्या' विचाराची समजली जाते. सरकारी अधिकारी राजरोसपणे पैश्याची मागणी करतात किंवा आपली सरकार दरबारी अडकलेली कामे पार पाडण्याकरिता कोणत्याही थरावर जाण्याची कारखानदार किंवा व्यापारी वर्गाची तयारी असते. विशेष म्हणजे त्यात त्यांना काहीही वावगे वाटत नाही. दुसऱ्या प्रशासकीय सुधार आयोगाचे अध्यक्ष श्री. ए. डी. गोरवाला नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाबाबत खंत व्यक्त करताना म्हणतात की, ''आपण भौतिक साधनसंपत्ती किंवा तांत्रिक कौशल्याबाबत मागास आहोत असा सार्वत्रिक समज आहे. वस्तुतः आमची दिवाळखोरी नैतिक स्वरुपाची आहे. आमच्या नीतिमत्तेचा ऱ्हास झाला आहे''. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भ्रष्टाचाराची प्रवृत्ती अधिक प्रमाणात व प्रचंड वेगाने वाढली आणि आम्ही आर्थिकदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या दिवाळखोर बनलो.

iv) **आर्थिक घटक** – कोणतीही व्यक्ती मुळातच वाईट असते असे नाही. परिस्थितीच्या रेट्यामुळे काही व्यक्ती भ्रष्टाचार करण्यास प्रवृत्त होतात. विशेषत: कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा पुरेशा नसतात. उदा. पोलीस खात्याच्या कर्मचाऱ्यांना शासनाने पोलीस वसाहतीत निवासस्थाने उपलब्ध करून द्यावीत, हे अपेक्षित असले तरीही बहुसंख्य कर्मचाऱ्यांना ही सुविधा उपलब्ध करून दिली जात नाही. शहरांमध्ये जागेची टंचाई असल्याने बेसुमार घरभाडे आकारले जाते. अशा परिस्थितीत किमान दोन खोल्यांच्या जागेचे भाडे भरता यावे याकरिता प्रामाणिक कर्मचाऱ्यालाही नाइलाजास्तव भ्रष्ट मार्गाचा अवलंब करावा लागतो. सतत वाढत जाणारी महागाई, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई आणि त्यातून उद्भवणारा काळाबाजार यांमुळे भ्रष्टाचारास प्रोत्साहन मिळते. जर व्यक्तींना जीवनावश्यक वस्तू नियंत्रित दराने मिळाल्या तर भ्रष्टाचारी प्रवृत्तीस आळा बसू शकतो. व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील अपरिमित गरजा व त्याला मिळणारा पैसा याचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे व्यक्ती गैरमार्गाने पैसा कमविण्यास प्रवृत्त होते.

v) **प्रशासकीय कार्यपद्धती** – आधुनिक जीवन हे गुंतागुंतीचे व धावपळीचे झाले आहे. प्रत्येक व्यक्ती ही आपापल्या दैनंदिन व्यवहारात गुंतलेली असते. यामुळे प्रशासकीय कार्यालयातील आपले काम विनाविलंब व्हावे असे सर्वांना वाटते. प्रशासकीय कामकाजाची कार्यालयीन पद्धत लालफितीत अडकलेली असल्यामुळे कर्मचाऱ्याकडून आपले काम करवून घ्यायचे असेल तर त्याला काहीतरी मोबदला दिला पाहिजे, असा सार्वत्रिक समज निर्माण झाला आहे. थोडक्यात काही तरी वजन ठेवल्याशिवाय कोणतेच काम होत नाही. त्यामुळे सामान्य कामांकरितादेखील मोबदला दिला व मागितला जातो. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक प्रकारच्या व्यवहारांकरिता प्रशासनाची अनुमती, आयात-निर्यातंचे परवाने, परकीय चलनाकरिता अनुमती, कारखाने उभारण्याकरिता परवानगी, कर्जाकरिता वित्तीय संस्थांची मंजुरी इत्यादी प्रशासकीय व्यवहार अधिकाधिक जटिल बनले आहेत. त्याचा फायदा घेवून सरकारी कर्मचारी लाललुचपतीच्या मार्गांचा अवलंब करून आपला व्यक्तिगत स्वार्थ साधतात. जकात नाक्यावरील कारकून किरकोळ फायद्याकरिता स्थानिक प्रशासनाच्या जकातीच्या उत्पन्नाचे फार मोठे नुकसान करतो, म्हणजेच जेवढे प्रशासकीय नियम अधिक, तेवढाच भ्रष्टाचाराला अधिक वाव असे समीकरण दिसते. प्रशासकीय कार्यपद्धती सुलभ करण्यात आल्यास, जकातीसारखे कालबाह्य कर रद्द करण्यात आल्यास, अनावश्यक निर्बंध शिथिल करण्यात आल्यास, कार्यालयीन पद्धतीत सुधारणा करण्यात आल्यास प्रशासकीय भ्रष्टाचार कमी होऊ शकेल, असे मत अनेक प्रशासकीय सुधार आयोगांनी व्यक्त केले आहे.

vi) **राज्याच्या कार्यक्षेत्राची वाढलेली व्याप्ती** – २०व्या शतकात राज्याने लोककल्याणकारी धोरण स्वीकारल्याने राज्याचे कार्यक्षेत्र अतिव्यापक झाले आहे. म्हणजेच प्रशासनाच्या कार्यकक्षाही विस्तृत झाल्या. परिणामी राज्याच्या कार्यक्षेत्राची कक्षा जितकी अधिक व्यापक, तितकीच अधिक प्रशासकीय भ्रष्टाचाराची कक्षा व्यापक होत गेली आहे.

vii) **प्रशासन आणि हितसंबंधी गटांचे संगनमत** – विकसनशील देशात प्रशासनाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती विस्तृत होताना, अनेकविध क्षेत्रात त्याचे नियंत्रण प्रस्थापित होत असतानाच, विविध प्रलोभनांद्वारे प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'खिशात टाकणे' किंवा 'आपल्या प्रभावाखाली आणणे' ही कला हितसंबंधी गटांनी साधली आहे. यामुळे आयात-निर्यात धोरणात विशिष्ट उद्योगसमूहाला अनुकुल असे बदल केले जातात किंवा कर आकारणीत त्यांनाच लागू होणारी सवलत दिली जाते. विकसनशील देशात उद्योगसमूह आणि अन्य हितसंबंधी गटांनी प्रशासकीय यंत्रणेवर प्रभाव किंवा दबाव आणण्याची प्रक्रिया अधिक व्यापक प्रमाणात दिसून येते. आपल्या हितसंबंधांना अनुकूल असलेल्या अधिकाऱ्यांकरिता हितसंबंधी गट राजकीय नेतृत्वाकडे आपले वजन वापरतात आणि त्या प्रशासकीय नेतृत्वाच्या हितसंबंधाची काळजी घेतात. म्हणजेच हितसंबंधी गट, प्रशासक वर्ग आणि राजकीय वर्ग परस्परांच्या हितसंबंधाची काळजी घेतात. त्यांच्यातील या संगनमतामुळे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेपासून त्याच्या अंमलबजावणीपर्यंतच्या सर्व प्रशासकीय प्रक्रिया भ्रष्ट होतात.

viii) **राज्यकर्ते आणि प्रशासक वर्गाचे संगनमत** – प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण ठेवून ती भ्रष्ट होणार नाही याची दक्षता घेणे हे राजकीय वर्गाचे कर्तव्य असते. मात्र २० व्या शतकात प्रतिनिधिक लोकशाहीचा विकास आणि मताधिकाराची वाढती व्याप्ती यामुळे राजकीय पक्षातील सत्तासंघर्ष अधिकाधिक अटीतटीचा झाला आहे. सत्ता संपादन करण्याकरिता राजकीय पक्ष निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात. आज निवडणूक प्रक्रिया अत्यंत खर्चिक बनली आहे. निवडणुकांकरिता निधी उभारणे हे राजकीय पक्षांपुढे आलेले सर्वात मोठे आव्हान आहे. याकरिता ते प्रशासक वर्गाशी संगनमत करून आपल्या अधिकारपदाचा गैरवापर करतात. तर 'जी हुजूर' वर्गात मोडणारे प्रशासकीय अधिकारी त्यांना सामील होतात.

**३. प्रशासकीय भ्रष्टाचार निर्मूलनाचे उपाय –**

विकासाच्या प्रक्रियेतील सर्वात मोठा अडथळा राजकीय व प्रशासकीय भ्रष्टाचार आहे. सरकारने भ्रष्टाचार या समस्येचा छडा लावण्याकरिता वेळोवेळी चौकशी आयोगांची नेमणूक केली. प्रशासकीय सुधार आयोगानेदेखील या समस्येवर विविध उपाययोजना सुचविल्या. शासनाने वैधानिक तरतदी, सनदी नोकरवर्गाच्या सेवाशर्तीसंबंधीचे नियम, खात्यांतर्गत दक्षता यंत्रणा, भ्रष्टाचार निर्मूलन यंत्रणा, लोकपाल व लोकयुक्तसारख्या उच्चपदस्य स्वायत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती, भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध झाल्यास त्याबाबत कठोर कारवाईची तरतूद अशा अनेकविध मार्गाद्वारे भ्रष्टाचार निर्मूलनाचा प्रयत्न केला आहे. मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी भ्रष्टाचार निर्मूलनाकरिता करण्यात आलेली उपाययोजना निष्प्रभ ठरली आहे. भारतात प्रशासकीय भ्रष्टाचार निर्मूलनाकरिता उपलब्ध असलेल्या विविध उपाययोजनांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

i) **भारतीय दंड विधानातील तरतुदी** – भारतीय दंड विधान कलम १६१, १६५ व १६५-अ प्रशासकीय भ्रष्टाचाराशी निगडित आहेत. या तरतुदींद्वारे, सरकारी कर्मचाऱ्यांद्वारे केला जाणारा भ्रष्टाचार दखलपात्र गुन्हा आहे. त्याकरिता ३ वर्ष सश्रम कारावास व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

ii) **भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९४७** – १९४७ च्या भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील तरतुदी नुसार प्रशासकीय भ्रष्टाचार दखलपात्र गुन्हा आहे. या कायद्याद्वारा सक्षम पोलीस अधिकाऱ्यांना संबंधित कर्मचाऱ्याच्या निवासाची झडती घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कर्मचाऱ्याचे उत्पन्न त्याच्या ज्ञात उत्पन्न साधनांपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले आणि त्याबाबतीत तो समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकला नाही, तर त्याने आपली सरकारी कामे करताना भ्रष्टाचार केल्याचा आरोप सिद्ध होऊन त्याकरिता त्याला ३ वर्षांचा सश्रम कारावासाची शिक्षा होऊ शकते. संबंधित कर्मचाऱ्याची चौकशी चालू असताना त्याला तात्पुरते निलंबित करण्याची तरतूद आहे.

iii) **प्रशासकीय दक्षता विभाग** – १९५५ साली गृहमंत्रालयात दक्षता विभागाची स्थापना करण्यात आली. केंद्र सरकारच्या निरनिराळ्या मंत्रालयात किंवा आस्थापनेत सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यातील प्रशासकीय भ्रष्टाचारावर सातत्याने आणि बारकाईने लक्ष देण्याची जबाबदारी या विभागाकडे सोपविण्यात आली. १९६२ साली सर्व केन्द्रीय मंत्रालयात त्यांच्या दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली. प्रत्येक

मंत्रालयातील एका जेष्ठ अधिकाऱ्याची मुख्य दक्षता अधिकारी म्हणून नेमणूक केली जाते. हा अधिकारी संबंधित खात्याच्या सचिवाला त्या खात्यातील प्रशासकीय भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची चौकशी करून त्यासंबंधीचा अहवाल सादर करतो. त्या अहवालाच्या आधारे भ्रष्ट कर्मचाऱ्यांविरुद्धच्या कारवाई केली जाते.

iv) **केंद्रीय दक्षता आयोग** – १९६२ मध्ये तत्कालीन सरकारने श्री. के. संथानम यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय आयोगाची नेमणूक केली होती. या आयोगाने १९६४ मध्ये आपला अहवाल शासनास सादर केला. त्यात केंद्रीय दक्षता आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली. त्यानुसार १९६४ साली 'केंद्रीय दक्षता आयोगा'ची स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या अध्यक्षस्थानी मुख्य दक्षता आयुक्त असतात. त्यांची नेमणूक राष्ट्रपतीद्वारा करण्यात येते. त्यांचा कार्यकाल सहा वर्षाचा किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत असतो. त्यांना अधिकारपदावरून मुक्त करण्याचा अधिकार संसदेस आहे. केंद्रीय दक्षता आयोगाची विभागणी १) सर्वसामान्य तक्रारी व त्यांच्या निवारणाचा विभाग २) केंद्रीय पोलीस विभाग ३) केंद्रीय दक्षता विभाग या तीन भागांत करण्यात आली आहे. तर केंद्रीय दक्षता आयोग त्यांच्या कार्यकक्षेत येणारा कोणताही कर्मचारी भ्रष्टाचारात गुंतला असेल किंवा तसा आरोप करण्यात आला असल्यास त्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची चौकशी करतो.

v) **लोकपाल आणि लोकायुक्त** – नागरिकांच्या तक्रारीची व आरोपांची शहानिशा होऊन त्यांच्या तक्रारींचे निवारण करणारी यंत्रणा म्हणजेच ऑम्बुडसमन होय. महाराष्ट्रात १९७२ साली लोकायुक्ताची नेमणूक करण्यात आली. १९६९ ते २०१३ चा कालखंडात संसदेसमोर लोकपाल व लोकायुक्त विधेयक अनेक वेळा मांडण्यात आले. या प्रक्रियेने सन २०१३ मध्ये लोकसभेने लोकपाल व लोकायुक्त विधेयक संमत केले. मात्र राज्यसभेत ते पारीत होऊ शकले नाही. २०१४ मध्ये नवीन लोकसभेचे गठन झाले. मात्र लोकपाल-लोकयुक्त पदे निर्माण करण्याच्या प्रश्नाकडे गांभिर्यपूर्णरीत्या लक्ष देण्यात आले नाही. मात्र राजस्थान, गुजरात, उत्तरप्रदेश, बिहार, कर्नाटक इत्यादी राज्यात लोकायुक्त पदाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या सहकार्याच्या अभावी या यंत्रणा अपेक्षित कामगिरी करू शकल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

**सारांश**

राज्याच्या कल्याणकारी भूमिकेमुळे त्याच्या कार्यात प्रचंड वाढ झाली आहे. आज प्रशासनाची बदलती भूमिका पाहता प्रशासनाने नैतिक मूल्यांचा आदर करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाने स्विकारलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकता व न्याय या मूल्यांच्या वृध्दीसाठी प्रशासनाने कटिबध्द असणे आवश्यक आहे. संविधानाने व कायदेमंडळाने निर्णय घेण्याचे व निर्णय प्रक्रिया राबवण्याचे महत्वाचे अधिकार कार्यकारी मंडळ व प्रशासन यांना दिले आहेत. त्यामुळे जबाबदारीने व नैतिक पध्दतीने अधिकारांचा वापर करणे अभिप्रेत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणावर विकासात्मक बदल व सुधारणा झाल्या आहेत. राज्याची भूमिका ज्याप्रमाणे व्यापक होत आहे, त्याचप्रमाणे

प्रशासनाची भूमिकाही व्यापक होत आहे. त्यामुळे प्रशासनाने नैतिक मूल्यांचा आदर करुन देशाच्या नागरिकांना गतिशील, पारदर्शक, संवेदनशील, उत्तरदायी व कार्यकुशल प्रशासन केले पाहिजे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–४**

**योग्य पर्याय निवडा.**

१. "The Power of Ethical Management' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) अवस्थी आणि माहेश्वरी    ब) नार्मन विन्सेन्ट पीले आणि कैनेथ ब्लॅकार्ड

क) श्री. ए. डी. गोरवाला    ड) श्री. के. संथानम

२. महाराष्ट्रात ......... साली लोकायुक्ताची नेमणूक करण्यात आली.

अ) १९७२    ब) २०१३    क) १९६९    ड) २०१४

३) केंद्रीय दक्षता आयोगाचे अध्यक्ष मुख्य दक्षता आयुक्त यांची नेमणूक ......... हे करतात.

अ) पंतप्रधान    ब) राज्यपाल    क) राष्ट्रपती    ड) मुख्यमंत्री

## २.३ सारांश

स्वातंत्र्यानंतर आपण राज्यकारभारासाठी संसदिय लोकशाही व विकासात्मक भूमिका स्वीकारली. या भूमिकेमुळे भारतीय प्रशासनाच्या कार्यपद्धतीत अमुलाग्र बदल झाला आहे. भारतीय प्रशासनाची नियमक भूमिका कमी होत जाऊन विकासात्मक भूमिका वाढत आहे. लोकांचा व लोकप्रतिनिधींचा विकासातील सहभाग, विकासातील लिंगभाव समानता, दुर्बल घटकांकरिता विकास प्रशासन व प्रशासकीय नैतिकता या बाबींना आज प्रशासनात महत्व प्राप्त झाले आहे. आज प्रशासनाकडून जनसहभाग वाढण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविली जात आहे, दुर्बल घटकांच्या विकासासाठी स्वतंत्र यंत्रना उभारून प्रयत्न केले जात आहेत. परंतु सद्यकाळात प्रशासनातील भ्रष्टाचार, पक्षपात, उत्तरदायित्वाचा अभाव, बेजबाबदारपणा अश्या अनेक कारणांमुळे प्रशासन व जनता यामध्ये समन्वय, आपलेपणाचा अभाव दिसून येत आहे. परिणामी राष्ट्रीय विकासात अडथळे येत आहेत.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**लोकसहभाग** – विकास कार्यात जनतेचा सहभाग असणे.

**सार्वजनिक धोरण** – सरकारने स्वीकारलेल्या कृतीचा पाठपुरावा, सार्वजनिक हितासाठी ठरविलेले किंवा राबविलेले धोरण.

**विकास प्रशासन** – समाजात आधुनिकता आणणे, प्रशासकीय क्षमता वाढवणे.

**प्रतिमान** – प्रारूपे, नमुने किंवा आराखडे.

**सुशासन** – चांगले शासन.

**कल्याणकारी प्रशासन** – सामाजिक समस्यांचे अध्ययन, विश्लेषण व निराकरण करणारे प्रशासन.

**प्रशासकीय नैतिकता** – राज्यकर्त्यांनी किंवा प्रशासकीय अधिकारी वर्गाने आपली जबाबदारी पार पाडताना कोणताही व्यक्तीगत स्वार्थ न बाळगणे.

**भ्रष्टाचार** – गैरवर्तन, सत्तेचा व पदाचा दुरुपयोग करणे.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न – १ ची उत्तरे

१. ड) सर हिप

२. क) कै. आर. आर. पाटील

३. ब) निरक्षरता

स्वयं अध्ययन प्रश्न – २ ची उत्तरे

१. ड) १९८०

२. ब) बीजिंग

३. क) ईस्टर बोसरुप

स्वयं अध्ययन प्रश्न – ३ ची उत्तरे

१. ब) १९५३

२. अ) ३१ जानेवारी १९९२

३. ड) ३

स्वयं अध्ययन प्रश्न – ४ ची उत्तरे

१. ब) नार्मन विन्सेन्ट पीले आणि कैनेथ ब्लॅकार्ड

२. अ) १९७२

३. क) राष्ट्रपती

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. लोकसहभाग म्हणजे काय ते सांगून त्याची आवश्यकता स्पष्ट करा.

२. लोकसहभाग म्हणजे काय ते सांगून लोकसहभागासमोरील आव्हाने विषद करा.

३. विकासातील लिंगभाव समानता ही संकल्पना विषद करा.

४. दुर्बलांच्या विकासातील कल्याणकारी प्रशासनाचे योगदान स्पष्ट करा.

५. प्रशासकीय नैतिकता म्हणजे काय ते सांगून प्रशासकीय नैतिकतेची तत्वे व आवश्यकता विषद करा.

६. प्रशासकीय नैतिकता म्हणजे काय ते सांगून प्रशासकीय नैतिकतेच्या ऱ्हासामुळे निर्माण झालेल्या समस्यावर चर्चा करा.

७. प्रशासकीय भ्रष्टाचाराची कारणे व त्यावरील उपाय स्पष्ट करा.

ब) टीपा लिहा.

१. लोकसहभागाचे महत्व

२. लोकसहभागाची साधने

३. लोकसहभाग वाढीसाठी प्रभावी उपाय

४. राष्ट्रीय महिला आयोग

५. दुर्बलांकरिताच्या कल्याणकारी प्रशासनाचे महत्व

६. प्रशासकीय भ्रष्टाचार निर्मूलनाचे उपाय

## २.७. अधिक वाचण्यासाठी पुस्तके –


१. Norman Vincent Peale and Kenneth Blanchard, The Power Of Ethical Management, Ebury Publishing, London, 1988.

२. Henry Nicholas, Public Administration  Public Affairs (Ninth Edition), Prentice Hall of India, New Delhi.

३. Lakshmikant M, Public Administration, McGraw Hill Education Publication, 2012.

४. Tapas Kumar Dalapati and Yatindra Singh Sisodia, Strategies for Human Development and People’s Participation in Rural India, Primus book, 2021.

५. Young, K., Gender and Development : Notes for a Training Course on Gender and Development, Toronto, 1987.

६. डॉ. फडिया बी एल, भारतीय प्रशासन, साहित्य भवन प्रकाशन, आग्रा, २०१८.

७. प्रा. बंग के आर, विकास प्रशासन, विद्या प्रकाशन, पुणे, २०१०.


❑❑❑